म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १७२९
११६५

# रविवारची चिंतनिका

ह. रा. महाजनी

REFBK-0015930

[illegible]ना प्रकाशन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ४४०६२ वि: निबंध
क्रमांक १८२९ नों: दि: २५।११।८७

रविवारची चिंतनिका

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ..........

रविवारची चिंतनिका

साधना प्रकाशन

ह. रा. महाजनी

ह. रा. महाजनी

साधना प्रकाशन

रविवारची चिंतनिका

REFBK-0015930

प्रथमावृत्ती १९६७
प्रकाशक
प्रभाकर सिद्ध
साधना प्रकाशन
४३०-३१ शनिवार, पुणे
मुद्रक
वि. नी. पटवर्धन
साधना प्रेस
४३०-३१ शनिवार, पुणे
© ह. रा. महाजनी
मुखपृष्ठ
र. स. कंटक
किंमत
रु. १०·००

अनुक्रम

## राजकीय व तात्त्विक


प्रस्तावना ७
१ मध्यम मार्ग–दीपिका १९
२ लोकशाही, गुंडशाही, झुंडशाही व शिष्टशाही २६
३ अंधानुकरण नको; सात्मीकरण हवे ३३
४ स्वतंत्र–प्रज्ञा उबगली आहे ३९
५ तत्त्वशून्य पक्षांतर : एक दुधारी हत्यार ४५


## राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय


१ अणुबॉम्ब—निर्मिती ! ५३
२ स्वावलंबनाचे असिधारा व्रत ५९
३ राष्ट्रीय एकात्मता ६५
४ दोन कम्युनिस्ट धर्मपीठे ७१
५ झुकती तटस्थता ७७

## व्यक्तिचित्रे


१ पंडित जवाहरलाल नेहरू ८९
२ स्वातंत्र्यवीर सावरकर ९९
३ आचार्य विनोबा भावे १०९
४ लालबहाद्दूर शास्त्री ११७
५ काकासाहेब गाडगीळ १२५
६ विन्स्टन चर्चिल १३३


## संकीर्ण


१ गर्भपात- आपद्धर्म १४५
२ जीवन व ज्ञान यांतील तफावत १५१
३ नादब्रह्माचा आविष्कार १५७
४ शीतळ चंद्रतळ अंगार ओकणार ? १६२


## वाङ्मयीन


१ शाकुंतलचा आठवा अंक १७१
२ दुर्बोधतेची दुर्बोध मीमांसा १७७

संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५८३०

## प्रस्तावना

लोकसत्तेच्या रविवारच्या आवृत्तीत ' रविवारची चिन्तनिका ' या सदरात प्रसिद्ध झालेल्या लेखांपैकी काही लेख ग्रंथरूपाने वाचकांच्या हाती देताना मला आनंद वाटणे स्वाभाविक आहे. रविवारची चिन्तनिका सुरू झाली तेव्हापासून यातील लेख ग्रंथरूपाने प्रसिद्ध करण्याविषयी मला वाचकांची अनेक पत्रे आली. पण आजच्या प्रकाशनयुगात ' वक्ता श्रोता च दुर्लभः ' या दुर्लभ जोडीप्रमाणेच लेखक व प्रकाशक ही जोडीही दुर्लभ होऊन बसलेली आहे. त्यामुळे साधना-प्रकाशनाच्या चालकांनी हा ग्रंथ प्रसिद्ध करण्याचे मनावर घेतले याबद्दल त्यांचा मी खास करून ऋणी आहे. क्रमिक पुस्तके, चटोर कथा, उत्तान शृंगाराने रसरसलेल्या कादंबऱ्या इत्यादि बाजारपेठेत सहज खपणाऱ्या मालमसाल्यासारखा हा वाङ्मयीन प्रकार नाही; म्हणून हे ऋण विशेषच जाणवते.

चिन्तनिका या नावावरून हे स्पष्ट व्हावे की या लेखांचे स्वरूप प्रकट चिंतनाच्या स्वरूपाचे आहे. यंत्रयुगातील घाईगर्दीच्या व धकाधकीच्या जीवनात जर कोणती एक गोष्ट दुर्मिळ झाली असेल तर ती चिन्तन ही होय. शिवाय मार्क्सवादी युगात मार्क्सने चिन्तनाचा भाव पार खाली उतरवून ठेवला आहे! " आतापर्यंत तत्त्ववेत्त्यांनी विश्वाचे चिन्तनच केले; आता आपणांस हे विश्व

पालटावयाचे आहे " ( Hitherto Philosophers have contemplated the world, we have to change it ) हे त्याचे वचन प्रसिद्धच आहे. त्यामुळे चिन्तनशीलता हा आजचा युगधर्म नाही. जे काही बोलायचे असेल ते थोडक्यात, सूत्ररूपाने बोला असे एकमेक एकमेकांना बजावीत असतात. वास्तविक चिन्तनशीलता हा ज्या युगाचा धर्म होता, त्या युगात सूत्रवाङ्मयाचा आविष्कार झाला. आज ग्रंथप्रसवाला काही मर्यादा राहिलेली नाही आणि वाटेल त्या विषयावर भाराभर ग्रंथ बाहेर पडत असतात! तथापि लोकांना हा फापटपसारा पाहण्यासही उसंत नाही. तेव्हा ज्या काळात सूत्रवाङ्मयाची तशी गरज नव्हती त्या काळात सूत्रवाङ्मय मोठ्या प्रमाणावर निर्माण होते आणि ज्या काळात सूत्रवाङ्मय अजिबात थंडावले, त्या काळात त्याची गरज उत्कटतेने भासते, हा विरोधाभास लक्षात ठेवण्यासारखा आहे.

तथापि या यंत्रयुगातच, घाईगर्दीच्या युगातच चिंतनाची गरज आहे. या विज्ञानप्रणीत यंत्रयुगात मानवासमोर सर्व सुखसोयी हात जोडून उभ्या आहेत. त्याच्या सर्व प्रकारच्या भौतिक गरजा भागविण्यासाठी हजारो उपकरणे, साधने प्रत्यही निर्माण होत आहेत आणि या साधनसंभारामुळे त्याच्या भौतिक गरजाही वाढू लागल्या आहेत. थोडक्यात हे युग साधनसंपन्न आहे, उपकरणसंभाराने भरून गेले आहे. आणि ही उपकरणसंपन्नता कायमची टिकविण्यासाठी त्याला क्षणाची उसंत नाही, फुरसत नाही. पण या भौतिक समृद्धीला घेऊन काय चाटावयाचे ? त्याला चिन्तनाला थोडी तरी सवड नको काय ? कारण त्याच्या ठायी चिन्तनशीलता निर्माण झाल्याशिवाय त्याला आपल्या जीवनाचा बुद्धिगम्य उलगडा करता येणार नाही. उपकरणे माझ्यासाठी आहेत, मी उपकरणांचा गुलाम नाही हा विवेकही होऊ शकणार नाही. या चिन्तनाअभावी मानव आज या उपकरणांचा गुलाम बनला आहे असे खेदजनक दृश्य आपण पाहत आहोत. हे चित्र पालटावयाचे असेल तर आपण चिन्तनशीलतेच्या मूल्याची जपणूक केली पाहिजे. नाहीतर ' स्वामी तिन्ही जगांचा ' हे केवळ काव्यच ठरेल.

या विश्वाचा बुद्धिगम्य उलगडा करण्यासाठी जे विज्ञान जन्म पावले, त्या विज्ञानाचा चिन्तन हाच खरा आधार आहे. सामाजिक गरजेतून विज्ञानाचा जन्म झाला असून समाजपरिवर्तनासाठी विज्ञानाचा उपयोग झाला पाहिजे असा

विज्ञानाला आदेश दिला जातो. पण विज्ञानाचे मूळ स्वरूप क्रियात्मक नसून चिन्तनात्मक आहे असे मला वाटते. ' को अद्धा वेद क इह प्रवोचत् ' या जिज्ञासेतून विज्ञानाचा जन्म झाला. विश्वातील अनंत रहस्यांचा उलगडा करून आत्मसमाधान मिळवावे यातच विज्ञानाने कृतकृत्यता मानली. ज्या वेळी झाडावरली शेंग खाली पडली असे न्यूटनने पाहिले, त्या वेळी ती खालीच का पडली, वर अंतरिक्षात का उडाली नाही अशी जिज्ञासा त्याच्या मनात निर्माण झाली आणि गुरुत्वाकर्षणाचा सिद्धान्त बांधून शेंग-पतनाचा त्याला बुद्धिगम्य उलगडा झाला, तेव्हा त्याला विलक्षण आत्मिक समाधान लाभले असले पाहिजे ! कोणत्या सामाजिक गरजेतून गुरुत्वाकर्षणाचा सिद्धान्त जन्म पावला आणि कोणती सामाजिक गरज भागविण्यासाठी त्याचा उपयोग व्हावा हे प्रश्न, मला वाटते, तेथे गैरलागू आहेत.

चिन्तनशीलतेपासून विज्ञानाचा क्रियाशीलतेपर्यंत झालेला प्रवास हा विज्ञानाचा विकास आहे का मानवाचा त्यात ऱ्हास आहे याचा निर्णय अजून लागावयाचा आहे. पण एक गोष्ट खरी, विश्वाचे चिन्तन करणाऱ्या विज्ञानाने मानवाच्या हातात अपरंपार सत्ता दिली. ज्या कारणाने मानवाला ही सत्ता प्राप्त झाली ते कारण म्हणजे विज्ञानाने निर्माण केलेला कार्यकारणभाव ( Law of Causality ). अमुक एक घटना घडली की, ती कोणत्या कारणाने घडली याचा शोध घेतल्याखेरीज विज्ञान स्वस्थ बसू शकत नाही. कार्यकारण भावाची संगती लावणे हा विज्ञानाचा धर्म आहे. पण एवढ्यावरच थांबते तर काही हरकत नाही. त्यावरच मानवाचे समाधान झाले नाही. कारणाचा शोध लागल्यानंतर, त्या कारणावर ताबा मिळवून आपणांस हवी ती व हवी तशी कार्यनिष्पत्ती करण्यासाठी मानवाची धडपड सुरू झाली. या धडपडीतूनच मानवाला या विश्वावर, मानवसमाजावर अपरंपार सत्ता गाजविण्याचे सामर्थ्य मिळाले. सूक्ष्म अणूचा भेद करण्यापासून चंद्र-मंगळावर स्वारी करण्यापर्यंत आज तो अप्रतिहत संचार करू लागला आहे. विज्ञानापासून प्राप्त झालेली ही सत्ता, हे सामर्थ्य मानवाला मिळालेले वरदान आहे का शाप आहे असा आज भल्याभल्यांना संभ्रम निर्माण झाला आहे.

विज्ञानाने मानवाला या सृष्टीवर अभूतपूर्व सत्ता दिली असली तरी चिंतनशीलता हाच विज्ञानाचा मूळ धर्म आहे. या विश्वातील घटनांचे निरीक्षण करावे, न उलगडणारी कोडी उलगडण्याचा प्रयत्न करावा आणि विश्वातील

रहस्यांचे ज्ञान झाल्यावर त्यातच कृतार्थता मानावी हे विज्ञानाचे सात्विक स्वरूप आहे. पण विश्वातील रहस्यांचे ज्ञान झाल्यानंतर परिस्थिती आपण हवी तशी वाकवू शकतो ही जी मानवाला जाणीव झाली, त्या जाणिवेने विज्ञानाच्या प्रवाहाला एक वेगळी कलाटणी मिळाली. त्या प्रवाहातून मानवाचा अहंभाव जागा झाला. स्वामित्वाची भावना निर्माण झाली. विज्ञानाला सत्तेच्या गाडयाला जुंपण्यात आले. मानवाच्या आधिभौतिक जीवनातील विविध गरजा भागविण्यासाठी विज्ञानाला वेठीला धरण्यात आले. संशोधनाचे आत्मप्रबोधनात पर्यवसान न होता, त्यातून प्रयोगशाळा निर्माण झाल्या आणि या प्रयोगशाळांमधून मानवाच्या आधिभौतिक गरजा भागविणारी आणि मानवाचा संहार करणारी उपकरणे निर्माण झाली. मूळ सात्विक प्रवृत्तीच्या विज्ञानातून भोग व विनाश ही राजस व तामस संपत्ती – जिला गीतेत आसुरी संपत्ती असे नाव दिले आहे – बाहेर आली. या सर्व अनर्थाचे कारण एकच. आणि ते म्हणजे, चिन्तनाचा मूलाधार तुटला. ‘ किं तया क्रियते धेन्वा या न सूते न दुग्धदा ’ या उपयुक्ततेच्या मापाने विज्ञानाचे मोजमाप घेण्यास सुरवात झाली.

फार वर्षांपूर्वी वाचलेल्या रसेलच्या ‘वैज्ञानिक दृष्टिकोण ’ ( Scientific Outlook ) या ग्रंथाची आज मला उत्कटत्वाने आठवण होत आहे. त्या ग्रंथात ‘ विज्ञान आणि मानवी मूल्ये ’ असे एक प्रकरण असून मानवी मूल्यांबाबत विज्ञान तटस्थ आहे असे तो सांगतो. याचा अर्थ अगदी स्पष्ट आहे. या सृष्टीतील अज्ञात घटना ज्ञात करून देणे, त्या घटनांमधील कार्यकारणभावाची संगती उलगडून दाखविणे आणि त्या ज्ञानाच्या सामर्थ्यावर मानवाला भौतिक परिस्थितीवर मात कशी करता येईल याविषयी मार्गदर्शन करणे एवढेच विज्ञानाचे काम. पण या ज्ञानसामर्थ्याच्या बळावर माणसाने कसे वागावे याविषयी विज्ञान काही सांगू शकत नाही. कसे आहे याचा बोध विज्ञान देऊ शकते; कसे असावे याविषयी विज्ञान मौन पाळते. कसे असावे येथून जीवनमूल्यांचा प्रांत सुरू झाला आणि या प्रांतात प्लेटो सांगतो त्याप्रमाणे मानव ज्ञानी झालेला असला तरी अजून शहाणा झालेला दिसत नाही.

यासाठी विज्ञानाच्या चिन्तनशीलतेवर मी अतिरिक्त भर देतो. आज प्रायोगिक विज्ञानाची ( applied sciences ) चलती आहे. शुद्ध विज्ञानाचा भाव बराच कमी झाला आहे. कारण शुद्ध विज्ञानात चिन्तन आहे. विज्ञाननिष्ठ

युगातील मानवाला चिंतन आवडत नाही. एक तर त्याला चिंतन करण्याइतकी सवड नाही. जीवनात धावपळ, संघर्ष, समुदाय, सतत गती, सतत क्रियाशीलता यांनी त्याला एके जागी क्षणभर थांबून मागे सिंहावलोकन करण्याची फुरसत नाही. यासाठी 'थांबला तो संपला' असे एक सोयिस्कर सूत्र त्याने शोधून काढले आहे. त्याला थांबायला उसंत नाही. या वस्तुस्थितीचे त्याने एक तत्त्वज्ञान बनविले आहे. दुसरे, आजचा मानव फार उपयुक्ततावादी बनला आहे. त्याला चिंतन हा पाण्यावर थापट्या मारण्यासारखा वायफळ उद्योग वाटतो. विज्ञानातून जी भौतिक निर्मिती होते, त्याला तो महत्त्व देतो. 'बाप दाखीव, नाहीतर श्राद्ध कर' अशी काहीशी त्याची मनोवृत्ती झालेली आहे.

'धावणे' या क्रियेला आज फार महत्त्व. संस्कृत व प्रौढ भाषेत याला गती व प्रगती असे म्हणतात. गतिमानता, प्रगतिशीलता हे या युगाचे परवलीचे शब्द होऊन बसले आहेत. पण गतीला स्थितीचा आधार नसेल तर त्या गतीला काही अर्थ आहे का ? मुक्काम नसलेला अखंड प्रवास म्हणजे वेड्यासारखे भटकणे नव्हे काय ? हे ओळखूनच पूर्वाचार्यांनी परमपुरुषाचे 'स्थाणुरिवायं अचलप्रतिष्ठः' असे वर्णन केले आहे. कविकुलगुरू यापुढे एक पाऊल जाऊन म्हणतो, की "विकृतिर्जीवितमुच्यते बुधैः" जगत् आणि जीवित त्याच्या दृष्टीने विकृती होत. क्रियाशीलता हा एक विकार आहे. क्रांती हा मानवाचा स्वभाव नाही. त्याला इतिहासात क्वचित प्रसंगी क्रांतीचा आधार घ्यावा लागला असेल. पण क्रांती केल्यानंतर जे काही घडते, त्याचा विचार केला तर क्रांती ही स्पृहणीय अवस्था ठरत नाही, कारण क्रांतीच्या मागे चिंतन नसते; विचार नसतो.

म्हणून विज्ञाननिष्ठ जगातील वेगवान जीवनाला चिंतनाची नितांत गरज आहे. मानवाला विसावा हवा आहे. धावपळीच्या जीवनातून दूर कोठेतरी, एखाद्या डोंगराच्या पायथ्याशी, संथ वाहणाऱ्या नदीप्रवाहाच्या किनारी, एका तरुतळी शिलाखंडावर बसून सिंहावलोकन करण्याची त्याला भूक आहे. अशा शांत वातावरणात प्रतिभा बहरते, विचार सुचतात, बुद्धीला नवे नवे उन्मेष येतात आणि मानवी जीवनाला यांची फार गरज आहे. आज त्याच्या हाती असलेली शस्त्रे शास्त्राविना त्याला मिळाली नसती आणि ज्या शास्त्रांनी त्याला ही शस्त्रे दिली त्या शास्त्रांचा जन्म चिंतनातून, एकांतात बसून केलेल्या चिंतनातून झालेला

आहे. क्रियाशीलतेलाही चिंतनशीलतेचा आधार असावा लागतो. अन्यथा त्या क्रियेला आंधळ्या प्रतिक्रियेचे स्वरूप येईल.

रविवारची चिन्तनिका सुरू करताना माझी भूमिका अशी होती. वृत्त-पत्राच्या व्यवसायात उसंत नाही. ज्या दिवशी जो प्रश्न निर्माण होईल, त्या दिवशीच त्या प्रश्नाचा विचार झाला पाहिजे, हा या व्यवसायाचा दण्डक. नाहीतर तो विषय शिळा झाला. शिळेपणाचे या व्यवसायाला फार वावडे. या व्यवसायात सारे काही ताजे, गरमागरम असावे लागते. साहजिकच येथे चिन्तनाला अवसर फक्त एकाच दिवशी असतो. तो दिवस म्हणजे रविवार. वाचकालाही सवड असते. रोज धावतपळत लोकल पकडून त्या लोकलच्या प्रवासात वृत्तपत्रे चाळणारा वाचक रविवारी ते वृत्तपत्र वाचण्याच्या मनःस्थितीत असतो. त्यालाही हजारो प्रश्न भंडावीत असतात. पण त्यांचा विचार करायला सवड मिळते ती रविवारी. त्या रविवारी त्याच्या चिन्तनाला थोडी चालना मिळावी हा या चिन्तनिकेचा उद्देश.

पत्रकाराचे व्यावसायिक जीवन मोठे गमतीदार असते. तसा तो स्थिर असतो. पण त्याच्याभोवती जग फिरत असते. चलच्चित्रपटातील प्रसंगांप्रमाणे त्याच्यासमोर घटना व प्रसंग सारखे धावत असतात. या क्षणाला नायगेरियातील यादवीचा प्रसंग तर दुसऱ्या क्षणी राहत्या गावातील घात–आघात–अपघात. पश्चिम आशियातील युद्धाची रोमहर्षक वृत्ते वाचावीत तोच भारताच्या काही भागात नद्यांच्या महापुराने ओढवलेले अनर्थ दृष्टीस पडतात. अंतरिक्षयानातून चंद्राची टिपलेली छायाचित्रे नजरेखालून घालावीत तोच कोसळलेल्या इमारतीचे भाग दृष्टिपथात येऊ लागतात. लोकसंख्येचे वाढते कोष्टक नजरेखालून घालीत असतानाच भूकंपाने घातलेले मृत्यूचे थैमान दृष्टीस पडते. जन्म-मृत्यू, निर्मिती-नाश, युद्ध–शांती, शस्त्रांचे खणखणाट व शांतिमंत्रांचे पाठ अशी परस्पर विरोधी द्वंद्वे अनुभवताना मनाला किती ताण पडत असेल याची कल्पनाच केलेली बरी. या वातावरणामागे वळून गत घटनांचे अवलोकन करण्याची गरज भासल्यास नवल नाही. चिंतनिका हा एक ' फ्लॅशबॅक ' आहे.

प्रचलित अशा अनेक विषयांवरील लेखांचा हा संग्रह. तथापि या सर्व लेखांमधून एका विशिष्ट दृष्टीने घटनांचा अन्वयार्थ लावण्याचा मी प्रयत्न केला आहे. मी बुद्धिवादाचा पुरस्कर्ता आहे हे आता जगजाहीर आहे. पण माझ्या

बुद्धिवादी भूमिकेचे थोडे स्पष्टीकरण आवश्यक आहे. मी बुद्धिवादी असलो तरी श्रद्धेला मानतो. किंबहुना मानवी जीवनाचा बराच मोठा भाग श्रद्धेने व्यापलेला आहे. त्या श्रद्धेविना माणसाला जगता येणार नाही. असेही म्हटल्यास हरकत नाही की बुद्धीवर माझी श्रद्धा आहे. हा एक वदतो व्याघात वाटेल. पण तसा तो नाही. बुद्धीवर माझी श्रद्धा या अर्थाने आहे की मानवी बुद्धी अपरिपक्व व अपूर्ण असली तरी कार्याकार्यविवेकाचे बुद्धीखेरीज मानवापाशी दुसरे कोणतेही साधन नाही. त्यामुळेच माझी अशीही श्रद्धा आहे की, माझ्याप्रमाणेच इतरही विचार करू शकतात आणि त्यामुळे केवळ कोणा एका व्यक्तीला–मग ती व्यक्ती कितीही मोठी असो–बुद्धिप्रभावाने अंतिम सत्याचा निर्णय लागणार नाही. या दृष्टीने मी मानतो तो बुद्धिवाद लोकशाहीला पोषक आहे. कारण या बुद्धिवादात परमतसहिष्णुता आहे, विचारविनिमयाला थारा आहे. खेरीज या बुद्धिवादात कोणाही एका व्यक्तीला इतरांपेक्षा अधिक महत्त्व नसल्याकारणाने विभूतिपूजेला हुकूमशाहीला स्थान नाही.

महनीयता मी मानत नाही असा याचा अर्थ नाही. समाजात ‘ लेव्हलिंग ’ असावे अशा मताचा मी नाही. उंची कमी अधिक असणार. पण उच्चतेविषयी आदर असला तरी आपली बुद्धी गुंडाळून नमावे असा याचा अर्थ नाही. मानवी जीवनात श्रद्धेला फार मोठे स्थान आहे. श्रद्धास्थानाशिवाय कोणताही समाज जगू शकत नाही. पण देशकालनिमित्ताने जुनी श्रद्धास्थाने टाकून देण्याचा प्रसंग आला असताना, ही श्रद्धास्थाने टाकून द्या असे सांगण्याचे धैर्य बुद्धिवाद्याखेरीज इतरापाशी नाही. या अर्थाने मी बुद्धिवादी आहे आणि त्याच दृष्टिकोणातून या लेखांतील विषय हाताळण्याचा मी प्रयत्न केला आहे.

राजकारण, समाजकारण, साहित्य, कला इत्यादि जीवनाच्या विविध दालनांतून प्रवास करण्याचा या चिन्तनिकेत मी अल्पसा प्रयत्न केला आहे. तो कितपत जमला हे वाचकांनी ठरवावे. आपल्या सर्वच जीवनाला मरगळ आली आहे असे केव्हा केव्हा वाटू लागते. अलीकडील काळात तर ती मरगळ प्रकर्षाने जाणवू लागली आहे. या कालखंडात कशाची गरज असेल तर ती विचाराची. आचार फार झाला. असा एक दिवस जात नाही की त्या दिवशी संप, मोर्चा, निदर्शने, इत्यादि आचार होत नाही. पण त्यामागे विचारांचा अभाव जाणवतो. होते आहे ती आंधळी प्रतिक्रिया. ठराविकाच्या चाकोरीतून हे सारे आचार

घडतात; ठराविक घोषणा दिल्या जातात, ठराविक परवलीचे शब्द उच्चारले जातात. या ठराविकामागील गृहीत कृत्यांना आव्हान दिले तर आव्हान देणारावर टीकेचा भडिमार होतो. या चिन्तनिकेत असे आव्हान देण्याचा अल्पसा प्रयत्न आहे.

हा लेखसंग्रह पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्यास लोकसत्तेच्या चालकांनी परवानगी दिली याबद्दल त्यांचा मी आभारी आहे. माझे सहकारी व मित्र श्री. विद्याधर गोखले व श्री. नारायण आठवले यांचा ऋणनिर्देश येथे आवर्जून केला पाहिजे. साधना प्रकाशनाचे चालक व व्यवस्थापक यांचे आभार मानावेत तितके थोडेच आहेत.

५१७ कॉलेज रोड
मुंबई १९

--ह. रा. महाजनी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ४४०६३ वि: निबंध
१५२९ नों: दि: १५।११।८६

# राजकीय व तात्त्विक

१

# मध्यम मार्ग–दीपिका

"मी मध्यमार्गी आहे ( I am a Centrist )," पंतप्रधान ना. शास्त्री यांची घोषणा. ना. लालबहादूर शास्त्री यांची ही मध्यमार्गी भूमिका वास्तविक भुवनेश्वरच्या अधिवेशनातच स्पष्ट झाली होती. भुवनेश्वरच्या अधिवेशनात डाव्या व उजव्या, पाटील-मोरारजी आणि मेनन-मालवीय या गटात जो वाद झाला, त्या वादात आपण बरोबर मध्यभागी उभे आहोत, ही गोष्ट ना. शास्त्री यांनी भाषणात स्पष्ट करून दाखविली.

हा मध्यमार्ग कोणता ? मनू वा मार्क्स यांमधला ? पाटील व मोरारजी यांच्या स्वरूपावर ते अवलंबून राहील. साधारणतः असे दिसते की, मनू व मिल्ल यांचे एक चमत्कारिक मिश्रण मोरारजीवादात झालेले आहे. तसेच मेननवादातही निर्भेळ मार्क्सवाद आढळत नाही. मार्क्स व स्टालिन यांची मिसळ मेननवादातही झालेली असावी. मिसळ तशी चविष्ट व खमंग, पण त्यात विचारांची शुद्धता नाही. अर्थात दोन मिसळींचा मध्यबिंदू सांधणारी भूमिका म्हणजे चारी पदार्थांची थोडी थोडी चव असलेली अशी आणखी एक नवी मिसळ, असाही मध्यमार्गी भूमिकेचा अन्वयार्थ लागू शकतो. तेव्हा मध्य भूमिकेवर उभे असलेले शास्त्री नेमक्या कोणत्या भूमिकेवर उभे आहेत याचा उलगडा अजून व्हावयाचा आहे. हळूहळू तो होत जाईल, अशी आपण आशा बाळगू या.

मध्यमार्ग किंवा आपल्या परिचयाचा शब्द वापरावयाचा तर 'मध्यम मार्ग-

दीपिका ' महाराष्ट्राला नवी नाही. कै. तात्यासाहेब केळकर या मध्यम मार्ग-दीपिकेचे महाराष्ट्रातील आद्य पुरस्कर्ते. या मध्यम मार्गाबद्दल त्यांच्यावर टीकाही झाली आणि बरीच थट्टाही झाली. थट्टा कशी होत असे याचे उदाहरण तात्या-साहेबांनी स्वतःच एका व्याख्यानात सांगितले होते. त्यांच्याच शब्दात ती दिलेली बरी. " एकाने दुसऱ्याला विचारावे की, मी तुझ्या तोंडात चार मारू का आठ मारू ? " या प्रश्नाचे उत्तर मध्यमक्रम तत्त्वाने ' तोंडात सहा मारा ' असेच येणार ! " अर्थात् ही थट्टा अतिरंजित आहे, हे सांगण्याची गरज नाही. पण या अति-शयोक्तीच्या मागे एक तात्त्विक आक्षेप दडलेला आहे आणि तो आक्षेप हाच की, या मध्यम मार्ग दीपिकेला स्वतःची अशी तात्त्विक भूमिका नाही. हे मध्यम मार्ग-वाले काय करतात ? तर बरे वाईट, मृदू कठीण, सुख दुःख अशी विचारांची व प्रसंगांची दोन आत्यंतिक टोके निर्माण झाली की, त्यांचा मध्यबिंदू कोणता याचा शोध घेत बसतात. बस्स ! या पलीकडे यांचे स्वतःचे असे तत्त्व नाही. तात्त्विक आक्षेपांचे स्वरूप हे असे आहे.

या आक्षेपातूनच ही मध्यम मार्गी भूमिका संधिसाधू वृत्तीची द्योतक आहे अशी टीका होऊ लागली. ' समाजवाद चांगला की वाईट ' असे या मध्यम मार्गाला विचारा. तो असेच उत्तर देईल, ' म्हटले तर चांगला आहे, म्हटले तर वाईट आहे ' असे. बाजू अंगलट येऊ लागली तर त्यातून निसटून जाण्याची ही एक नामी युक्ती आहे. म्हणून तात्यासाहेब केळकरांच्यावर त्यांच्याच पक्षातील लोक ' श्री. केळकर यांना स्वपक्षात मित्र नाहीत आणि प्रतिपक्षात शत्रू नाहीत ' अशी टीका करीत असत. कारण मध्यम मार्गाला दोन्ही बाजूत गुणही दिसत आणि दोषही आढळून येत. त्यामुळे या भूमिकेत जसा आवेश नाही, तसाच अभिनिवेश नाही. चढ नाही तसाच उतार नाही, यश नाही, तसेच अपयश नाही; पूर्वग्रह नाही तसाच आग्रह नाही. अगदीच मुळमुळीत भेंडीची भाजी. त्याला कसला धर नाही. त्यात आप-परभाव नाही, अहंकार नाही की ममत्व नाही. स्वजन व परजन या मध्यम-मार्गाला सारखेच. अशा प्रकारे कणा नसलेली केवळ वेळ निभावून नेणारी ही भूमिका असल्याचा टीकाकारांचा दावा आहे.

मला वाटते मध्यम मार्ग दीपिकेवर टीकाकार बराच अन्याय करीत आहेत. या दीपिकेचा पुष्कळसा विपर्यास होत असून, त्याची तात्त्विक भूमिका अधिक स्पष्ट होण्याची गरज आहे. थोडक्यात या मध्यम दीपिकेवर भावार्थदीपिका नसली तरी यथार्थदीपिका कोणी तरी लिहावी. कारण मध्यम मार्ग दीपिकेचा अवलंब केवळ एकट्या तात्यासाहेब केळकरांनीच केला किंवा पंतप्रधान शास्त्री करीत आहेत असे नाही. या दीपिकेलाही फार प्राचीन काळापासून तत्त्ववेत्त्यांचे

पाठबळ लाभलेले आहे. सुप्रसिद्ध चिनी तत्त्ववेत्ता कॉन्फ्यूशिअस याने आपल्या ग्रंथाला "सुवर्णमध्याचे तत्त्व" असेच नांव दिले आहे. प्रसिद्ध ग्रीक तत्त्ववेत्ता आणि प्लेटोचा शिष्य ॲरिस्टॉटल याने देखील या सुवर्णमध्य तत्त्वाचा स्वीकार केला आहे. त्याला तर सद्‌गुणाचा अतिरेकही मान्य नाही. सुवर्ण-मध्यच कसा उत्तम हे सांगतांना फोक्युलाईडस या कवीची खालील कविता त्याने उद्‌धृत केली आहे.

The middle coin within the
State, Fares best, I ween
May I be neither low nor
Great, But even between

आपल्या महाभारतकारांनी तीक्ष्ण व मृदू या दोन टोकांचे 'तीक्ष्णादुद्विजते लोको मृदुः सर्वत्र बाध्यते' असे वर्णन करून, त्यातून 'एवं बुद्धवा महाराज मा तीक्ष्णो मा मृदुर्भव' असा मध्य मार्गच काढला आहे. कामंदकी नीतिकारांनी प्रजेला कोणती राजवट मान्य होते याचा सिद्धान्त सांगताना—

**मृदुश्चेदवमन्येत तीक्ष्णादुद्विजते जनः**
**तीक्ष्णश्चैव मृदुश्चैव**
**प्रजानां स च सम्मतः ॥**

अशी मध्यमार्गी राजकारणाची तरफदारी केलेली आढळते. कविकुलगुरू कालि-दासांनी रघुवंशाच्या आठव्या सर्गांत अज राजाच्या राजनीतीचे वर्णन केले आहे. अज राजाची राजनीती कशी होती याची कल्पना देताना कालिदास वर्णन करतो :

**न खरो न च भूयसो मृदुः**
**पवमानः पृथिवीरुहानीव ।**
**स पुरस्कृतमध्यमक्रमो**
**नमयामास नृपाननुद्धरन् ॥**

म्हणजे वारा ज्याप्रमाणे वृक्षांना हालवितो; पण मुळासकट उपटून काढीत नाही. त्याप्रमाणे मांडलिकांना स्थानभ्रष्ट न करता त्याना नमविण्याची मध्यम क्रमाची राजनीती अजाने स्वीकारली. असा मध्यम क्रमाचाच या राजनीतीत पुरस्कार केलेला आहे.

एकूण मध्यम मार्ग दीपिकेला जोराचे तात्त्विक पाठबळ आहे. थट्टेवारी उडवून लावण्यासारखी ही दीपिका नाही किंवा टीकाकार जसे भासवितात तसे तिचे स्वरूप नाही. मग मध्यम मार्ग दीपिकेचे स्वरूप तरी काय ? मला वाटते की, तत्त्व व

व्यवहार यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न म्हणजे मध्यम मार्ग. मध्यम मार्ग यातला मध्यम, उत्तम, मध्यम व अधम या श्रेणीतला मध्यम नव्हे. संगीताच्या परिभाषेत असे सांगता येईल की, पंचमाच्या खालचा आणि गांधाराच्या वरचा असा हा मध्यम आहे. हा मध्यम म्हणजे सुवर्णमध्य नव्हे. कारण विचार व आचार भूमितीतील रेषेप्रमाणे सरळ रेषेत नसतात. या मध्यमात सरळ रेषेची गती नसली तरी घड्याळाच्या लंबकाइतके आंदोलन आहे. लंबकाप्रमाणे हा मध्यम मार्ग मध्यबिंदूला स्पर्श करतो; पण तेथे थांबत नाही. लंबक मध्यबिंदूवर थांबला की, घड्याळ थांबले. तसेच या मध्यम मार्गाचे आहे. ' थांबला तो संपला ' हे तत्त्व या मध्यम मार्गालाही लागू पडते; पण त्याचबरोबर तो एका कोणत्या टोकावरही स्थिर होत नाही.

म्हणजे मध्यम मार्ग दीपिका टोकदार नाही. तथापी ती गुळगुळीत गोट्या-सारखी नाही. हाताला खुपणार नाही, पण जाणवतील असे तिला वैचारिक कोन आहेत आणि तत्त्व व व्यवहार यांचा समन्वय साधावयाचा म्हणजे असेच घडावे लागते. कोणत्याही विचाराला मर्यादा असतात. त्या मर्यादा शोधून तो विचार व्यवहाराच्या मखरात कसा बसवावा याचा मार्ग म्हणजे मध्यम मार्ग. शुद्ध चांदीचाही रुपया बनतो आणि शुद्ध तांब्याचाही रुपया बनतो; पण खरेदी-विक्रीचे देवघेवीचे व्यवहार करताना, चांदीत विशिष्ट प्रमाणात भेसळ करून रुपया खणखण वाजू लागला तरच तो व्यवहारात चालतो. निर्भेळ चांदीचा रुपया असला तरी त्याचा आवाज बद्द असतो. म्हणूनच लौकिक व्यवहार कसे चालतात याचे वर्णन करताना ' सत्यानृते मिथुनीकृत्य ' असे त्या व्यवहाराचे शंकराचार्यांनी स्वरूप मानले आहे. लौकिक व्यवहाराला शंकराचार्यांनी असे मिसळीचे स्वरूप दिले आहे. मात्र ती पुणेरी मिसळीसारखी खमंग व चविष्ट आहे.

सद्‌गुण व दुर्गुण, सदाचार व दुराचार ही जी द्वंद्वे आहेत त्यात सद्‌गुणा-प्रमाणेच दुर्गुणाचा स्वीकार करावा अशी या मध्यम मार्गाची भूमिका नाही. तर सद्‌गुण ग्राह्य असला तरी त्यालाही मर्यादा असतात, अशी ती भूमिका आहे. चांगली गोष्टही अमर्याद होऊ लागली की, ती असह्य होऊ लागते. शॉने म्हटल्याप्रमाणे पतिपत्नी चोवीस तास नुसते प्रेमच करू लागले, तर संसार चालणार नाहीच; पण प्रेमातही दम राहाणार नाही; त्याचा वीट येईल. जिलबीची गोडी कायम राहावी म्हणून आंबट मठ्ठ्याचा भुरका मारावा लागतो. याचा अर्थ गोड ग्राह्य, पण मर्यादेत, प्रमाणबद्धतेत त्याची ग्राह्यता आहे. सज्जनांचे सौजन्यही अमर्याद झाले तर हा काही काळ दुर्जन का बनत नाही, असे त्याच्या अनुयायांना वाटल्याशिवाय राहात नाही, म्हणून नंदांनी सदाचाराची ही जी परवड काढली

आहे, तिला काही मर्यादा असणे जरूर आहे. सदाचारात भ्रष्टाचार मिसळावा असा याचा विपर्यास होऊ नये. सदाचाराच्या व्यावहारिक मर्यादा न ओळखता सदाचाराचा बभ्रा होऊ लागला तर जीवन असह्य होऊन जाईल. एवढेच या मध्यम मार्ग दीपिकेला सांगावयाचे आहे. जगात रोमन सम्राट कालिगुला हे एक टोक तर प्लेटोचा आदर्श तत्त्ववेत्ता राजा हे दुसरे टोक. दोघेही राज्यव्यवहारात अपेशी ठरतात. मध्यम मार्ग दीपिका श्री नंदांना एवढेच सांगेल की, राज्यकर्ते सदाचारी जरूर ठेवा, पण कुंभमेळ्यातील बैरागी नकोत.

म्हणून पुरुषोत्तम हा मर्यादा पुरुषोत्तम आहे. मला हे माहीत आहे की, समाजात निर्भेळ तत्त्ववेत्त्यांची, प्रेषितांची व नीतिविशारदांची गरज असते; पण ' जीनियस ' थिजलेल्या समाजाला धक्का देते. व्यवहार करू शकत नाही. ख्रिस्त क्रुसावर चढल्यानंतर, त्याच्या अनुयायांनी त्याच्या धर्माचा फैलाव केला. बुद्धाचीही तीच अवस्था झाली. कार्ल मार्क्सला तर उभे आयुष्य वनवासात काढावे लागले. प्लेटोलाही आदर्श राज्यव्यवस्था व्यवहारात उतरविणे जमले नाही. या महापुरुषांनी समाज गतिमान केला, त्याला धक्के दिले; खुंटलेल्या प्रगतीची वाट मोकळी केली. हीच जीनियसची ऐतिहासिक गरज; पण त्या जीनियसने निर्माण केलेली विचारधारा व्यवहारभूमीत रुजविण्यासाठी आणि त्याची वाढ करण्यासाठी जीनियसनंतर त्याच्या अनुयायांना मध्यम मार्ग दीपिकेचाच आश्रय घ्यावा लागतो. कारण जीनियसची अखंड परंपरा नसते. जीनियसची परंपरा कायम ठेवण्यासाठी मध्यम मार्गाची गरज आहे. प्रेषिताचा पंथ झाला की, त्याच्या विचारात व्यवहार मिसळून ते ग्रहणीय करावे लागतात. नाही तर ते गर्हणीय ठरण्याचा धोका असतो. जीनियस ही ' कॉन्सेन्ट्रेटेड ' मद्यासारखी असते. त्यात व्यवहाराचे पाणी मिसळले तरच ते पेय बनते.

महात्मा गांधी व पंडित नेहरू यांच्या मार्गदर्शनानंतर शास्त्रींच्या मध्यम मार्गाची भारताला गरज आहे. ती त्यांच्या मार्गाने लोकांना जाता यावे यासाठी आहे. नवनिर्मितीनंतर, निर्माण केलेले जतन करावे लागतेच का नाही ? निर्माण करावे आणि परत नष्ट करावे एवढाच क्रम चालू राहिला तर त्या नवनिर्मितीला काही अर्थ राहील का ? पं. नेहरूंनी समाजवादाची वाट निर्माण केली; पण ह्या वाटेने पुढे जावयाचे असेल तर समाजवाद व लोकव्यवहार यांचा काहीतरी मेळ बसला पाहिजे. हा मेळ म्हणजे तत्त्व व व्यवहार यांचा समन्वय म्हणजेच मध्यम मार्ग दीपिका.

शास्त्री मध्यम मार्गी आहेत; हे डावे व उजवे यांच्या संदर्भात ठरविले जाते. एकेकाळी राजदरबारात निर्माण झालेल्या या संज्ञा. त्यांचा त्या वेळचा आणि

आताचा अर्थ यात किती तफावत पडली आहे ? या संज्ञा दिशा दाखवितात. त्या दिग्वाचक शब्दांना विचारप्रणाली चिकटली आणि मग इतिहासाच्या त्या त्या कालखंडांतील स्थितिप्रिय व गतिप्रिय गटांना उजवे व डावे अशा संज्ञा मिळत गेल्या. आज मिल्ल व मार्क्स यांच्या अनुयायांना या उजव्या-डाव्यांच्या संज्ञा लागू करण्यात येतात. त्यातही परत बारकावे आहेत. स्वतंत्र उजवे तर काँग्रेसमधील स्वतंत्र डावीकडे झुकलेले उजवे. चीनवादी कम्युनिस्ट आत्यंतिक डावे, तर मॉस्कोवादी कम्युनिस्ट उजवे डावे. संयुक्त समाजवादी त्यापेक्षा उजवीकडे कललेले. एकाच रेषेमध्ये केवढी ही विभागणी ! त्यात शास्त्री मध्यभागी उभे आहेत. यावरून नेमके काय समजावे ? तर या दिशावाचक संज्ञा दिशाभूल करणाऱ्या आहेत एवढेच समजावे. या संज्ञा कशा दिशाभूल करणाऱ्या ठरतात याविषयी स्टॅलिननेच एकदा एक मार्मिक वाक्य उच्चारले होते. तो म्हणाला होता, "पृथ्वी वाटोळी असल्याकारणाने डाव्या बाजूने प्रवास करणारा अखेर उजव्या बाजूस येऊन पोहोचतो."

माझ्या दृष्टीने आज जगातच मध्यममार्गाची सरशी होऊ लागलेली आहे. कार्ल मार्क्सच्या काळातील दोन टोके आता राहिलेली नाहीत. त्याने 'कॅपिटल' ग्रंथात ज्या भांडवलशाहीचे विदारक चित्र रेखाटले ती भांडवलशाही आज औषधाला शिल्लक नाही आणि साम्यवादाचे जे सुखमय चित्र रेखाटले त्यातील एकही रेषा दिसत नाही. आज पश्चिम युरोपातील बहुतेक राष्ट्रे या मध्य मार्गावर आलेली आहेत. अमेरिकेत केनेडींच्या नव्या क्षितिजांचा मध्य मार्ग पसंत केला जात आहे. पूर्व युरोपातील राष्ट्रे रशियन वर्तुळातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत आहेत तर खुद्द रशियाचे तोंड पश्चिमेकडे वळू लागले आहे. आत्यंतिक साम्यवाद व आत्यंतिक भांडवलशाही ही दोन टोकेच आज अस्तित्वात नाहीत. अस्तित्वात आहे तो फक्त मध्य मार्ग. फक्त प्रमाणाचा फरक आहे.

या जागतिक राजकारणाच्या गतीशी शास्त्रींची मध्यम मार्गीय गती सुसंवादी आहे असे मला वाटते. उजवे व डावे यांना बगलेत मारून भारताला मधल्या मार्गाने नेण्याचे सामर्थ्य एकट्या नेहरूंचे. इतरांना ते जमणार नाही, हे ओळखून शास्त्रींनी व्यवहाराच्या भूमीवर पाय पक्के रोवले आहेत आणि मग ध्येयाच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे. अर्थात या मध्यम मार्गात भव्य-दिव्य डोळ्यांना दिपविणारे असे काही नसणार. मध्यम मार्ग हा चमत्कृती निर्माण करणारा मार्ग नाही. त्यात धीमेपणा आहे. भारताला त्याची गरज आहे. कारण आता मिळालेले राखून आणखी मिळवावयाचे नाही. यात पूर्वीच्या काही गोष्टी टाकाव्या लागतील. त्यामुळे नेहरूंच्या मार्गापासून शास्त्री च्युत झाले असा गिल्ला होईल आणि तसा

तो होतही आहे. पण भाष्यकाराने वाट पुसत भावार्थदीपिका लिहिली तरी भाष्यकारांचे सारे काही त्या दीपिकेने स्वीकारले नाही. तसेंच याही मध्यम मार्ग-दीपिकेचे आहे. फक्त वाट पुसत जावयाचे. ज्याला वाट विचारायची त्याचीच शिदोरी, असली उधारउसनवारी नाही. गीतेवर भाष्य करणाऱ्या प्रत्येक भाष्य-काराने पूर्वीच्या माणसाला मूर्ख न ठरविता स्वतःचा शहाणपणा या मार्गाने सिद्ध केलेला आहे. शास्त्रींनी तरी या नियमाला अपवाद काय म्हणून व्हावे !

(२०-९-१९६४)

२

# लोकशाही, गुंडशाही, झुंडशाही व शिष्टशाही

जरी मथळ्यात मी चार शाह्यांचा निर्देश केला असला तरी माझा आजचा विषय " शिष्टशाही " असा आहे. लोकशाहीतून ही शाही निर्माण झालेली नसली, तरी लोकशाहीशी या शाहीने दोस्ती बांधलेली आहे. इतकी की लोकशाहीचे माहेरघर समजल्या जाणाऱ्या इंग्लंडमध्ये, साम्राज्य वितळून वर्गभेदाच्या सीमारेषा पुसट झालेल्या इंग्लंडमध्ये, १९६४ सालच्या इंग्लंडमध्ये निवडणुका तोंडावर आल्या असताना देखील ' शिष्टशाही ' तेथे पक्की पाय रोवून उभी आहे. ' न्यू स्टेट्समन ' सारखे भारदस्त पत्र लिहिते, " शिष्टगिरी हा खास करून इंग्लिश रोग आहे. " क्रॉसलँड हा लेखक सांगतो, " माणसाने तोंड उघडले की हा शिष्ट आहे हे ओळखण्याची किमया इतर कोणत्याही देशात आढळणार नाही. "

तेव्हा शिष्टशाही म्हणजे काय ? तिचे स्वरूप कोणते ? तिचे वैशिष्ट्य काय ? असे अनेक प्रश्न येथे निर्माण होतात. या प्रश्नांची उत्तरे शोधावयाची म्हणजे शिष्ट-शाहीतील जो ' शिष्ट ' शब्द, त्याचा अर्थ आपण नीट समजावून घेतला पाहिजे. इंग्रजीतील ' स्नॉब ' या शब्दाला मी शिष्ट हा पर्यायी शब्द योजला आहे. त्यावरून या प्राण्याचे दोन गुणधर्म ठळकपणे नजरेस येतात. एक कनिष्ठांशी मुजोरी आणि दुसरा वरिष्ठांशी लाचारी. हे वर्णन फार कडक झाले असे वाटेल; पण त्यातला भाव आपण घ्यावा आणि तो भाव हाच की, समाजात आपल्याला भाव आहे

अशी हाव बाळगून तो भाव दाखविण्यासाठी जो बुद्धिपुरस्सर प्रयत्न करतो तो ' स्नॉब ' समजावा. पोशाख, चालण्याची ढब, बोलण्याची लकब, हस्तांदोलनाची तऱ्हा, भ्रुकुटिभंग, कृत्रिम आवाज, मोजमापाने हसणे इत्यादी सर्व गोष्टी या बुद्धिपुरस्सर प्रयत्नात समाविष्ट होतात. विलायतेतील हा जो ' स्नॉब ' नावाचा प्राणी तोच आपल्याकडचा शिष्ट.

वास्तविक शिष्ट शब्दाचा मूळचा अर्थ चांगला आहे. आपल्या धर्मशास्त्रकारांनी श्रुतिस्मृती यांच्या बरोबरीने शिष्टाचार प्रमाण मानला आहे. कुल, शील, वय, अनुभव, ज्ञान इत्यादी गुणांनी मान्यता पावलेले लोक ते शिष्टजन. यांनाच आप्त अशी दुसरी संज्ञा आहे आणि ' आप्तवाक्ये प्रमाणम् ' असे नैय्यायिकांनी आप्तवाक्याला महत्त्व दिले आहे; पण लक्षणेने शब्दाचे अर्थ पालटतात, त्यामुळे ' शिष्ट ' शब्दाला अहंमन्य असा अर्थ प्राप्त झाला. ' तो ना ? शिष्ट आहे झालं. ' या निंदागर्भ वाक्यात मोठेपणाचा आव आणणारा प्राणी, असा शिष्टार्थ अभिप्रेत आहे. यातही ' अंगी मोठेपणा नसताना मोठेपणाचा आव आणणे ' ही क्रिया महत्त्वाची समजावी. शिष्टाचे वैशिष्टय आहे ते या मोठेपणाच्या रुबाबात आहे.

शिष्टपणा हा केवळ व्यक्तिगत गुण वा दोष असता तर त्याची शाही झाली नसती; पण तो जेव्हा एका व्यक्तिसमूहाचा किंवा वर्गाचा धर्म होऊन बसला आणि त्या वर्गाच्या हातात जेव्हा सत्ता केंद्रित झाली तेव्हा ' शिष्टशाही ' जन्म पावली. इंग्लंड ही या शिष्टशाहीची जन्मभूमी. वास्तविक इंग्लंडमधील राजवट लोकशाहीची; पण साम्राज्यशाहीचे या लोकशाहीला पलिस्तर मारल्याकारणाने तेथे राजकारण व सनदी नोकरी या दोन क्षेत्रात शिष्टशाही प्रथम निर्माण झाली. ऑक्सफर्ड व केंब्रिज ही विद्यापीठे शिष्टनिर्मितीचे कारखाने आणि टोरी किंवा हुजूर पक्ष या शिष्टांचा बालेकिल्ला. राजकारणात लोकशाहीने गण्यागणप्यांना आणून सोडले तरी त्यांचे कार्यक्षेत्र फक्त मतदानापुरते मर्यादित होते. प्रत्यक्ष राज्यकारभार हाकण्यासाठी गणपतरावच हवेत. मजूर पक्ष उदयास येण्यापूर्वी हुजूर व उदारमतवादी यामध्ये आलटून पालटून सत्तेची खांदेपालट होत असे; पण राव गेले नि पंत चढले. यापेक्षा त्याला फार महत्त्व नव्हते. पार्लमेंटमधील पहिला मजूर प्रतिनिधी हार्डी तो ज्या दिवशी पार्लमेंटमध्ये गेला. तेव्हा त्याच्या एकंदर वेषावरून सभागृहाच्या संघ्याने त्याला हटकले. त्याला वाटले की, सभागृहाच्या छपराची दुरुस्ती करणारा हा कोणी तरी असावा.

म्हणून तो हार्डीला विचारतो, " Are you working on the roof, mate ? " हार्डीने उत्तर दिले, " No. on the floor. " यात हार्डीच्या खेळकर

विनोदबुद्धीचा जसा प्रत्यय येतो, तसाच शिष्टशाहीची पाळेमुळे किती खोलवर रुजली होती, याचाही प्रत्यय येतो.

इंग्लंडहून या वर्गाची आयात भारतात झाली. जसे मांजरपाट कापड आले तसाच हा शिष्ट आला. अर्थात इंग्लंडप्रमाणेच भारतातील विद्यापीठे ही यांची टाकसाळ. त्यातल्या त्यात या विद्यापीठांचा पदवीधर विलायतची वारी करून आणि तेथील आय. सी. एस. वा अन्य पदवी घेऊन आला तर त्या शिष्ट-पणाला थोडा गडद रंग येई. समाजात हा प्राणी उठून दिसू लागला एवढे खरे. सनदी नोकर, हुद्देदार आणि त्याचा परिवार असा या वर्गाचा परिघ दिवसें-दिवस वाढत चालला आणि याच्या अवती भवती सुशिक्षिताचा वर्ग गोळा होऊ लागला. सामान्य माणसाने आपल्या प्राकृत भाषेत त्याला 'पांढरपेशा' असे नाव दिले. मोठे अन्वर्थक नाव आहे हे. यांचा व्यवसाय सदैव पावसा–चिखला-पाण्यात राबणाऱ्या शेतकऱ्यासारखा कधी मळायचा नाही किंवा गिरणीच्या धुराड्यात काम करणाऱ्या कामगारासारखा कधी धुरकटायचा नाही. त्यामुळे आपला व्यवसाय म्हणजे बुद्धिमत्तेची साय, असा या वर्गाचा साहजिकच समज झाला. अर्थात् साम्राज्याचे जू उचलण्यास हा वर्ग अत्यंत योग्य असा होता, पण अस्सलापेक्षा नक्कल केव्हाही भ्रष्ट असते. त्याप्रमाणे विलायती शिष्टशाहीची सही सही नक्कल करताना, कधी कधी त्याला विडंबनाचे स्वरूपही प्राप्त होत असे. 'मराठीत मला आपले विचार व्यक्त करता येत नाहीत' अशी असमर्थता हे शिष्ट वारंवार बोलून दाखवित असत. ही शिष्टशाहीच्या विडंबनाची उत्तम साक्ष होय.

या शिष्टशाहीशी साम्राज्याने गुंडशाहीबरोबर एक विचित्र, पण मजेदार नाते निर्माण केले. नोकरशाहीला पोलादी चौकट असे नाव होते; पण या पोलादी चौकटीने ग्रामीण भारतात समाजाची चौकट कधीच उद्ध्वस्त केली नाही. खेडेगावातील दादा लोक होते तसेच होते. त्यांना या पोलादी चौकटीने वेठीला धरले इतकेच. पिकांची आणेवारी, सारावसुली आणि इतर प्रशासकीय कामे पार पाडण्याबाबत पोलादी चौकटीतला शेवटला अधिकारी म्हणजे कलेक्टर व मामलेदार. त्या अधिकाऱ्यांशी या गावदादांनी सहकार्य केले म्हणजे बाकी सारे ग्रामजीवन या दादांच्या कह्यात होते. हे दादा या ग्रामीण भागाचे अनभिषिक्त राजेच होते म्हणानात. उलट त्यांच्या या राज्याला पोलादी चौकटीचे साहाय्यच होत असे. सातारा जिल्ह्यात जवळजवळ वीस वर्षे कपूरशाहीचे अबा-धीत राज्य होते. यातील मर्म तरी शिष्टशाही व गुंडशाही यांचा समन्वय हेच होय. साम्राज्याला जर जात्याची उपमा दिली तर शिष्टशाही त्या जात्याची

वरची तळी होती; आणि गुंडशाही त्याची खालची तळी होती. आणि त्या दोन तळीत सारा समाज भरडून निघत होता. शिष्टशाही हा विलायती माल तर गुंडशाही हा खास देशी माल, पण दोघाचे परस्परांशी सहकार्य मोठे नमुनेदार होते.

त्या मानाने झुंडशाही साम्राज्याच्या पथ्यावर पडली नाही. उलट ब्रिटिश साम्राज्याला ती नको होती. झुंडशाहीमध्ये गुणवत्ता बाजूला फेकली जाते हा दोष असला, तरी समाज त्यामुळे तळापासून ढवळून निघतो आणि परकीय सत्तेला नेमके तेच नको होते. 'मॉब्' हा भारताच्या विशिष्ट परिस्थितीत गुणकारी ठरला. शिवाय 'मॉबॉक्रसी' किंवा 'झुंडशाही' हा काही समाजाचा स्थायी भाव नाही. निदान भारतात तरी तसे दिसत नाही. भारतीय समाज दुखणे जिव्हारी गेल्याखेरीज हालत नाही, चवताळून उठत नाही असे मला गेल्या पन्नास वर्षांच्या इतिहासावरून दिसते. संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन हे त्याचे उत्तम उदाहरण. या आंदोलनात सामील झालेल्या राजकीय पक्षाच्या अंतरीचे हेतू काहीही असोत. लोकांनी त्यांना साथ केली महाराष्ट्राचे घटक राज्य होईपर्यंत. ते घटकराज्य झाले आणि लोकांनी या पक्षापासून साफ घुमजाव केले. भारताच्या उत्तर सरहद्दीवर चिनी आक्रमण झाले ते दुसरे उदाहरण. लोकच एक दिलाने प्रतिकाराला सज्ज झाले. राजकीय पक्षांना व त्यांच्या नेत्यांना त्यांनी सवडच दिली नाही. आशिया व आफ्रिका खंडांतील इतर देशात झुंडशाहीची जी उग्र स्वरूपे पाहावयास सापडतात, त्यांशी तुलना करता भारतीय समाजाची नाडी ठीक चालली आहे असे म्हणावयास मला तरी प्रत्यवाय दिसत नाही. मर्यादित प्रमाणात झुंडशाही हवी. राज्यकर्त्यांच्या आत्मसंतुष्टतेला हादरा देण्यासाठी आमचा सामान्य माणूस तसा सामान्य दिसत नाही. असामान्य म्हणविणारे नेते त्याला बिघडविण्याचा प्रयत्न करीत असतात; पण तसेच विशेष घडल्याखेरीज तो सहसा बिघडत नाही.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर शिष्टशाही व गुंडशाही एकदम नाही तरी हळूहळू कमी होतील असे वाटले होते. तसे दुर्दैवाने घडले नाही. फरक इतकाच झाला की दोन्ही शाह्यांनी आपली टोपी तेवढी बदलली. टोपी बदलणे हा बाकी राजकारणाचा एक धर्मच आहे म्हणा. तशा दोन्ही शाह्या अबाधीत आहेत. निवडणूक होईपर्यंत गुंडशाही सत्ता चालविते आणि निवडणूक झाल्यानंतर शिष्टशाही प्रभावी ठरते. दोघी एकमेकींना अशा परस्पर-पूरक आहेत. मी तर असे ऐकले आहे की, नव्या दिल्लीत पंधराशे रुपये पगारदाराची पत्नी हजारबाराशे पगार मिळविणाऱ्या पत्नीशी बोलावयास तयार नसते. 'तुझे आहे तुजपाशी' मध्ये

पु. लं. नी शिष्टशाहीचा तेवढा ' पीस ' फार चांगला रंगवला आहे. वास्तविक राष्ट्रीय चळवळीतील अग्रगण्य नेत्यांनी या शिष्टशाहीवर कडाडून हल्ला चढविला होता. महात्माजींची खादी दरिद्री नारायणाचे प्रतीक होती. मला पक्के आठवते की, आम्ही वीस साली ती जाडीभरडी खादी वापरली की खरोखर दरिद्री दिसत असू; पण आता राजकीय नेत्यांचे व मंत्र्यांचे खादीचे पोशाख हेवा करण्यासारखे असतात. गांधीजींनी नम्रता शिकविली; पण आता त्या नम्रतेला शिष्टपणाचे स्वरूप येऊ लागले आहे. ' तुला मदत हवी ना, हे घे पन्नास रुपये ' असे तात्यासाहेब केळकर रोखठोक सांगत आणि मदत देतही. शंकरराव देव नम्रतेने हात जोडून ' मी आपणासाठी काय करू शकतो ' असे बोलत असत; पण करीत काही नसत. त्यामुळे थिऑसॉफिस्टांचा पंचेचाळीस अंशांचा कोन असलेला नमस्कार; गांधीवाद्यांची विनम्र मुद्रा, राजकीय पुढाऱ्यांचे ' मी जनतेचा सेवक ' म्हणून वारंवार निवेदन, सर्वोदयवाद्यांची पदयात्रा ( विनोबाजी सोडून ) या सर्व गोष्टी शिष्टपणाच्या नाण्याच्या दुसऱ्या बाजूसारख्या मला दिसतात.

या शाहीचा घटक जो शिष्ट, तो आता केवळ वर्गच राहिला नाही, त्याची आता एक जात बनली आहे, आणि जातीप्रमाणेच त्याचे रीतिरिवाज, कुळधर्म, तत्त्वज्ञान आचारविचार ठरून गेलेले आहेत. या शिष्ट ज्ञातीचे एक संमेलन भरले अशी आपण कल्पना केली तर तेथे आपणास काय पहावयास सापडेल? काय ऐकावयास मिळेल? सार्वजनिक समारंभांत आपल्याला उत्तमोत्तम ठेवणीतले पोशाख, रंगीबेरंगी साड्या, वेगवेगळया केशभूषा, नाना तऱ्हेची आभरणे पहावयास मिळतील. मातृभाषा मराठी असली तरी " Hallow, how do you do ? " असे मंजूळ वा घोगरे आवाज ऐकावयास सापडतील; आपण आयुष्यात कसे स्थिर झालो आणि ' आपल्या बग्याला अमेरिकेला पाठवून मोठ्या पगाराच्या नोकरीचे स्थैर्य कसे लाभेल व ठकीला सुस्थळ प्राप्त झाल्यावर तिचा संसार कसा स्थिरावेल ' असे जीवनात स्थिरावण्याचे सुखसंवाद कानांवर पडतील, अशी नोट लिहिली की, मंत्र्याला देखील दहा वेळ विचार करावा लागेल असा अहकाराचा हुंकार क्वचितच कानावर पडेल. टेरेलिनचे सूट, नायलॉनच्या साड्या अमक्या मेकच्या गाडया, मुलांची खेळणी, आणि सौभाग्यवतीचे दागिने, मांजराची आवड व कुत्र्यांची निवड, क्रिकेटवर भाष्य आणि झेपेल एवढी तात्त्विक चर्चा हेच या संमेलनांतील सूक्ष्म चर्चेचे विषय बनल्याचे आढळून येईल. एकमेकांना भेट देण्याचे कार्यक्रम निश्चित केले जातील. शनिवार दुपार व रविवार सबंध अशी दीड दिवसांची सहल कशी असावी यावरील नाजूकसाजूक चर्चा रंगेल. ज्या नाटकातील तीन अंकात नायक व प्रतिनायक याचा धांगडधिंगा चालतो व चवथ्या अंकांत त्याचे बक्षीस म्हणून नायकाच्या गळयात सुंदर नायिका हार घालते, ते नाटक उत्तम'

असे नाट्य-परीक्षण ऐकावयास मिळेल. अत्यंत अश्लील वृत्तपत्र वा मासिक समग्र वाचून काढल्यानंतर ' शीः किती अश्लील लिहीतो हा लेखक ! ' असा अभिप्राय श्रवणपथावर आढळेल. तत्वज्ञान, नीती, कला, समाजसुधारणा, इत्यादी गहन विषयांवर हे लोक किती सहजतेने व आत्मीयतेने बोलू शकतात याचे आश्चर्य वाटेल, त्याचबरोबर, टाचण्या, सुया, पिना, नेकटाय, फ्लॉवर पॉट्स, मनि-बॅग्ज, इत्यादी सूक्ष्म वस्तूंवरील गंभीर चर्चा ऐकून नवल वाटेल थोडक्यात, आजकाल ताजमहाल, ग्रीन्स आदी हॉटेलांमध्ये ज्या मेजवान्या झडतात आणि महिला परिषदांची वार्षिक संमेलने भरतात त्या सर्व ठिकाणी आढळणारा असा हा समाज आहे. जे काम दोन तासांत होऊ शकते ते काम सहा तासात करण्याची विद्या या वर्गाला अवगत झाल्यामुळे याच्या शरीराला व मेंदूला तशी फार झीज नाही. आणि त्यामुळे चविष्ट पदार्थ, गर्विष्ठ वृत्ती आणि कळणाऱ्या व न कळणाऱ्या प्रत्येक विषयात तोंड खुपसण्याची प्रवृत्ती या वर्गात आढळते.

शिष्ट अजिबात नसावा असे माझे मत नाही. त्याची शाही नको. जीवनात शिष्ट-पणाचीही एक लज्जत आहे; पण त्याचे प्रमाण साधले गेले पाहिजे ' जॉर्ज तू राजा हो ' या उपदेशात शिष्टपणाची गरज उत्तम प्रकारे दाखविली आहे आणि समाजात जो गुणविशिष्ट असतो, तो थोडा शिष्ट असतोच. शिष्ट असावे त्याने. पुढाऱ्याने पुढाऱ्यासारखेच वागले पाहिजे. मंत्र्याने मंत्र्यासारखेच वागले पाहिजे आणि सामान्याने सामान्यासारखेच वागले पाहिजे. बुद्धी,चातुर्य, ज्ञानविज्ञान, कलाक्रीडा मुत्सद्देगिरी, समाजसेवा आणि साधुत्व या गुणांनी जे इतरांपेक्षा वेगळेपण प्राप्त होते, त्या वेगळेपणात माफक प्रमाणात शिष्टपणा मिसळला तर त्याची लज्जत वाढते. मसाल्याच्या दुधाला केशराची काडी लावल्याप्रमाणे ! पण काडीभर शिष्टपणाचे गाडीभर शिष्टपणात रूपांतर झाले की, त्याला वास येऊ लागतो ! प्लेटोने आपल्या आदर्श समाजात ज्या तत्त्ववेत्त्याकडे राजेपद बहाल केले आहे, तो तत्त्ववेत्ता धीर असावा; गंभीर असावा आणि शिष्टही असावा असे त्याने सांगितले आहे. या शिष्टपणात सात मजली हास्यालाही त्याने प्रतिबंध केला आहे. ( Decorum demands that there should never be loud laughter. ) अर्थात इतका जखडलेला शिष्टपणा नको. शिष्टाने हसावे आणि खिदळावेही. आक्षेप आहे तो शिष्टशाहीवर. आपल्या विद्यापीठातून बाहेर पडणाऱ्या सुशिक्षि-तांचा राज्ययंत्रणेशी संबंध येतोच; त्यातून हा जो शिष्टांचा वर्ग निर्माण झाला, त्या वर्गाने स्वतःचा एक ' कल्ट ' बनविला आहे. त्या संप्रदायात लोकविन्मुखता आहेच; पण लोकांकडे पाहण्यात थोडा अधिक्षेप आहे. भुवया उंच करून पहाण्याची या वर्गाची लकब केव्हा केव्हा मनात विलक्षण चीड निर्माण करते.

आणि या शिष्टशाहीची सामाजिक उपयुक्तताही फार कमी झाली. हे आपले नवनिर्मितीचे युग. हे युग आहे शास्त्रज्ञांचे, तंत्रज्ञांचे, यंत्रज्ञांचे. परीटघडी कपड्यावर बसलेला धुरळा टिचकीने झटकण्याचे हे युग नाही. यंत्राशी, कोळशाशी झगडून कपडे मस्त काळे करावेत, हात यंत्राच्या तेलकट घाणीने माखले जावेत; धरित्रीच्या मातीने सर्वांग माखून निघावे असे हे युग आहे. या युगात शिष्ट जर एवंगुणविशिष्ट झाला नाही, तर त्याची चलती होणार नाही.

मला भीती वाटते ग्रामीण जीवनात निर्माण झालेला सुशिक्षितांचा वर्ग या शिष्ट शाहीत प्रवेश करील अशी. आमच्या विद्यापीठांनी शिक्षणाची जी काही खोटी मूल्ये निर्माण केली आहेत त्यात शिष्टत्व हे एक मूल्य आहे. धरित्रीशी घनिष्ट संबंध असलेल्या ग्रामीण जीवनातून उदयास आलेला हा पांढरपेशा वर्ग, शहरी पांढरपेशा वर्गासारखा अधांत्री लोंबत राहिला तर ! तर लोकशाहीवर ते एक मोठे संकट ठरेल. या सुशिक्षित तरुणाने आपल्या वडिलांच्या हाताला पडलेले नांगराचे घट्टे जरूर लक्षात ठेवावेत. तेही एक महान लोकशाही मूल्य आहे.

(११-१०-१९६४)

3

# अंधानुकरण नको; सात्मीकरण हवे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ४४०६२ वि: निबंध
क्रमांक १६२० नों: दि: १५।१२।६६

खरोखरीच आपण पश्चिमेचे किती अनुकरण करीत आहोत ? गेल्या भारत-पाकिस्तान संघर्षात आपण स्वावलंबनाची भाषा बोलू लागलो आहोत. त्या स्वावलंबनातूनच हा प्रश्न माझ्या मनात निर्माण झाला.

कारण स्व+अवलंबन म्हणजे स्वावलंबन. त्यात दुसऱ्याचे अनुकरण बसते का ? आणि बसत असेल तर स्वावलंबनाला अर्थ काय राहिला ? आपण ही अनुकरणाची वृत्ती टाकावी. हा वाद आजच निर्माण झाला नाही. जेव्हा केव्हापासून इंग्रजांचा आपल्या देशाशी राज्यकर्ते या नात्याने संबंध आला, तेव्हापासून हा अनुकरणवाद सुरू झाला आहे. लोकहितवादींनी आपल्या शतपत्रात आवर्जून सांगितले आहे की, " हिंदू लोकांस आता जागृति आली. पृथ्वीवर कोठे काय आहे हे कळू लागले, हे सर्व इंग्रजामुळे झाले. ईश्वरानेच ही शहाणपणाने योजना केली आहे. " याच्या नेमका उलट पक्ष, त्यांचे टीकाकार विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी घेतला होता. आणि तेव्हापासून हे दोन पक्ष, आपापल्या बाजूचे समर्थन करीत आले आहेत.

आपल्याला स्वातंत्र्य मिळून अठरा वर्षे होऊन गेली. राजकीय दृष्ट्या आपण आता कोणावर अवलंबून नाही. पण मुंबई, मद्रास, कलकत्ता, दिल्ली यांसारख्या कोणत्याही मोठ्या शहरात आपण फेरफटका मारा. तेथील तरुण-तरुणींची केशभूषा व वेषभूषा पाहिली की, आपण हॉलीवुडच्या नटनटींच्या घोळक्यात तर नाही ना, असाच संभ्रम निर्माण होतो आणि हे सारे पाश्चात्य पद्धतीचे अनुकरण

बुद्धिपुरस्सर होते असे नाही. आमच्या रजतपटांनी हा अनुकरणाचा जमाना निर्माण केलेला आहे. गंमत म्हणून हा एक विरोधाभास लक्षात घेण्यासारखा आहे. ज्यांनी इंग्रजांचे अनुकरण करावे म्हणून प्रथम हाक दिली त्या लोकहितवादी, रानडे, गोखले, आगरकर यांची छायाचित्रे पाहिली तर अस्सल पेशवाई पोषाखाचा थाट आपल्या नजरेत भरतो. बाराबंदी अंगरखा, रेशीमकाठी धोतर, पुणेरी जोडा, पुणेरी पगडी, भरदार शरीरयष्टी, गुलछबू मिशा असे हे पूर्वीचे चित्र आणि वाळलेली शरीरकाठी, आवारा पँट, नायलॉनचा शर्ट, डोक्यावर केसांची झुलपे असे हे आताचे चित्र. अनुकरणवादी हे असे बाळबोध आणि स्वावलंबनवादी हे असे छचोर !

केवळ गंमत म्हणून या विरोधाभासाचा मी निर्देश केला. आता तो बाराबंदी अंगरखा, ती पगडी, तो जोडा परत अवतीर्ण होईल असा संभव दिसत नाही. ‘ संभव ’ हा शब्द वापरण्याचे कारण फॅशनला तसे तार्किक नियम नाहीत, हेच होय. ती कशी बदलेल आणि पूर्वपदावर येईल याचा काही भरंवसा नाही. आता हेच पहा ना की, जुन्या पद्धतीच्या चोळया जाऊन त्यांची जागा बिनबाह्याच्या पोलक्याने घेतली होती; पण आता पहावे तो कोपरापर्यंत येणाऱ्या बाह्यांची चोळी आधुनिक स्त्रीलाही आवडू लागली आहे. तेव्हा जुना अंगरखा व पगडी परत येणारच नाही असे निश्चयाने सांगता येत नाही. काल पालटला की वेषही पालटतो हेच खरे. तथापी राजकारणात पोषाखाचे अंधानुकरण झाले नाही ही समाधानाची गोष्ट होय. चुणीदार पायजमा व शेरवानी किंवा जोधपुरी बंद गळ्याचा कोट व पँट हा पोषाख समाधानकारक आहे. सोय व सौंदर्य यांचा मिलाफ साधण्याचा त्यात यशस्वी प्रयत्न आहे. पायघोळ धोतर, रेशमी नेहरू शर्ट व डोक्यावर कडक इस्त्रीची तिरकी गांधी टोपी व पायांत गुळगुळीत पंपशू हा पोषाखही रुबाबदार दिसतो. तेव्हा व्यापारी कचेऱ्या व इतर काही कारखाने यांतील सुटाबुटात हिंडणारे काही अधिकारी व नटांचे अनुकरण करणारे तरुण सोडले तर स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपण पोषाखाची ढब स्वतंत्र ठेवली आहे, हे दिलखुलास मान्य करावे लागेल.

पण वेषभूषा वा केशभूषा हा अनुकरणवादाचा खरा गाभा नाही. विचारांचे अनुकरण करावे काय हा खरा वादाचा विषय होय आणि मी प्रथमच सांगितले की हा वाद तसा फार जुना आहे. अव्वल इंग्रजी अमदानीतील पहिल्या पिढीपासून हा चालत आलेला आहे. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी या वादाला खतपाणी घातलेले आहे. या वादाचा प्रवाह असा काही वक्रगतीने वाहत आहे की ज्याचे अनुकरण करायला हवे त्याचे आपण अनुकरण केले जात नाही आणि ज्याचे करायला

नको त्याचे मात्र नेमके अनुकरण करीत आहोत. बिटिशांनी या देशात रेल्वे आणली, अद्ययावत शस्त्रे आणली. पण ज्या शास्त्रातून ही शस्त्रे निर्माण होतात ते शास्त्र त्या प्रमाणात आणले नाही वा आणू दिले नाही. म्हणून आमच्या शिक्षणसंस्था कारकून निर्माण करण्याचे कारखाने होत, ही टीका अतिशयोक्त असली तरी अवास्तव नव्हती.

ईश्वरी संकेताने इंग्रजी राज्य येथे आले अशी श्रद्धा बाळगणारांनीही असल्या निरर्थक अनुकरणाचा पुरस्कार केला नाही. लोकहितवादींचेच परत उदाहरण देतो. इंग्रजांवर म्हणजे परकीय राज्यकर्त्यांवर श्रद्धा बाळगणारे म्हणून त्यांची टिंगलटवाळी काही कमी झाली नाही; पण त्यांनी आपल्या शतपत्रात भारतीय लोकांनी व्यापार व कारखानदारी या क्षेत्रात प्रवेश केल्याशिवाय या देशाची भरभराट होणार नाही, असे सांगितले होते. इंग्रजांच्या हाताखाली शिक्षण घेतल्यावर आपण शहाणे होणार या त्यांच्या मतावर टीकेचा गहजब झाला, पण त्यांनी पुढे असे सांगितले आहे की, भारतीय लोक शहाणे झाले की इंग्लंडप्रमाणे आम्हाला पार्लमेंट द्या अशी ते इंग्रजांपाशी मागणी करतील आणि इंग्रज गडबड करू लागले तर त्याला सांगतील की, " तुम्ही आपले देशास जावे. आता आमचे देशाचा कारभार आम्हाला चांगला करता येतो. तुमचे गुरुत्व नको." (पत्र नं. ५४) यात लोकहितवादीचे द्रष्टेपण तर दिसून येतेच; पण अनुकरणातही एक विशिष्ट दृष्टी आढळून येते. या समाजाच्या बलशाली उत्थानासाठी जे ज्ञान व विज्ञान आवश्यक आहेत, ज्या राज्यपद्धतीची गरज आहे, ती आपण इंग्रजांपासून घेतली पाहिजे असा त्यांचा अनुकरणवाद सांगत होता.

घड्याळाच्या लंबकाप्रमाणे विचारांची आंदोलने होतात असे मला वाटते. मूळ विचार जो सांगतो, त्याने एकदा का त्या विचाराला गती दिली की, तो विचार एका टोकाला जाऊ लागतो आणि मग त्या विचाराला प्रतिक्रियात्मक विचार सुरू झाला की, तो प्रतिक्रिया मक विचारही असे शेवटचे टोक गाठण्याच्या दिशेने वाटचाल करू लागतो. पश्चिमेचे अनुकरण करण्याचा जो विचार लोकहितवादींनी प्रवर्तित केला, त्याचेही असेच झाले. लोकहितवादी, रानडे, गोखले आदी आद्य विचारवंतांनी त्यात जो विवेक बाळगला होता, तो पुढे राहिला नाही आणि इंग्रजी विद्येचे अनुकरण करण्याचे बाजूला पडून त्यांच्या फॅशन्सचे अंधानुकरण होऊ लागले. त्यातच राज्यकर्त्यांनी आम्ही तुमचे संस्कृतिदाते हा जो अहंमन्यतेचा आव आणला, त्याने अनुकरणाच्या विरुद्ध जोरदार प्रतिक्रिया सुरू झाली. ज्या रुडियार्ड किप्लिंगचा या शहरात शताब्दीमहोत्सव झाला, तो " East is East and West is West, Twin shall never

meet !! " या अहंमन्यतेचा जोरदार पुरस्कर्ता होता. ही त्याची गर्वोक्ती प्रसिद्धच आहे. कोणताही समाज कितीही पददलित झालेला असला तरी त्याच्या अहंकाराला डिवचले की, तो चवताळून उठतो. असे ज्या समाजात घडत नाही तो समाज मृत झाला असे समजावे. पश्चिमेच्या अनुकरणाविरुद्ध जी प्रतिक्रिया झाली ती या अर्थाने समाज जिवंत असण्याचे लक्षण मानावे लागते.

या प्रतिक्रियेने समाजाची दृष्टी भूतकाळाकडे वळली. तसे होण्यात गैर काहीच नव्हते, भूतकाळाचे संशोधनही समाजाच्या विकासाला आवश्यक असते. सगळीच उधार-उसनवारी करून समाजाची प्रगती होत नसते. त्या समाजाचे स्वतःचे म्हणून काही असावे लागते. तरच त्यावर दुसऱ्या रोपट्याचे कलम करता येते. आपल्या भूतकाळाचे संशोधन या दृष्टीने आवश्यक आहे. म्हणून आपला प्राचीन इतिहास, आपली प्राचीन शास्त्रे, आपली प्राचीन तत्त्वज्ञाने, आपले प्राचीन वाङ्मय, धर्म, कला, नीती यांच्या आभ्यासाकडे अनुकरणवादविरोधी प्रतिक्रियेने दृष्टी वळविली हे फार चांगले केले.

भूतकालाचे पुनरुज्जीवन करावयाचे नसते. भविष्यकालीन प्रगतीची वाटचाल करताना ज्याचा आधार घ्यावयाचा असतो, त्यासाठी भूतकालीन इतिहासाचे संशोधन करून त्यात ग्राह्य कोणते व त्याज्य कोणते असा विवेक करावा लागतो. म्हणजे अनुकरणात जशी विवेकाची गरज आहे; तशीच विरुद्ध प्रक्रियेतही विवेकाची गरज आहे.

पण विशिष्ट परिस्थितीविरुद्ध प्रतिक्रिया म्हणून जो विचार जन्म पावतो, त्यात हा विवेक राहात नाही. अशा प्रतिक्रियेला भावनात्मक प्रतिक्रियेचे स्वरूप आपोआपच येऊ लागते आणि भूतकाळाकडे वळलेल्या या प्रतिक्रियेला असेच एकांतिक स्वरूप येत गेले. आम्ही मागासले आहोत असे म्हणता ? तर मग आम्ही तुमच्यापेक्षा दोन पावले पुढे गेलेलो आहोत ! काय पश्चिमेकडून आम्हाला शिकायला हवे असे सांगता ? तर मग पश्चिमेलाही आमच्याकडून बरेच शिकावे लागेल. पश्चिम आधिभौतिक आहे; तर आम्ही आध्यात्मिक आहोत. पश्चिम भोगवादी आहे तर आम्ही त्यागवादी आहोत. पश्चिमेत लोकराज्य असेल तर आमच्यात रामराज्य आहे. या अशा प्रतिक्रिया काय दाखवतात ? तर भूतकाळाच्या संशोधनांची प्रक्रिया मागे पडून भूतकाळाच्या पुनरुज्जीवनाचा, उदात्तीकरणाचा विचार बळावत गेला असा या प्रतिक्रियांचा इत्यर्थ आहे. येथे विवेकवाद सुटला आणि अहंगंडाने शेवटचे टोक गाठले.

याचा परिणाम काय झाला हे आपण अनुभवीत आहोत. पश्चिमेचा राजकीय संबंध कटुतेचा आहे; पण विवेक असा करायला हवा की, राजकारण आणि

ज्ञानविज्ञाने ही दालने वेगळी आहेत. तसाच विचार केला तर ज्ञानविज्ञानाच्या सामर्थ्यावरच इंग्रजांनी या देशाची सत्ता संपादन केली की नाही ? तेव्हा त्या सत्तेला शह देण्यासाठी देखील आपणास त्याच विज्ञानाची उपासना करणे भाग आहे. या आंधळ्या प्रतिक्रियेने एक पिढीच्या पिढी विज्ञानापासून वंचित झाली. कथा, कादंबरी, निबंध, लघुनिबंध, गुजगोष्टी, या प्रकारांना उत्तेजन मिळाले; पण भौतिक ज्ञाने, मौलिक संशोधन, आर्थिक विकासाचा विचार हे जे महत्त्वाचे क्षेत्र त्याचे १९४५ पर्यंतच्या तरुण पिढीला तितके आकर्षण वाटेनासे झाले. हे कटू सत्य नाकारता येणार नाही.

तेव्हा अनुकरण, अंधानुकरण व सात्मीकरण असे कोणत्याही समाजासमोर तीन विकल्प असतात. यापैकी अंधानुकरणाची कोणीच तरफदारी करणार नाही; पण जगच आज इतके लहान झाले आहे की, मागस देशांना पुढारलेल्या राष्ट्रांचे काही क्षेत्रात अनुकरण करावे लागते. 'रॉबिनसन क्रूसो' ही आधुनिक युगात एक दंतकथा ठरलेली आहे. गोगलगाय, पोटातपाय दुमडून जशी कवचात लपून बसते तशी जगापासून दडण्याची कोणत्याही राष्ट्राला सोय राहिलेली नाही. तेव्हा अनुकरण करणे आवश्यक आहे; पण नुसते अनुकरण करणे उपयोगी नाही. ज्या गोष्टी इतरांपासून आपण घेऊ इच्छितो त्या आपणास पचविता आल्या पाहिजेत. आपल्या समाजजीवनाशी त्यांचा रांधा बनला पाहिजे. आपल्याशी त्या सात्म्य पावल्या पाहिजेत. आगरकर या सात्मीकरणाचे कट्टर पुरस्कर्ते होते. आपली मूळ भारतीय प्रकृती न टाकता इतरांचे जे काही चांगले असेल ते आपल्या प्रकृतीशी सात्म्य करून घेण्याचा सिद्धान्त त्यांनी आग्रहाने मांडलेला आहे.

त्या दृष्टीने वाङ्मयाचा विचार केला तर उधारउसनवारी फारच आढळून येते. नवकाव्य, नवकादंबरी, नवनाट्य यांनी तर नुसता उच्छाद मांडला आहे. परदेशी टपाल आले रे आले की, त्यावर हे लोक गिधाडाप्रमाणे तुटून पडतात की काय असा त्यांच्या वाङ्मयीन व इतर कलाकृतींवरून भास होत असतो. ज्या पाश्चात्य समाजातून हे सारे बाड येते त्या पाश्चात्य समाजाचे जीवन आणि भारतीय समाजजीवन यांत अंतर असू शकते, याचीही या अनुकरणवाद्यांना जाणीव राहत नाही आणि मग आपल्या समाजात ज्या कलाकृती जन्म पावतात त्यांची 'हर हर न हिन्दुर्न यवनः' अशी शोचनीय अवस्था होऊन जाते. आर्थिक विकासाच्या उंच शिखरावर बसलेले हे समाज आता उतरणीस लागले आहेत की काय, अशी मला तरी नेहमी शंका येते. उलट पक्षी आफ्रिका व आशिया येथील नवोदित राष्ट्रे मागास असली तरी चढणीच्या वाटेवर आहेत. त्यांच्या मागासलेपणात जोम आहे, तर पुढारलेल्या समाजाच्या पुढारपणात दम नाही, नुकतीच उमलू लागलेली

कळी व संपूर्ण फुलून बरेच दिवस झालेले फूल यांत जो फरक आहे तोच त्या दोहोत आहे. तेव्हा माझ्या दृष्टीने भारताच्या नवोदित समाजाचे जीवन हा कला व ललित वाङ्मयाच्या विकासाला एवढा दमदार विषय आहे की या समाजजीवनात कलावंताला आत्माविष्कार करण्याचे का जमू नये याचेच मला राहून राहून आश्चर्य वाटते. आगरकर म्हणतात तेच खरे. आपली बौद्धिक पचनशक्तीच वाढली पाहिजे.

भौतिक विज्ञानाच्या क्षेत्रात मात्र आपण फारच मागे पडलो आहोत. जवळ-जवळ दोन शतकांचे अंतर पडले आहे. एखादा रामन्, एखादा जगदीशचंद्र बोस, एखादा मेघनाथ साहा, एखादा भाभा यावरून समाजात विज्ञानाची वाढ झाली अशी कल्पना करणे चुकीचे ठरेल. पाश्चात्य जगात अंतराळ विहाराचे युग प्रवर्तित झाले आहे. त्या तुलनेने आपण कुठे आहोत असा विचार केला की अंतर किती पडले आहे याची कल्पना येऊ लागते. तेव्हा या क्षेत्रात आपणास बराच काळ उमेदवारी करावी लागेल. आजकाल विज्ञान विषयाकडे विद्यार्थ्यांचा वाढता कल आहे खरा; पण इंजिनिअरिंग या एका ठराविक शाखेतच तो आढळून येतो आणि तोही त्यात चरितार्थाची सोय होण्याचा संभव जास्त म्हणून. संशोधन, मौलिक संशोधन, ही अजूनही ' यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः ' अशी दुर्मिळच वस्तू आहे. या क्षेत्रातील अद्ययावत ज्ञान हस्तगत करून त्यापलीकडे दोन पावले जाण्याची हिंमत व तयारी बांधणारे विरळाच सापडतात. सांगण्याचे तात्पर्य असे की, भौतिक विज्ञानाच्या क्षेत्रात आपणास बराच काळ पश्चिमेचे अनुकरण करावे लागेल.

आणि तसे करण्यात बिघडले काय ? ज्ञानाला पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर अशा मर्यादा नसतात.

( ६-२-१९६६ )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ६४०८२ वि: निबंध
क्रमांक ९६२९ नों. दि: १५/११/८७

४

# स्वतंत्र–प्रज्ञा उबगली आहे

लोकसभेत नुकताच मध्यमवर्गाचा उल्लेख करण्यात आला. पंतप्रधान ना. शास्त्री यांनी या वर्गाविषयी सहानुभूतिपर उद्गार काढले. मध्यमवर्ग याबद्दल त्यांचा आभारी राहील असा विश्वास वाटतो.

पण, खरेच मध्यमवर्ग म्हणजे कोणता वर्ग? कारण मध्यम ही संज्ञा सापेक्ष आहे. वरिष्ठ आणि कनिष्ठ यांच्या मधला एवढाच त्या संज्ञेचा अर्थ आहे. आता नवकोट नारायण हा वरिष्ठ होऊ शकतो आणि एक कोटीचा मालक त्याच्याशी तुलना करता, कनिष्ठ ठरू शकतो. या दोन टोकांमधला चार–पाच कोटींचा मालक मध्यमवर्गीय समजावा काय? आपण दुसऱ्या टोकाला जाऊन विचार करू. शंभर रुपये प्राप्तीशी तुलना करता ५०० रुपये प्राप्तीचा इसम वरिष्ठच मानावा लागेल. मग दोनशे–अडीचशे मिळविणारा तेवढाच मध्यमवर्गीय समजावा काय? कम्युनिस्टांनी शेतकऱ्यांचेही वरिष्ठ, मध्यम व कनिष्ठ असे तीन वर्ग पाडले आहेत आणि स्टालिनने ज्या 'कुलक'चे हत्याकांड आरंभिले होते ते मध्यमवर्गीय शेतकरीच होते. सारांश, मध्यमवर्ग ही एक सैलभोंगळ अशी संज्ञा आहे. समाजाच्या प्रत्येक थरात मध्यमवर्ग आहे आणि म्हणून 'मध्यमवर्ग' असे एका विशिष्ट व्यक्तिसमूहाकडे बोट दाखविता येणार नाही. छोटे कारखानदार, किरकोळ व्यापारी, तेली, तांबोळी, इत्यादी हरहुन्नरी आणि डॉक्टर, वकील, शिक्षक आदी पांढरपेशा वर्ग या वेगवेगळ्या सामाजिक गटांचा मध्यमवर्गात

समावेश करावा लागेल. मार्क्सने या सर्व वर्गांचा 'पेटि बूर्झ्वा' असा निर्देश केला आहे.

तथापी शब्दांचे अर्थ वेगवेगळ्या कारणांनी बदलत जातात आणि एका संज्ञेचे अनेक अर्थ होत असले तरी रूढीने वा संकेताने त्यापैकी एकाच अर्थावर ती संज्ञा वा तो शब्द स्थिर होतो. मीमांसकांनी यासाठीच यौगिक रूढ, योगरूढ अशी शब्दांची वर्गवारी केलेली आहे. मध्यमवर्ग ही संज्ञा योगरूढ वर्गातील आहे. ज्याप्रमाणे पंकज या शब्दाचे अवयव पाडले असता बेडूक व कमळ असे दोन अर्थ होत असले तरी संकेताने कमळ असाच अर्थ घेतला जातो, त्याप्रमाणे मध्यमवर्गाचा यौगिक अर्थ अनेक वर्गवाची असला तरी रूढीने सुशिक्षित पांढरपेशा असा अर्थ व्यवहारात निश्चित झाला आहे. याच वर्गातून देशाला राजकीय नेतृत्व लाभले, असा या वर्गाचा पंतप्रधानांनी गौरवपर उल्लेख केला आहे. येथे थोडी गल्लत होत आहे असे वाटते. हा जो पांढरपेशा वर्ग आहे त्यात अनेक व्यवसाय करणारे लोक आहेत. कारकून, अव्वल कारकून, हुद्देदार, सनदी नोकर, मॅनेजर, तंत्रज्ञ हे व्यावसायिक जसे पांढरपेशा वर्गात मोडतात तसेच वकील, डॉक्टर, शिक्षक, प्राध्यापक असे स्वतंत्र व्यवसाय करणारे लोकही या वर्गात समाविष्ट होतात. वेगवेगळे व्यवसाय वा नोकरी करणाऱ्या या लोकांचा बुद्धिजीवी असा उल्लेख करता येईल; पण बुद्धिजीवी म्हणजे विचारवंत नव्हे.बुद्धीवर जगणारा व स्वतंत्र विचार करणारा या दोन वेगळ्या व्यक्ती आहेत. शारीरिक श्रमावर जगणारा तो श्रमजीवी आणि बुद्धीवर जगणारा तो बुद्धिजीवी. उदर–निर्वाहाचे एक साधन म्हणून बुद्धीचा वापर करणे वेगळे आणि स्वतंत्र विचार करण्याची शक्ती असणे वेगळे. या बुद्धिजीवी वर्गातून स्वतंत्रप्रज्ञा निर्माण होत असतील. त्यावरून बुद्धिजीवी व स्वतंत्रप्रज्ञा यांची गल्लत करणे चूक ठरेल. देशाला जे राजकीय नेतृत्व मिळाले ते या स्वतंत्रप्रज्ञ वर्गातून. मध्यमवर्ग हा या वर्गनिर्मितीचा कच्चा माल होय.

या वर्गाला 'इंटेलिजेन्शिया' असा इंग्रजी शब्द लावतात. ऑक्सफर्ड कोशात त्याचा "The part of a nation that aspires to independent thinking" असा अर्थ दिला आहे. स्वतंत्र विचार करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणे हे या वर्गाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. राजकीय नेते, समाजसुधारक, साहित्यिक, कवी, तत्त्ववेत्ते, कलावंत या सर्वांचा या वर्गात समावेश होतो. त्या सर्व व्यवसायांना छेदून जाणारा असा हा वर्ग आहे. प्रतिभासंपन्न गडकरी नाटक कंपनीत मास्तर होते, तर साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळविलेले 'रथचक्र' कार श्री पेंडसे परवापरवापर्यंत 'बेस्ट'मध्ये कारकून होते. उलट पक्षी मोठमोठ्या

हुद्यावर असलेल्या सनदी नोकरांनी आपआपली प्रशासकीय खाती संभाळण्यात व फायलींची उलथापालथ करण्यात जन्म घालविला व वैचारिक आंदोलनात कसल्याही प्रकारचा भाग घेतला नाही अशीही उदाहरणे सापडतील. लोकमान्य उत्तम वकील झाले असते काय ? महात्माजी नामांकित बॅरिस्टर म्हणून प्रसिद्धीस आले असते काय ? या प्रश्नांची उत्तरे सहजी देता येणार नाहीत. नामांकित वकील, नामांकित डॉक्टर, उत्तम प्राध्यापक आणि स्वतंत्र प्रज्ञा यांचा तसा संबंध नाही, हे या उदाहरणांवरून दिसून येईल. या बौद्धिक व्यवसायांची पार्श्वभूमी असल्याखेरीज प्रज्ञा व प्रतिभा बहरत नाहीत, असे फार तर म्हणता येईल; पण राजकारण, समाजकारण, अर्थकारण, साहित्य, कला इत्यादी क्षेत्रात ज्यांनी नवनिर्मिती केली, नवे नेतृत्व निर्माण केले; ते वकिली, वैद्यकी, शिक्षण इत्यादी क्षेत्रात निष्णात होतेच असे म्हणता येणार नाही.

स्वतंत्रप्रज्ञांच्या या वर्गावर मी जो एवढा भर दिला, त्याला कारणही तसेच जबरदस्त आहे. गेल्या तीस–चाळीस वर्षात प्रज्ञा व प्रतिभा यावर दोन विचार-प्रणालीकडून जबरदस्त आक्रमण होऊ लागले आहे. राष्ट्रवाद आणि साम्यवाद या त्या दोन विचारप्रणाली. वास्तविक राष्ट्रवादाचा उगम प्रतिगामी सरंजामशाहीला विरोध करण्यासाठी झाला; पण राष्ट्र या कल्पनेतून आक्रमक राष्ट्रवादाचा जन्म झाल्याबरोबर प्रज्ञा व प्रतिभा, शोध व संशोध, विचार व विवेक यावरही त्या राष्ट्रवादाने आक्रमण करण्यास प्रारंभ केला. या दृष्टीने नात्सीवाद राष्ट्रवादाची दारुण शोकांतिका होय. अनेक शास्त्रज्ञ, विचारवंत, कलावंत, या काळात आपल्या मायदेशाला पारखे झाले. दुसऱ्या महायुद्धात नात्सींचा पाडाव झाला खरा; पण आता वर्गलक्षणेला चिकटून बसलेल्या साम्यवादाने प्रज्ञा व प्रतिभा यावर भयानक आक्रमण करण्यास सुरुवात के आहे. ' प्रावदा 'चे प्रमुख संपादक रुमियान्तसेव्ह यांनी ' पक्ष व स्वतंत्रप्रज्ञ ' असा एक लेख नुकताच प्रसिद्ध केला आहे. त्यातील एक उतारा देतो, त्यावरून आक्रमणाची कल्पना येईल. संपादक महाशय लिहितात :

" After the victory of revolution it bacame specially important to draw the intelligentsia into building socialism. At the same time the revolutionary task arose of creating an intelligentsia of a new type, a freed peoples' intelligentsia that would be flesh of flesh of the working class and the toiling peasantry."

संपादक महाशयांना समाजवादाचे बांधकाम करण्यासाठी स्वतंत्रप्रज्ञांचा वर्ग

हवा आहे. हा एक नवा व न्यारा नमुना आहे, असे ते सांगतात. हा लोकांचा, लोकांतून निर्माण झालेला, किसान-मजदूर वर्गाशी समरस झालेला असा वर्ग आहे, असे ते सांगतात. या सर्व गौडबंगालाचा नेमका अर्थ काय आहे?

विचारात जळमट नकोत म्हणून आपण प्रमेये स्वच्छ मांडू. ‘ जनतेचा इंटेलिजेन्शिया ’ कोण ठरवणार हे ? तर कम्युनिस्ट पक्ष. कारण त्याचाही दावा जनतेचा पक्ष असाच आहे; पण पक्ष व जनता हे समीकरण तपासायला हवे. पक्ष जनतेचा एक भाग असतो. जेथे पक्ष म्हणजेच सर्व जनता असे सांगितले जाते, तेथे लोकशाही स्वातंत्र्य असू शकत नाही. अल्पसंख्य लोक आपणच जनता असे समजून जनतेवर आपले म्हणणे लादीत असतात, असा पक्ष म्हणजे जनता या समीकरणाचा अर्थ आहे. आता या पक्षाने निर्माण केलेल्या वातावरणात प्रज्ञा व प्रतिभा या खुलतील ? कारण प्रज्ञा व प्रतिभा कोणत्याही बंधनांनी जखडता येत नाहीत. मानवाच्या या दोनच शक्ती अशा आहेत की, त्या आत्यंतिक व्यक्तिवादी आहेत. कोणत्याही विचारांच्या साच्यात त्या बसू शकत नाहीत. ‘ इंटेलिजेन्शिया ’ हा इंटेलिजेन्शियाच आहे. त्याला हे ‘ पीपल ’ नावाचे जे विशेषण लावले आहे ना, ते जसे मोहक नि गोंडस आहे तसेच फसवे नि घातकही आहे. स्वतंत्रप्रज्ञा कधीही लोकांच्या चालीने चालत नाही. लोकांच्या चालीने राजकारणी चालतात. कारण त्यांना ‘ बहुतांची अंतरे ’ राजी राखावी लागतात. लोकांची मते मिळवावी लागतात. आणि त्यांचे हे वागणे बरोबरच आहे. लोकाराधनेसाठी सीता देवीचा त्याग करण्याची पाळी आली तरी ‘ नास्ति मे व्यथा ’ असे प्रभू रामचंद्रांनी सांगितले. कारण त्यांना राज्य चालवायचे होते. पण शास्त्रज्ञ, संशोधक, कवी, तत्त्ववेत्ता, कलावंत ‘ हा माझा नवविचार, माझी नवनिर्मिती लोकांना पसंत नसेल तर मी ती केराच्या टोपलीत टाकून देण्यास तयार आहे ’ असे म्हणू शकेल काय ? असे त्याने म्हणावे काय ?

स्वतंत्रप्रज्ञा व प्रतिभासंपन्न व्यक्ती लोकाराधनेचा मंत्र जपू लागेल, तर समाजाची प्रगती खुंटली असे आपण बेलाशक समजावे. मानव समाजाचा इतिहास आपण बारकाईने तपासला तर प्रज्ञा, प्रतिभा व लोकप्रियता यांचे प्रमाण व्यस्त असल्याचे दिसून येईल. गॅलिलियो, केप्लरपासून आतापर्यंतचे शास्त्रज्ञ व संशोधक, कवी, तत्त्ववेत्ते, ज्ञानेश्वर, तुकारामादी संतमहंत, कणाद, कपिल, बुद्ध, जिन आदी प्रेषित तत्त्ववेत्ते या सर्वांना त्यांच्या हयातीत जबरदस्त लोकविरोधाला तोंड द्यावे लागले. फार कशाला ‘ पीपल ’ असा शब्द उच्चारताच ज्याचे अष्टभाव सद्गदित होतात त्या कम्युनिस्टांचा प्रपितामह जो कार्ल मार्क्स, त्यालाही सबंध जन्म वनवासात काढावा लागला आणि लेनिनला तीन चतुर्थांश आयुष्य परदेशात

घालवावे लागले. नाही, नवविचार आणि लोक यांचे सूत जमत नाही. यात लोकांचा दोष नाही. लोक परंपरेला धरून वागतात. ' येनास्य पितरो याताः येन याताः पितामहाः ' अशा प्रकारच्या ठराविक चाकोरीने जाण्यात त्यांना सुरक्षितता वाटते. मळलेली वाटच ते पसंत करतात. प्रज्ञा व प्रतिभा या ठराविकाला धक्का देतात आणि म्हणून लोक त्याला एवढा प्रखर विरोध करू लागतात. तेव्हा संपादक महाशयांनी हा जो ' पीपल्स इंटेलिजेन्शिया ' शोधून काढला आहे याची जात काही वेगळी असली पाहिजे. " निस्त्रैगुण्ये पथि विचरतां को विधिः को निषधः ' हे जे आमच्या पूर्वाचार्‍यांनी स्वतंत्रप्रज्ञाचे लक्षण सांगितले आहे, ते आजही अबाधित आहे.

कुठला आहे हा ' पीपल्स इंटेलिजेन्शिया ' ? आजच्या समुदायवादी युगाचे हे एक अपत्य आहे. नियोजन या समुदायवादाचा महाप्राण आहे. प्रचंड प्रमाणावर आर्थिक व्यवहार आज संघटित करावे लागतात. या गरजेतून जन्म पावतो तंत्रज्ञ, यंत्रज्ञ, शास्त्रज्ञ, नियोजक, व्यवस्थापक हा वर्ग. हा वर्ग सत्तेत सहभागी होऊ लागला आहे. वाघाला रक्ताची चटक लागते तशी या वर्गालाही सत्तेची थोडी चटक लागू लागली आहे. तेव्हा आजपर्यंत सत्तेचा वापर करणारांना या नव्या महत्त्वाकांक्षी वर्गाची भीती वाटावी हे स्वाभाविकच होय. या नव्या वर्गाला बंधनात जखडून ठेवण्यासाठी सत्ताधाऱ्यांनी खटपट करावी हेही स्वाभाविकच आहे. अंतरिक्षात मुक्त विहार करणाऱ्या अंतराळ वीरांची छायाचित्रे प्रसिद्ध झाली; पण ज्या शास्त्रज्ञाने, या अंतरिक्षविक्रमाचे गणित बसविले तो मात्र अज्ञातच आहे. ज्याच्या प्रतिभेने या अंतरिक्षवीराला विहार करता आला त्या प्रतिभासंपन्न शास्त्रज्ञाला अंतराळ वीर नमन करीत नाही. तो नमन करतो कम्युनिस्ट पक्षाला ! गॅलिलियोला पोपच्या सत्तेपुढे नमावे लागले. त्याचाच हा विसाव्या शतकातील आविष्कार मानावा काय ? या महत्त्वाकांक्षी वर्गाला कह्यात ठेवण्याचा दुसरा मार्ग म्हणजे त्यांच्या मनात लोकांची भीती निर्माण करणे हा. म्हणून हा ' पीपल्स इंटेलिजेन्शिया ' ! " किसान–मजदूर यांतून तुम्ही निर्माण झाला आहात हे लक्षात ठेवा आणि किसान–मजदूर म्हणजे कोण ? तर आम्ही कम्युनिस्ट ! " असा त्या दोन शब्दांचा अर्थ आहे, लेनिनने जो नवा सामाजिक प्रयोग सुरू केला, त्या प्रयोगात या दोन वर्गामध्ये संघर्ष निर्माण होण्याची चिन्हे स्पष्ट दिसतात. नव्हे तसा संघर्ष निर्माणही होऊ लागला आहे. अकबराला वाटले की, बाबा हरिदासाने आपल्या लहरीप्रमाणे वागावे. या आधुनिक अकबरांना वाटते की, स्वतंत्रप्रज्ञांनी आपल्या तालावर नाचावे.

आपणही समाजवादी आहोत; पण आपल्या समाजवादाचा रंग इतका लाल-

भडक नाही. गुलाबी आहे. नियोजन आहे; पण नियोजनाचा अभावही आहे. तेव्हा आपल्याला ' पीपल्स इंटेलिजेन्शिया ' चा एवढा मोह नाही; पण ' पीपल 'चे वेड आहे. ' लोककला ', लोकसाहित्य ',' लोकनाट्य ' ही नाणी वेगाने हाताळली जातात. ' जनता ', ' बहुजनसमाज ' या शब्दांना गांभीर्य प्राप्त झाले आहे, पण अजून ते मर्यादेत आहे. स्वतंत्रप्रज्ञांना, विचारवंतांना हाक मारली जाते, धाक दाखविला जात नाही. लोककल्याणासाठी साद घातली जाते, याद राखा असा दम दिला जात नाही. विचारवंतानी सल्ला द्यावा असे वाटते, पण त्यापेक्षा पुढे सरकू नये असेही वाटते. या वातावरणात विचारवंतांना राज्यकर्त्यांची डर नाही, पण विचारवंतांची फारशी कदरही नाही. चौकटीत एखादा विचारवंत बसविला जातो. पण आम्हीही विचारवंतांचे भोक्ते आहोत हे दाखविण्यासाठी. आपल्या समाजात प्रज्ञा दबलेली नाही, पण उबगलेली आहे.

' इंटेलिजेन्शिया ' किंवा स्वतंत्रप्रज्ञांची ही स्थिती फारशी आशादायक नाही आणि निराशाजनकही नाही. दोष उभयपक्षी आहे. वयात आलेल्या प्रत्येक स्त्री-पुरुषाला मताधिकार देऊन लोकशाही राजवट सुरू झाली की, त्या लोकांच्या पातळीवरचे राज्यकर्ते येणार हे उघड आहे. त्याकरिता बुद्धिमंतांनी तक्रार करून उपयोगी नाही किंवा गोगलगाईसारखे पोटात पाय घेऊन उपयोगी नाही. निर्भीड पण विधायक टीका करण्याचा त्यांचा हक्क आहे आणि तेच त्यांचे कर्तव्य आहे. वास्तवापासून पलायन हा आमच्या बुद्धिमंतांना जडलेला मोठा रोग आहे. ' ऊर्ध्वबाहुर्विरोम्येष नच कश्चित् शृणोति मे ' या व्यासमुनींच्या पवित्र्यात ते हताश चेहरा करून उभे राहतात. या बुद्धिमंतांनी हेही लक्षात ठेवले पाहिजे की, असा आक्रोश करणाऱ्या व्यासांनी अठरा पर्व महाभारत लिहिण्याच्या आपल्या कर्तव्यात कसूर केली नाही. ज्यांना नवी वाट दाखवावयाची आहे त्यांनी लोकांचा विरोध होणार हे गृहीतच धरून चालले पाहिजे. नवविचार अक्रोडाच्या झाडासारखे असतात. फळ तिसऱ्या पिढीला मिळते. आणि बुद्धिमंताला फलाशा सोडून काम करावे लागते. नवनिर्मिती हेच प्रतिभेचे सर्वांत मोठे पारितोषिक आहे आणि तीच त्या प्रतिभेची सर्वांत मोठी प्रेरणा आहे. राज्यकर्ते, मुत्सद्दी, अधिकारी यांचा मार्ग प्रेयाचा आहे आणि विचारवंतांचा मार्ग श्रेयाचा आहे, प्रेय व श्रेय हातात हात घालून चालतील तरच समाजाचे बलशाली उत्थापन होऊ शकेल.

(११-४-६५)

५

# तत्त्वशून्य पक्षांतर : एक दुधारी हत्यार

राजकारणात वारंवार विचित्रांची शय्यामैत्री घडत असते. या निवडणुकीनंतर तर या शय्यामैत्रीच्या प्रकाराला उधाण आल्यासारखे झाले आहे आणि तसे होणे स्वाभाविकही आहे. जेव्हा कोणताच एक पक्ष निखालस बहुमत मिळवू शकत नाही, तेव्हा सारे विरोधी पक्ष एकत्र न येते तरच नवल मानावे लागले असते. एरवी ह्या विरोधी पक्षांनी एकमेकांचे मुखावलोकनही केले नसते. आणि या निवडणुकीपूर्वी तसे ते करीतही नव्हते. पण आज हे सर्व पक्ष एकत्र येऊ शकतात याचे कारणही एकच आहे. काँग्रेसचा पराभव होऊ शकतो हा अनुभवच इतका रोमहर्षक आहे की, त्या आनंदात विरोधी पक्षांची आपापसांतील कंटकशल्ये बोथटल्यासारखी दिसतात. काँग्रेस अल्पमतात जाऊ शकते हा अनुभव रोमहर्षक आहे, कारण तो अनपेक्षित आहे. गेल्या वीस वर्षांच्या राजकारणात असे कधी घडले नव्हते हे तर खरेच, पण त्यावरून असे कधी घडू शकेल असेही वाटत नव्हते. काँग्रेसच्या राजवटीला लोक कितीही कंटाळले असले तरी लोक अखेर काँग्रेसलाच मत देणार असा एक 'कंडिशन्ड रिफ्लेक्स'च तयार झाला होता असे म्हणानात! आणि मग दिवशी सुप्रभाती सात–आठ राज्यांत काँग्रेस अल्पमतात गेल्याचा चमत्कार दिसला. या अनपेक्षिताचा धक्का इतका विलक्षण होता की, आर्किमेडसला जितकी बेहोषी निर्माण झाली नसेल इतकी बेहोषी निर्माण झाली. काँग्रेस अल्पमतात गेली; पण बहुमत कोणाला मिळाले? हा प्रश्न

विचारण्याचेही भान राहिले नाही. 'आपण सारे मिळून राज्य–काजाचा पंथ धरू या' अशी परस्परात दिल्लगी निर्माण होऊन आता राजकीय सत्तास्पर्शाने विरोधी पक्ष पुलकित झालेले आहेत.

या राजकीय वातावरणात आता एक नवीनच साथ निर्माण झाली आहे. ती म्हणजे 'क्रॉसिंग ऑफ द फ्लोअर' ही. बाजू बदलून विरोधी पक्षात सामील होणे हा त्याचा बाळबोध अर्थ. राजस्थान, पंजाब या सारख्या ज्या राज्यात काँग्रेसच्या संख्याबळाचे बहुमत बनण्यास फार थोड्या मताचे अंतर आहे, त्या त्या राज्यात पक्षांतराची साथ उभयपक्षात फैलावत चालल्याचे दिसते. आज काँग्रेसचा एक आमदार विरोधी पक्षाला जाऊन मिळतो, तर उद्या तेच पाखरू आपल्या घरट्यात सुखरूप परत येते. त्यामुळे गमतीचे प्रकारही पहावयास मिळतात. उदाहरणार्थ गणितात शंभर संख्येपेक्षा एक ही संख्या केव्हाही कमी मानली आहे. पण या राजकीय गणितात मात्र उभयपक्षी एक्याण्णव संख्येपेक्षा एक ही संख्या भारी ठरली आहे ! ठराव जसे एकमताने पास होतात तसेच एक्याण्णवचे बळ एका मताने पार नाहीसे होते. अल्पमताला राजकारणात एवढा भाव क्वचितच आला असेल. पण राजस्थान, पंजाब येथे काँग्रेसला बहुमत तरी नाही. हरियानात काँग्रेसचे निखालस बहुमत असताना बहुमत नष्ट झाल्याचा चमत्कार एके दिवशी घडून आला. लागोपाठ पाँडिचेरीच्या सभागृहाने त्याला साथ दिली. या चमत्कारामागे हिशोब असा दिसतो की, बहुमताची जी संख्या असेल, त्या संख्येला दोनानी भागून जो भागाकार येईल त्यात अधिक एकदोन मिळवावेत. असा हा बहुमताचा गुणाकार-भागाकार आज राजकारणात थैमान घालू लागला आहे. हे लागोपाठ दोन चमत्कार घडल्याने 'आता तिसरा कोठे' अशी उत्सुकता निर्माण झाल्यास नवल नाही.

राजकारणातील बघ्यांच्या दृष्टीने ही गम्मत झाली तरी राजकारण काही तत्त्वानुसार, विशिष्ट नीतिनियमांना धरून चालावे असे ज्यांना वाटते, त्यांना या घटना गंभीर स्वरूपाच्या वाटतात. 'Politics is the art of possible' या सूत्रात राजकारण ही कला आहे असे मानले असले तरी ते सर्वांशी खरे मानता येत नाही. राजनीती म्हणून काही नीती असतेच असते. जेव्हा राजकारणाचा हा नैतिक आधार नाहीसा होतो, तेव्हा शॉ म्हणतो त्याप्रमाणे राजकारणाला मधमाशाच्या धंद्याचे स्वरूप प्राप्त होते. महाभारतामध्ये कणिकाने व युरोपात मॅकेव्हिलीने याही धंद्याला शास्त्रीय स्वरूप देण्याचा प्रयत्न केला हे खरे, पण जेव्हा समाजात लोकशाही जीवनपद्धती मान्य होते, तेव्हा त्या समाजात काही एक किमान नैतिक मूल्यांचा स्वीकार करावा लागतो. ही नैतिक मूल्ये झिडकारली गेली

तर लोकशाही म्हणजे लोकांना बनविणारी टोळीशाही एवढेच समीकरण शिल्लक राहील. हरियाना, पाँडिचेरी येथील चमत्कारांचा या दृष्टीने विचार झाला पाहिजे. या भागात कॅांग्रेस सत्ताभ्रष्ट झाली म्हणून आता ज्यांना बरे वाटते, त्यांनी हे लक्षात ठेवावे की, असली फोडाफोडी हे एक दुधारी हत्यार आहे. हरियानातील चमत्काराची लोकसभेत पुनरावृत्ती होण्याचा डॉ. लोहिया प्रभृती मनसुबा रचीत आहेत, त्यांनीही हे लक्षात ठेवावे की, हे हत्यार त्यांच्याही अंगावर उलटण्याचा संभव आहे.

राजकीय पक्ष टिकावेत असे जर वाटत असेल तर पक्षसभासदांत किमान पक्षनिष्ठा असली पाहिजे. एका प्रकारे हे राजकीय पातिव्रत्यच आहे. असे म्हटले तरी चालेल. अर्थात् आपल्या धर्मतत्त्वानुसार पतिपत्नींची जशी जन्माची गाठ बांधली जाते, तशा स्वरूपाचे हे पातिव्रत्य नाही. पक्ष ही बोलूनचालून ऐच्छिक संघटना. तेव्हा पातिव्रत्यालाही घटस्फोटाचा मार्ग मोकळा राहिला पाहिजे. पण त्या घटस्फोटासाठी काही विधिनियमांचे पालन झाले पाहिजे आणि त्यांची काही बलवत्तर कारणे दाखविली पाहिजेत. पक्षांतर हे धर्मांतराइतके कठीण असता कामा नये. तसेच वेशांतराइतके ते सुलभही असता कामा नये. विधानसभेच्या सभागृहात बाजू बदलली की पक्ष बदलला इतका राजकीय प्रवास चुटकीसरसा होऊ नये. हरियानात घडले ते हे असे चुटकीसरसे घडले. ना त्यामागे तत्त्व, ना त्यात नीती. सत्तेच्या प्रलोभनाने अथवा सत्तेपासून दूर ठेवल्याच्या असंतोषाने ही पक्षांतरे घडून आली म्हणून ती घृणास्पद वाटतात. आणि ज्या विरोधी पक्षांनी या चमत्काराचा आनंद मानला त्यांनाही ती घृणास्पद वाटावीत. कारण ही साथ त्यांनाही भोवणारी आहे.

पक्षाच्या पाठिंब्यावर जेव्हा उमेदवार निवडून येतो, तेव्हा तो पक्षतत्त्वाला व पक्षनीतीला बांधलेला असतो. निवडून आल्यानंतर तो सर्वतंत्र स्वतंत्र राहात नाही. विधानसभेत त्याला पक्ष बदलता येत नाही. ध्येयधोरणाशी मूलभूत मतभेद झाले तर त्याला पक्ष बदलण्याचा जरूर हक्क आहे. पण त्यासाठी त्याला विधानसभेच्या बाहेर यावे लागेल. लोकमताचा कौल फिरून मागावा लागेल. राजकीय पक्षांनी हा राजकीय नीतीचा गाभा कटाक्षाने पाळला नाही तर कोणताच राजकीय पक्ष स्थिर राहाणार नाही. ज्या पक्षातर्फे निवडून येण्याची शक्यता आहे, त्या पक्षाच्या तिकिटावर निवडून यावे आणि निवडून आल्यानंतर सत्तालोभाने मनमानेल त्या पक्षात सामील व्हावे असे घडू लागले तर देशात अराजकतेला आवाहन केल्यासारखे होईल. यासाठी सर्वच पक्षांनी पक्षांतराची काही एक लक्ष्मणरेषा आखली पाहिजे. निवडणुकीपूर्वी आचारसंहितेची जशी गरज होती तशीच निवडणुकी-

नंतरही आहे. पक्षात सर्वच आमदारांची सत्तेवर कशी वर्णी लागणार? त्यामुळे नाराजी होणे स्वाभाविक आहे. पण त्याचे पर्यवसान पक्षत्यागात होणे राजनीतीला धरून होणार नाही.

अर्थात असे आज का घडू लागले याची कारणमीमांसा होणे अगत्याचे आहे. जेव्हा काँग्रेस निराबाध बहुमतात होती, तिचे घटकराज्यात व मध्यवर्ती सत्तेत प्रचंड बहुमत होते, तेव्हा काँग्रेसनेच हा पक्षफोडीचा पायंडा पाडला. मग आताच नक्राश्रू ढाळण्यात काय हशील, असा कोणी आक्षेप घेतील तर त्या आक्षेपात बरेच तथ्य आहे असे म्हणणे भाग आहे. या महाराष्ट्रातील शेतकरी कामगार पक्षाची अशीच वाताहत झाली. विधानसभेत आपल्या पक्षाला लगतच्या भविष्यात बहुमत मिळण्याची कधीच आशा नाही असे दिसून आल्यानंतर, विरोधी पक्षातील काही प्रतिनिधी सत्तास्थानाच्या आमिषाला बळी पडले तर "Spirit is willing but flesh is weak" या न्यायाने हे दौर्बल्य क्षम्य नसले तरी स्वाभाविक आहे. संयम सत्ताधाऱ्यांनी दाखविला पाहिजे. तो राखला नाही, उलट एका पक्षातून फुटून दुसऱ्या पक्षात जाण्याचे गृहप्रवेश समारंभ मोठ्या थाटामाटाने साजरे झाले. आताची पक्षांतरे हा त्याच प्रवृत्तीचा एक परिणाम आहे.

राजकीय पक्ष सत्तावादी राजकारण खेळतात. राजकीय पक्ष म्हणजे महंतांचे मठ नव्हेत. बहुमत मिळवून आपल्या पक्षाला सत्ता मिळावी अशी प्रत्येक पक्षाची महत्त्वाकांक्षा असते आणि ती महत्त्वाकांक्षा वाजवी पण आहे. लोकसेवा, सेवाभाव, जनताजनार्दन ही जी नाणी स्वातंत्र्यापूर्वी काँग्रेसने प्रचारात आणली ती सत्तेच्या वापराने बरीच गुळगुळीत झालेली आहेत. आता ती टाकून द्यावीत. पण सत्तास्पर्धा हेच पक्षीय राजकारणाचे उद्दिष्ट असले तरी, सत्तेसाठी सत्ता असे त्या उद्दिष्टाचे स्वरूप नसते. निदान असता कामा नये. विशिष्ट ध्येयधोरण अमलात आणण्यासाठी सत्तेचा मार्ग पक्ष स्वीकारतात आणि तसे असते तोपर्यंत त्या पक्षाचा जनतेत आब असतो. पक्षाचा जनतेत आब असतो तोपर्यंत पक्ष–सदस्यावरही त्या पक्षाचा दाब असतो. पक्षाची शिस्त लादावी लागत नाही. सभासद ती निमूट पाळतात. चर्चिलने आयुष्यात एकदाच पक्षत्याग केला; पण हुजूर पक्षाने त्याला कित्येक वर्षे पक्षाबाहेर ठेवले. परत हुजूर पक्षात मानाचे स्थान मिळविण्यासाठी त्याला बरेच श्रम करावे लागले. आजही मजूर पक्षात अंतर्गत संघर्ष नाहीत असे नाही. उलट अधिक तीव्र स्वरूपाचे आहेत. युरोपियन सामायिक बाजारपेठ, 'इन्कमूपॉलिसी' इत्यादी प्रश्नांवर मजूर पक्षातील डावे व उजवे यांची कडाक्याची भांडणे आजही चालू आहेत. पण हरियाना होत नाही. कारण लोकमानसात पक्षाची एक प्रतिमा तयार झालेली आहे.

स्पष्ट सांगावयाचे तर काँग्रेस पक्षाची प्रतिमा व प्रतिष्ठा बरीच घसरली आहे. हरियानाचा हा बोध आहे. सर्व सभासदांना अंतःप्रेरणेने एकत्र बांधून ठेवणारे समान सूत्रच नष्ट झाल्यासारखे दिसते. गेली तीन चार वर्षे काँग्रेसमध्ये अंतर्गत कटकटी चालू आहेत. आणि जवळजवळ प्रत्येक घटकराज्यात कटकटी चालू आहेत. गटबाजी, सत्ताबाजी या प्रकारांना तर उधाण आलेले आहे. आणि हे सारे कशासाठी ? तत्त्वासाठी ? काही कार्यक्रमांवर मतभेद झाले म्हणून ? बिलकूल नाही. एक गट दुसऱ्या गटाला सत्तेपासून दूर ठेवण्याची धडपड करीत आहे. म्हणून या परिस्थितीत इतके दिवस कोठेही हरियाना झाला नाही हेच आश्चर्य मानावे लागते. कदाचित् अंतर्गत कितीही कटकटी असल्या तरी, काँग्रेसला पर्यायी पक्ष नाही तोपर्यंत काँग्रेसच्या सत्तास्थानाला धोका नाही या कल्पनेचा दबदबा आडवा आला असेल. या निवडणुकीने तो दबदबा नाहीसा झाला. लगाम सुटल्यावर घोडे जसे चौखूर उधळते, तसे आज घडत आहे.

पण काँग्रेसचा हरियाना झाला आणि पुढेही होण्याची शक्यता आहे म्हणून आनंद वाटण्यासारखी परिस्थिती आहे असे मला वाटत नाही. राजकारणात सत्तेचा खेळ चालू असला तरी त्या राजकारणाला तत्त्वाचे अधिष्ठान असले पाहिजे. समर्थांनी त्याला भगवंताचे अधिष्ठान असे नाव दिले आले आहे. सर्वच राजकीय पक्षांनी या तत्त्वशून्य पक्षांतराचा धिक्कार केला पाहिजे. आज ते करी नाहीत कारण त्यांना सत्तेचे आमिष दिसते. पण काँग्रेससारख्या एकसंध पक्षाचा हरियान होऊ शकतो तर, सर्व विरोधी पक्षाचे कडबोळे म्हणून तयार झालेल्या संयुक्त सरकारची प्रतिबंधक शक्ती त्या मानाने किती तरी कमी आहे. विरोधी पक्षांनी ओळखणे हे जरूर आहे. नववधूच्या नवलाईने आज सारे विरोधी पक्ष सत्तापदावर विनम्रता, शालीनता, ऋजुता दाखवीत असले, तरी संसारसुखाची नवलाई नष्ट झाल्यानंतर या सुंदोपसुंदीला दूर ठेवण्याइतकी त्यांच्यापाशी प्रतिबंधक शक्ती दिसत नाही !

(२३-३-१९६७)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ४४०६३ वि: निबंध
१८२९ नों: दि: 25.1.1986

# राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय

१

# अणुबॉम्ब-निर्मिती ?

भारताने अणुबॉंब तयार करावा काय ? हा प्रश्न आज प्रत्येकाच्या मनात घोळत आहे आणि याचे कारणही अगदी उघड आहे. चीनने अणुबॉंब तयार केला हेच ते कारण. चीनने अणुबॉंब तयार केला इतकेच नव्हे तर अमेरिकेचे संरक्षण-मंत्री मि. मॅकनामारा यांनी नाटोच्या बैठकीत माहिती दिल्याप्रमाणे चीन हैड्रोजन बॉंब तयार करण्याच्या मार्गावर असून, येत्या पाच वर्षांत या अणुशस्त्रांचा वापर करण्याची साधनेही चीन निर्माण करण्याचा संभव आहे. चीन अणुबॉंब तयार करण्याची शक्यता पं.जवाहरलाल नेहरूंनाही माहीत होती;पण अण्वस्त्र तयार केले तरी त्याचा भरपूर साठा तयार करून ती अस्त्रे वापरण्यासाठी लागणारी साधने निर्माण करण्यास चीनला बरीच वर्षे लागतील असा त्यांचा अंदाज होता आणि त्यामुळे चीनच्या अण्वस्त्रनिर्मितीला महत्त्व दिले नाही; पण अमेरिकन तज्ज्ञांच्या मते अवघ्या पाच वर्षांत चीन तशी तयारी करील असे आहे आणि म्हणून भारताने अणुबॉंब तयार करावा काय, या प्रश्नाला महत्त्व आले आहे.

या प्रश्नासंबंधी भारत सरकारचे अधिकृत धोरण पंतप्रधान ना. शास्त्रींनी राज्यसभेत या विषयावर वादविवाद झाला त्या वेळी स्पष्ट केलेच आहे. सरकारच्या धोरणाचे दोन भाग पडतात. एका भागात चीनने अणुबॉंब तयार केला तरी भारत अण्वस्त्रनिर्मिती तयार करणार नाही या सूत्राचा उच्चार केला आहे आणि दुसऱ्या भागात जगातील अणुशस्त्रे बाळगणारी राष्ट्रे अणुशस्त्रै नष्ट

करण्याविषयी निश्चयाने प्रयत्न करतील असा आशावाद प्रकट केला आहे. प्रश्न असा निर्माण होतो की, या दुसऱ्या भागाचा पहिल्या भागाशी संबंध काय ? आमचे तटस्थतेचे धोरण लक्षात घेता, अणुशस्त्र निर्माण न करण्याचे धोरण त्या तटस्थतेच्या धोरणातूनच निघते अशी जर आपली भूमिका असेल तर मग अणुशस्त्रांनी सज्ज असलेल्या राष्ट्रांना हे आव्हान कशासाठी ? भारताने अणुशस्त्रे निर्माण करावयाची नाहीत असे ठरविले. चीनचा धोका असला तरी ही शस्त्रे निर्माण करावयाची नाहीत असे ठरविले. मग अणुशस्त्र-संपन्न राष्ट्रांविषयी आपण काही अपेक्षा का बाळगावी ? चीनने अण्वस्त्रे भारताविरुद्ध वापरण्याचे ठरविले तर या राष्ट्रांनी अण्वस्त्रांचे भारतावर छत्र धरावे असा ध्वनी तर या आशावादातून निघत नाही.

अणुशस्त्रांनी सुसज्ज असलेली राष्ट्रे दोन. एक अमेरिका व दुसरे रशिया.बाकी राष्ट्रात ही अणुशस्त्रनिर्मितीची साथ पसरू नये अशी दोघांचीही इच्छा आहे. अगदी प्रामाणिक इच्छा आहे असे आपण मानून चालू. तरी देखील ही इच्छा सफल करण्याचे सामर्थ्य या दोन समर्थ राष्ट्रांत आहे असे दिसत नाही. तसे सामर्थ्य असते तर फ्रान्स व चीन या दोन राष्ट्रांनी ही इच्छाधुडकावून अणुशस्त्रनिर्मितीचा खटाटोप आरंभिलाच नसता. या कामात अमेरिका फ्रान्सला व रशिया चीनला बांध घालू शकत नाही असे सिद्ध झाले नाही काय ? मग आशिया व आफ्रिका खंडातील राष्ट्र अण्वस्त्रनिर्मिती करू इच्छित नाहीत ती काय तात्त्विक कारणाने करू इच्छित नाहीत का या राष्ट्रांना समर्थ राष्ट्रांच्या इच्छेविरुद्ध जाण्याचे सामर्थ्य नाही म्हणून करू इच्छित नाहीत, ही शंका मनात आल्याशिवाय राहात नाही. वस्तुस्थिती अशी आहे की, या दोन्ही खंडांतील राष्ट्रे रशिया व अमेरिका या दोहोंपैकी कोणा तरी एकाच्या किंवा वेळ प्रसंगी दोघांच्या आर्थिक व लष्करी मदतीवर अवलंबून आहेत. ही वस्तुस्थिती लक्षात घेतल्यास या सर्व राष्ट्रांनी अणुशस्त्रे तयार न करण्याचा जो निर्णय घेतला, त्याचे स्वरूप कसे काय दिसते ? केवळ मानवतेच्या दृष्टिकोणातून, शांततावादाच्या भूमिकेवरून अण्वस्त्रांच्या संहार-सामर्थ्याला तत्त्वनिष्ठ विरोध म्हणून हा निर्णय घेण्यात आलेला आहे काय ? का या समर्थ राष्ट्रांच्या इच्छेला मान दिला नाही तर त्यांच्याकडून मिळणाऱ्या मदतीचा ओघ थांबण्याचा संभव आहे ह्या घटकांचाही या निर्णयात काहीएक भाग आहे ? हे प्रश्न डावलता येणार नाहीत.

मी या ठिकाणी दक्षिण आशियातील राष्ट्रांच्या लष्करी सामर्थ्याचे चित्र रेखाटण्याचा प्रयत्न करणार आहे. या आशियायी राष्ट्रांची लष्करीदृष्ट्या तीन वर्तुळे कल्पिली तर ब्रह्मदेश, लाओस व कंबोडिया हे अगदी आतले छोटेसे वर्तुळ

आहे. या तिन्ही राष्ट्रांचे लष्करी सामर्थ्य फारच तोकडे आहे. ब्रह्मदेशाचे खडे लष्कर साठ बटालियन्स इतके असून विमानदल तळ अवघे सत्तर विमानांचे आहे. लाओसचे सैन्य अवघे सत्तर हजार आणि विमानदल तर जवळजवळ नसल्यासारखे आहे. लाओसपेक्षा कंबोडिया थोडा वरचढ, म्हणजे सैन्य अठ्ठावीस बटालियन्स व पन्नास विमाने. या अंतर्गत वर्तुळाच्या बाहेरच्या परिघात दक्षिण व्हिएतनाम, मलेशिया, इंडोनेशिया व फिलिपाइन्स ही राष्ट्रे येतात. या राष्ट्रांचे लष्करी सामर्थ्य आतील वर्तुळापेक्षा अधिक आहे; पण चीनच्या आक्रमणाला टक्कर देण्याइतके नाही. दक्षिण व्हिएतनामचे सैन्य दोन लक्ष, होमगार्डस् एक लक्ष; विमानदल शंभर विमानांचे तर मलेशियाचे, सैन्य आठ बटालियन्स इतके आहे.

इंडोनेशियाची परिस्थिती यापेक्षा अधिक चांगली आहे. जवळजवळ चार लक्ष खडे सैन्य असून इंडोनेशियापाशी दोनशे विमानांचे विमान दल आहे. तुलनेने फिलिपाइन्सपाशी लष्कर, नौदल व विमानदल फार कमी. या दोन्ही वर्तुळांतील राष्ट्रांच्या लष्करी सामर्थ्यांचा विचार केला तर यांपैकी एकाही राष्ट्राला किंवा या सर्व राष्ट्रांना मिळून चीनच्या आक्रमणाचा प्रतिकार करण्याचे सामर्थ्य नाही. अशा प्रकारे या खंडात सामर्थ्याची एक पोकळी निर्माण झाली आहे व ही पोकळी भरून काढण्याचे सामर्थ्य एकाच राष्ट्रात आहे. ते राष्ट्र म्हणजे भारत. फीफील्ड या लेखकाने ' आशियाचे अमेरिकेच्या धोरणातील स्थान ' या आपल्या प्रसिद्ध ग्रंथात आशियातील सर्व राष्ट्रांच्या लष्करी सामर्थ्याचा आढावा घेऊन भारताविषयी पुढील उद्‌गार नमूद केले आहेत :

" When all its land, sea and air forces are considered India is the strongest military power in Southern Asia. "

भारताची सुप्त शक्ती लक्षात घेतल्यास ते सामर्थ्य किती तरी पटींनी वाढण्यासारखे आहे. अणुशस्त्रनिर्मितीच्या प्रश्नाचा विचार करताना ही वस्तुस्थिती दुर्लक्षिण्यासारखी नाही.

मी काही अमेरिकेचा विरोधक नाही. पण वास्तवतेचा विचार केला असता आशियाई राष्ट्राबाबत अमेरिकेच्या धोरणाचे काय स्वरूप दिसते ? दुसरे महायुद्ध संपल्याला आता वीस वर्षे झाली. या वीस वर्षांत बहुतेक आशियाई राष्ट्रे स्वतंत्र झाली. ही स्वतंत्र राष्ट्रे कमकुवत होती. या राष्ट्रांचे प्रतिकारसामर्थ्य वाढविण्याच्या दृष्टीने अमेरिकेने कोणते प्रयत्न केले ? सामर्थ्यांची ही पोकळी भरून काढण्यासाठी अमेरिकेने मदत केली पाकिस्तानला आणि जे एकमेव राष्ट्र चीनशी मुकाबला करण्यासाठी समर्थ ठरले असते त्या राष्ट्राचे लष्करी सामर्थ्य वाढविण्याच्या दृष्टीने पोषक धोरण स्वीकारले नाही. म्हणजे आशियातील ही पोकळी अशीच कायम राहावी

आणि जेव्हा केव्हा आक्रमणाचा धोका निर्माण होईल तेव्हा ह्या राष्ट्रांनी कायमचे आपल्या तोंडाकडे पहावे असा अमेरिकेच्या 'फॉरवर्ड स्ट्रॅटेजी' या धोरणाचा अर्थ घेतला तर तो अवास्तव ठरेल काय? आशियात भारत एक प्रबल राष्ट्र म्हणून पुढे आले तर आपल्या 'फॉरवर्ड स्ट्रॅटेजी'ला तो एक शह असेल असा सुप्त भीतीचा प्रवाह अमेरिकेच्या धोरणात नाही?

तेव्हा भारताने अणुशस्त्रे निर्माण करू नयेत अशी बलाढ्य राष्ट्रांची इच्छा असेल तर ती इच्छा निर्भेळ शांततावादातून व मानवतावादातून निर्माण झाली आहे असे मानता येत नाही. त्या इच्छेमागे राजकारण दडलेले असावे असा संशय घेण्यास बरीच जागा आहे. या खंडातील कोणतेही एक राष्ट्र चीनशी मुकाबला करण्याइतके सामर्थ्यसंपन्न ठरले तर आपल्या प्रभुत्वाचे वर्तुळ त्यामुळे आकुंचित होईल हा घटकही बलाढ्यांच्या धोरणात असावा असे वाटण्यासारखी वस्तुस्थिती आहे. बॉंब तयार करावा की न करावा याविषयी निर्णय घेताना भारताने ही वस्तुस्थिती लक्षात घेणे आवश्यक ठरते. आमची परंपरा, आमचा उज्ज्वल ध्येयवाद, आमची तटस्थतेवरील निष्ठा इत्यादी सर्मन्स तशी ठीक आहेत. पण राजकारण ही एक शक्याशक्यता अजमावण्याची व ठरवण्याची कला आहे हे विसरून चालणार नाही. विश्वात शांती नांदावी यासाठी महात्माजींचा दाखला देऊन आता निभाव लागणार नाही. कारण चीनच्या आक्रमणाने व पाकिस्तान-चीन युतीने हे दाखले अव्यवहार्य ठरविले आहेत.

संसदीय पक्षाचे चिटणीस श्री श्रीराम रेड्डी यांनी अणुबॉंबविरोधी धोरणाचे जोरदार समर्थन केले आहे. त्यांच्या मताने तटस्थता, सहजीवन व पंचशील या त्रिसूत्रात्मक धोरणाला अणुबॉंब विरोधी आहे आणि तो त्यांचा निष्कर्ष तार्किक दृष्ट्या बरोबर आहे, पण अडचण एवढीच आहे की, तटस्थता एकाने पाळून निभाव लागत नाही. चीनने असाच पंचशीलचा पुकारा केल्याचा इतिहास श्री. रेड्डी विसरले नसतील. मग त्याच चीनने पंचशील फेकून आपली शीलभ्रष्टता सिद्ध केल्यानंतर आपण काय करावे? दोघांच्या तंट्यात आपण तटस्थ रहावे हे ठीक; पण ज्या तंट्यात आपण भागीदार आहोत तेथे आपण तटस्थता कशी पाळणार? ही अगदी प्राथमिक अशी सत्ये आहेत. नवल याच गोष्टीचे वाटते की, या सत्याचा वारंवार पडताळा येऊनही आपण त्या जुन्या चाकोरीतून बाहेर पडावयास तयार नाही.

तेव्हा आम्ही तटस्थतेचे पाठीराखे असलो तरी चीनला ही तटस्थता मान्य नाही. आम्ही पंचशीलावर निष्ठा ठेवण्याइतके सुशील असलो तरी चीन तसा नाही. आम्ही सर्वांची मैत्री बांधण्यासाठी उत्सुक असलो तरी चीनला त्याविषयी उत्साह

नाही. आम्ही शांति-मंत्राचा तारस्वरात उद्घोष करीत असलो तरीचीन आपले क्रांतितंत्र सोडावयास तयार नाही. आम्ही आपण होऊन कोणावर आक्रमण करणार नसलो तरी चीन आक्रमण केल्याशिवाय राहणार नाही. आम्ही सहजीवनवादाचा पुरस्कार करीत असलो तरी चीन त्याचा तिरस्कार केल्याशिवाय राहत नाही. या परिस्थितीत आपण काय करावे ? हात जोडून स्वस्थ बसावे ? चीन अणुबाँब, हैड्रोजन बाँब कसा तयार करतो, त्या शस्त्रांचा स्फोट कसा करतो, ती शस्त्रे फेकण्यासाठी साधने कशी तयार करतो या सर्व क्रिया–प्रतिक्रियांकडे कौतुकाने बघावे ? या प्रश्नांची आपण सरळ उत्तरे दिली पाहिजेत. तर्कशास्त्रात 'जनरलायझेशन्स' खपून जातात. व्यवहारात त्याने निभाव लागणार नाही. 'स्त्रीत्वावर' कोणी प्रेम करू शकत नाही. नाम, रूप या उपाधी असलेल्या विशिष्ट स्त्रीवरच प्रेम करता येते.

याही परिस्थितीत आपण अणुबाँब तयार करणार नाही असा कृतनिश्चय केला असेल तर त्यातून निघणारे निष्कर्षही आपण लक्षात घेतले पाहिजेत. त्यापैकी महत्त्वाचा निष्कर्ष हा की भारताला रशिया व अमेरिका यांच्या अण्वस्त्रसाधनसामर्थ्यावर सदैव अवलंबून राहावे लागेल. कारण चीनची पाच वर्षांत अण्वस्त्र युद्ध खेळण्याची तयारी झाली तरी या दोन बलाढ्यांच्या भीतीने चीन शस्त्रे वापरणारच नाही अशी हमी कोण देऊ शकेल ? या दोन समर्थ राष्ट्रांच्या भीतीने तो अण्वस्त्रांचा वापर करणार नाही ही एक शक्यता झाली. पण वापर करण्याचीही शक्यता आहे. अशा वेळी आपण काय करणार आहोत ? अशा वेळी रशिया किंवा अमेरिका यांच्या सामर्थ्यावर भिस्त ठेवावी लागेल ना ? या प्रश्नांची सरळ स्पष्ट उत्तरे आपल्या मनाशी दिली पाहिजेत. टाळाटाळ करून चालणार नाही. ती आत्मवंचना ठरेल. अशी सरळ उत्तरे द्यावयाची ठरविली तर आपण अण्वस्त्राबाबत कायमचे परावलंबित्व पत्करण्यास तयार आहोत असाच त्याचा अर्थ घ्यावा लागेल. काँग्रेस संसदीय पक्षाच्या चिटणीसांनी याच परावलंबित्वाचा पुरस्कार केलेला आहे. त्यांच्या लेखातील उतारा पहा :

"The assurance of the present Russian leadership that any pro–Chinese switch–over will not be at India's expense, should reassure us that China will not be allowed to play with the bomb."

मग याच महत्त्वाच्या बाबतीत भारत जर परावलंबी झाला तर भारताची जी काही स्वतंत्र धोरणे आहेत, त्या धोरणांचा तरी निभाव लागेल काय ? राजकारणात हवाबंद कप्पे नसतात. एका क्षेत्रातील धोरणाचा दुसऱ्या क्षेत्रावरही

परिणाम होत असतो. भारत–पाक संघर्षाने हे पुरेपूर सिद्ध केले आहे. युद्ध सुरू झाल्यानतर आर्थिक मदत बंद झाली आणि लष्करी मदत बंद झाली हा कटु अनुभव आल्यामुळेच आपण स्वावलंबनाची घोषणा केली नाही काय? मग एवढ्या महत्त्वाच्या क्षेत्रात आपण परावलंबी राहिलो तर त्याचा आपल्या स्वतंत्र धोरणावर प्रतिकूल परिणाम होणार नाही, असे कसे मानता येईल? अणुबाँब केलाच पाहिजे या मताचे समर्थन करण्यासाठी मी हे प्रश्न निर्माण केले नाहीत. अणुबाँबविरोधी धोरणाचे जे व्यावहारिक परिणाम होत असतात त्यांची आपण योग्य दखल घ्यावी हाच या प्रश्नमालेमागे हेतू आहे.

एकच व्यावहारिक अडचण आहे. आणि ती म्हणजे खर्चाची. २० टी चे ५० अणुबाँब तयार करण्यासाठी जवळ २४ कोटी रुपये खर्च येईल असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. पण नुसते अणुबाँबच तयार करून चालत नाही. ही शस्त्रे वापरण्यासाठी व त्यांचा साठा करण्यासाठी त्याच्या शंभरपट खर्च करावा लागणार आहे. आगामी सहा वर्षांत अण्वस्त्रदल तयार करावयाचे भारताने ठरविले तर आपल्या संरक्षण खर्चात वरील अंदाजाप्रमाणे ४५ टक्के वाढ करावी लागेल. लोकशाही समाजात एवढा मोठा खर्च करावयाचा तर लोकांवर जबर ताण पडल्याशिवाय राहणार नाही आणि त्यासाठी लोकांची संमती अवश्य हवी. चीनसारख्या हुकूमशाही राष्ट्रासमोर ही समस्या नाही. कारण लोकांची संमती हा भागच त्या समाजात नाही. बेकारी वाढली व उपासमारीने लोक त्रस्त झाले तरी राज्यकर्ते त्याची पर्वा करणार नाहीत. लोकशाही भारताला अशी बेपर्वाई दाखविता येणार नाही. सरकारला त्यासाठी लोकांची संमती मिळवावी लागेल; पण अमुक एक धोरण राष्ट्राच्या संरक्षणाच्या दृष्टीने आवश्यक आहे असे ठरेल, तर त्यासाठी सरकारला लोकमत जागृत करावयास नको काय? या संघर्षात आपण स्वावलंबनासाठी त्यापायी पडेल तो त्याग करण्यासाठी लोकांना आवाहन केलेच की नाही? तेव्हा लोकांची संमती मिळेल की नाही हा येथे प्रश्न येथे गौण ठरतो. अणुबाँब तयार करणे इष्ट आहे की अनिष्ट आहे हाच खरा प्रश्न आहे आणि त्या प्रश्नाचे उत्तर शोधताना राजकीय वास्तवता काय आहे, याचे थोडे दिग्दर्शन करण्याचा मी येथे प्रयत्न केला आहे.

(९-१-१९६६)

ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थळप्रत
अनुक्रम ४४०६३ वि: निबंध
क्रमांक १८२९ नों: दि ११।११।६६

२

# स्वावलंबनाचे असिधारा व्रत

समुद्रमंथनाप्रमाणेच सध्याच्या संघर्षातून अनेक रत्ने निर्माण होऊ लागली आहेत. स्वावलंबनाचे तत्त्व हे त्यांपैकीच एक रत्न होय. आपणांस माहीत आहे की, समुद्रमंथनातून हालाहल निर्माण झाले आणि अमृतही हाती लागले. स्वावलंबनाला यापैकी कशाची उपमा देता येईल ? माझ्या मताने स्वावलंबन आरंभी हालाहलासारखे आहे आणि परिणामी अमृतासारखे आहे. अलंकारिक भाषा सोडून असे सांगितले पाहिजे की स्वावलंबनाचा निर्णय घेताना आपण फार कठीण निर्णय घेत आहो याची आपण जाणीव ठेवावी. सध्याचे वातावरण भावनेने भरून गेले आहे. आपल्या जवानांनी गाजविलेली मर्दुमकी, त्यामुळे कित्येक वर्षे हृदयात असलेले शल्य नाहीसे होऊन झालेला आनंद, स्वसामर्थ्याबद्दल निर्माण झालेला आत्मविश्वास, या घटनांनी सामान्य जनता इतकी उत्तेजित व उद्दीपित झालेली आहे की परकीय मदत न घेता आपण स्वावलंबनाने स्वतःचा विकास करून घेण्यास तयार असले पाहिजे असे कोणी सांगितले की, जनता टाळयांच्या प्रचंड कडकडाटात त्या आवाहनाला साथ देत असते. अर्थात् लोकांचा हा उत्साह केव्हाही स्वागतार्हच आहे. त्या उत्साहावर पाणी पडेल असे कोणीही काहीही करता कामा नये. पण हा उत्साह महापुरासारखा हंगामी स्वरूपाचा न राहाता त्याला स्थायीभाव यावयाचा असेल तर या स्वावलंबनाच्या धोरणातील गृहीत कृत्ये, त्यासाठी पाळावी लागणारी पथ्ये, करावा लागणारा त्याग

आणि त्या धोरणाचे परिणाम या सर्वांची लोकनेत्यांनी आतापासून जनतेला नीट व स्पष्ट जाणीव करून दिली पाहिजे.

स्वावलंबनाचा विचार म्हणजे देशाच्या आर्थिक बाजूचा विचार. राजकारण व लष्कर यांच्याभोवती जे एक तेजोवलय असते, ते अर्थकारणाभोवती नसते; पण हेहि तितकेच खरे आहे की, राजकारण व लष्कर यांपेक्षा अर्थकारणाला अधिक महत्त्व असते. किंबहुना असेही म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही की, अर्थकारण हा आपला लष्करी मर्दुमकीचा पाया आहे. पुनरावृत्तीचा दोष पत्करूनही 'सैन्य पोटावर चालते' हा नेपोलियनचा सिद्धान्त सांगण्याचा मोह मला येथे आवरता येत नाही. तेव्हा असे निष्पन्न झाले की, आपल्याला आपले लष्करी सामर्थ्य वाढवावयाचे असेल तर शस्त्र-निर्मितीच्या कारखान्यांच्या वाढीवर आपल्याला भर दिला पाहिजे. आता शस्त्रनिर्मितीचे कारखाने वाढवावयाचे तर लोखंड व पोलाद, रासायनिक द्रव्ये, आदि उत्पादक मालाचे कारखाने वाढविणे भाग आहे. या ठिकाणी उत्पादक माल व उपभोग्य माल या अर्थशास्त्रीय परिभाषा आपण नीट समजावून घेतल्या पाहिजेत. उत्पादक माल म्हणजे तो माल की ज्यामधूनच अन्न, कापड आदी उपभोग्य माल निर्माण करणारी यंत्रसामुग्री निर्माण होऊ शकते. जीवनाच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी लागणारा माल तो उपभोग्य माल होय. शस्त्रनिर्मितीमधील वाढ अशा प्रकारे उत्पादक माल निर्माण करणाऱ्या कारखान्यांशी निगडित आहे.

मागास राष्ट्राचा आर्थिक विकास होण्यासाठी उत्पादक मालाचे कारखाने वाढवून, त्या राष्ट्रांचा औद्योगिक पाया विस्तृत व रुंद होण्याची गरज असते; पण त्याचबरोबर हेही आपण लक्षात घेतले पाहिजे की, ज्या प्रमाणात उत्पादक मालाची वाढ होत जाते, त्या प्रमाणात उपभोग्य मालाचे उत्पादन कमी होत जाते. म्हणजे शांततेच्या काळातही आर्थिक विकास करून घेताना मागस राष्ट्रातील जनतेला काही काळ पोट बांधून काम करावे लागते; पण आशा अशी असते की, हे उत्पादक, मुलभूत व अवजड उद्योगधंदे निर्माण होऊन आवश्यक असा औद्योगिक पाया तयार झाला की, नंतर उपभोग्य वस्तूचे उत्पादन पूर्वीपेक्षा मोठ्या प्रमाणावर होऊन लोकांचे राहणीमान वाढत जावे. या मार्गाने अर्थिक विकास करून घेण्यात धोका असतो हेही आपण लक्षात घेतले पाहिजे. या मार्गाने जाताना जर विशिष्ट पथ्ये पाळली नाहीत तर या अर्थिक विकासात लोकशाहीची आहुती पडते. हिटलरचा जर्मनी व स्टालिनचा रशिया या धोक्याची प्रात्यक्षिके होत. आता या उत्पादक मालाच्या कारखान्यातून उपभोग्य माल निर्माण करणारी यंत्रसामुग्री निर्माण न होता जर शस्त्रनिर्मिती होऊ लागली तर लोकशाहीला

निर्माण होणारा धोका किती तरी पटीने वाढेल याचीही आपल्याला नीट कल्पना असली पाहिजे.

हा धोका टाळण्यासाठी पंडित नेहरूंनी नियोजनात स्वावलंबनाचा मार्ग न पत्करता आंतरराष्ट्रीय सहकार्याचा मार्ग पत्करला. वीज, मोठी धरणे, लोखंड व पोलाद, सिमेंट, रासायनिक द्रव्ये व खते इत्यादी उत्पादक मालाच्या निर्मितीचे उद्योग वाढविताना अन्नधान्याची व उपभोग्य मालाची तूट आली तर त्यासाठी आवश्यक तो माल परदेशातून आयात करावा. हे उत्पादक व अवजड उद्योग निर्माण करण्यासाठी प्रचंड प्रमाणावर भांडवल लागेल, ते सारेच्या सारे देशात उपलब्ध होणार नाही म्हणून त्यापैकी काही भाग मदतीच्या व कर्जाच्या रूपाने परदेशातून आणावा आणि उत्पादक मालनिर्मितीवर भर देणाऱ्या नियोजनातून निर्माण होणारे चलनवाढ, भाववाढ, परदेशी चलनाची चणचण हे दोष शक्यतोवर टाळावेत, हे पं. नेहरूंनी स्वीकारलेल्या मार्गाचे थोडक्यात स्वरूप होते. या मार्गाने जाण्यात लोकशाहीवर येणारे गंडांतर टळण्याचा संभव असला तरी ज्या राष्ट्रांची मदत आपण घेणार त्या राष्ट्रांचे प्रत्यक्ष नसले तरी अप्रत्यक्ष वर्चस्व वा दडपण येण्याचा धोका होता हेही आपण नीट लक्षात घेतले पाहिजे. मदतीबरोबर किंवा भांडवलाच्या आयातीबरोबर राजकीय पाश येणार असतील तर आम्ही ती मदत वा ते भांडवल घेणार नाही हे पं. नेहरूंनी लोकसभेत वा सभागृहाबाहेर वारंवार आवर्जून सांगितले असले तरी तो धोका नष्ट झालेला नव्हता आणि त्यांच्या पश्चात आज तो धोका खरा ठरला आहे.

हा धोका टाळण्यासाठी, दडपणाचा प्रतिकार करण्यासाठी आपण स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारला आहे, पण स्वावलंबन–मार्ग स्वीकारताना आपण काय काय स्वीकारले आहे, कशाकशासाठी आपण प्रतिज्ञाबद्ध होत आहोत याचीही आपल्याला यथार्थ कल्पना आली पाहिजे. शस्त्रनिर्मिती व आर्थिक विकास या दोन्ही आघाड्यांवर आपण स्वावलंबी होण्याचे ठरविले आहे. इंग्लंड, अमेरिका वा रशिया, कोणीहि शस्त्रे देण्याचे नाकारले तर आपण त्याला दबकणार नाही. पण दबकणार नाही एवढ्याचा उपयोग नाही. ही शस्त्रे देशातल्या देशात तयार करण्याची जबाबदारी स्वीकारली आहे. शस्त्रनिर्मितीबाबत स्वावलंबन करण्याची शक्यता व निश्चय पाहिल्यावर स्वाभाविकच अन्नधान्याची मदत बंद करण्याचा, पैशाच्या मदतीचा वेग मंद करण्याचा पुढचा टप्पा येतो. तेव्हा आपण त्याही क्षेत्रात स्वावलंबन करू असा निश्चय केला आहे. या दोन्ही क्षेत्रात स्वावलंबन करू असे म्हणताना आपण कशाकशाला मान्यता दिली आहे ? आपण शस्त्रनिर्मितीवर भर देताना जर अन्नाची, वस्त्राची तूट आली तर

ती आनंदाने सहन करू या गोष्टीला मान्यता दिली आहे. शस्त्रनिर्मिती करीत असतानाच त्याच वेगाने उत्पादक मालाचे उत्पादन वाढवू यालाही मान्यता दिलेली आहे. त्याचबरोबर अन्नधान्याचे उत्पादन वाढवू यालाही मान्यता दिलेली आहे. हे सारे उत्पादन वाढविण्यास लागणारे भांडवल देशातल्या देशात गोळा करू यालाही मान्यता दिलेली आहे. मला वाटते हे सारे निर्णय अतिशय कठीण व गंभीर स्वरूपाचे आहेत.

आपण या भ्रमात राहू नये की, अमेरिकेने धान्य मदत वा पैशाची मदत थांबविली, तर आपल्या अर्थव्यवस्थेवर याचा कसलाही परिणाम होणार नाही. आपण असा एक प्रगतीचा चमत्कारिक टप्पा गाठलेला आहे की, आपल्या उद्योगांचा विविध प्रकारे व व्यापक स्वरूपात विकास झालेला आहे. पण बाहेरची मदत मिळाली नाही तरी या औद्योगिक विकासातूनच पुढील विकासाला लागणारे भांडवल आपोआप मिळू शकेल, येथपर्यंत हा विकास पोचलेला नाही. ही अवस्था जशी महत्त्वाची तशीच नाजूक आहे. यंत्रे, यंत्रांचे सुटे भाग व अन्य प्रकारची मदत याची या वेळेसच खरी गरज आहे आणि नेमके याच वेळेला ती मदत थांबविण्यात आलेली आहे. एकदोन उदाहरणे देतो. एक्स्पोर्ट-इंपोर्ट बँक ही संपूर्ण अमेरिकन सरकारच्या मालकीची. या बँकेने भारताला द्यावयाच्या कर्जाचा वेग अती मंद केला आहे. त्याचा आपल्या विकासाच्या गतीवर परिणाम होणार नाही असे कसे म्हणता येईल ? बँकेच्या या धोरणामुळे जी विकासाची कामे धूमधडाक्याने सुरू होणार होती ती आता थंडावली आहेत. अमेरिकन सरकारने शेतीच्या विकासासाठी जी मदत देऊ केली होती तीही आता स्थगित केली आहे. त्यामुळे रासायनिक पुरवठ्यावर प्रतिकूल परिणाम होणार असून पुढील वर्षांच्या धान्योत्पादनावर त्याचा परिणाम झाल्याविना राहाणार नाही हे निःसंशय.

या दबकावणीने नाउमेद होण्याचे कारण नाही; पण त्याचबरोबर फाजील आशावाद बाळगून चालणार नाही. आगामी चार-पाच वर्षे आपणांस त्रासाची काढावी लागणार आहेत असे आपण धरून चालावे, पण गेल्या खेपेस मी ज्या राष्ट्रीय श्रद्धेचा उल्लेख केला होता त्या श्रद्धेची येथे या क्षेत्रात गरज आहे. श्रद्धेने जर पर्वत हालतात तर विकास कामे जरूर हालतील. पहा, आज आपल्याला खरी गरज आहे भांडवलाची. त्यासाठी सरकारने दोन योजना सादर केलेल्या आहेत. परदेशात ज्यांचे पैसे गुंतलेले आहेत त्यांनी ते पैसे भारतात परत आणावेत ही एक योजना. सरकारने त्यासाठी खास सवलतीही जाहीर केल्या आहेत; पण आमिषांनी या भांडवलाला स्वदेशाकडे पाय फुटणार नाहीत. त्यासाठी श्रद्धा

हवी. हे जे परदेशात स्वदेशी भांडवल पडून राहिले आहे, ते सारेच काही सरळ मार्गाने तिकडे गेले नाही. त्या कामी वाममार्गाचा बराच वापर झालेला असला पाहिजे. सरकारने या वाममार्गीयांना अभयदान दिले असले तरी हृदयात राष्ट्रनिष्ठेची तार छेडल्याखेरीज ते भांडवल परत येणार नाही हे निश्चित. या लोकांच्या अंतःकरणांतील राष्ट्रप्रेम जागे झालेच तर तज्ज्ञांच्या अंदाजाप्रमाणे दोनशे ते तीनशे कोटी रुपयांचे भांडवल सहज गोळा होऊ शकेल.

दुसरी योजना सुवर्णरोख्यांची. यात सोने बाळगणारांचे नुकसान असे काहीच नाही. पण दुर्दैवाची गोष्ट अशी दिसते की ज्यांच्याजवळ देण्यासारखे सोने आहे ते अजून दत नाहीत. सामान्य लोक मात्र आपले किडूकमिडूक घेऊन रांगा लावीत आहेत. या थेंबाथेंबानेही तळे भरून जाईल असा आशावाद जरूर बाळगावा; पण ज्यांनी दिले असता भारत सरकारची भांडवलटंचाई बऱ्याच प्रमाणात दूर होऊ शकेल त्यांच्या अंतःकरणांतील श्रद्धा जागी होत नाही. वास्तविक ‘श्रद्धया देयं’ ‘इया देयं’ ‘भिया देयं’ असा हा प्रसंग आहे; पण त्या प्रसंगाचे नाद अंतरी उमटले पाहिजेत. सामान्य मनुष्य आजपर्यंत देतच आला आहे. त्याला कोणीच घेऊ देत नाही. ज्याच्याजवळ देण्यासारखे आहे तो मात्र देत नाही. तो एकसारखा घेतच सुटला आहे. देवाणघेवाणीचा हा उलटा व्यवहार सरळ व्हावा असा आजचा प्रसंग आहे, देशातील प्रत्येक व्यक्तीच्या निष्ठेची कसोटी पाहणारा हा प्रसंग आहे.

अन्नधान्याचे उत्पादन व पुरवठा हाही असाच कसोटीचा प्रसंग. याही क्षेत्रात वास्तववादी दृष्टीची गरज आहे. अवघी आठ टक्के अन्नधान्याची तूट आहे; या आठ टक्क्यांकडे अधिक्षेपाने पाहू नये. शेवटचे आठ टक्केच भरून काढणे कठीण असते. सध्याचे पावसापाण्याचे मान लक्षात घेतल्यास अन्नधान्याची टंचाई भासणार हे आपण धरून चालावे. या टंचाईला तोंड देण्यासाठी आपण काय केले पाहिजे? येथेही सामाजिक कर्तव्याची जाणीव ज्या प्रमाणात होईल त्या प्रमाणात या टंचाईचा भाग सर्वांवर सारख्या प्रमाणात पडेल व टंचाईची तीव्रता कमी होईल. लोकात ही जाणीव निर्माण करण्याचे काम समाजधुरीणांचे व पक्षनेत्यांचे आहे. केवळ सरकारने स्वावलंबनाचे धोरण जाहीर करून चालत नाही. त्यासाठी लोकांचा प्रतिसाद हवा. तो प्रतिसाद मिळविण्याचे काम राजकीय पक्षांचे आजचे राजकीय पक्ष या कामी फार अपुरे पडतात. या परिस्थितीत शासनयंत्रणेवरही जबाबदारी आहे. सचोटी व लोकहितदक्षता, कार्यक्षमता व झपाट्याने कामाचा उरक करण्याविषयी तत्परता या गुणांनी शासनयंत्रणा समृद्ध होणार नसेल तर या टंचाईचे स्वरूप तीव्रच होत जाईल.

सारांश, रणांगणाच्या आघाडीपेक्षाही ही आर्थिक आघाडी महत्त्वाची आहे. स्वावलंबनाचा आपण अत्यंत कठीण असा निर्णय घेतला आहे. लोकांच्या संमतीने हा निर्णय आपण अमलात आणणार आहोत. कारण संमती हाच लोकशाहीचा खरा आधार. लोकांनी या निर्णयाला संमती दिलेली आहे. त्या संमतीला पात्र आहोत असे सिद्ध करण्याची जबाबदारी नेत्यांवर येऊन पडते. सरकार, राजकीय पक्ष, सामाजिक संस्था, शेत पिकविणारा व कारखाना चालविणारा, व्यापारी व ग्राहक या सर्व क्षेत्रांतील नेत्यांवर ही जबाबदारी येऊन पडते. कारण रणांगणावरील आघाडीसारखी ही आर्थिक आघाडी एका विशिष्ट भागापुरतीच मर्यादित नाही. ती सर्वत्र विखुरलेली आहे. देशभर ही आघाडी पसरलेली आहे. युद्धविरामाला पूर्णविरामाचे स्वरूप द्यावयाचे झाल्यास ही आघाडी बळकट होणे अगत्याचे आहे. भारतात लोकशाही आहे की नाही याविषी शंका घेणाऱ्या, पाकिस्तानीप्रेमाने भारतावर दडपण आणू पाहणाऱ्या अँग्लो-अमेरिकनांना तेच एक चोख उत्तर आहे.

(७-११-१९६५)

३

# राष्ट्रीय एकात्मता

भारत पाक संघर्षांत सर्व पक्षांच्या, पंथांच्या व धर्मांच्या लोकांनी जी अभेद्य एकजूट दाखविली, त्याबद्दल पंतप्रधान ना. शास्त्रींनी हार्दिक समाधान व्यक्त केले. हा संघर्ष सुरू होण्यापूर्वी दक्षिण भारतातील भाषिक दंगल आणि ठिकठिकाणच्या जातीय दंगलीवर भर देऊन, काश्मीरवर हल्ला केल्यास भारतीय समाज अंतर्गत मतभेदांनी कोलमडून पडेल आणि मग आपले पॅटन टँक्स दिल्लीचा मार्ग सुखाने व सुलभतेने आक्रमण करतील ही पाकिस्तानी राज्यकर्त्यांची स्वप्ने धुळीस मिळाली आणि भाषा, धर्म, पंथ या भेदांनी भारतीय समाज आतून पोखरला गेला आहे या कल्पनेला घट्ट चिकटून असलेल्या अँग्लोअमेरिकनांना आश्चर्याचा धक्का बसला. एकाच घटनेच्या अशाच वेगवेगळ्या प्रतिक्रिया होऊ शकतात. ज्याची जशी दृष्टी तशी त्याला सृष्टी दिसत असते. कंसवधासाठी मथुरेत कृष्ण आल्यानंतर तो ज्याला त्याला ज्याच्या त्याच्या भूमिकेप्रमाणे वेगवेगळ्या स्वरूपात दिसला. तोच न्याय येथेही लागू पडतो.

या संघर्षात राष्ट्रीय एकात्मतेचे हे जे मनोज्ञ दर्शन घडले, त्यावर प्रकट चिंतन झाले पाहिजे. म्हणून मी येथे थोडासा प्रयत्न करणार आहे. राष्ट्रीय एकात्मतेच्या आविष्काराने ज्या कोणाच्या मनात निराशावाद असेल तो दूर व्हावा. हा समाज जातिभेदांनी विस्कळीत झालेला आहे, म. गांधी, जवाहरलाल नेहरू इत्यादी दिग्गजांसारखी माणसे गेल्यानंतर कसे होणार या समाजाचे, हे रडगाणे केवळ

पाश्चात्य राष्ट्रेंच गात होती असे नाही. आपल्या समाजातील आंग्लविद्या-विभूषितांचा जो वर्ग आहे, त्या वर्गातील बराचसा भाग या न्यूनगंडाने पछाडलेला आहे. ' ' East is East, West is West and the twin shall never meet. ' हा किप्लिंगने व्यक्त केलेला अहंगंड आणि आमच्या सुशिक्षितांच्या मनांतील न्यूनगंड, या एकाच नाण्याच्या दोन बाजू होत. पण महात्माजी गेले आणि पंडितजीही आपल्यात नाहीत. त्या मानाने सध्याचे नेते छोटे आहेत असा सर्वांचा समज. पण या छोट्या नेत्यांनी मोठ्यांपेक्षा मोठे काम करून दाखविले. ' कभी कभी ऐसा होता है कि छोटी छोटी चीजेभी ज्यादा काम करती हैं ! ' हे पंतप्रधानांचे उत्तर या न्यूनगंडधारी लोकांना समर्पक वाटावे, अशी आजची परिस्थिती आहे.

पण राष्ट्रीय एकात्मतेच्या आविष्काराने हुरळून जाण्याचेही कारण नाही. निराशावाद नको तसाच आशावादही नको. वास्तववाद हवा. त्या भूमिकेवरून राष्ट्रीय एकात्मतेच्या आविष्काराचे परीक्षण झाले पाहिजे. त्या दृष्टीने आपल्याला काय आढळून येते ? पहिली गोष्ट, राष्ट्रीय एकात्मतेचा आविष्कार हा स्थायीभाव नाही. जेव्हा केव्हा राष्ट्रीय आपत्ती येईल, पेचप्रसंग निर्माण होईल, तेव्हा ही एकात्मता जागी होत असते. १९६२ साली झालेले चीनचे आक्रमण, पं. नेहरूंच्या प्रयाणानंतर निर्माण झालेली राजकीय पोकळी आणि आताचा संघर्ष, असे प्रसंग निर्माण होतात तेव्हा लोक एकदिलाने उभे राहतात. ही एकात्मता इतकी प्रभावी ठरते की, तिच्या रेट्याने नेते पुढे रेटले जातात; पण हे प्रसंग ओसरले की, एकात्मतेचाही भर ओसरू लागतो. पावसाळ्यात नद्यांना जसे महापूर येतात आणि नंतर ओसरतात तसे या भावनेला पूर येतात व ओसरततात. त्या भावनेचा कायम साठा होऊ शकत नाही.

दुसरी गोष्ट. राष्ट्रीय एकात्मतेला अजून विरोधाचे स्वरूप आहे. ती भावना निषेधपर आहे. तिला विधायक स्वरूप अजून आलेले नाही. एखादा परकीय शत्रू उभा राहिला की आपण सारे एक होतो. ' वयं पंचशताधिकं ' अशी ही भावना आहे. ब्रिटिश राज्यकर्ते होते त्या वेळी एकात्मतेचे हे स्वरूप होते. चीनने आक्रमण केले त्या वेळी हेच स्वरूप होते. आणि आजही हेच स्वरूप आहे. म्हणजे राष्ट्रीय एकात्मता हा एक नैमित्तिक धर्म आहे, असे आपण समजतो. ते निमित्त संपले की, आपण परत पूर्वपदावर तो. याचा अर्थ असा आहे की, या एकात्मतेला स्थायी व विधायक स्वरूप आलेले नाही. तसे स्वरूप देण्याची जबाबदारी नेत्यांची व राज्यकर्त्यांची आहे. इतिहासाने त्यांना हे एक आव्हान दिलेले आहे. ' ऱ्होड्स सेमिनार ' मध्ये प्रा. धनंजयराव गाडगीळ यांनी या मुद्द्याचे

चांगले विवेचन केले आहे. त्यांनी काढलेला निष्कर्ष त्यांच्याच शब्दात येथे देतो.

" The attainment of national unity should be considered a challenge to the leaders and rulers of the new States. It has to be achieved and cannot be taken for granted. "

राष्ट्रीय एकात्मता हा तयार माल नाही. तो बनावयाचा आहे. या दोनतीन प्रसंगी हा माल तयार होण्याची प्रसादचिन्हे स्पष्ट दिसू लागली आहेत. पण अद्यापि बरीच मजल गाठावयाची आहे. या वास्तववादी भूमिकेवरून सध्या प्रकट झालेल्या राष्ट्रीय एकात्मतेचा विचार व्हावा. कारण असेही लोक आहेत की भारतात ही राष्ट्रीयत्वाची भावना फार प्राचीन काळापासून होती असे ते मानतात. मी असे मानणारांपैकी नाही. इतिहासाची याला साक्ष नाही. हा भारत नवखंड पृथ्वी आणि दशमखंड काशी असा दशखंडी होता. आताची घटक राज्ये पूर्वीची राष्ट्रे व राष्ट्रके होती. या सर्व राष्ट्रांना मांडलिक बनवून अधिराज्य भोगणारा तो चक्रवर्ती. अश्वमेध यज्ञ त्याने करावयाचा. मी ही यादी अधिक लांबवीत नाही. वानगीदाखल उदाहरणे दिली ती अशासाठी की, इतिहासात जे घडले नाही ते घडले असा इतिहासावर बलात्कार करण्याची प्रवृत्ति थांबवावी. आतांच्या कल्पना इतिहासावर अशा प्रकारे लादण्याचा प्रयत्न झाला तर त्यातून निर्माण होणारी राष्ट्रीय एकात्मता लोकशाहीला पोषक ठरणार नाही. हिंदुत्वनिष्ठ वा जनसंघीयांशी माझा मतभेद आहे तो या मुद्यावर त्यांची दृष्टी भूतकालाकडे वळलेली आहे आणि याच कारणासाठी महात्माजींची रामराज्याची कल्पनाही मला मान्य होत नाही. भारत यापुढे हिंदू राज्य राहणार नाही. किंवा ते रामराज्यही राहणार नाही. ते विशुद्ध लोकराज्य असले पाहिजे, तरच ते जगेल.

थोडक्यात भारतीय समाजाचे आधुनिक समाजात रूपांतर करण्याची जबाबदारी भविष्यकाळाने आपल्यावर टाकलेली आहे. असे रूपांतर झाल्याविना मधून मधून उफाळून वर येणाऱ्या या राष्ट्रीय एकात्मतेला स्थायी स्वरूप येणार नाही. ही रूपांतराची प्रक्रिया फार अवघड आहे. दीर्घोद्योग, चिकाटी, धडाडी इत्यादी अनेक गुणांची या कामी गरज आहे. आपण असा विचार करा की, हजारो वर्षांच्या भारतीय परंपरा वेगळ्या स्वरूपाच्या होत्या. मोक्षधर्म, कुलधर्म इत्यादी अनेक धर्म त्यात समाविष्ट होते; पण राष्ट्रधर्माच्या जोपासनेला अवघे एक शतकही पूर्ण झालेले नाही. भारतीय राजकारणाचे जनक न्यायमूर्ती रानडे यांच्यापासून बोटे घालून वर्षे मोजा. पुरे शतकही होणार नाही असे आपल्याला दिसेल. तेव्हा हजार वर्षांचा आचार व शंभर वर्षांचा प्रचार असा हा सामना आहे. हा काही तुल्यबल सामना नाही!

तरी देखील भारताच्या आधुनिक इतिहासातील या नेत्यांनी जे कमावले ते थोडे थोडके नाही, असाच कौल द्यावा लागतो. अंतर्गत भेदांनी व परस्परांच्या असूयेने हा एवढा मोठा समाज एखाद्या लोखंडाच्या गोळ्याप्रमाणे थंड पडला होता. त्यात राष्ट्रवादाची ऊब या राजकीय नेत्यांनी निर्माण केली. राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेला त्यांनी खतपाणी घातले. ही आधुनिक भावना टिकावी व वाढीस लागावी म्हणून त्यांना नव्या राजकीय व सामाजिक संस्था निर्माण कराव्या लागल्या आणि या निर्माण करताना त्यांना परंपरा, रूढी व अंधश्रद्धा यांच्याशी प्रखर सामना द्यावा लागला. हे असे इतिहासात नेहमीच घडते. मानव-समाजाच्या इतिहासाचा प्रसिद्ध भाष्यकार टॉन्बी लिहितो.

" The introduction of new dynamic forces ought to be accompanied by a reconstruction of a whole existing set of institutions, and in any actually growing society a constant readjustment of the more flagrant anachrnisms is continually going on. "

आज या पेचप्रसंगात जाती, पंथ, भाषा, धर्म या संकुचित भावनांना छेदून राष्ट्रीय एकात्मतेचा जो आविष्कार आपण पाहत आहोत, तो म्हणजे आपल्या पूर्वीच्या नेत्यांनी खतपाणी घालून वाढविलेल्या वृक्षाचे एक परिणत फळ आहे. प्रसंगी भारतीयांनी त्या नेत्यांचेही कृतज्ञतापूर्वक स्मरण केले पाहिजे.

पण गेल्या पाऊणशे-शंभर वर्षांत समाजधुरिणांनी जे घडवून आणले ती केवळ सुरुवात होती. नव्या युगाचा तो एक शुभारंभ होता. हजार वर्षांचा साचत आलेला गाळ एवढ्या अल्पावधीत संपूर्ण कसा उपसला जाणार ? आणि म्हणून वॉल्टर लिप्मनसारख्या विचारी पाश्चात्यांचाही भारतात एकात्मतेचा आविष्कार होत आहे या घटनेवर विश्वास बसत नाही. ती घटना आज निश्चित घडू लागली आहे. ती चिरस्थायी कशी होईल या दिशेने प्रयत्न करण्याची जबाबदारी आपली आहे. स्वातंत्र्यपूर्व कालात राष्ट्रीय एकात्मतेची जोपासना करणारांच्या मार्गात अनेक अडचणी होत्या. पहिली व सर्वांत मोठी अडचण परकीय सत्तेची. या सत्तेला विरोध करताना विरोध हाच त्या भावनेचा स्थायी भाव होऊन बसला. असंस्कृतांना संस्कृतिदान आम्ही करीत आहोत, या अहंगंडाने प्रेरित झालेल्या परकीय सत्तेला विरोध करताना, आमच्या राष्ट्रवादाचे तोंड साहजिकच भूत-कालाकडे वळले आणि भविष्यकाळाचा वेध घेण्याऐवजी भूतकाळाचे उदात्ती-करण करण्याची प्रवृत्ती बळावली. तथापि आताचा राष्ट्रीय एकात्मतेचा हृद्य आविष्कार या अनंत अडचणींना तोंड देत देत राष्ट्रीय एकात्मतेचा गाभा कायम

राखण्यात या लोकांनी यश मिळविले याचीच साक्ष देत आहे.

तेव्हा दादाभाई नौरोजी, रानडे, टिळक, आगरकर, महात्माजी यांनी जो पाया घातला त्यावर एक विधायक मंदिर उभे करण्याची जबाबदारी आपल्यावर येऊन पडलेली आहे. त्या दृष्टीने सध्याचा पाकिस्तान व भारत यातीळ संघर्ष हा धर्माधिष्ठित हुकूमशाही व धर्मातीत लोकशाही यातील संघर्ष आहे या मुद्याकडे मी विचारवंतांचे लक्ष वेधू इच्छितो. राष्ट्रवादाच्या अतिरेकाने भयभीत झालेल्या लोकांनाही संघर्षाचे हे स्वरूप लक्षात घेतल्यास थोडे हायसे वाटेल. राष्ट्रवादाचा अतिरेक थोपवून धरण्यासाटी सँको पांझाप्रमाणे पवनचक्कीवर हल्ला करण्याची या लोकांना गरज भासणार नाही. या समाजात धर्मातीत लोकशाहीची भावना कशी बळ धरू शकेल याचाच विचार यापुढे महत्त्वाचा विचार ठरणार आहे. या संघर्षाने हा एक चांगला व निकोप असा राजकीय विचार पुढे आला. आता आपले कर्तव्य हे आहे की, आपल्या देशात हा विचार जेणेकरून खोलवर रूजेल असा आपण प्रयत्न करावा आणि देशाबाहेरचे जे लोक अजून हा विचार मानीत नाहीत त्यांना तो पटवून देण्याची कोशिस करावी.

भारत धर्मातीत लोकशाही राष्ट्र आहे असे पाश्चात्य जग अजून मानीत नाही. पाकिस्तान हे मुसलमान राष्ट्र आणि भारत हे हिंदु राष्ट्र असाच पाश्चात्य लोक या दोन राष्ट्रांचा उल्लेख करतात. ज्या राज्यात सहा कोटी मुसलमान सुखा-समाधानाने राहतात त्या राज्याचा हिंदू राज्य असा कसा उल्लेख करता? असे कोणी अडवलेच तर ‘ बहुसंख्य हिंदू असलेले राज्य ’ असा आडवळणाने तोच उल्लेख करतात. पण भारत धर्मातीत लोकशाही राज्य आहे, हे समीकरण ते लोक काही केल्या मान्य करावयास तयार होत नाहीत. लोकशाहीला पात्र असलेला समाज काय तो पाश्चात्य समाजच आहे, असा अहंभाव या राष्ट्रात असावा असे यावरून दिसते. तरी बरे, निर्भेळ लोकशाही बड्या राष्ट्रातही आहे असे म्हणता येणार नाही! लोकशाहीविषयी येवढे प्रख्यात राष्ट्र इंग्लंड; पण ते देखील राजा व राणी यांनाच प्रमुख मानते. द गॉलने फ्रान्समध्ये लोकशाही कशी पद्धतशीर गुंडाळून ठेवली हा इतिहास अगदी ताजा व आपल्या डोळ्यांदेखत घडलेला आहे. अमेरिकेत यापेक्षा अधिक निर्भेळ स्वरूपाची लोकशाही आहे. तरी देखील अमेरिकेच्या अध्यक्षपदाची माळ अजून कोणा निग्रो इसमाच्या गळ्यात पडल्याचे ऐकिवात नाही. इतके असून नखरा हा की भारतासारख्या मागास देशात लोकशाही येणार नाही!!

पण परकीयांचे हृदयपरिवर्तन करण्यापेक्षा आपल्या समाजाचे परिवर्तन करणे अधिक श्रेयस्कर. असे म्हणतात की, शंभर वर्षांचा इतिहास युद्धाने दहा वर्षांत

घडतो. मात्र त्या संधीचा फायदा घेण्याची दृष्टी हवी व कुवत हवी. भारत–पाक संघर्ष हा तर अवघ्या बावीस दिवसांचा; पण रशियन क्रांतीने दहा दिवसात जगाला जसा हादरा दिला तसाच या संघर्षाने बावीस दिवसात जगाला धक्का दिला आहे ! या अवधीत सारा भारतीय समाज एकरूप झाल्याचे दृश्य आपण पाहिले. आता त्या एकरूपतेला चिरस्थायी स्वरूप देण्याचा प्रसंग आलेला आहे. रणांगणावर जवानांनी गाजविलेल्या शौर्याची परिणती त्याशिवाय होणार नाही, पण त्यासाठी संघटनात्मक हत्यारे फार मजबूत हवीत. भीती अशी वाटते की, काळाने संधी आणून दिली आणि तयारी नाही म्हणून आम्ही ती गमावली असे घडण्याचा संभव आहे. असे न घडावे हीच शुभेच्छा मी येथे व्यक्त करतो ! !

(२४-१०-१९६५)

...ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ४४०६३ दि: नि.व्यं.
क्रमांक १५०२९ नों. दि: २५।२२

४

# दोन कम्युनिस्ट धर्मपीठे

कम्युनिस्टांची आता दोन धर्मपीठे झाली आहेत. एक मॉस्को आणि दुसरे पेकिंग. जगातील सर्व कम्युनिस्ट पक्ष दुभंगावेत हा या घटनेचा एक स्वाभाविक परिणाम आहे. अर्थात् ज्या राष्ट्रात कम्युनिस्ट सत्ताधारी आहेत, त्या राष्ट्राचे मॉस्कोवादी व पेकिंगवादी असे दोन गट पडले असून, जेथे कम्युनिस्ट पक्ष सत्ताधारी नाहीत तेथे त्या पक्षात दोन फळ्या पडल्या आहेत. दोघेही स्वतःला कम्युनिस्ट म्हणवितात. नव्हे आपण तेवढे खरे कम्युनिस्ट आहोत, असा प्रत्येक बाजूचा दावा आहे. खऱ्या कम्युनिस्टांचे लक्षण कोणते? तर मार्क्सवाद–लेनिनवाद यावर ज्याची नितांत श्रद्धा आहे तो खरा कम्युनिस्ट. मागे स्टालिन जिवंत असताना मार्क्सवाद लेनिनवाद–स्टालिनवाद अशी एक लांबलचक मालगाडी होती; पण स्टालिनच्या मृत्यूनंतर त्याच्या कुंडलीतील ग्रह फिरले आणि एका गटाने 'स्टालिनवादा'चे शेपूट गाळून टाकले. पेकिंगवादी गट मात्र हा वाद गाळण्यास राजी नाही. हा अवांतर प्रश्न बाजूला ठेवला तरी प्रत्येक गटाचा आपण तेवढे खरे कम्युनिस्ट हा दावा आहे. म्हणजे मार्क्सवाद–लेनिनवादाचे आपणच तेवढे सच्चे अनुयायी आहोत अशी प्रत्येक गटाची भूमिका आहे.

एकेश्वरी धर्मपंथातील कडवेपणा जशाचा तसाच उचलणारा हाच निरीश्वरवादी पंथ आहे. त्यामुळे त्या कडवटपणातून निर्माण होणारी असहिष्णुताही या पंथात भरपूर प्रमाणात आढळते. आपल्या पंथातून फुटून

बाहेर पडणारावर, मतभेद प्रदर्शित करणारांवर यांचा फार राग होतो. अशा रीतीने कळपातून फुटून बाहेर पडणारावर अपशब्दांचा भडिमार करून त्याला नामोहरम करण्याची क्लृप्ति प्रथम लेनिनने शोधून काढली. मार्क्सच्या मूळ सिद्धांताला धरून रशियासारख्या मागासलेल्या देशात क्रांती होऊ शकत नाही, असे मत प्रतिपादन करणाऱ्या केरेन्स्की आदी समाजवाद्यांवर लेनिनने ' प्रतिगामी ", ' प्रतिक्रांतिकारक "; " भांडवलशाहीचे बगलबच्चे " ' साम्राज्यवादाचे बूटचाटे ' इत्यादी शिव्यांची अशी काही सरबत्ती केली म्हणता की, त्यामुळे आंतरराष्ट्रीय संघटना दुभंगून गेली. अशा रीतीने या सांप्रदायात किती अपशब्द आहेत याचा संग्रह करणे मोठे उद्बोधक ठरेल! पण एवढे मात्र खरे की, लेनिनने जो काही तत्त्वसंप्रदाय निर्माण केला असेल, त्यापेक्षा त्याने निर्माण केलेला शिवीसंप्रदाय मात्र कम्युनिस्ट पंथातील दोन पंथांना सारख्याच प्रमाणात मान्य झालेला दिसतो. आणि कम्युनिस्टेतर–त्रयस्थांपेक्षा जेव्हा हे दोन गट एकमेकांवर अपशब्दांचा प्रहार करण्यास सज्ज होतात तेव्हा ती लढाई पाहण्यासारखी असते.

भारतात या लढाईचे प्रात्यक्षिक आपण पाहातच आहोत. यापैकी गेल्या आठवड्यात मॉस्कोवादी गटाचा मेळावा मुंबई शहरात भरला होता. स्वाभाविकच सिद्धांतविवेचनाबरोबर विरुद्ध गटावर थोडी फैर झडली. स्वाभाविकच होते ते. दोघांचेही श्रद्धास्थान एकच. ते म्हणजे मार्क्सवाद–लेनिनवाद; पण मतभेद झाला तो त्याचा बरोबर अर्थ कोणता या मुद्यावर, ' वेदाचा तो अर्थ आम्हांसीच ठावा ' अशी प्रत्येकाची आग्रही भूमिका. त्यामुळे एकाने दुसऱ्याला ' रिव्हिजनिस्ट ' म्हणून हिणवावे आणि दुसऱ्याने पहिल्यास ' ॲडव्हेंचरिस्ट ' असा टोला हाणावा अशी लढत सुरू झालेली आहे. धर्मग्रंथ प्रमाण मानून त्याच ग्रंथातून परस्परविरोधी मतसंप्रदाय निर्माण करण्याची ही घटना तशी अपूर्व वा नवी नाही ! आपल्या येथे एका गीतेवर शंकराचार्य, रामानुजाचार्य, मध्वाचार्य आदी आचार्यांनी भाष्य लिहून परस्पर विरोधी पंथ निर्माण केले, इतकेच नव्हे तर एका आचार्याने दुसऱ्या पंथावर थोडे गालिप्रदानही केलेले आहे. युरोपच्या इतिहासाकडे नजर टाक तरी बायबलचा अचूक अर्थ लावण्यासाठी कॅथॉलिक धर्मपंथात तीव्र मतभेद झालेल्याचे आणि एकमेकांनी एकमेकांवर शिव्यांचा वर्षाव केल्याचे आढळून येते. युरोपच्या मध्ययुगीन इतिहासात ' सेंट सायरील ' आणि नेस्टोरियस या दोन धर्मगुरूंमध्ये ' कुमारिकेला, देवमाता ( Mother of god ) मानावे की नाही या मुद्यावर मतमेद झाला आणि ' तू पाखंडी आहेस ' असा एकमेकानी एकमेकावर आरोप करण्यात त्या मतभेदाची परिणती झाली

तेव्हा मॉस्कोवादी व पेकिंगवादी एकमेकावर कडवट शब्दप्रहार करण्यास तयार झाले ही घटना इतिहासात अद्‌भुत नाही.

पण हा अवांतर विषय झाला. दोन धर्मपीठांमुळे येथील कम्युनिस्टात जे शैव वैष्णव पंथ निर्माण झाले त्यांपैकी एका पंथाच्या परिषदेत जे काही ठरले, त्याचा मी येथे थोडक्यात विचार करणार आहे. तो पंथ मॉस्कोवादी पंथ हे न सांगताच आपण ओळखाल. मार्क्सवाद लेनिनवाद हा याही पंथाचा मूलाधार; पण त्या त्या देशातील परिस्थितीला मार्क्सवाद–लेनिनवाद कसा लागू करावा हा एक विधी या पंथात असतो. हा विधी मोठा महत्त्वाचा. पण परिस्थिती एकसारखी बदलत असते. म्हणून हा वाद लागू करण्याची क्रियाही एकसारखी बदलत जाते. १९२० पासून १९३५ पर्यंत या लागू करण्यातून 'कामगार–क्रांती' निर्माण झाली होती. पण १९३५ साली काय घडले कोण जाणे! एकदम घुमजाव होऊन भांडवलदार वर्गही देशभक्त बनला. महायुद्धात परिस्थितीचा रंग पालटला आणि रशिया युद्धात सामील होईपर्यंत हे युद्ध साम्राज्यवादी होते व रशिया दोस्तांच्या बाजूने आल्यानंतर ते एकदम लोकयुद्ध बनले! त्यातही बारकावे आहेत. रशियाच्या बाजूने, म्हणजे जर्मनीच्या पूर्वेला हे लोकयुद्ध होते व जर्मनीच्या पश्चिमेला हे साम्राज्यवादी युद्ध होते. हे बारकावे अर्थातच आपल्या डोक्यावरून जाणारे आहेत. म्हणून मी ते पार सोडून देतो. युद्ध संपल्यानंतर परिस्थितीत आणखी बदल झाला आणि त्याची आंदोलने इतक्या वेगाने होऊ लागली की, मार्क्सवाद–लेनिनवाद लागू करण्याच्या प्रक्रियेला तारेवरच्या कसरतीचे स्वरूप आले. आता लंबक थोडा मंदगती झाला आहे. आणि त्यातून 'राष्ट्रीय लोकशाही' ची भूमिका निर्माण झाली आहे.

मॉस्कोवादी पीठाच्या या राष्ट्रवादी लोकशाहीचा तोंडवळा कसा काय दिसतो? समग्र प्रबंध माझ्यासमोर नाही. वृत्तपत्रातून क्षणशः कणशः जे झिरपले त्यावरच आपल्याला तहान भागवून घ्यावी लागणार आहे. ही लोकशाही म्हणजे अनेक वर्गांची एकजूट. त्यात कामगार आहेत. किसान आहेत आणि गरीब मध्यम वर्ग आहे. असणारच हे वर्ग; पण त्यात भांडवलदार वर्गाचा एक तुकडाही समाविष्ट करण्यात आला आहे. हा तुकडा देशभक्त आहे असे म्हणतात. अशा प्रकारची ही अनेक वर्गसमन्विता राष्ट्रीय लोकशाही म्हणजे समाजवादी समाजनिर्मितीची एक पायरी होय. देशाच्या सध्याच्या परिस्थितीत समाजवादी समाज एकदम निर्माण होऊ शकत नाही अशी यात कबुली दिली आहे. याची चाणाक्ष वाचकांनी कृपया नोंद ठेवावी. सुमारे तीस पस्तीस वर्षांपूर्वी मानवेंद्रनाथ रॉय नामक व्यक्तीने कम्युनिस्टांना हाच इशारा दिलेला होता. पण स्टालिन

पीठाशी मतभेद झाल्याकारणाने ' रॉय दि रेनिगेड ' अशी त्या वेळी भूमिका होती. कारण त्या वेळी परिस्थिती वेगळी होती. असो; प्रस्तुताकडे वळू. या राष्ट्रीय लोकशाहीच्या उद्दिष्टांबाबत काँग्रेसशी या पीठाचा मतभेद नाही. ' राष्ट्रीय आर्थिक स्वातंत्र्य (?) शेतीचा विकास, आर्थिक विषमतेची पीछेहाट, लोकांच्या राहणीमानात वाढ ही उद्दिष्टे काँग्रेस व आम्ही ( म्हणजे मॉस्कोवादी ) यांना समान आहेत. पण काँग्रेस लोकविरोधी मार्गाने जात आहे. त्यामुळे देशात मक्तेबाजीचा उदय झाला आहे. स्वतंत्र पक्षासारख्या प्रतिगामी शक्ती बळावत आहेत. तेव्हा भांडवलशाहीचा मार्ग न चोखळता ' राष्ट्रीय लोकशाही'ची स्थापना झाली पाहिजे. याचाच बाळबोध अर्थ असा की, काँग्रेसमधील उजव्या गटाला हुसकावून लावून ती आपल्या मार्गाला वळविली पाहिजे.

मॉस्कोवादी धर्मपीठाने काँग्रेसकडे पंडित नेहरू असल्यापासून मोर्चा वळविला होता; पण पंडितजी ही व्यक्तीच तशी जबरदस्त होती. त्यामुळे मेनन–मालवीय-द्वारा थोडी ढवळाढवळ करण्यापलीकडे या पंथाचा अधिक प्रवेश होऊ शकला नाही. पंडितजीनंतर रान मोकळे सापडल्याची जाणीव कम्युनिस्टांनाच नव्हे तर स्वतंत्र, जनसंघ आदी बाकी पक्षांनाही झाल्यासारखी दिसते. सध्या काँग्रेसमध्ये शिरून ती आपल्या बाजूला वळविण्याचा मनसुबा हे पक्ष करू लागले आहेत. काँग्रेसजनांना ' सावधान ' असा इशारा दिला तर तो अनाठायी ठरणार नाही. म्हणजे या सर्व पक्षांना मुक्तद्वार असणारी काँग्रेस ही काही राजकीय पंढरी नाही असे काँग्रेसला केव्हा तरी या सर्व पक्षांना दाखवून द्यावे लागेल. त्यातल्या त्यात या धर्म-पीठाला याची जाणीव होणे अगत्याचे आहे. कारण या मॉस्कोपीठाने ' राष्ट्रीय लोक-शाही ' असे गोंडस नाव घेतले असले तरी या पीठाच्या प्रमाणभूत पोथीत लोकशाही चपखल बसू शकत नाही. जोपर्यंत या पीठात धार्मिक अभिनिवेश आहे तोपर्यंत उदारमतवादावर आधारलेल्या लोकशाहीचा या पीठात प्रवेश होणे अशक्य आहे. भांडलशाहीची प्रवृत्ती आर्थिक मक्तेबाजीकडे असते की नाही हे एक वेळ विवाद्य ठरेल; पण सामाजिक उद्धाराच्या मार्गाची मक्तेबाजी केवळ आपल्याकडेच आहे, अशी या धर्मपंथाची–मग तो मॉस्कोवादी असो वा पेकिंगवादी असो–श्रद्धा आहे हे निर्विवाद आहे. आर्थिक मक्तेबाजीपेक्षा सत्याची मक्तेबाजी महाभयंकर होय. कारण या धर्मपंथाच्या परीघाबाहेर राहणारे गुन्हेगार ठरतात. ख्रिश्चन व पेगन् , पाक व काफिर, धार्मिक व पाखंडी या भेदांसारखाच हा भेद अमानुष आहे. म्हणजे भिन्न मत धारण करणाऱ्या माणसांना या धर्मपीठात थारा नाही. एवढेच नाही तर या माणसांना समाजात स्थान नाही अशी या धर्मपीठाची धारणा आहे. अशी धारणा असणारांनाही सन्माननीय विरोधक म्हणून वागविले जाते हे भारतीय लोकशाहीचे खास वैशिष्ट्य मानावे लागेल.

परिस्थितीनुसार पवित्रा बदलणे याला संधिसाधूपणा ( opportunism ) असे नाव आहे. कम्युनिस्टांच्या कोशात संधिसाधू ही शिवी असली तरी त्यांच्यासारखे संधी साधण्यात वाकबगार कोणी सापडणार नाही! त्यांचा महनीय धर्मगुरु लेनिन हा प्रख्यात संधिसाधू!! त्याने " Theory is green, but evergreen is the tree of life " असे संधिसाधूपणाचे केलेले समर्थन महशूर आहे. जर्मनीने टाकलेल्या मानहानिकारक अटी मान्य करून ब्रेस्टलिटाव्हस्कचा तह करताना त्याने स्वपक्षाच्या बहुमताला धाब्यावर बसविले आणि तुम्ही दोन हातांनी मला विरोध केलात; पण लोकांनी दोन हातांनीच नव्हे तर दोन्ही पायांनी मला मान्यता दिली असे आपल्या कृत्याचे समर्थन केले. त्यानंतर कम्युनिस्टांनी संयुक्त आघाडीचे जे तत्त्वज्ञान निर्माण केले आहे, त्याचा पायाही संधिसाधूपणा हाच आहे. मला वाटते अशी जी पोथीनिष्ठ तत्त्वज्ञाने असतात, त्या तत्त्वज्ञानाच्या संप्रदायांना ' संधिसाधूपणा ' अपरिहार्यपणे स्वीकारावा लागतो. कारण ख्रिस्त, बुद्ध किंवा मार्क्स हे कधी चुकत नाहीत असे एकदा मानले की, त्यांनी सांगितलेला विचार आणि बदलती परिस्थिती यांमधील विसंगती दूर करण्यासाठी त्या त्या सांप्रदायिकांना तारेवरची कसरत करावी लागते. विचाराप्रमाणे परिस्थिती पालटता येत नाही. कारण ती त्यांच्या हातची गोष्ट नसते. मग परिस्थितीप्रमाणे विचार पालटावा लागतो. ते तर जिवावर येते. मग पळवाटा शोधाव्या लागतात आणि येथेच संधिसाधूपणा जन्म पावतो. त्यासाठी धर्मग्रंथाचे अर्थ फिरविले जातात. अथवा शब्दातून निराळे अर्थ काढण्याची खटपट केली जाते किंवा त्या संप्रदायातील लेनिनसारखा एखादा जबरदस्त इसम मूळ तत्त्वज्ञानाचा मी विकास केला आहे, असे सांगून अनुयायांना गप्प करतो.

रशियन क्रांतीचेच उदाहरण घ्या. मूळ मार्क्सवादाच्या पोथीत ही क्रांती नव्हती. जर्मनीत क्रांती व्हावी असे त्या पोथीत लिहिले होते, पण झाली रशियासारख्या मागसलेल्या देशात. कारण तेथे क्रांती यशस्वी होण्याची संधी होती आणि लेनिनने ती साधली. त्यानंतर औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या युरोपीय राष्ट्रांत क्रांती होईल या संधीची तो वाट पाहात होता. ती संधी त्याला कधीच मिळाली नाही. साहजिकच रशियात मिळालेली संधी हातची जाऊ नये या उद्योगाला तो लागला आणि आता क्रांती व्होल्गापासून यांगत्सेकडे पसरणार असा मूळ पोथीशी विसंगत असा नवा सिद्धांत त्याने मांडला. क्रांतीची संधी साधण्यासाठी विचारांचा हा जो उलटा प्रवास सुरू झाला, त्यातच चीनच्या महाभयानक धोरणाचा उगम झालेला आहे. सामाजिक विकासाचे एक साधन म्हणून मार्क्सने क्रांतीचा पुरस्कार केलेला असला तरी युरोपातील प्रगत संस्कृतीने पुढे टाकलेले एक पाऊल अशी त्याची क्रांतीची कल्पना होती. सुधारलेल्या समाजाला क्रांतिदीक्षा

द्यावी असे त्याला अभिप्रेत होते. लेनिनने अप्रगत समाजाला बाप्तिस्मा देण्याचे ठरविले. रानटी समाजाला ख्रिश्चन समाजाची दीक्षा सेंट पॉलने दिली. मार्क्सवादाचा लेनिन हा सेंट पॉल होय. सेंट पॉलच्या प्रयत्नाचा जो परिणाम झाला तोच याही प्रयत्नाचा झाला. शॉने या प्रक्रियेचे बहारदार वर्णन केले आहे. तो म्हणतो. " Conversion of a savage to christianity is a conversion of christianity to savagery."

तेव्हा येथील मॉस्कोवादी धर्मपीठ काय किंवा पेकिंगवादी धर्मपीठ काय, दोन्हेही सत्तेच्या संधीची वाट पाहात आहेत आणि त्यासाठी ते सैद्धांतिक कोलांट्या घेऊ लागले आहेत. राष्ट्रीय लोकशाही हा असाच एक विचार. पोथीत नाही; पण पोथीच्या बोकांडी बसून तो काढून दाखविता येतो आणि सत्ता हातात आल्यानंतर तो गुंडाळून ठेवता येतो. युरोपच्या पूर्व भागात हेच घडले. येथे काही वेगळे घडेल असा संभव दिसत नाही. पण जर मॉस्को पीठाचे स्वरूपच बदलले तर गोष्ट वेगळी. सध्या या पीठाचा यांगत्सेकडील मोर्चा थांबलेला आहे. तो डान्यूबच्या दिशेने वळला असे निश्चयाने सांगता येत नाही; पण तसा तो वळला तर अधुनिक संस्कृतीच्या रक्षणाला ती घटना निश्चित उद्‌बोधक ठरेल !

(२०-१२-१९६४)

६

# झुकती तटस्थता

आपल्या परराष्ट्रीय धोरणावर स्वर्गस्थ पं. नेहरूंनी लोकसभेत जी वेळोवेळी वक्तव्ये केली, त्यापैकी एका व्यक्तव्यात 'परराष्ट्रीय धोरणाचे स्वरूप कसे असावे या वादात जे अनेक पंथ आहेत, त्यात 'विद्वत्तापूर्ण गोंधळ' (Learned confusion) असा एक पंथ असल्याचे सांगितले होते. गेल्या सप्ताहात खासदार सुधीर घोष यांनी सांगितले की, नेफामधून चिनी सैन्य परतले याचे कारण बंगालच्या उपसागरात अमेरिकेने विमानवाहू जहाज सुसज्ज ठेवले होते हे होय. या त्यांच्या वक्तव्यामुळे संसदीय काँग्रेसपक्ष, खासदार, मंत्री या वर्तुळात जो एकच गोंधळ उडाला, त्या गोंधळाचे वर्णन पंडितजींच्या शब्दात 'विद्वत्तापूर्ण गोंधळ' असे करता येईल.

आश्चर्य, खेद, संताप, अस्वस्थता अशा अनेक भावभावनांचा लोकसभेत व लोकसभेबाहेर आविष्कार झाला. कम्युनिस्ट खासदार अर्थातच अस्वस्थ झाले. पण काँग्रेसपक्षाच्या खासदारांना थोडा संताप आला असे दिसते. अशा प्रकारच्या विधानांनी आपली पंचाईत होते हे त्या संतापाचे कारण असावे. सुधीर घोष यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करावी असे सांगण्यापर्यंत काही खासदारांची मजल गेली. घोष यांच्या वक्तव्याचा अधिकृतरीत्या इन्कार करण्यात आला. अर्थमंत्री श्री. कृष्णम्माचारी यांनी तर असे उद्गार काढले की, हे विधान भारताच्या प्रतिष्ठेला बाध आणणारे आहे. पण इतके सारे होऊनही कै. तात्यासाहेब

केळकरांची उपमा उसनवार घेऊन सांगावयाचे झाले तर असे सांगता येईल की, घोष यांच्या विधानाने निर्माण झालेल्या संशयाचे शेण माती घेतल्याशिवाय उठले नाही. श्री. घोष यांच्या वक्तव्यातील तपशील कदाचित् इकडेतिकडे होण्याचा संभव आहे; पण त्यातील मूळ गाभा खरा असावा, असा संशय लोकमानसात तसाच रेंगाळत राहिला आहे आणि राजमानसातही थोडी अस्वस्थता उरलेली असावी. कदाचित् श्री. घोष यांचे 'टायमिंग' चुकले असावे.

श्री. घोष यांच्या वक्तव्याचे आपण थोडे पृथ्थक्करण करू. नेफाच्या सपाट मैदानावर चिनी सेना उतरण्याच्या बेतात असताना चीनने एकदम युद्धविरामाची घोषणा करून सैन्य परत का घेतले, या संदर्भात श्री. घोष यांनी हे विवाद्य वक्तव्य केले. खरेच चीनने एकदम युद्धविराम का पुकारला? चिनी सैन्य अचानक का परतले? भारतीय सैन्याच्या प्रतिकारामुळे? का झाली एवढी भारताची मानहानी पुरे झाली, अशी भारताची गय करण्यासाठी? का चीनवर तसेच जबरदस्त दडपण आले म्हणून? श्री. घोष यांच्या विधानांचा इन्कार करताना हे प्रश्न तसेच अनुत्तरित राहिले आहेत. आता घोष यांच्या विधानातील उत्तरार्धातून काही प्रश्न निर्माण होतात. पं. नेहरू यांनी अमेरिकेला आणीबाणीच्या प्रसंगी लष्करी मदत तातडीने पाठविण्याविषयी विनंती केली होती की नाही? त्या काळात अशी मदत मिळाल्याखेरीज चिनी सैन्याची लाट थोपवून धरता येणे शक्य नाही हे त्या विनतीत गृहीत धरले होते की नाही? या सर्व प्रश्नांची सरळ व स्पष्ट उत्तरे द्यावयाची तर जबरदस्त दडपणामुळेच चीनला माघार घ्यावी लागली, आणि अमेरिकेला भरीव व तातडीची मदत पाठविण्याबद्दल विनंती करण्यात आली होती अशीच उत्तरे दिली पाहिजेत. मग वाद राहिला कशाबद्दल? तर बंगालच्या उपसागरात विमानवाहू आरमारी जहाज अमेरिकेने पाठविले नाही याबद्दल? समजा चीनने नेफामधून खाली उतरावयाचे ठरविले असते तर अमेरिका तातडीची मदत कोठून पाठविणार होती? प्रशांत महासागरात जे सातवे नौदल खडे आहे तेथूनच ना? तेव्हा श्री. घोष यांचा जर कोणता गुन्हा झाला असेल तर तो एवढाच की, ही हवी असलेली मदत इतक्या जवळ आली होती असे त्यांनी सांगितले. दूर अंतरावर अमेरिकेचे आरमार व विमानदल सज्ज होते असे त्यांनी सांगितले असते तर हरकत नव्हती. पण बंगालच्या उपसागरात! फारच जवळ झाले हे. भारताच्या प्रतिष्ठेला बाध आला तो चिनी सैन्य नेफामध्ये आले यामुळे नाही, अमेरिकेला लष्करी मदत तातडीने पाठवा अशी विनंती केल्यामुळे नाही, फक्त बंगालच्या उपसागरात ही मदत आली या विधानामुळे प्रतिष्ठेला बाध आला. अमेरिकन मदत व भारत यामध्ये 'प्रतिष्ठित अंतर' Respectable distance असणे हा भारतीय प्रतिष्ठेचा मानबिंदू झालेला दिसतो!

आपल्या परराष्ट्रीय धोरणाची फेरतपासणी झाली पाहिजे असा याचा सरळ व स्पष्ट अर्थ आहे. महान् नेते गेले तरी त्यांच्या कल्पना कशा मानगुटी बसतात आणि बदलत्या परिस्थितीची दखल घेण्यास पुढची पिढी कशी असमर्थ बनते याचे हे उत्तम उदाहरण आहे. कशासाठी श्री. घोष यांच्या विधानावर एवढा गदारोळ माजला? घोष यांच्या विधानातील तपशीलाबाबतची चूक दाखविण्यासाठी खासच नव्हे. तसे असते तर त्या आणीबाणीच्या प्रसंगी अमेरिकेला तातडीने मदत पाठविण्यासाठी विनंती केली होती हे खरे असले तरी, बंगालच्या उपसागरात कुमक आली नव्हती, असे लोकसभेत साग्रसंगीत निवेदन केले गेले असते. लोकसभेत कॉंग्रेस पक्षात व इतरत्र श्री. घोष यांच्या विधानावर जी एवढी आरडाओरड झाली त्याचा अर्थ हाच की, घोष यांच्या विधानाने आमच्या तटस्थतेच्या धोरणाला बाध आला. इतकेच नव्हे तर थोडी गैरसोयही झाली. आपल्या तटस्थतेच्या धोरणाला नैतिक श्रेष्ठतेचा बराच वास मारतो. पं. नेहरूंच्या वेळेपासून ही नैतिक श्रेष्ठता ठाण मांडून बसली आहे. आणि सध्या दक्षिण वि. उत्तर व्हिएतनाममध्ये जो संघर्ष चालू आहे, त्या संघर्षातही आम्ही 'शांतिः पुष्टिः तुष्टिः' हा महामंत्र उच्चारीत आहोत त्यातही हा नैतिक उच्च पातळीचा बराच भाग आहे. तेव्हा तुमच्यावर बेतली त्या वेळी अमेरिकेची मदत चालते तर सबंध दक्षिण व्हिएतनाम कम्युनिस्टांच्या घशात जाण्याचा प्रसंग आला असता तुमचा हा शांतिपाठ कशासाठी? असा जर शांतिब्रह्मांच्या उपासकांना कोणी प्रश्न केला तर घोष यांच्या विधानामुळे उत्तर देणे गैरसोयीचे होते आणि म्हणून घोष यांच्यावर हा एवढा गहजब झाला. चूक तपशिलाची नाही.

भारताला एका विचित्र परिस्थितीत टाकण्याची श्री. घोष यांनी चूक केली. आम्ही कोणत्याही गटात नाही. तटावर स्वस्थ बसलेलो आहोत आणि जेथे काही खटकत असेल तेथे शांतिब्रह्माची उपासना करून युक्तीच्या चार गोष्टी सांगण्याचे कार्य आम्ही करीत असतो. ही जी आधुनिक तटस्थगीता आम्ही मानतो त्या गीतेला श्री. घोष यांनी बंगालच्या उपसागराकडे बोट दाखवून जबर धक्का दिला याबद्दल त्यांच्यावर राग आलेला असावा.

कोणत्याही राष्ट्राचे परराष्ट्रीय धोरण कसे ठरते? पं. नेहरूंच्याच शब्दांत सांगतो. पं. नेहरूंचा शब्द म्हणजे वेदवाक्य. म्हणून पंडितजींचे वक्तव्य येथे देत नाही. त्यात परराष्ट्रीय धोरणाची शास्त्रीय मीमांसा आहे, म्हणून ते येथे देतो. १९५५ साली लोकसभेत पंडितजींनी खासदारांना ही मीमांसा सांगितली आणि १९६५ च्या खासदारांनी विशेषतः कॉंग्रेस खासदारांनी आजही ती नीट लक्षात ठेवण्यास हरकत नाही. पंडितजींनी सांगितले.

" The international policy of a country depends ultimately on the domestic state of affairs in that country; the two have to be in line and they cannot be isolated from each other. Indeed it is the internal state of affairs of a country that enables it to speak with some strength, force and authority in the international sphere ". ( India's Foreign Policy, page 65 ) या उताऱ्यात पंडितजींनी परराष्ट्रीय धोरणाची दोन महत्त्वाची सूत्रे सांगितली आहेत. ( १ ) कोणत्याही राष्ट्राचे परराष्ट्रीय धोरण त्या राष्ट्राच्या अंतर्गत परिस्थितीवर अवलंबून असते आणि ( २ ) राष्ट्राच्या अंतर्गत परिस्थितीच्या सामर्थ्यावरच त्या राष्ट्राला आंतरराष्ट्रीय राजकारणात अधिकारवाणीने बोलता येते. या दोन सूत्रांच्या प्रकाशात तटस्थतेचे धोरण तपासावे लागेल. ज्या वेळी पंडीतजींनी तटस्थतेचे धोरण स्वीकारले त्या वेळी जगाचे रशिया व अमेरिका असे दोन भाग स्पष्ट पडलेले होते आणि त्याच वेळी भारताने सामाजिक पुनर्घटनेचा महान् प्रयोग आरंभिला होता. या परिस्थितीत भारताने यापैकी कोणत्या एका गटात सामील व्हावे असे ठरविले असते तर सामाजिक पुनर्घटनेच्या प्रयोगात व्यत्यय आला असता. सामाजिक पुनर्घटनेचा प्रयोग व्यवस्थित व निराबाध रीतीने चालू राहाण्यासाठी तटस्थता ही एक भारताची आवश्यक गरज होती आणि लोकशाही राजवट कायम ठेवून, राजकीय स्थैर्य राखून, भारत आर्थिक विकासाच्या दिशेने पुढे पाऊल टाकीत आहे, म्हणून आशियातील इतर राष्ट्रांपेक्षा भारताला महत्त्वही प्राप्त झाले होते पंडितजींनी परराष्ट्रीय धोरणाची जी दोन सूत्रे सांगितली, त्या सूत्रानुसार भारताने परराष्ट्रीय धोरण प्रारंभी आखले होते, असे यावरून दिसून येईल.

पण तटस्थता ही एक तारेवरची कसरत ठरण्याचा संभव असतो. ज्या दोन बलाढ्य गटांपासून अलिप्त राहण्यावर या तटस्थतेचा कटाक्ष, त्या दोन गटांना एकमेकांविरुद्ध खेळविण्याचा मोह तटस्थाला होणे स्वाभाविक असते. तटस्थतेचे या संधिसाधू मनोवृत्तीत रूपांतर झाले नाही तरी, तटस्थता धारवाडी काट्यासारखी समतोल राखणे कठीण जाते. कुठे तरी त्या तटस्थतेचे माप झुकते, थोडा एका बाजूला कल जातो, तोल सुटतो. तटावरून बसून दोन्ही बाजूपैकी कोणत्याही बाजूकडे आपला तोल जाऊ न देणे, ही फार अवघड किमया आहे. राजकारणात तर ती फारच अवघड आहे. त्या तटस्थतेला ' झुकती तटस्थता ' असे नाव देता येईल. हेही झाले नाही तरी, तटस्थांचाच एक स्वतंत्र गट बनण्याची शक्यता दृष्टीआड करता येणार नाही ! आपण तटस्थ आहोत याबद्दल एक नैतिक अहंकार निर्माण होत असतो. आपण कोणत्याही गटाचे नाही, म्हणजे आपण

निःपक्षपाती आहोत, अशी भावना होऊ लागते. दोन्ही गटांच्या राजकारणावर अभिप्राय, शेरे वा ताशेरे झाडण्याचा आपल्याला नैतिक अधिकार प्राप्त झाला आहे असा ग्रह बळावत जातो आणि दोन्ही गटांना जगातील जास्तीत जास्त राष्ट्रे आपल्या छावणीत ओढावयाची असल्या कारणाने, प्रारंभी या तटस्थांचे त्यांच्याकडून थोडे लाडही केले जातात. म्हणजे असे की, जरी आपल्या एखाद्या धोरणावर या तटस्थांनी टीका केली, तरी बलाढ्य राष्ट्रे त्याबद्दल रागावत नाहीत, काना-डोळा करतात, थोडेसे चुचकारतात आणि थोडा मदतीचा खाऊ देऊन गप्प बसविण्याचाही प्रयत्न करतात; पण लाडाने मूल बिघडते तसे तटस्थ राष्ट्रांचे होते. हा नैतिक दर्प इतका प्रबळ होतो की, मग ते धोरण तुटेपर्यंत ताणण्याचा मोह होणे स्वाभाविक होते. जगातील यच्चयावत राष्ट्रांच्या धोरणाविषयी अभिप्राय व्यक्त करण्याचा जणू आपणांस निसर्गदत्त अधिकार मिळाला आहे अशी जाणीव निर्माण होऊन तटस्थतांच्या आंतरराष्ट्रीय धोरणाला शाळा-तपासणीच्या शेरे-बुकाचे स्वरूप प्राप्त होऊ लागते. लोकसभेतील पंडितजींचे एक वक्तव्य देतो. त्याला नैतिक श्रेष्ठतेचा वास मारतो की नाही ते. पाहा पंडितजी सांगतात, “ It is indeed due to this feeling that India is marching forward, that India is a country which is firmly established and is dynamic, that people in the rest of the world would look upon us with a measure of respect.”

आपल्या तटस्थतेचा संधिसाधूपणापर्यंत अधःपात झाला, असा आरोप मी करीत नाही, पण आपली तटस्थता एका बाजूला कललेली आहे एवढे मात्र खास म्हणता येईल. गेल्या सतरा वर्षांत ‘ हिंदी चिनी भाई भाई ’, ‘ हिंदी रूसी भाई भाई ’ या घोषणा जशा बेंबीच्या देठापासून करण्यात आल्या, तसा प्रकार आपण पश्चिमेबाबत केला नाही आणि त्यांच्याकडून एवढी प्रचंड मदत घेऊन सुवेजच्या संघर्षात आणि कोरियन युद्धात आपण केवढी तीव्र नापसंती व्यक्त केली होती ! आणि हंगेरीच्या स्वातंत्र्ययुद्धात आपण ‘ नरो वा कुंजरो वा ’ अशा पवित्र्यात प्रारंभी कसे उभे होतो ! कोरियापासून कांगोपर्यंत प्रत्येक राष्ट्राच्या स्वातंत्र्यसंगराला आमचा केवढा प्रचंड पाठिंबा मिळाला ! आणि ‘ नववसाहतवाद ’, ‘ नवसाम्राज्यवाद ’ हे कम्युनिस्ट कोशातील शब्द आपण कसे मिटक्या मारीत उच्चारले ! रशियाच्या टाचेखाली सापडलेल्या सर्व युरोपात, कम्युनिस्टांनी संपूर्ण नवा अल्जेरिया, कांगो, व्हिएतनाम येथे नववसाहतवादाचा वास येऊ लागताच केवढा मोठा डोळा केला ! वसाहतवाद निर्माण केला असा आपण त्याच्याकडे कसा कानाडोळा केला ! अशी ही यादी बरीच लांबवित

येईल. त्यावरून एवढेच दिसते की, आपल्या तटस्थतेला आपण ' पॉझिटिव्ह ' ' डायनॅमिक ' अशी कितीही विशेषणे लावली तरी तिला ' बेनिव्होलंट न्यूट्रॅलिटी 'चे स्वरूप प्राप्त झाले होते आणि आतादेखील श्री. घोष यांच्या वक्तव्याने जी अस्वस्थता वाटू लागली, त्या अस्वस्थतेचे रहस्य हेच आहे. ' अँग्लो-अमेरिकन जगाशी जवळचा संबंध म्हणजे साम्राज्यवादाच्या गोटात जाऊन बसणे' असा हा समाजवादी न्यूनगंड आहे. तटस्थतेचा मूळचा तात्त्विक पाया ढासळला आहे. काप गेले आहेत, उरली आहेत ती निव्वळ भोके ! आपण आशियाचे नेते आहोत काय ? नाही ! ! कम्युनिस्ट जगातील हुकूमशाही परंपरेशी आपल्या लोकशाहीची सोयरिक होऊ शकेल काय ? नाही ! ! किमान पश्चिमेइतकी आपल्या आर्थिक विकासाला हे दुसरे जग मदत देऊ शकेल काय ! नाही ! ! ! तथापि आमचा ओढा या कम्युनिस्ट गटाकडे आहे. तसे आपण तटस्थ आहोत. पण जरा तिकडे शरीर झुकले आहे आणि त्या कम्युनिस्ट गटापैकी एका राष्ट्राने आक्रमक पवित्रा धारण केला असूनही मानसशास्त्रात ' सॅडिझम ' असे ज्या विकृतीला नाव आहे, त्या विकृतीचे हे उत्तम उदाहरण होय.

युद्धोत्तर जगाची ज्या दोन गटांत विभागणी झाली, ते दोन गट केवळ सत्तावादी प्रेरणेनेच पडले आहेत असे नाही. कम्युनिझम का लोकशाही हा त्या विभागणीचा तात्त्विक पाया आहे. तटस्थतेला या तात्त्विक पायाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. दोन्ही गटांच्या म्होरक्यांनी जे लष्करी गट निर्माण केले, त्यांपैकी कोणत्याही गटात सामील न होण्याचे तटस्थतेचे धोरण समजण्यासारखे आहे; पण कम्युनिस्ट गट सर्व जग कम्युनिस्ट बनविण्याच्या महत्त्वाकांक्षेने प्रेरित झालेला आहे आणि त्या गटाचा प्रत्येक मुत्सद्देगिरीचा पवित्रा या ध्येयाच्या दिशेने पडत आहे. या सत्याकडे तटस्थतेला डोळेझाक करून कसे चालेल ? तटस्थतेला जशी व्यावहारिक बाजू आहे तशीच तात्त्विक बाजू आहे आणि तात्त्विक बाजूचा विचार करताना तटस्थतेला कोणतीतरी बाजू घ्यावीच लागेल. जो समाज आपण निर्माण करू इच्छितो, त्या समाजाचे वैचारिक नाते कोणत्या समाजाशी आहे हा विचार न करता तटस्थतेचे धोरण ठरविले तर हे ध्येयशून्य धोरण नर्मदेतील गोट्याप्रमाणे कोठेच स्थिर राहणार नाही ! चीनने आक्रमण केले त्या वेळी आपणांस बाजू घ्यावी लागलीच ना ? कोठे राहिली तटस्थता ? त्या वेळी आपण पश्चिमेचाच धावा केला ना ? मग आता ' मी तशी नाही हो ' हा अभिनय कशासाठी ? राजकारणात आपपरभाव ठेवावाच लागतो. सर्व प्राणिमात्रांकडे समबुद्धीने पाहणारी स्थितप्रज्ञ वृत्ती राजकारणात चालत नाही आणि म्हणून आपल्या तटस्थतेला 'कोणत्या प्रसंगी गप्प बसावे' ही कलाही अवगत करून घेतली पाहिजे. जगाच्या रंगभूमीवर जे जे नाट्यमय प्रवेश होतात, त्या प्रत्येक प्रवेशात आपली एंट्री हवीच

एवढा मी म्हणतो आग्रह कशाला? काही वेळ पडद्याआड राहून कार्य साधते आणि त्या वेळी पडद्यासमोर आल्याने हसे होते. आपल्या तटस्थतेला ही कला साध्य करून घेतली पाहिजे. सर्व दलित राष्ट्रांचा उद्धार करण्याचा मक्ता आपल्याकडे नाही अणि त्यांच्या उद्धाराविषयी तळमळ व्यक्त केलीच पाहिजे असे नाही. थोडक्यात अमर्याद तटस्थता नको. तटस्थतेच्या व्यावहारिक व तात्त्विक मर्यादांची यथायोग्य जाणीव ठेवल्यानेच आपले तटस्थतेचे धोरण अधिक सतेज बनेल.

( २८-३-१९६५ )

# व्यक्तिचित्रे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ४४०६३ वि: निबंध
क्रमांक १८३९ नों. दि. २५।११।५



१

# पं. जवाहरलाल नेहरू

## भारतीय लोकशाहीचा असामान्य शिल्पकार

[आज जवाहरलाल नेहरूंची ७५ वी अमृत-महोत्सवी स्मृती ...'मरणात खरोखर जग जगते' ही उक्ती सार्थ करणाऱ्या पंडितजींनी, भारताला जी सर्वश्रेष्ठ देणगी दिली तिचे अनन्यसाधारण वैशिष्ट्य कथन करणारे हे प्रकट चिंतन...]

मृत्यूनंतर येणारी 'जयंती'! त्यातही ज्या मृत्यूची स्मृती ताजी आहे अश मृत्यूनंतर येणारी जयंती! जयंतीच्या आनंदात मृत्यूचे दुःख मिसळल्यानंतर गुलाबाचा सुवास घेत असताना हाताला हळूच काटा सलावा, तशा संमिश्र भावना मन व्यापून टाकतात; पंडित जवाहरलाल नेहरूंच्या ७५ व्या जयंतीची स्मृती भारतीयांच्या मनात अशा संमिश्र भावना निर्माण करीत आहे. १४ नोव्हेंबर ही पंडित नेहरूंची ७५ वी जयंती. पंडित नेहरू आज हयात असते तर त्यांचा ७५ वा वाढदिवस मोठ्या थाटाने साजरा झाला असता आणि 'हयात असते तर' या 'तर' ने अंतःकरणाच्या एका भागात मृत्यूचे दुःख सलू लागते. पंडितजी नसले तरी त्यांचा वाढदिवस भारतीय मन साजरा करीलच. पण निर्गुणोपासनेपेक्षा सगुणोपासना मनात भावनांची ऊब अधिक निर्माण करते हे नाकारण्यात काय हशील? मृत्यूनंतर विम्याचे पैसे मिळाल्याचा आनंद निर्भेळ व निर्व्याज असतो असे म्हणता येईल काय? तसाच नेहरू जयंतीचा आनंद निदान या वेळी तरी निर्भेळ आनंद प्राप्त करून देण्यास असमर्थ आहे

तथापि मृत्यू ही एक अटळ घटना आहे. या कठोर सत्याची जाणीव ठेवून आपण पंडितजींची ७५ वी स्मृती साजरी करीत आहोत. ७५ वी स्मृती म्हणजे अमृत-महोत्सवी स्मृती. मृत्यूनंतर अमृत-महोत्सव ! कारण पार्थिव देहाला मृत्यूने ग्रासले तरी त्यापलीकडे एक तत्त्व उरते आणि त्याला मृत्यू स्पर्श करू शकत नाही. तांबे कवींनी 'मरणात खरोखर जग जगते' हा जो विरोधाभास सांगितला, त्याची उपपत्ती ही अशी आहे. म्हणून पंडितजी गेले तरी पंडितजी आपल्यात आहेत.

या जयंतीला सगुणोपासना नसली तरी स्मृतीची उपासना आहे आणि तीच उपासना आपण करणार आहोत. पण व्यक्तींची उपासना व गुणांची उपासना, विभूतिपूजा व कर्तृत्वपूजा असे उपासनेचेही दोन प्रकार आहेत. या दोन उपासनांत श्रेष्ठ-कनिष्ठ भाव ठरविण्याचा माझा इरादा नाही. पण भारतीय मनाची स्वाभाविक ओढ विभूतिपूजेकडे आहे. राजकारणाला आधुनिक स्वरूप प्राप्त झाले तरी या आधुनिक राजकारणालाही विभूतिपूजेने सोडले नव्हते. महात्माजी, पंडितजी यांच्या दर्शनासाठी लोक उत्सुक असत. देवदर्शनाच्या परंपरेत आम्ही वाढलो आहोत. तीच परंपरा आम्ही राजकारणाला लागू केली आणि त्या दर्शनपरंपरेतून पूजा परंपरा निर्माण झाली. गंधाक्षता व फुले, दुर्वा समर्पण केल्यानंतर 'गच्छ गच्छ सुरश्रेष्ठ' हे या पूजेचे भरतवाक्य आहे. हे भरतवाक्य लक्षात घेतल्यास महापुरुषाने आपल्यावर टाकलेली जबाबदारी टाळण्याचा विभूतिपूजा हा एक उत्तम उपाय आहे असे सिद्ध होते ! म्हणून पंडितजींना विसरून जाण्याचा मार्ग सांगणारी व्यक्तिपूजा टाकून त्यांच्या कार्याची सतत आठवण करून देणारी गुणपूजा आपण केली पाहिजे.

घटना, योजना, लोकशाही व समाजवाद ही पंडित नेहरूंच्या कार्याची चतुःसूत्री. यांपैकी लोकशाही ही पंडित नेहरूंनी भारताला दिलेली सर्वांत मोठी देणगी होय. भारताची सामाजिक व राजकीय परिस्थिती अशी नव्हती की ज्यामधून लोकशाहीचा नैसर्गिक क्रमाने उदय व्हावा. ज्या पाश्चात्य समाजात लोकशाही सुस्थिर झाली असे आपण मानतो, त्या समाजालाही लोकशाही बद्धमूल करण्यासाठी अग्निदिव्यातून जावे लागले अशी इतिहासाची साक्ष आहे. फ्रेंच राज्यक्रांतीतून नेपोलियन निर्माण झाला आणि ब्रिटिश लोकशाहीला क्रॉमवेलची गरज भासली. भारतात तर लोकशाहीला सर्वस्वी प्रतिकूल परंपरा होती. लोकशाहीला आवश्यक असणाऱ्या उदारमतवादाची कळी उमलण्याच्या आतच खुडली गेली होती. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर एकच पक्ष अत्यंत बलवान व विरोधी पक्ष अत्यंत दुर्बल. गलिव्हरच्या प्रवासातील लिलिपुटच्या नागरिकांप्रमाणे ही परिस्थिती लोक-

शाहीच्या उदयाला व स्थैर्याला अनुकूल आहे असे म्हणता येणार नाही. या परिस्थितीत पं. नेहरूंसारख्या अफाट लोकप्रियतेच्या कोणाही नेत्याला लोकशाही गुंडाळून ठेवण्याचा मोह व्हावा. नव्हे, आजुबाजूच्या वा आशिया-आफ्रिका खंडांतील दूरच्या राष्ट्रांतील नेहरूंपेक्षा कमी प्रतीच्या व कमी लोकप्रिय नेत्यांना असा मोह झालाही. या पार्श्वभूमीवर भारतीय लोकशाहीचे शिल्प अधिकच उठावदार दिसते आणि त्याचे एकमेव शिल्पकार आहेत पं. नेहरू.

लोकशाहीला लागणारे भौतिक व सामाजिक घटक नसताना भारतामध्ये लोकशाही कशी स्थिर झाली या कोड्याचा बुद्धिगम्य उलगडा होण्याची गरज आहे. मला वाटते पं. नेहरूंच्या व्यक्तिमत्त्वात याचे उत्तर सापडेल. परस्परविरोधी प्रवृत्तीच्या ताण्यांनी व बाण्यांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा पट विणला गेला आहे. पं. नेहरूंचे पाय पूर्वेत, भारतीय समाजात पक्के रोवले असले तरी त्यांचा वैचारिक पिंड आधुनिक विचारांचा होता. ते गांधीवादी होते तरी अध्यात्मवादी नव्हते. म्हणजे राजकारणात अध्यात्मवाद आणावा हे त्यांना नामंजूर होते. ते राष्ट्रवादी होते तरी भूतकालाचे उदात्तीकरण करावे हे त्यांना मान्य नव्हते. म्हणजेच ते लोकराज्यवादी होते, पण रामराज्यवादी नव्हते. ते अज्ञानपूजक नव्हते तर विज्ञानपूजक होते. ते समाजवादी होते, तसेच उदारमतवादी होते. अज्ञान, अंधश्रद्धा इत्यादींचे ते कट्टर विरोधक होते, तसेच ते परमतसहिष्णू होते. लोकप्रियतेच्या शिखरावर आरूढ होऊनही त्याची नशा त्यांना चढली नव्हती. सतत सोळा वर्षे अधिकारारूढ असूनही विरोधकांची त्यांना कदर होती. ते रागावत असत, चिडत असत, त्यांना न आवडणाऱ्या गोष्टी करण्यास कोणी धजावत नसत, आणि तरीदेखील विरोधकांनी टीका केली तर कम्युनिस्ट नेत्यांप्रमाणे विरोधकाला नेस्तनाबूत करण्याचे त्यांच्या वृत्तीत नव्हते. जनमतावर विलक्षण हुकुमत, प्रतिष्ठा, राजकीय सत्तेचे केंद्रीकरण, अनुयायांवर करडा अंमल इत्यादी ज्या गुणांनी नेहरूंसारख्या लोकप्रिय नेत्याचे इतर समाजात हुकूमशहात सहजासहजी रूपांतर झाले असते, ते गुण असूनही नेहरू लोकशाहीचा आधारस्तंभ बनले याचे रहस्य या गुणांना मारक असलेल्या विरोधी गुणांचाही त्यांच्या व्यक्तिमत्त्वात समावेश झाला होता, यातच शोधावे लागेल.

खरे सांगावयाचे तर, पं. नेहरूंची लोकशाहीवर व मानवतावादावर आत्यंतिक निष्ठा होती. ही निष्ठा त्यांना हुकूमशहा बनविण्यापासून सतत सावधगिरी बाळगण्याचा इशारा देत होती. पं. नेहरूंनीच स्वतःच्या व्यक्तिमत्वाचे केलेले सुंदर विश्लेषण या संदर्भात उद्बोधक ठरेल. ते लिहितात, " महान व चांगली कार्ये उरकण्याचे सामर्थ्य असलेली जवाहरलाल नेहरूंसारखी माणसे लोकशाहीत धोका देणारी आहेत. नेहरू स्वतःला लोकशाहीवादी व समाजवादी म्हणवितात आणि ते तसे

प्रामाणिकपणे वागतात याबद्दलही शंका नाही... पणत्यानी थोडी बाजू बदलली तर त्यांचे हुकूमशहात रूपांतर होण्याचा संभव आहे...ते फॅसिस्ट होऊ शकत नाहीत. फॅसिझमचे ओबडधोबड, घृणास्पद स्वरूप न मानवण्याइतके ते उच्चभ्रू आहेत. त्यांची चर्या व आवाजच याबद्दल ग्वाही देतो. तथापि प्रचंड लोकप्रियता, प्रबळ इच्छाशक्ती, दुर्दम्य उत्साह, आत्माभिमान,... हुकूमशहा बनण्याला लागणारे हे सारे घटक त्यांच्यात आहेत. जनसंमर्दावर त्यांची प्रीती असली तरी इतरांविषयी असहिष्णुता व दुर्बळ आणि अकार्यक्षम व्यक्तीविषयी तुच्छताही त्यांच्यापाशी काही प्रमाणात आहे. त्यांचे रागावणे, उसळून येणे तर प्रसिद्धच आहे. नावडत्या गोष्टी बाजूला सारून कामाचा उरक होण्याविषयी त्यांच्या ठिकाणी असलेल्या अधीरतेला लोकशाहीचा मंदगतीने चालणारा कारभार फार काळ सहन होणार नाही. आत्मप्रौढी तर विलक्षणच आहे. तिला पायबंद घातलाच पाहिजे. '**आम्हांला सीझर नकोत**' ( जाड ठसा माझा ). नेहरू आणि सीझर यांतील हा अंतर्गत संघर्ष जितका मनोरंजक तितकाच उद्बोधक नाही, असे कोण म्हणू शकेल ?

भारतीय लोकशाही अशा प्रकारे एका व्यक्तीवर अवलंबून राहणे, हे काही लोकशाहीच्या स्थैर्याचे लक्षण नव्हे, असे जाणकार टीकाकार सांगतात. कम्युनिस्ट समाजासारख्या हुकूमशाही समाजातही जेथे 'पर्सनॅलिटी कल्ट'-विरोधी मोहीम सुरू आहे, तेथे लोकशाहीचा पुरस्कार करणाऱ्या उघड्या समाजात व्यक्तिमाहात्म्याचे एवढे स्तोम माजावे याचे कित्येकांना आश्चर्य वाटेल. याला दोन प्रकारे उत्तर देता येईल. सामाजिक जीवनात, मानवसमाजाच्या इतिहासात कर्तबगार व्यक्तीला एक निश्चित स्वतंत्र स्थान आहे, 'पर्सनॅलिटी कल्ट' ला एवढा कडाडून विरोध करणाऱ्या कम्युनिस्ट लोकांनाही लेनिन झाला नसता तर ऑक्टोबर क्रांतीचे भवितव्य काय झाले असते याचे निश्चित व निर्णायक उत्तर आजतागायत देता आले नाही. लोकशाहीतील नेतृत्व आणि कम्युनिस्टांचा 'पर्सनॅलिटी कल्ट' यात मला फरक एवढाच दिसतो की, कम्युनिस्ट जिवंत नेत्याचा 'पर्सनॅलिटी कल्ट' नको म्हणतात. लेनिन आता जिवंत नाही आणि त्याचा उदो उदो सोयिस्कर आहे. म्हणून त्याचा कल्ट चालतो ! स्टालीनही जिवंत नाही हे खरे ! परंतु सोयिस्कर नाही. लोकशाहीतील नेतृत्वाचे स्थान असे लहरी नाही. लोकशाहीतही चर्चिलप्रमाणे नेत्याचे उदयास्त होतात. पण त्या नेत्याचा अस्त झाला तरी त्याचे कर्तृत्व आणि व्यक्तिमत्त्व शिल्लक राहते. तसे ते राहिले पाहिजे. या भूतकालातूनच भविष्यकाल निर्माण होत असतो हे विसरून कसे चालेल ?

लोकशाही व नेतृत्व या परस्परविरोधी घटना नाहीत. 'लोकशाहीत लोक

सार्वभौम ' हा सिद्धांत झाला. पण हिशोब घातला तर एक चाळीस कोट्यांश सार्वभौमत्व प्रत्येक व्यक्तीच्या वाट्याला येईल. मोठे आकर्षक नाही हे सार्वभौमत्व आणि त्याचा बाजारभावही फार कमी. तेव्हा लोकसमुदायाला लोकशाहीकडे नेणारा कोणीतरी लागतो. हा जो कोणीतरी नेणारा असतो, त्याचे डोके लोकांच्या पेक्षा उंच असले तरी पाय लोकांत असले म्हणजे झाले. राजेशाहीत वा हुकूमशाहीत राजा वा हुकूमशहा याचे पाय लोकांच्या डोक्यावर दिले जातात. आणि लोकशाहीत नेता अशा प्रकारे लोकांच्या डोक्यावर पाय देऊ लागला तर त्याचे पाय ओढण्याची सोय असते. लोकांच्या चालीने चालणारा पण त्यांच्यापुढे दोन पावले असणारा, लोकांपेक्षा शहाणा, त्यांना शहाणपण शिकवणारा, पण अतिशहाणा नसलेला, लोकांना अप्रिय गोष्टी सांगूनही लोकप्रिय असणारा, त्यांच्या अज्ञानाला, अंधश्रद्धेला, पूर्वग्रहाला धक्का देऊन त्यांना हवाहवासा वाटणारा, विरोधकांची प्रखर टीका सहन करणारा, पण विरोधकांनाही ज्याच्या नेतृत्वाची गरज भासते असा लोकनेता ही लोकशाहीतील एक अजब चीज आहे. विशेषतः लोकशाहीच्या परंपरांची ओळख नसलेल्या भारतीय समाजाला स्वातंत्र्यानंतर संक्रमण काळात तर अशा नेत्याची आत्यंतिक गरज होती. मला माहीत आहे की, पंडित नेहरूंपेक्षाही बुद्धिमत्तेने काकणभर जास्त असलेल्या व्यक्ती समाजात होत्या; आणि आहेत. त्यांच्यात व पंडितजीत फरक आहे तो एवढाच की, पंडितजींना भारतीय समाज पचविता आला आणि या बुद्धिमंतांना त्याचे अजीर्ण झाले. किंवा बुद्धिमंतांविषयी यथायोग्य आदर दाखवावा म्हणून आपण असे उलट म्हणू या की, भारतीय समाजाला पं. नेहरू पचविता आले आणि हे पचायला जड गेले.

स्वातंत्र्यपूर्व काल आणि स्वातंत्र्योत्तर काल या दोन कालखंडांत पहिला कालखंड मोठा. दुसरा त्या मानाने फार अल्प. पण अत्यल्प असला तरी त्या कालातील समस्या मोठ्या पर्वताएवढ्या. स्वातंत्र्यपूर्व कालातील समस्या एक व अगदी साधी. परकीय सत्तेला विरोध. लोखंडाच्या गोळ्याप्रमाणे थंड पडलेल्या या समाजाच्या सर्व थरांत चैतन्य निर्माण करण्याचे कार्य कमी महत्त्वाचे व कमी जिकीरीचे होते, असे मला म्हणावयाचे नाही. पण काही झाले तरी ' अशक्तोऽहम् गृहारंभे शक्तोऽहम् गृहभंजने ' हे खरेच आहे. शिवाय विरोधात्मक कार्यावरच अतिरिक्त भर दिल्याने काही विकृतीही निर्माण झाल्या होत्या. स्वराज्याच्या विधायक स्वरूपाचे अज्ञान ही त्यांतील सर्वांत मोठी विकृती. लोकांत चैतन्य निर्माण झाले तरी ते अंधळे चैतन्य होते. समाजात धार्मिकता होती, जातीयता होती, पूर्वीचे मध्ययुगीन अवशेष तसेच कायम होते. मध्ययुगाचा आर्थिक पाया ढासळला होता, पण नवयुगाची पायाभरणी झाली नव्हती. नवयुगात आलो

होतो, पण नवीनता प्राप्त झाली नव्हती. अध्यात्मज्ञाने कायम होती. पण विज्ञाने आली नव्हती. पत्तने वाढत होती. पण ग्रामे ओसाड पडत होती. दरिद्र-नारायणाची उपासना चालू होती. पण दरिद्रनारायण ही वास्तवता आहे, ते काही ध्येय नाही याची जाणीव झाली नव्हती. लोक रामराज्यच बोलत होते, लोकराज्याची त्यांना नीट कल्पना आलेली नव्हती. थोडक्यात, गांधीयुगाचे कवच फोडून भारतीय समाजाला बाहेर पडावयाचे होते. अशा वेळी जुने युग व नवे युग यांचा सांधा जमविणाऱ्या नेतृत्वाची गरज होती. ' ह्युमॅनिटी अपरूटेड ' असे नेतृत्व नको होते. पंडित नेहरूंचे नेतृत्व हा या दोन कालखंडांतील सेतुबंध होता. गांधीयुगाचा ग्राह्याग्राह्य विवेक करून, शांततेने झालेल्या सत्तांतरातील चांगला भाग कायम ठेवून समाजाला लोकशाहीच्या दिशेने खेचून नेण्याचे कार्य फार मोठे होते आणि या कामासाठी केवळ लोकांचा पाठिंबा उपयोगी पडत नाही. नेतृत्वही तसेच असावे लागते. हा कल्ट नाही. ही एक सामाजिक गरज आहे.

भारतीय लोकशाही एका व्यक्तीवर अवलंबून असणे चांगले नाही, या आक्षेपाला दुसरे उत्तर असे की, पं. नेहरूंनी संसदीय लोकशाहीत विरोधी मताची कदर करण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न केले. विरोधी पक्षाला हे कटू सत्य मान्य होणार नाही हे मी जाणतो. पण विरोधी पक्षाचे बॅ. चतर्जी यांनी पं. नेहरूंना ' द ग्रेटेस्ट लिव्हिंग डेमॉक्रॅट ' हे शिफारसपत्र लोकसभेच्या व्यासपीठावर दिले होते हे या संदर्भात मी नमूद करू इच्छितो. जेथे एकच पक्ष सतत अधिकारावर असतो, अत्यंत प्रबळ असतो, आणि विरोधी पक्ष अतिदुबळे असतात, तेथे अधिकारारूढ पक्षाची प्रवृत्ती विरोधी मताची फारशी कदर करण्याकडे होणे स्वाभाविक असते. पण न्यायालयाच्या मताची कदर, विरोधी पक्षाला संसदीय कार्यात सहभागी करून घेणे, टीका करण्याचे वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य अबाधित राखणे यांबद्दल पंडित नेहरूंनी जागरूकता बाळगली होती, ही गोष्ट त्यांच्या सोळा वर्षांच्या कारकीर्दीचे स्थूलमानाने सिंहावलोकन करणाऱ्या त्यांच्या कट्टर विरोधकालाही मान्य करावी लागेल. स्थानप्रतिबंधक कायदा, घटनेत होणारे वारंवार बदल, भारत संरक्षण कायदा इत्यादि अनेक लोकशाहीची धोकास्थाने या सोळा वर्षांत निर्माण झाली, नाही असे नाही, राज्यपुनर्रचनेचा कालखंड तर अतिशय जिकिरीचा असा गेला. तथापि लोकशाहीला धोकादायक अशा घटना होत असतानाही, लोकशाहीला पं. नेहरूंच्या नेतृत्वामुळे धोका नाही याची विरोधकांनाही मनोमन जाणीव होती. ब्रेशरने आपल्या " नेहरूंचे चरित्र " या ग्रंथात नेहरूंच्या नेतृत्वाचे केलेले मूल्यमापनच उद्धृत करतो, "....In fact, the Indian experiment in constitutional democracy owes more to Nehru than to anyone else or to

any combination of factors. Aware of his autociratic tendencies, he has striven--successfully--- to curb them lest India revert to the condition of benevolent despotism. Few men with these talents could have resisted the temptation to exercise dictatorial powers. Some frustrated Indians regret his reluctance to do so. Some Westerners would do well to appreciate this aspect of Nehru's leadership" आणि पं. नेहरूंच्या नेतृत्वाचे हे स्वरूप, पाश्चात्यांनीच नव्हे, तर भारतीयांनी देखील लक्षात ठेवण्यासारखे नाही काय?

महान नेत्यांच्या हयातीत त्यांच्यावर प्रखर टीका होत असते आणि मृत्यूनंतर त्यांच्यावर स्तुतीचा वर्षाव होत असतो. केवळ उपचार म्हणून ही स्तुती होते असे मला वाटत नाही. त्या नेत्याच्या अभावाने जी पोकळी निर्माण होत असते, ती पोकळीच त्या नेत्याच्या कर्तृत्वाची जाणीव करून देत असते. स्पुटनिकमधून वातावरणाच्या वर गेल्यानंतर वजनरहित अवस्था अनुभवली की हवेच्या दाबाची कल्पना येते. तसेच काहीसे हे आहे. पं. नेहरूंनाही या टीकादिव्यातून जावे लागले. जम्नादास मेहतांनी तर 'मोठेपण लादलेला असा नेता' (greatness thrust upon him) इतकी प्रखर टीका केली होती. याचे कारण हेच की पं. नेहरूंच्या नेतृत्वातील जाणीवेपेक्षा उणीवाच टीकाकारांना दिसत होत्या. तात्कालिक प्रश्नाभोवतीच माणसाचे मन इतके घोटाळत राहते की त्या तात्कालिकामागे दडलेला शाश्वत भाग त्या वेळी दिसू शकत नाही. नेत्याच्या मृत्यूनंतर त्याच्या जीवनातील शाश्वत भाग हळूहळू स्पष्ट होत जातो. पं. नेहरूंच्या कार्याचे व नेतृत्वाचे त्यांच्या हयातीत मूल्यमापन का होऊ शकले नाही याचे हे एक उत्तर आहे. दुसरे त्यांच्या नेतृत्वाची गतिमत्ता. सामान्य माणसांना काही मर्यादेपर्यंत वेग सहन करता येतो. ती मर्यादा ओलांडली की तो वेग दु:सह होत असतो. सुधारलेल्या जगाच्या मागे भारत दोनशे वर्षे आहे आणि हे मागासलेपण आपणांस अवघ्या वीस वर्षांत उरकावयाचे आहे, या जाणीवेने पं. नेहरूंच्या नेतृत्वात विलक्षण गतिमानता निर्माण झाली होती. त्यामुळेच ते रागावत असत, चिडत असत. माणसांना विचार करायलाही सवड देत नसत. या दु:सह वेगामुळे ते टीकाकारांच्या टीकेचा विषय बनले तरी त्याच वेगवत्तेमुळे अवघ्या सोळा वर्षांत त्यांनी भारतीय लोकशाहीचा पाया मजबूत केला. इतका की 'त्यांच्या मृत्यूनंतर भारतात अराजक माजेल' अशी पाश्चात्य वृत्तपत्रांनी व राजकीय नेत्यांनी वर्तविलेली भाकिते खोटी ठरली. त्यांच्या

या गतिमान नेतृत्वाचे मनोज्ञ :र्शन व्हावे म्हणून, गार्डिनरने ज्यात लॉइड जार्जच्या नेतृत्वाचे वर्णन केले आहे असा एक उतारा मी येथे देतो.

" He swoops down on opportunity like a hawk on its prey. He does not pause to think : he acts. He has no fear. The bigger the task, the better he likes it. The higher the stakes, the more heroic his play. He never fears to put his fate to the touch, and will cheerfully risk his all on a throw. When the great moment came he seized it with both hands."

( १५-९-१९६४ )



२

# स्वातंत्र्यवीर सावरकर
# अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा श्रेष्ठ क्रांतिकारक

आपल्या राष्ट्रीय जीवनाच्या घडणीत ज्यांनी ज्यांनी मोलाची कामगिरी बजावली आहे, त्यांचे राष्ट्र सदैव ऋणी राहील. या महाभागांच्या मागून राष्ट्र सदैव जाईल असा याचा अर्थ नाही. त्या त्या व्यक्तींचा एकेक काळ असतो. तो संपला की त्या व्यक्तीचे मोठेपण व त्याची लोकप्रियता यांचे प्रमाण व्यस्त होऊ लागते. तरीही लोक त्या व्यक्तीचे मोठेपण मनोमन ओळखतात आणि 'तेथे कर माझे जुळती' या भावनेने नमस्कारही करतात. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या पक्षाला देशात बहुमत आजपर्यंत मिळाले नाही. तथापि सावरकरांचे अंगभूत मोठेपण त्यामुळे झाकाळले जाणार नाही. ज्या ज्या पक्षांनी सावरकरांच्या विचारांना व पक्षाला कडवा व प्रखर विरोध केला, त्या सर्व पक्षांच्या नेत्यांनी परवा त्यांच्या मोठेपणाची पावती दिलेली आहे. यावरून लोकप्रियता, पक्षाचे नेतृत्व, बुद्धिमत्ता, ही काही मोठेपणाची अंगभूत लक्षणे नव्हत असे सिद्ध होते. ही लक्षणे असावी लागतातच. पण एवढयाने भागत नाही. इंग्रजीत ज्याला 'स्टेचर' असे म्हणतात, आणि मराठीत ज्याला 'व्यक्तिमत्त्वाची उंची' असे आपण नाव देऊ ते स्टेचर हेच मोठेपणाचे व्यवच्छेदक लक्षण होय. ही उंची गणितागत पद्धतीने मोजून मापून काढता येणार नाही. ती जाणवते. तिचे विश्लेषण करता येणार नाही. तिचे विभाजन करता येणार नाही. पण महनीय व्यक्तीला पाहिल्यावर तें मोठेपण जाणवू लागते. सावरकरांचे मोठेपण हे अशा स्वरूपाचे आहे.

क्रांतिकारकांच्या संघटनेचा काल हा स्वातंत्र्यवीरांचा उत्कर्षकाल. त्यांच्या महनीयतेची प्रचीती या वेळेला आली. १९६६ मधील पिढीला हे आकलन होण्यासारखे नाही. त्यासाठी मनाने त्या कालखंडात प्रवेश करण्याची 'परकाल-प्रवेश'-सिद्धी हवी; आज वातावरण खुले आहे. मनावर भीतीचे दडपण नाही. ज्या काळात स्वातंत्र्य हा शब्दही उच्चारण्याची चोरी होती, तो काळ कादंबरीतील कपोलकल्पित काळ होय, असे आजच्या पिढीला वाटण्याचा संभव आहे. पण एक काळ असा होता, त्या काळात परकीय सत्तेचा दबदबा होता. 'राजाने मारले, पावसाने झोडपले' अशा अगतिकतेचा तो काळ होता. आलेले राज्य ईश्वरी संकेताने आले अशी हलबलता त्या काळाची निशाणी होती. त्या काळात भीती होती. दैवाधीनता होती. कमालीची दुर्बलता होती. त्या काळात अजिंक्य समजल्या जाणाऱ्या सत्तेला धडक मारण्याचे काम साहसाचे तर खरेच. पण त्यात मानवतेचा तेजस्वी आविष्कार होता. म्हणून आद्य क्रांतिकारकांचे मोठेपण वादातीत ठरते.

क्रांतिकारकांच्या कार्यांचे यथायोग्य, मूल्यमापन झाले पाहिजे. ते कार्य ही एक घटना होती, संघटना नव्हती. पण ही घटना घडली नसती तर पुढे सघटना निर्माण झाली नसती. ते कार्य म्हणजे जुलमी राज्यकर्त्यांविरुद्ध अंधळी प्रतिक्रिया नव्हती, प्रसिद्ध रशियन शास्त्रज्ञ पॅव्हलॉव्हच्या परिभाषेत तो एक 'कंडिशन्ड रिफ्लेक्स' होता असे सांगता येईल. क्रांतिकारकांच्या मार्गाने ही पोलादी चौकट उलथून पडेल असा कोणाच्याही मनात भ्रम नव्हता. खुद्द क्रांतिकारकांनाही तसे वाटत नसावे असे मला वाटते. पण दऱ्याडोंगरांतून रस्ता तयार करावयाचा तर डोंगर फोडण्यासाठी सुरुंग लावावे लागतात किंवा मरगळलेल्या समाजाला "शॉक ट्रीटमेंट" द्यावी लागते. क्रांतिकारकांचे कार्य ही अशी धक्का देणारी घटना होती. हा दुहेरी स्वरूपाचा धक्का होता. राज्यकर्त्यांची नशा उतरविणारा व समाजाची निशा संपविणारा असा हा धक्का होता. म्हणून पुढील राजकीय वादांचे मूल्यमापन करण्याची रीत क्रांतिकारकांच्या कार्याला लागू करता येणार नाही. कारण आकाशात वीज तळपावी तशी ती एक क्षणिक घटना होती. पण क्षणिक घटना असली तरी त्या घटनेसाठी मनाची हिम्मत, निर्भयता, बेडरपणा, बेछूटपणा आणि राष्ट्रावरील अपार निष्ठा ही गुणसंपदा अत्यंत उत्कटत्वाने प्रकट व्हावी लागते. हेच क्रांतिकारकांचे खरे मोठेपण होय. आता अंतरिक्षातील चंद्र, मंगळ, शुक्र आदि ग्रहांचा वेध घेण्याचे मार्ग कितीही चित्तवेधक असले तरी अद्ययावत साधने नसताना कोलंबसाने अमेरिकेचा शोध लावला या घटनेचे महत्त्व आगळेच आहे. तद्वत मागाहून गल्लीबोळातील विनायक अहमहमिकेने तुरुंगाच्या वाऱ्या करू लागले तरी आद्यविनायकाचे अंदमानचे काळेपाणी अद्वितीयच ठरणार यात शंका नाही.

९४९३०

भारतीय राजकारणातील हा हाराकिरीचा काळ संपल्यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकरांची मुक्तता झाली पण या बदलत्या काळात त्यांच्याविषयीच्या अपेक्षाही उंचावल्या होत्या. क्रांतिकारक घटनांचे युग संपून राजकीय संघटनेचे युग सुरू झाले होते. उदंड राजकारणाचा परिणाम म्हणून सावरकर कारावासात गेले आणि ते परत आले त्या वेळी कारावासात जाणे यालाच राजकारणाचे स्वरूप आले. स्वाभाविकच पहिला राजबंदी म्हणून कारावासगमनागमनी लोक त्यांच्याकडे अत्यादराने पाहू लागले आणि आता सावरकर कोणता चमत्कार करतात या अपेक्षेने त्यांच्या हालचालींकडे नजर ठेवू लागले. कारण चमत्कार हाही संघटनात्मक राजकारणाचा स्थायीभाव झालेला होता. 'एका वर्षात स्वराज्य' ही महात्माजींची पहिली चमत्काराची घोषणा. माझ्यासारख्या बुद्धिवाद्याला ती चमत्कारिक वाटली तरी चमत्काराला नमस्कार करण्याच्या अवस्थेतून लोक पलीकडे गेले नसल्याकारणाने लोकांना ती घोषणा आदरणीयच वाटली. 'आतला आवाज' हा दुसरा चमत्कार. 'उपोषण' हा तिसरा चमत्कार. कारावासाच्या राजकारणाची शिकवण देणारे महात्माजी जर एवढे चमत्कार करू शकतात, तर सर्वांत खडतर कारावासाचे जीवन अनुभवलेले सावरकर यापेक्षा अधिक भव्य चमत्कार का करणार नाहीत बरे? लोकांची अंधश्रद्धा व पूर्वग्रह नेत्यावर कसा सूड उगवितात याचे हे उत्तम उदाहरण होय. जे जे जुने क्रांतिकारक या काळात बंधमुक्त होऊन परतले, त्या सर्वांची शोकांतिका या राजकारणात झाली याचे कारण हा चमत्कार होय.

बंधमुक्त जीवनात स्वातंत्र्यवीर सावरकरांनी आणला तो हिंदुराष्ट्रवाद. मतभेदाचा विषय. मला स्वतःला हा राष्ट्रवाद मान्य नाही. पण गांधीप्रणीत काँग्रेसने राष्ट्रवाद स्वीकारला होता व सावरकरांनी त्याला हिंदुत्वनिष्ठा देण्याचा प्रयत्न केला या प्रमेयाची कठोर तपासणी व्हायला हवी. गांधीप्रणीत राष्ट्रवाद आणि सावरकरप्रणीत हिंदुराष्ट्रवाद यात फरक कोणता असेल तर गांधीप्रणीत राष्ट्रवादात हिंदु-मुसलमानांचे ऐक्य होते आणि सावरकरांच्या हिंदुराष्ट्रवादात मुसलमानांना अल्पसंख्य म्हणून वागविले जाईल अशी भूमिका होती. पण महात्माजींच्या राष्ट्रवादालाही हिंदुत्वाची गडद छटा नव्हती असे आपणांस म्हणता येईल काय? तसे म्हणावे तर प्रार्थना, व्रतेवैकल्ये, उपोषणे, यांची संगती कशी लावता येईल? स्वराज्याला रामराज्य बनविण्याची महत्त्वाकांक्षा निर्भेळ राष्ट्रवादातून कशी निघू शकेल? हरिजनोद्धाराचे व्रत स्वीकारीत असतानाच डॉ. आंबेडकरांच्या स्वतंत्र मतदारसंघाच्या मागणीला विरोध करण्यासाठी महात्माजींनी उपोषण का करावे? तेव्हा नुसत्या नावावर जाऊन चालणार नाही, तर त्या राष्ट्रवादातील आशय तपासला पाहिजे. तो आशय हिंदुत्वाचा आहे. ऐतिहासिक सत्य असे आहे

की, जिनांनी मुस्लिम राष्ट्रवादाचा पुरस्कार केला तो गांधीप्रणीत राष्ट्रवादाला विरोध करण्यासाठी. जिनांचा आरोप असा होता की गांधीप्रणीत राष्ट्रवादाची सावरकरप्रणीत हिंदुराष्ट्रवाद ही तार्किक व अपरिहार्य परिणती आहे.

उलटपक्षी सावरकरांची हिंदुसमाज संघटित करण्याची कल्पना अधिक तार्किक, अधिक आधुनिक, बुद्धिवादी व विज्ञानपूत आहे. सावरकरांच्या हिंदुराष्ट्रवादाचे मुस्लिमराष्ट्रविरोध व हिंदुसमाजसंघटन असे दोन भाग पाडता येतील. हिंदुसमाज-संघटन हा जो दुसरा विधायक भाग, त्यात सावरकर महात्माजींच्या दोन पावले पुढे होते असे जर मी म्हटले तर गांधीभक्त माझ्यावर रागावणार नाहीत अशी मी अपेक्षा बाळगतो. राज्यसंस्था व धर्म यांचे समीकरण घालण्याचा सावरकरांनी जो प्रयत्न केला त्याच्याशी माझे प्रामाणिक मतभेद आहेत. पण त्याखेरीज हिंदु समाजातील विस्कळितपणा नष्ट करून त्याचे बलशाली उत्थापन करण्यासाठी त्यांनी ज्या सुधारणांचा हिरीरीने पुरस्कार केला, त्या सुधारणांमागे त्यांची भूमिका निःसंशय बुद्धिवादी व विज्ञाननिष्ठ होती. किंबहुना त्यांची हिंदुसंघटनांची कल्पना राजकीय स्वरूपाची होती, धार्मिक मुळीच नव्हती. हिंदुसमाज बलवान व्हावयाचा असेल तर त्या समाजातील जातिभेदाची घरकुले, त्या समाजातील पोथीनिष्ठा, खुळ्या समजुती, निरर्थक रीतिभाती समूळ नष्ट होऊन ख्रिश्चन वा मुसलमान समाजाप्रमाणे हा समाज एकसंध व समपातळीवर आला पाहिजे अशी त्यांची हिंदु-संघटनांमागची भूमिका दिसते आणि ही भूमिका राजकीय स्वरूपाची आहे. तुलनेने विचार केला तर गांधीवादाने अंधश्रद्धा वा अज्ञानावर असा हल्ला चढविला नाही हे आपणांस प्रांजलपणे कबूल करावे लागेल. उलट पापपुण्य, अध्यात्म, ईश्वरभक्ती, विज्ञानविरोध अशा अनेक खुळचट कल्पनांना गांधी-वादाने थाराच दिला आहे. बिहारमधील भूकंप मानवाच्या पापामुळे झाला या महात्माजींच्या विधानावर खुद्द गुरुदेव टागोरांनी केलेल्या प्रखर टीकेची या संदर्भात गांधीभक्तांना मी आठवण करून देतो.

हा विरोधाभास मला अजून उलगडलेला नाही. बुद्धिवाद व विज्ञाननिष्ठा यावर आधारलेल्या समाजसंघटनेचे तोंड भूतकालाकडे वळू शकत नाही. त्याची दृष्टी नेहमी भविष्यकाळाकडे आणि धर्माधिष्ठित राष्ट्रवादाची प्रवृत्ती तर भूत-कालाकडे वळलेली असते. तेव्हा या सावरकरांच्या विज्ञाननिष्ठ संघटनेत या दोन परस्परविरोधी प्रवृत्तींचा मेळ कसा काय बसू शकेल ? रामराज्य, विक्रमराज्य, राणा प्रताप वा इतर पराक्रमी राजे यांचे सत्य इतिहासाच्या आधारे यथायोग्य मूल्यमापन करून, त्यांतील ग्राह्य भाग स्वीकारण्यास बुद्धिवादाची मुळीच आडकाठी नाही. पण राष्ट्रवाद एवढयावर थांबत नाही. त्याची स्वाभाविक

प्रवृत्ती भूतकाळाचे उदात्तीकरण करण्याकडे असते. रामराज्य हे एक आदर्श राज्य असून, त्याचीच पुनरावृत्ती करण्याने समाजाचे सर्व प्रकारचे हित साधले जाईल असा त्याचा दावा असतो आणि सावरकरांच्या विज्ञाननिष्ठेत हा दावा बसू शकत नाही. सावरकर जेव्हा राजकीय पक्षाचे पुढारी म्हणून पुढे आले, तेव्हापासून त्यांचा भूतकालावरील भर ओसरत चालला असे माझे मत आहे. पण त्याचबरोबर या दोन विरोधी प्रवृत्तींच्या कचाट्यात सापडून त्यांच्या अनुयायांची विलक्षण कुतरओढ होत असली पाहिजे असेही वाटू लागले.

पण सामान्य जनतेला एवढी प्रखर तार्किकता सहन होत नाही. सामान्यतः पुढाऱ्यांचे तीन प्रकार पडतात. लोकांच्या अज्ञानाला व अंधश्रद्धेला सुखकारक गुदगुल्या करून लोकप्रिय होणारांचा एक वर्ग, लोकांच्या अज्ञानाला थोडा धक्का देणारा व त्या अज्ञानाला थोडा कुरवाळणारा असा दुसरा वर्ग आणि त्या अज्ञानावर प्रखर हल्ला चढविणारांचा तिसरा वर्ग. पैकी तिसऱ्या वर्गाचे पुढारी लोकप्रिय होणे महाकठीण. तार्किक सुसंगतीपायी लोकांना धारेवर धरणाऱ्या नेत्याला नेहमीच लोकविरोध सहन करावा लागतो. मठाधिपती महंत, साधु, फकीर, बुवा हे पहिल्या वर्गातले पुढारी. त्यांचा सामाजिक जीवनाला काही उपयोग नाही. मधल्या वर्गातले पुढारी मात्र अफाट लोकप्रियता मिळवू शकतात. सावरकरांचे चुकले ते येथे चुकले. त्यांच्या विचारसरणीविषयी मतभेद होतील, अगदी तीव्र मतभेद होतील; पण त्यांनी आपल्या विचारात तार्किक संगती राखण्याचा प्रयत्न केला. इतके सुसंगत राजकारण या समाजात खपत नाही. थोड्या विसंगती पत्कराव्या लागतात. ' यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं ' अशी विज्ञाननिष्ठेपासून माघार घ्यावी लागते. गोधनाचा मुख्य उपयोग दुग्धोत्पादनासाठी असतो हे मान्य करून भाकड गायीचा संभाळ करणाऱ्या पांजरपोळालाही उदार आश्रय द्यावा लागतो ! अशी अनेक उदाहरणे देता येतील. अभक्ष्य भक्षण करावे आणि प्रायश्चित्त घेऊन मोकळे व्हावे अशी ही मिसळ जितकी खमंग तितकीच लोकप्रिय ! विज्ञान व अज्ञान, संगती व विसंगती यांचे योग्य प्रमाणात मिश्रण केल्याशिवाय नेतृत्वाचा रुपाया खणखण वाजत नसतो !

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या विचारसरणीतील ज्या दोन भागांचा मी वर उल्लेख केला, त्यांपैकी कोणता भाग महत्त्वाचा हा वाद घालण्यात आता हशील नाही. एवढे मात्र खरे की, त्यांच्या समाजसुधारणांची कसोशीने अमलबजावणी करून अनुयायांनी हा समाज एकसंघ बनविला असता तर आज हिंदुमहासभेचे जे स्वरूप दिसते त्यापेक्षा काही वेगळे स्वरूप दिसले असते. पण राजकारणात आणि त्यातल्या त्यात सत्तावादी राजकारणात हा संघटनेचा भाग बसत नाही.

सर्वच पक्षांची ही शोकांतिका आहे. मते मिळविण्यासाठी मूलगामी तत्वांना मुरड घातली जाते आणि मग शॉने ख्रिस्ती तत्त्वज्ञानाच्या शोकांतिकेवरून जो सिद्धान्त बांधला त्याचा खेदजनक प्रत्यय येऊ लागतो. शॉने लिहिले आहे, " years ago I have said that conversion of a savage to christianity is a converersion of christianity to savagery. " नेत्याच्या विचारांची झेप सहन झाली नाही की अनुयायी ते विचार आपल्या बौद्धिक पातळीला आणण्याचा प्रयत्न करतात. जात्युच्छेदाचा अत्यंत हिरीरीने पुरस्कार करणाऱ्या स्वातंत्र्यवीरांची हिंदुत्वनिष्ठा अखेर जातिभेद तसेच मान्य करण्यापर्यंत पातळ केली गेली. कारण जात्युच्छेद म्हणजे प्रारंभी तरी वरिष्ठवर्णीयांचा विरोध. राजकारणात झटपट यश मिळविण्यासाठी या विरोधाची मोठीच अडचण होती. तेव्हा जात्युच्छेदक निबंध लिहिणाऱ्या सावरकरांना गुंडाळून केवळ अखंड हिंदुस्थानवादी सावरकरच त्यांच्या पक्षाने मान्य केले.

येथे काँग्रेसशी सामना करणे अवघड होते. एक तर काँग्रेसला मोठी परंपरा होती. महात्माजींच्या ' राजकारणी संत ' या भूमिकेचे बहुजनसमाजाला जसे तात्काल आवाहन होत होते, तसे सावरकरांच्या हिंदुत्वनिष्ठेचे आवाहन होणे शक्य नव्हते. सावरकर राजकारणी म्हणूनच पुढे आले. अध्यात्म, अंतर्नाद, ब्रह्मचर्य यांचे त्यांनी अवडंबर माजविले नाही. या देशातील बहुजनसमाजाच्या नाडीवर त्यांच्या हिंदुत्वनिष्ठेला अचूक बोट ठेवता आले नाही. अलौकिक शक्तीची तरफ लावून स्वराज्याचे जड ओझे जो कोणी उचलील त्याच्या दर्शनाला जनता उत्सुक होती. या सामर्थ्यांत महात्माजींवर मात करणारा दुसरा कोणीही पुढारी झाला नाही. त्यांना सरळ सामना दिला जिनांनी, आणि त्यांच्याच साधनांनी सामना दिला. परिणाम फाळणीत झाला हे आपण पाहिलेच आहे. पुढारी व जनता यांत फक्त दर्शन–संबंध आहे. संवाद ( डायलॉग ) नाही. कम्युनिस्ट, सोशलिस्ट, हिंदुत्वनिष्ठ सारे सारे फार मागे रेटले गेले. राष्ट्रातील दोन आणे पाठिंबाही या पक्षांना मिळू शकला नाही. कारण जनता या पक्ष-पुढाऱ्यांच्या दर्शनाला उत्सुक नव्हती.

आता काळ पालटत चालला आहे. लोक अधिक चोखंदळ होऊ लागले आहेत. ' नेतावाक्यं प्रमाणम् ' हा जमाना उतरणीला लागलेला दिसतो. या नव्या मनूत ज्यांची ज्यांची हेटाळणी वा थट्टा झाली, त्यांचे त्यांचे योग्य मूल्यमापन करण्याच्या मनःस्थितीत समाज आलेला आहे. आणि म्हणून ना. गोखले, जगन्नाथ शंकरशेट, लोकमान्य यांच्या शताब्दी साजऱ्या करून, ज्याचे देणे त्याला दिले पाहिजे या

न्यायबुद्धीने समाजात वागणे सुरू झाले आहे. या वातारणात स्वातंत्र्यवीर सावरकरांचे मोठेपण मान्य होईल अशी मी आशा बाळगतो. राष्ट्रासाठी अतुल स्वार्थत्याग, प्रखर बुद्धिवाद, मूलग्राही सामाजिक सुधारणा, तेजस्वी साहित्य, स्वभाषेचा प्रगाढ अभिमान, त्या अभिमानापोटी उद्भवलेली भाषाशुद्धी व लिपिशुद्धी इत्यादी सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक आकर्षक पैलू आहेत. राजकारण हंगामी आहे. कालौघात ते राजकारण व त्यातील मतभेद वाहून जातात. उरतो तो हा शाश्वत भाग. या राष्ट्राच्या जडणघडणीत स्वातंत्र्यवीरांचे एक स्थान निश्चित राहील ते या शाश्वत भागामुळे. नवी पिढी या स्वातंत्र्यवीराला वीरोचित मानवंदना देईल असा मला दृढ विश्वास वाटतो.

(६-३-१९६६)



३

# आचार्य विनोबा भावे स्वतंत्र प्रज्ञेचे 'दर्शन' कार

' शम-प्रधानेषु तपोधनेषु गूढं हि दाहात्मिकमूमस्ति तेजः । '

आचार्य विनोबाजींची ७० वी जयंती अकरा सप्टेंबरला परंधाम आश्रमात साजरी झाली. तत्पूर्वी बरेच दिवस सौ. कुसुमताई नारगोळकर यांनी पत्रद्वारे सूचना केली होती की या जयंतीनिमित्त तुम्ही काही लिहा. पण त्याचबरोबर त्यांना शंकाही आली, मी काही लिहिणार नाही अशी. म्हणून त्याच पत्री त्यांनी टोमणाही दिला की कदाचित तुम्हांला या विषयात स्वारस्य वाटणार नाही. त्यांचा टोमणा अस्थानी नव्हता, परंतु स्वारस्य नसले तरी विनोबाजींविषयी मला आदर नाही असा त्याचा अर्थ नाही. मला आचार्य आदरणीय वाटतात, पण अनुकरणीय वाटत नाहीत, आणि याबद्दल आचार्य-भक्तांनी फारशी खळबळ करू नये. कारण मतभेदापेक्षा हा रुचिवैचित्र्याचा प्रश्न आहे.

गांधीयुगात आचार्य बरेच निर्माण झाले. मला वाटते महाविद्यालयीन शिक्षकाला हा प्रतिशब्द शोधून काढण्यात आला असावा. कारण प्राचीन शिक्षण-शास्त्रातील हा शिक्षकाला पर्यायवाची शब्द आहे. पण शब्द लावताना फारसा विचार झालेला दिसत नाही. कारण कोणाला आचार्य म्हणावे याचे पूर्वी संकेत ठरलेले आहेत. उदाहरणार्थ मनूचे कोष्टक पाहा :—

उपाध्यायान्दशाचार्यः
आचार्याणां शतं पिता ।
सहस्रं तु पितृन्माता
गौरवेणातिरिच्यते ॥

दहा उपाध्याय म्हणजे एक आचार्य, शंभर आचार्य म्हणजे एक बाप ( सध्या पित्याचा भाव बराच खाली आला आहे हे कळविण्यास वाईट वाटते. ) आणि हजार बाप बरोबर एक माता. या हिशेबानुसार सध्याचे शिक्षक उपाध्याय ठरतात. कारण संथा देणारा तो उपाध्याय. अनेक प्राचीन पर्यायांचे त्या मागचे संकेत झुगारून दिल्याने विडंबन होते ते हे असे.

दर्शन निर्माण करणाराला आचार्य म्हणावे हा दुसरा संकेत. या संकेनानुसार आचार्य ही पदवी ठरते आणि शंकराचार्य, रामानुजाचार्य इत्यादि नावांत आचार्य पर्यायाचा पदवीप्रमाणेच उपयोग करण्यात आलेला आढळतो. हल्ली आचार्य विशेषणासारखे उपयोजिले जाते. जसे श्रीयुत, श्रीमती, मिस्टर, मिसेस् तसे आचार्य. आचार्य हे आजकाल विशेषण बनले आहे 'विशेष न' या अर्थाने.

विनोबाजी जुन्या दोन्ही संकेतांनुसार आचार्य ठरतात. एक तर ते केवळ संथा देणारे नाहीत. कोणाला पटो वा न पटो, त्यांचा स्वतःचा म्हणून एक विचार आहे. मला तो कदाचित मान्य होणार नाही, माझ्याप्रमाणेच अनेकांनाही. पण स्वतःचा एक स्वतंत्र विचार मांडणारे असे ते आचार्य आहेत, याविषयी दुमत न व्हावे. दुसरे दर्शनकार या नात्यानेही ते आचार्य ठरतात. गांधीदर्शनापेक्षा विनोबादर्शन वेगळे आहे अशी माझी धारणा आहे. ब्रह्मचर्य, अपरिग्रह, प्रार्थना आदि आध्यात्मिक तंत्राचा भाग या दोन्ही दर्शनांत समान असला, तरी विनोबादर्शनात विज्ञानावर दिलेला भर हा त्या दर्शनाचा गांधीदर्शनापेक्षा विशेष होय. गांधीदर्शनात विज्ञानविद्वेश नसला तरी विज्ञान पराङ्मुखता होती. इंग्लंडात यंत्रविरोधी ल्युडाइट चळवळीचा रस्किनच्या विचारसरणीवर जो प्रभाव पडला होता त्याचीच दाट छाया गांधीदर्शनावर आढळून येते. विनोबादर्शन इतक्या एकांतिक टोकाला गेलेले नाही.

भूदान हा विनोबादर्शनाचा दुसरा विशेष. गांधीदर्शनात विश्वस्ताची कल्पना होती. त्या कल्पनेत मालकी हक्काचा त्याग नव्हता. भूदानात मालकी सोडण्याची कल्पना आहे. त्याजबरोबर कसेल त्याची जमीन अशी उत्पादकतेशी निगडित असलेली मालकीही भूदानाला संमत नाही. मालकी गावाची, ग्रामसमाजाची. त्यामुळे भूदान शेतीचे उत्पादन वाढविण्यास कितपत उपयोगी पडेल याची मला

शंका वाटते. कारण भूदानाचा भर अर्थशास्त्रावर नाही. परमार्थशास्त्रावर आहे. गांधीदर्शन राजकारणाचे अध्यात्मीकरण करू इच्छिते. तर भूदान अर्थशास्त्राचे अध्यात्मीकरण करू पाहते. दोन्ही दर्शने विवाद्य आहेत. पण दोन्ही स्वतंत्र दर्शने आहेत यात शंका नाही. यासाठीच ते आचार्य ठरतात.

विनोबाजींच्या भूदानाने तेलंगणातील कम्युनिस्टांचा प्रभाव नष्ट केला याबद्दल माझ्या मनात आदर आहे. जी गोष्ट राज्यकर्त्यांना जमली नाही ती त्यांनी व त्यांच्या भूदानाने करून दाखविली. हे कार्य लहानसहान नाही. कम्युनिझम हे सामान्य भारतीय जनतेला आकर्षित करणारे तत्त्वज्ञान आहे. वास्तविक युरोपात मार्क्सवाद हा बुद्धिवादातून निर्माण झाला. विज्ञानप्रणीत समाजाची ती शेवटची परिणती असे ते स्वतःच्या तत्वज्ञानाला मानतात. पण चमत्कार असा झाला की विज्ञानाची प्रगती ज्या समाजात जास्त तेथे त्याची पीछेहाट झाली आणि जेथे अज्ञानाचा प्रभाव जास्त तेथे त्याचे आकर्षण वाटू लागले. मार्क्सला वाटत होते की कम्युनिझम डॅन्यूब नदीच्या तीरावर प्रथम येईल. प्रत्यक्षात तो आला होल्गावर. होल्गाही थोडी सुधारली तर त्याचा प्रसार यांगत्से, गंगा, कृष्णा अशा दिशेने होऊ लागला आहे. विचार करण्यासारखे हे दृश्य आहे.

लोकमानसाला वाटणारे कम्युनिझमचे हे वाढते आकर्षण कायद्याच्या बडग्याने नष्ट होण्यासारखे नाही. त्यापेक्षा अधिक प्रभावी आकर्षण जो कोणी निर्माण करू शकेल तोच कम्युनिझमला पायबंद घालू शकेल. तेलंगणात विनोबांनी कम्युनिझमला जो पायबंद घातला तो भूदानाच्या दर्शनाने. भूदानाने अहिंसेचा, सहकार्याचा विजय झाला की नाही, हे अजून सिद्ध व्हावयाचे आहे. पण कम्युनिस्टांच्या वर्गकलहाच्या शिकवणुकीत केवळ नकारात्मक वा निषेधात्मक शिकवण आहे हे स्पष्ट झाले. आंदोलन, मोर्चे, संप अशा हंगामी, अल्पजीवी कार्यक्रमात ती शिकवण प्रभावी ठरते. कारण दलित व दरिद्री लोकांना त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची चीड असतेच. पण राग, द्वेष हा कोणत्याही चळवळीचा स्थायीभाव होऊ शकत नाही. त्यातून काही विधायक फल पदरात पडले नाही तर मन वैफल्याच्या भावनेने विषण्ण बनते आणि मग त्यानंतर होणारी प्रतिक्रिया कार्याचा सत्यानाश करून टाकते. कम्युनिस्टांच्या वर्गकलहाचे हे मर्मस्थान आहे. मला वाटते भूदानाने या मार्गावर बोट ठेवले आणि त्यामुळेच तेलंगणात कम्युनिस्टांची पीछेहाट झाली. मात्र भूदान यशस्वी झाले का हे अजून सिद्ध व्हावयाचे आहे.

आचार्य विनोबाजी यासाठी मला आदरणीय वाटतात. एकट्या पदयात्रेचाच

विचार करा. एक कृश आणि उतार वयातील व्यक्ती अखिल भारताचा पायी प्रवास करते आणि ती एका ' मिशन 'साठी, ही कल्पनाच किती रोमहर्षक आहे! कम्युनिटी डेव्हलपमेंटचे अधिकारी व कार्यकर्ते त्यांच्या एकशतांश जरी पदयात्रा करतील तर! असा विचार मनाला चाटून जातो. पण ते होणे नाही. कारण लोक अद्भूताला नमस्कार करतात, त्याचे अनुकरण करीत नाहीत. काही लोक-विलक्षण घडले की लोक ते बघायला येतात. वंद्य वाटले तर नमस्कार करतात; निंद्य वाटले वा विलक्षण वाटले तर हुर्रेवडी करून घटकाभर करमणूक करून घेतात. पण त्याचे अनुकरण करीत नाहीत. कोणत्याही तत्त्वाची वा विचाराची साथ आली तर तिचा जोर घटकाभर पसरतो रोगाच्या साथीप्रमाणे. पण ती साथ आपल्या विचारात कायमची घर करू नये म्हणून लोकांनी भरपूर ' इम्युनिटी ' तयार केलेली आहे.

मग काय घडते? त्या महात्म्याभोवती अनुयायी गोळा होतात. त्यांचा एक पंथ बनतो, मठ तयार होतो आणि जनता दरवर्षी नेमाने मठ-महंताची पूजा बांधते; आणि म्हणत असते, ' न देवचरितं चरेत् ' सर्व महापुरुषांची आणि संतांची लोकांनी अशी अगदी ' ट्रॅजेडी ' ( शोकांतिका ) करून टाकली आहे. आमचे ऋषी, दर्शनकार, आचार्य, बुद्ध, ख्रिस्त आणि महाराष्ट्रातील संत, कोणी कोणी यातून सुटलेला नाही. प्रत्येकाचे मठ तयार झाले आहेत. त्या मठांत महंत बसले आहेत. त्या मठांत दरवर्षी यात्रा, उत्सव होतात. लाखो लोक त्या दिवशी जमतात, रामधून, ' ग्यानबा तुकाराम ' यांच्या गगनभेदी गर्जना उठतात आणि लोक घरोघर परत जातात. त्या महात्म्याची शिकवण संपूर्ण विसरून. त्यांच्या जीवनात संतमहात्म्यांसाठी फक्त एक दिवस राखून ठेवलेला असतो. फक्त एकच दिवस !

म्हणून आचार्य विनोबांविषयी माझ्या मनात अनादर आहे असा त्यांच्या शिष्यांपैकी वा भक्तांपैकी कोणाचा गैरसमज असला तर तो काढून टाकावा. राजकीय वा सामाजिक जीवनात ही जी गूढ अध्यात्मवादी प्रवृत्ती शिरली आहे ती माझ्या विचाराला पटत नाही. राजकारणाला हा गृहस्थधर्म आहे, यतिधर्म नाही. लोकविलक्षण पोषाख, लोकविलक्षण बोलणेचालणे, काहीतरी नवीनच टूम काढणे या लकबी समुदाय गोळा करण्यास उपयोगी पडत असल्या तरी सामाजिक जीवनाशी त्याचा साक्षात संबंध काय येतो? ब्रह्मचर्य, अपरिग्रह, उपवास, प्रार्थना, मौन इत्यादि व्रतांचा चित्तशुद्धी व आत्मशुद्धीसाठी उपयोग असला तरी राजकारणात त्याचा एवढा बडीवार कशाला? या बाह्य उपाधींनी का राजकारणाचे आध्यात्मीकरण होणार आहे? मला तसे वाटत नाही. पंथ निर्माण करण्याची


ही साधने आहेत. राजकारण शुद्ध करण्याची नाहीत. चारचौघांसारखे वागून त्यांच्यापेक्षा जे दशांगुळे उंच राहतात, तेच माझ्या मते खरे राजकीय नेते होत.

यासाठी माझी भक्ती न्या. रानडे, लो. टिळक, यांच्यावर आहे. ते आपल्यातले वाटतात आणि आपल्यापेक्षा मोठे वाटतात. महात्माजींनी हा यतिधर्म राजकारणात आणला खरा. पण राजकारण करताना राजकीय नेत्यासारखे राजकारण केले. त्यामुळे त्यांच्याभोवती ज्या व्यक्ती गोळा झाल्या, त्या सर्व संसारी, गृहस्थधर्मी व निर्भेळ राजकारणी अशा होत्या. विनोबाजींचा त्या तुलनेने 'सेक्ट' वा पंथ वाटतो. त्यांच्या भूदानाविषयी आणि आता ग्रामदानाविषयी कुतूहल वाटते, कौतुक करावेसे वाटते. राज्यकर्ते त्यांची भेट घेतात, त्यांना वंदन करतात. त्यांच्याविषयी आदराने बोलतात; पण यापलीकडे काही करीत नाहीत वा करू शकत नाहीत; कारण त्यांचे राजकारण वा अर्थकारण गृहस्थधर्मी नाही !

राजकारण वा समाजकारण बुद्धिवादी व विज्ञाननिष्ठ असावे. विनोबाजीदेखील विज्ञानाचा पुरस्कार करतात, पण त्यावर अध्यात्माची टोपी घालू पाहतात. मला ते मान्य नाही. माझे मित्र श्री. वसंतराव नारगोळकर यांनी विनोबाजींच्या अध्यात्मवादी भूमिकेचे बुद्धिवादी समर्थन केले आहे. बुद्धीच्या मर्यादा दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचा 'क्रीड ऑफ सेंट विनोबा' हा ग्रंथ या दृष्टीने वाचण्यासारखा आहे. पण बुद्धीच्या मर्यादा मान्य करूनही मानवी जीवनाला बुद्धीखेरीज मार्गदर्शक असे दुसरे कोणतेही साधन कोणी दाखवू शकला नाही. ज्याला इंटयुइशन किंवा प्रतिभा असे म्हणतात, ती देखील नवोनवोन्मेशशालिनी बुद्धीच आहे. मानवी बुद्धीला जीवनातील प्रत्येक कोडे उलगडलेच पाहिजे, असा बुद्धिवाद्यांचा आग्रह नाही. पण जे बुद्धीला सुटले नाही ते आम्ही अध्यात्मवाद्यांनी उलगडले हा अध्यात्मवाद्यांचा निव्वळ अहंकार आहे. बुद्धिवादी व विज्ञानवादी अधिक विनम्र आहेत. तरी नम्रता हा अध्यात्मवाद्यांनी गुण मानला असला तरी तो त्यांच्यापेक्षा बुद्धिवाद्यांपाशीच आढळतो.

असो. अनेक प्रश्नांवर असा वाद घालता येईल. पण तो वाद प्रस्तुत नाही. प्रस्तुत आहे विनोबाजींची भूमिका. ती मला आदरणीय वाटते. या अशा व्यक्तीचा सामाजिक जीवनावर प्रत्यक्ष परिणाम होत नसला, तरी अप्रत्यक्ष परिणाम होतच असतो. मध्ययुगात ख्रिश्चन मोनॅस्ट्री, आपल्या येथील ऋषींचे आश्रम वा बौद्धांचे विहार, सार्वजनिक जीवनावर कोणता परिणाम घडवून आणतात याचे 'शमप्रधानेषु तपोधनेषु गूढे हि दाहात्मकमस्ति तेजः '.असे कालिदासाने मोठे मार्मिक वर्णन केले आहे. समाजजीवन विशुद्ध करणारे हे 'फिल्टरिंग टॅंक'च होत.

(२७-९-१९६४)



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
........ दि: ........
अनुक्रम ........ नों दि: ........
क्रमांक ........

४

# शांतियुध्दातील बहाद्दूर बलिदान

ताश्कंद हे दिवंगत पंतप्रधान ना. शास्त्री यांचे चिरंतन स्मारक म्हणून प्रत्येक भारतीयाच्या स्मृतिपटलावर कोरले जाईल. येथेच शांतिब्रह्माच्या उपासनेपायी त्यांनी बलिदान केले! होय, बलिदान असेच मी त्यांच्या मृत्यूला नाव देतो. ज्या दोन राष्ट्रांचे संबंध अत्यंत दुरावलेले होते आणि ज्या दोन राष्ट्रांच्या सरहद्दीवर शस्त्रांचा खणखणाट चालू होता, त्या दोन राष्ट्रांत शांतता व सलोखा प्रस्थापित करण्यासाठी किती चिकाटीच्या व अविश्रांत परिश्रमाची गरज असते, हे जावे त्यांच्या वंशा तेव्हाच कळण्यासारखे आहे. ना. शास्त्री यांच्या मनावर किती दडपण होते याची आत्मौपम्यबुद्धीने आपण कल्पना करा. कश्मीरच्या प्रश्नावर आपण विशिष्ट भूमिकेला बांधलेले आहोत असे राष्ट्राला त्यांनी आश्वासन दिले होते. याच प्रश्नावर पाकिस्तान अखेरपर्यंत ताणून धरील याची त्यांना जाणीव होती. ज्या रशियन भूमीत ते तडजोडीसाठी गेले, त्या भूमीचे राज्यकर्तेही देवाणघेवाणीत काहीतरी भारताने देवाण केली पाहिजे अशी अपेक्षा बाळगून असल्याची त्यांना पुरेपूर कल्पना होती. रशियाची अपेक्षा, पाकिस्तानची आशा आणि स्वतःची भूमिका हा त्रिकोण समभुज नव्हता. आपल्या मूळ भूमिकेला धक्का न लावता, रशियाला नाराज न करता आणि पाकिस्तानलाही समाधान वाटेल अशी वाट काढण्याचे काम फार बिकट होते. कारण फंदी म्हणतात तशी ही वहिवाटीची वाट नव्हती. त्यासाठी मनावर विलक्षण ताण पडणे स्वाभाविक

होते. त्याला त्यांचे मन तयार होते. पण शरीर नाजूक होते. ‘ Spirit is willing, but flesh is weak ’ अशी त्यांची स्थिती होती आणि हे माहीत असूनही त्यांनी ताश्कंद गाठले. याला बलिदान हे नाव न द्यावे तर काय नाव देता येईल?

या पार्श्वभूमीवर ताश्कंद कराराची आपण अत्यंत गांभीर्याने दखल घेतली पाहिजे. एका अर्थाने ना. शास्त्रींनी हा पुढिलांस वारसा दिलेला आहे. आता भारताच्या भावी पंतप्रधानाला ताश्कंदच्या करारापासून पुढे वाटचाल करावी लागणार आहे. १८ महिन्यांत घडलेल्या महाभारतातील युद्धपर्वाची वाटल्यास त्याने पाने चाळावीत. पण त्याचबरोबर शांतिपर्व सुरू होऊन त्याचा पहिला अध्याय समाप्त झाला हेही लक्षात ठेवावे. यापुढील इतिहास घडविताना या पहिल्या अध्यायात काय घडले आणि कसे घडले, त्या घटनांतील मुख्य सूत्र कोणते, ते सूत्र घेऊन पुढची पावले कशी टाकावीत याचाच विचार प्रमुख ठरतो आणि त्या दृष्टीने शांतिपर्वाच्या पहिल्या अध्यायावर धावती टीका केल्यास ती अस्थानी ठरणार नाही, असा मला विश्वास वाटतो.

काश्मीर हा भारताचा अविभाज्य घटक असल्याने त्यावर वाटाघाटी होऊ शकत नाहीत आणि वाटाघाटी करणेच असेल तर भारत व पाकिस्तान या दोन देशांतील राजकीय, आर्थिक इत्यादि सर्व समस्यांविषयी साकल्याने वाटाघाटी केल्या पाहिजेत. या दोन गोष्टी मनाशी पक्क्या करून ना. शास्त्री ताश्कंदला गेले होते. ताश्कंदला जो संयुक्त करार झाला त्या कराराचे मूल्यमापन या दोन गोष्टींच्या प्रकाशात झाले तर ते यथायोग्य मूल्यमापन होऊ शकेल. हा महत्त्वाचा निकष वगळून प्रजा समाजवादी व जनसंघ या पक्षांच्या प्रवक्त्यांनी करारावर जे अवांतर ताशेरे झाडले आहेत, ते मला तरी निरर्थक वाटतात. या विरोधी पक्षांनी एक महत्त्वाची गोष्ट अवश्य लक्षात घ्यावी की ना. शास्त्री वाटाघाटींसाठी व तडजोड करण्यासाठी गेले होते आणि तडजोड करावयाची असते तेथे देवाणघेवाण करावी लागते. देवाण करणार नाही, सगळी घेवाणच करू तर तो करार होऊ शकत नाही. आता पाकिस्तानशी करार करण्याची जरूरीच नाही अशीच या पक्षांची भूमिका असेल तर गोष्ट वेगळी. मग या पक्षांची भूमिका मूलतः भिन्न पडते आणि ज्यांची भूमिका मुळातच भिन्न आहे, त्यांच्या टीकेला उत्तर एवढेच द्यावे लागेल की या पक्षांची भूमिका शास्त्रींच्या भूमिकेशी जुळती नाही. पण पाकिस्तानचे राष्ट्र म्हणून अस्तित्व ज्यांना मान्य आहे आणि भारताच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने या दोन राष्ट्रांत सलोखा व शांतता नांदणे आवश्यक आहे हे ज्यांना मान्य आहे, त्यांनी मी जे दोन निकष वर सांगितले, ते निकष लावूनच या कराराचे मूल्यमापन करावे लागेल.

तेव्हा काश्मीरच्या प्रश्नाबाबत या करारात काय ठरले याचा आपण प्रथम विचार करू. करारातील पहिल्या कलमात या प्रश्नाचा उल्लेख आहे. त्यात भारत व पाकिस्तान यांमधील वादग्रस्त प्रश्न शस्त्रबळाच्या जोरावर सोडविले जाऊ नयेत, या भूमिकेला दोघांनी मान्यता दिली आहे. दोन राष्ट्रांत तणातणीचे संबंध राहणे इष्ट नाही याही तत्त्वाला उभयतांनी संमती दिली आहे. या पार्श्वभूमीवर दोघांनी काश्मीरविषयक आपली भूमिका स्पष्ट केली एवढाच या कलमात काश्मीर प्रश्नाचा उल्लेख आहे. म्हणजे काश्मीर प्रश्नावर उभयतांनी चर्चा केली असली तरी काश्मीर हा भारताचा अविभाज्य घटक आहे ही भूमिका परत एकवार ना. शास्त्रींनी निःसंदिग्धपणे मांडली. यानंतर कराराच्या कलम दोनमध्ये काश्मीरचा अप्रत्यक्ष उल्लेख करण्यात आला आहे. उभय पक्षांनी ऑगस्ट ५ च्या रेषेपर्यंत आपापले शस्त्रधारी परत घ्यावेत, यामध्ये तिथवाल, कारगिर, हाजिपिर खिंड ही घेतलेली ठाणी भारताला परत करावी लागणार असा भाग आला. पण त्याचबरोबर करारात केवळ सैन्य असा शब्द न वापरता ' आर्म्ड पर्सोनेल ' असा शब्द वापरला आहे. म्हणजे काश्मीरात घुसविण्यात आलेले मुजाहिद परत घेण्याची जबाबदारी पाकिस्तानने स्वीकारली आहे, असा या कलमाचा अर्थ होतो.

या संयुक्त करारावर टीका करण्यासारखा कोणता भाग असेल तर तो हा. काश्मीरात परत आक्रमण करार करणार नाही अशी पाकिस्तानने हमी दिल्याशिवाय घेतलेली ठाणी परत सोडणार नाही, अशी भारताची भूमिका होती. तशी कोणतीही हमी न मिळता भारताने ही ठाणी सोडण्याचे मान्य केले हाच काय तो टीकाकारांचा आक्षेप. देवाणघेवाणीत काही द्यावे लागते हे या आक्षेपाचे उत्तर वर मी दिलेच आहे. पण उभयपक्षांतील तंट्याचे प्रश्न शस्त्रबळावर यापुढे सोडविले जाणार नाहीत, या सर्वसामान्य भूमिकेला पाकिस्तानने मान्यता दिली आहे आणि त्रयस्थाला साक्ष ठेवून ही मान्यता दिलेली आहे. ही गोष्ट लक्षात घेतल्यास, काश्मीरवर परत सशस्त्र आक्रमण न करण्याची हमी मिळवून काश्मीरसंबंधी आपली भूमिका कायम ठेवण्याच्या कामी ना. शास्त्रींनी फार मोठे यश मिळविले हे कोणासही मान्य करावे लागेल.

शब्दांचा कीस काढून या दोन कलमांचा अर्थ मी लावीत नाही. वीस सप्टेंबरला सुरक्षा समितीचा ठराव झाल्यापासून, भुत्तोंचा सुरक्षा समितीतील थयथयाट, अध्यक्ष आयुबखान यांचा ताश्कंद भेटीला प्रथम नकार, नंतर आयुबखानांची अमेरिका भेट या सर्व घटना आपण येथे ध्यानात घ्याव्यात. अमेरिकेत आपली डाळ शिजत नाही आणि केवळ चीनच्या कोरड्या सहानुभूतीवर आपला निभाव लागणार नाही, काश्मीर प्रश्नावर अमेरिका सार्वमताच्या भूमिकेला पाठिंबा देणार

नाही, या सर्वांची जाणीव झाल्यावर आयुबखान ताश्कंदला आले. आणि आल्यानंतर काश्मीर प्रश्नावर हटवादी भूमिका घेऊन वाटाघाटी फिसकटल्या तर पाकिस्तानला चीनखेरीज कोणाचाही-म्हणजे अमेरिका व रशिया या दोघांचाही पाठिंबा राहणार नाही, अशी त्यांना जाणीव करून देण्यात आली. कराराची ही पार्श्वभूमी अधिक महत्त्वाची आहे असे मला वाटते. ही पार्श्वभूमी लक्षात घेतल्यानंतर, शस्त्रबळाचा वापर न करण्याला संमती देण्यामध्ये आयुबखानांचे हेतू काय आहेत, ते करारातील हे कलम पाळतील की नाही, हे प्रश्न गौण ठरतात. शस्त्रबळाचा वापर करणार नाही अशी पाकिस्तानने हमी दिली नाही असे एक वेळ मानले तरी या करारातील या कलमाला रशियाची प्रत्यक्षपणे व अमेरिकेची अप्रत्यक्षरीत्या हमी आहे आणि प्रत्यक्ष पाकिस्तानच्या हमीपेक्षा ही हमी अधिक महत्त्वाची आहे.

येथेच ना. शास्त्रींच्या मुत्सद्देगिरीचे कसबही स्पष्ट दिसते. गेली अठरा वर्षे काश्मीरचा प्रश्न आपल्याला भंडावून सोडीत आहे. प्रत्यक्ष युद्धविराम रेषेवर वातावरण तंग होतेच. पण युनोत व सुरक्षा समितीत बहुतेकांची प्रतिकूलता होती. सुरक्षा समितीत भारताने काश्मीर प्रश्नावर आपली भूमिका कायम ठेवली ती रशियन व्हेटोच्या बळावर. अमेरिका व इंग्लंड यांचा सार्वमताचा आग्रह कायम होता. पाकिस्तानची बाजू न्यायाची आहे, अशी त्यांची धारणा होती. भारत व पाकिस्तान यांमधील संघर्षाने हे चित्र पालटले यात शंका नाही आणि याचे प्रमुख कारण म्हणजे पाकिस्तान व चीन यांची युती. पं. नेहरू यांच्या कारकीर्दीत चीनच्या आक्रमणाचा परिणाम एवढाच झाला की काश्मीर प्रश्नावर पाकिस्तानशी वाटाघाटी करण्यासाठी अँग्लो-अमेरिकन गटाने भारतावर दडपण आणले. पण पाकिस्तान व चीन यांच्या युतीचा फायदा घेऊन पाकिस्तानला अमेरिकेपासून अलग पाडण्याच्या कामी ना. शास्त्रींनी यश मिळविले. आज अमेरिकेने सार्वमताचा आग्रह सोडला आहे. त्याचबरोबर रशियाने आपली मूळ भूमिका सोडलेली नसली तरी भारत व पाकिस्तान यांच्यात सलोखा साधून चीनला अलग पाडण्यात त्याचे हितसंबंध गुंतलेले आहेत. रशियाच्या या बदलत्या भूमिकेचा फायदा भारताला मिळावा म्हणून ना. शास्त्री ताश्कंदला गेले आणि ताश्कंद कराराने त्यांनी रशियाची सहानुभूती मिळविली म्हणजे काश्मीरच्या प्रश्नावर शस्त्रबळाचा वापर करणार नाही, याविषयी दोन्ही बलाढ्य राष्ट्रांची हमी ना. शास्त्रींनी भारताला मिळवून दिली आहे. मुत्सद्देगिरीचे हे सर्वांत मोठे यश होय.

काश्मीरचा वाद मिटविण्यासाठी पाकिस्तानला 'स्वयंचलित यंत्रणा' हवी होती. याहीबाबत ना. शास्त्रींनी पाकिस्तानची डाळ शिजू दिली नाही. या कराराच्या

नवव्या कलमामध्ये भारत-पाक संयुक्त समित्या स्थापन करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. पण लवाद, मध्यस्थ अशा स्वरूपाची स्वयंचलित यंत्रणा त्यात मान्य केलेली नाही. तेव्हा पाकिस्तानचा शेवटचा उपाय म्हणजे वीस सप्टेंबरच्या ठरावाचा आधार घेऊन हा वाद परत सुरक्षा समितीकडे नेणे हा. पण तेथे पाकिस्तानचे उद्दिष्ट सफल होण्यासारखी परिस्थिती नाही. सार्व-मताला अमेरिकेची संमती नाही. चिनी आक्रमणाचा प्रतिकार करण्याच्या दृष्टीने काश्मीर खोऱ्याचे महत्त्व अमेरिकेला पटलेले आहे आणि काश्मीर भारताचा अविभाज्य घटक आहे ही रशियाची भूमिका कायम आहे. या परिस्थितीत फार झाले तर काश्मीरची आज जी फाळणी झाली आहे तीच कायम होऊ शकेल. वास्तवता लक्षात घेतली तर आज जी युद्धविराम रेषा आहे तीच आंतरराष्ट्रीय सरहद्द बनण्याचा संभव मला तरी अधिक दिसतो.

काश्मीर ही कसोटी लावली तर ताश्कंद करार भारताच्या दृष्टीने मुळीच तोट्याचा झाला नाही, हे वरील विवेचनावरून दिसून येईल. 'युद्धबंदीचा करार' झाला नाही आणि मुजाहिद परत घुसविणार नाही अशी पाकिस्तानकडून हमी मिळाली नाही, हे जे दोन प्रमुख आक्षेप या करारावर घेतले जातील ते आक्षेप कसे निराधार आहेत, याचा उलगडा करण्याचा मी यथामती प्रयत्न केला आहे. पण काश्मीरपेक्षा या करारात ज्या इतर गोष्टी समाविष्ट केलेल्या आहेत त्याही महत्त्वाच्या आहेत. ' Totality of relations ' असा शब्दप्रयोग ताश्कंदला जाण्यापूर्वी ना. शास्त्रींनी वापरला होता. या करारात त्या दृष्टीने कशमीरखेरीज अनेक प्रश्नांचा समावेश करण्यात आलेला आहे. तिसऱ्या कलमात एकमेकांनी एकमेकांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करण्याचे तत्त्व मान्य करण्यात आले आहे. भारतव्याप्त काश्मीरात मुजाहिद शिरता कामा नये या तत्त्वाला ही एक अप्रत्यक्ष मान्यताच नव्हे काय ? चवथ्या कलमात एकमेकांनी आपापल्या राष्ट्रांत एकमेकांविरुद्ध विषारी प्रचार करता कामा नये या गोष्टीला मान्यता दिली आहे, तर दोन्ही राष्ट्रांत एकमेकांनी वकिलाती परत सुरू कराव्यात, व्यापार व वाहतूक पूर्ववत अनिर्बंध सुरू व्हावी, युद्धबंदी एकमेकांनी परत करावेत, जप्त केलेला माल परत केला जावा इत्यादि गोष्टी बाकीच्या कलमांत समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. सारांश, भारत व पाकिस्तान या दोन राष्ट्रांतील समग्र प्रश्न सोडविण्याच्या दिशेने वाटाघाटी व्हाव्यात हे जे शास्त्रींनी ठरविले होते, त्या दृष्टीने या करारात बरेच यश मिळविले, हे कोणालाही मान्य करावे लागेल.

पण करारातील कलमांना तसे काय महत्त्व आहे? करार ज्या वातावरणात झाला ते वातावरण, करारावर स्वाक्षरी करणारांचे मनोभाव आणि त्यांनी एकमेकांशी

प्रस्थापित केलेले व्यक्तिगत संबंध हे घटक करारापेक्षा महत्त्वाचे आहेत. अखेर माणसे करार करतात. करार माणूस निर्माण करीत नाही. ना. शास्त्रींचे खरे यश यात आहे. ना. शास्त्रींची उत्कटता व प्रामाणिकता मला पटली असे आयुबखानांनी उद्गार काढले हे खरे शास्त्रींचे यश आहे. जाताना त्यांना यशाची जवळजवळ आशा नव्हती. आशा नसताना प्रामाणिक प्रयत्न करावा म्हणून ते ताश्कंदला गेले आणि आपल्या वागण्याने, बोलण्याने प्रतिपक्षाला आपले प्रामाणिक हेतू पटविले हे शास्त्रींचे खरे यश आहे. ताश्कंद करार या भावनेने पाळला गेला तरच तो यशस्वी होऊ शकेल.

भारत व पाकिस्तान या दोन राष्ट्रांत सलोखा व शांतता नांदावी हीच ना. शास्त्रींची मूळ भूमिका. मध्यंतरी संघर्षपर्व झाले म्हणून त्यांच्या भूमिकेविषयी कोणीही गैरसमज करून घेऊ नये. संघर्ष टाळता येईना म्हणूनच त्यांनी युद्धाला मान्यता दिली. पण मुंबईतील एका व्याख्यानात त्यांनी सांगितले होते, " I am essentially a man of peace " तोच त्यांचा स्वभाव. तीच त्यांची भूमिका. आपल्या राष्ट्राच्या अस्तित्वावर गदा आली म्हणून त्यांना संघर्षाचा मार्ग पत्करावा लागला. पण भारताच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने या दोन राष्ट्रांत शांतता नांदणे अत्यावश्यक आहे ह्या मूळ भूमिकेचा त्यांना कधीही विसर पडला नव्हता. या मूळ भूमिकेला सोडून त्यांनी संघर्षाचा मार्ग स्वीकारला कारण त्याशिवाय या राष्ट्राची प्रतिष्ठा व प्रतिमा कायम राहणार नाही असे त्यांना वाटले म्हणून आणि मग या राष्ट्राचे अस्तित्व कायम टिकविण्यासाठी आत्यंतिक टोकाला जावे लागले तरी जाण्याची त्यांची तयारी होती. पण जेव्हा शांततेचे क्षितिज दिसू लागले तेव्हा त्यांनी त्या क्षितिजाच्या दिशेने वाटचाल करण्यास क्षणाचेही अनमान केले नाही. युद्धाप्रमाणेच शांतीही सहज साध्य नसते याची त्यांना जाणीव होती. ही शांती जिंकण्यासाठी त्यांना किती ताण सहन करावा लागला असेल, किती दडपण त्यांच्या मनावर आले असेल आणि त्यातून आपल्या राष्ट्राच्या हिताला बाध येणार नाही अशी वाट काढण्यासाठी काय परिश्रम करावे लागले असतील, याची केवळ कल्पनाच केलेली बरी. अखेर शांती त्यांनी जिंकली, पण त्यासाठी जबर युद्ध खेळावे लागले. त्या शांतियुद्धात त्यांनी बलिदान केले. आता आशा हीच की ' हे व्यर्थ न हो बलिदान. '

( १६-१-१९६६ )

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थलप्र
अनुक्रम ........२२०६३ दि: ....।निबंध
क्रमांक ........१८२१९ नों: दि: ....२५।



## ६

# काकासाहेब गाडगीळ
## झुंजार उमद्या स्वभावाचे अन् प्रसन्न रसिक वृत्तीचे
## चिरतरुण ध्येयवादी नेते

**दे. भ.** काकासाहेब गाडगीळ यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या जुन्या पिढीतील महत्त्वाचा दुवा निखळून पडला. माझ्या जीवनात महाराष्ट्रातील तीन पिढ्या मी पाहिल्या आहेत. विद्यार्थी दशेत असताना कै. शिवरामपंत परांजपे, तात्यासाहेब केळकर, वासुकाका जोशी, चिंतामणराव वैद्य त्या पिढीतील अग्रेसर व्यक्ती होत्या. कै. काकासाहेब गाडगीळ, देशभक्त शंकरराव देव, देवगिरीकर, दास्ताने हे त्यानंतरच्या पिढीचे नेते आणि त्यानंतर ना. यशवंतराव चव्हाण, कै. भाऊसाहेब हिरे इ. नेत्यांची तिसरी पिढी आज सार्वजनिक जीवनात तळपत आहे. काकांच्या जाण्याने या दुसऱ्या पिढीतील 'शेवटचा रोमन' गेला असे म्हणता येत नाही. पण महत्त्वाचा रोमन गेला एवढे तरी निश्चित म्हणता येईल.

आणि अशी व्यक्ती आपल्यातून निघून गेली की मग त्या व्यक्तीच्या जीवनाभोवती गुंडाळलेला सारा इतिहास आठवतो. या पुनःप्रत्ययात त्या इतिहासाची काही वेगळीच चव लागते. काही पदार्थ असे असतात की एक दिवस ठेवल्याखेरीज त्याला चव येत नाही. अशा व्यक्तींच्या जीवनवृत्तांताला हाच न्याय लागू पडतो, असे मला वाटते. ऐन उमेदीत काकांनी जे काही काम केले, जे वाद खेळले, ज्या झटापटी केल्या, त्याचे महत्त्व प्रत्यक्ष काका समोर असताना एवढे वाटले नाही. आता मनाने त्या काळात शिरण्याचा प्रयत्न केल्यानंतर काकांचे बहुढंगी व्यक्तिमत्त्व मनात भरते आणि महाराष्ट्राच्या जीवनात त्यांचे किती

महत्त्वाचे स्थान होते याची यथार्थ कल्पना येऊ लागते. अती परिचयाने वर्तमान-कालाची आपण अवज्ञा करतो असा याचा अर्थ आहे. पण मानवी जीवनाचा क्रमच असा आहे की प्रत्यक्ष परमेश्वर जरी आपल्यासमोर उभा राहिला तरी समोर असेपर्यंत त्याचे ईश्वरत्व वा ऐश्वर्य आपल्या नजरेत भरणार नाही !

काका पुढे आले ते तरुणांचे नेते म्हणून आणि सत्तराव्या वर्षी त्यांनी प्रयाण केले तेही तरुणांचे नेते म्हणूनच. काका असे चिरतरुण होते. तारुण्यात शोभून दिसणारा अवखळपणा, तारुण्यात नेहमी प्रादुर्भूत होणारा खोडकरपणा, दोन द्यावे, दोन घ्यावे असला खेळकरपणा, तरुणांना शोभणारा मिस्किलपणा, मुसंडी मारण्याची वृत्ती आणि भरारी मारण्याची प्रवृत्ती सारे सारे काही काकांच्या व्यक्तित्वात अखेरपर्यंत होते. चिरतारुण्याची ही मिळकत काकांनी एखाद्या कृपणासारखी जपून ठेवली असावी असाच जणू भास होत असे. काही व्यक्ती अशा असतात की तारुण्यातही त्यांचा चेहरा पाहिला की अकाली वृद्धत्व प्राप्त झाल्याचा भास होतो. उलट काही व्यक्तींना ऐन वार्धक्यदशेत पाहिले तरी वार्धक्याची छटाही त्यांच्या चेहऱ्यावर आढळत नाही. काकांचे व्यक्तिमत्त्व दुसऱ्या वर्गातील होते. वर्षापूर्वीच लोकसत्तेच्या दिवाळी अंकात लेख मागण्यासाठी मी त्यांच्या घरी गेलो होतो. मनात अशी कल्पना होती की सत्तरीच्या उंबरठ्यावर काका आले आहेत. थकले असतील. त्यांच्या चेहऱ्यावरील पूर्वीची मिस्किल छटा जाऊन, त्यावर गांभीर्याने ठाण मांडले असेल, पण प्रत्यक्ष भेटीत यांपैकी कशाचा मागमूस दिसला नाही. तेच पूर्वीचे मिस्किल हास्य, तीच पूर्वीची थट्टा-मस्करी, तोच पूर्वीचा मनमोकळा स्वभाव. परतताना मनाला समाधान वाटले की तीस वर्षापूर्वी पाहिलेले काका अजून जसेच्या तसे कायम आहेत.

१९२० सालातील कॉंग्रेसपेक्षा १९३५ सालातील कॉंग्रेस वेगळी होती. १९२० साली कॉंग्रेस शंभर टक्के गांधीवादी होती. पुणेकरांना नामंजूर असलेला असा तो गांधीवाद होता. जिल्हा वा तालुक्याच्या गावी असलेल्या वकील मंडळींचा थट्टेचा विषय बनलेला असा तो गांधीवाद होता. पण गांधीवादाला पकडून बसलेली मंडळी खरोखरीच गांधीवादी होती. मोठी ध्येयनिष्ठ होती. सेवाभावी होती. पण तितकीच नीरस होती. अती गंभीर, अतीव श्रद्धाळू. जीवन एकारलेले. या मंडळींच्या सहवासात गुदमरल्यासारखे वाटत असे. १९३४ साली जो नवा लोंढा आला तो अगदी नव्या जातीचा. त्या प्रवाहाने कॉंग्रेसचे रूपच पालटून टाकले. ही नवी मंडळी कॉंग्रेसवादी होती, पण गांधीवादी नव्हती. जीवनाकडे हे लोक उमद्या वृत्तीने पाहणारे होते. जीवनातले सारे रस चाखावेत, त्यांत वर्ज्यावर्ज्य असू नये अशी त्यांची धारणा होती. काकांचे व्यक्तिमत्त्व या नव्या मंडळींत चपखल

बसणारे होते. कारण काका पूर्वीपासून कॉंग्रेसमध्ये होते तरी गांधीवादी नव्हते. ते गांधींचे अनुयायी होते, पण व्रती नव्हते. गांधीवादी मेळाव्यात जसे उठून दिसत, तसे काकांचे वेगळेपण उठून दिसत नसे.

१९३२ सालची ही गोष्ट असेल. साताराचे पंढरीनाथ घाणेकर, श्री. दादा साखळकर, बुवा गोसावी अशी आम्ही सारी मंडळी मुंबईतील एका महत्त्वाच्या बैठकीला चाललो होतो. दुसऱ्या खेपेस सत्याग्रहाची चळवळ सुरू झाली. तेव्हा महाराष्ट्रात ही चळवळ कशी टिकवून धरता येईल याचा विचार करण्यासाठी ठिकठिकाणच्या कार्यकर्त्यांची एक सभा सरदारगृहात बोलावण्यात आली होती आणि त्या बैठकीच्या निमित्ताने आम्ही साताराची मंडळी मुंबईला निघालो होतो. ही सारीच मंडळी गंभीर प्रकृतीची. त्यांना विनोदाचे वावडे! आणि म्हणून साताऱ्यापासून पुण्यापर्यंतचा प्रवास अगदी तोंड बांधून झाला. पुण्याला गाडीत आमच्याच डब्यात काकासाहेब आले. आले मात्र आणि त्यांनी कोकणच्या खाणावळीतील अशी काही सुरस कथा सांगितली की बैठकीचा सारा रंग त्यांनी पालटून टाकला.

काकांच्या व्यक्तिमत्त्वातील ही जी सहजता होती, अकृत्रिमता होती तेच त्यांच्या जीवनातील बलस्थान होते. मित्रमंडळी घोळका घालून बसली आहेत, मध्येच चहाचे कप समोर येत आहेत आणि काकांचे गप्पासत्र सुरू झाले आहे. 'अविदियतगतयामा रात्रीरेव व्यरंसीत्' हे भवभूतीचे वर्णन त्या बैठकीला यथार्थ लागू पडेल आणि गप्पा तरी एका विषयावर आहेत म्हणता काय? राजकारण, समाजकारण आदि गंभीर विषय जसे त्या गप्पासत्राला वावडे नव्हते तसेच महामिस्किल गोष्टींचेही वावडे नव्हते. मला वाटते की अशी रात्र रंगविण्याच्या कामी त्यांची थोडीफार बरोबरी करू शकणारी एकच व्यक्ती होती आणि ती म्हणजे एस. एम्. आताच्या एस. एम्. वरून त्या वेळच्या एस. एम्. ची कल्पना येणार नाही. म्हणूनच काकांचा एस. एम्. वर एवढा लोभ जडला असावा. त्या वेळी त्यांच्या गोतावळ्यात र. के. खाडिलकर, ना. ग. गोरे आदि मंडळी म्हणत होती. पण या मंडळींच्या व्यक्तिमत्त्वात गांभीर्याचा अंश जादा. काका व एस. एम्. यांच्या व्यक्तिमत्त्वाला व्रात्यपणाची मोठी मजेदार छटा होती, तशी या मंडळींत दिसत नव्हती. म्हणून काकांच्या गप्पागोष्टींना ही मंडळी मंदस्मितानेच साथ देत असत.

काकांनी राजकारण केले ते या उमद्या मनाने केले. वार केले आणि वार झेललेही. मित्रांशी अवीट मैत्री केली आणि जेधे यांजसारख्या परममित्रांशी सामना केला तरी निवडणूक जिंकल्यानंतर त्यांना बंधुभावाने कडकडून मिठी मारली. कॉंग्रेसच्या निष्ठेपायी १९३६ च्या निवडणुकीत प्रत्यक्ष आपल्या मेव्हण्याशी दोन हात खेळताना कच खाल्ली नाही. पण या सर्व धकाधकीच्या मामल्यात काकांचा

उमदा स्वभाव मावळला नाही. त्यांच्या वागण्यात धक्का बसत असे, बोलण्यात वार केला जाई, पण मनात कोणतीही गोष्ट खरवडीसारखी घट्ट चिकटून राहत नसे. त्यांच्या राजकारणात अवखळपणा फार होता. प्रतिपक्षावर फार जोराचा वाक्प्रहार केला जाई. पण आभाळात वीज चमकावी तसा हा सारा क्षणाचा खेळ होत असे. त्यात थोडा भाबडेपणा होता. आतली गाठ नव्हती, की जी फुटता फुटत नसे. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात त्यांचा श्री. गोरे यांनी पराभव केला. पण त्याचे शल्य अंतःकरणात फार दिवस सलत राहिले असे झाले नाही.

आणि म्हणूनच काकांनी जे राजकारण केले ते मैदानी व मर्दानी राजकारण केले. त्यांचे राजकारण फडी होते आणि वक्तृत्वही फडी होते. जेधे-गाडगीळ ही झंजावाती जोडी होती. त्यांचा दौरा झाला तो झंजावाती दौरा झाला. त्यांच्या अमदानीत काँग्रेसची भव्य इमारत झाली. इमारतीचा पाया त्यांनी घातला. त्यावर कळसही त्यांनीच चढविला. त्या इमारतीत बिऱ्हाड कोणी थाटले, कबजा कोणी घेतला, याचा विचारही त्यांच्या मनाला शिवला नाही. पुण्याची गल्ली जशी गाजविली तशीच एके काळी दिल्ली गाजविली. संसदेच्या आवारात आणि आवाराबाहेर. महाद्विभाषिकाच्या चर्चेत महाराष्ट्राची बाजू त्यांनीच खणखणीतपणे मांडली आणि त्याचबरोबर संसदेचा जो काही निर्णय होईल तो शिरोधार्य मानण्याची तयारीही दाखविली. मंत्रिमंडळात ते होते. तसेच मंत्रिमंडळाबाहेर साधे खासदार म्हणूनही होते. नको असलेल्या व्यक्तीला राजकारणातून हद्दपार करण्याची सोपी पद्धती म्हणजे त्याला राज्यपाल बनविण्याची. काकांनी त्याला दाद दिली नाही. पण राष्ट्राचे एक महत्त्वाचे काम म्हणून वेळ येताच त्यांनी पंजाबचे राज्यपालपद स्वीकारलेही. जितक्या सहजतेने स्वीकारले तितक्याच सहजतेने त्यांनी ते टाकून दिले.

आणि अखेरचा मुक्काम त्यांनी आपल्या मेहुणपुऱ्यात केला. या अखेरच्या मुक्कामातही आपण पराभूत झालो, उपेक्षित ठरलो अशी त्यांना खंत वाटली नाही. नवीनांविषयी ते परखड बोलत असत, कडवटही बोलत असत. पण जो जमाना त्यांनी पाहिला, नव्हे जो त्यांनी गाजविला त्यापेक्षा वेगळ्या जमान्यातील चालचलणूक त्यांच्या अंतःकरणाला पटेना. त्यातून कटुता निर्माण झाली होती. मुले धनदौलत उधळतात हे पाहून म्हातारपणी पित्याला जे वाटते, तसे त्यांना वाटत होते. त्या कटुतेत दुःस्वास नव्हता, भले व्हावे अशी आंतरिक तळमळ होती. पण जुन्या-नव्याच्या विसंवादापुढे या तळमळीचे काही चालले नाही आणि काही चालणार नाही याची त्यांना जाणीवही असावी, असा माझा कयास आहे.


अशा या काकांच्या कार्याचे व व्यक्तिमत्त्वाचे काय मूल्यमापन करावे ?

त्यांनी महाराष्ट्रात काँग्रेस जगविली आणि तिला घरंदाज बनविली. एके काळी पुण्यात काँग्रेस फक्त पश्चिम भागातच होती. १९३६ साली सत्ताग्रहण केल्यानंतर ती पूर्व भागात गेली. पण त्याचबरोबर पश्चिम भागातून तिचे उच्चाटन होऊ लागले. काकांनी पूर्व व पश्चिम अशा दोन्ही भागांत काँग्रेसला आसरा मिळवून दिला. काँग्रेसच्या लोकप्रियतेच्या लाटेवर ते आरूढ झाले. मागच्यांनी खो देताच बाजूला झाले आणि बाजूला झाले तरी बाजूला पडल्याचा विषाद त्यांनी मानला नाही.

कारण काकांचे जीवन एकारलेले नव्हते. त्यांनी साहित्य क्षेत्रात प्रवेश केला आणि तेथेही तसेच मैदान गाजविले. राजकारणाचा संग व साहित्याचा व्यासंग दोन्ही त्यांच्या जीवनात हातात हात घालून चालत होती. साहित्यातही ललित व गंभीर शैलीसारख्याच चालीने चालत होती. ग्यानबाचे अर्थशास्त्र आणि साहित्यातील ग्यानबा, ह्या दोघांनाही त्यांनी शब्दसृष्टीने साकार केले. पुण्यातील न्यायमूर्ती रानडे, लोकमान्य, तात्यासाहेब केळकर या सव्यसाची नेत्यांच्या परंपरेतील काका हे शेवटचे वारसदार होत. राजकारणी व साहित्यक असा त्यांच्या जीवनात षडपंचमभाव निर्माण झाला होता. सत्तेची व सत्याची, राजकारणातील गांभीर्याची व साहित्यातील लालित्याची त्यांनी सारख्याच मनोभावाने उपासना केली. ते अखेरपर्यंत गृहस्थाश्रमीच राहिले. राजकारणात त्याग केला आणि सत्तेचा उपभोगही घेतला. पराभव झेलले आणि मानसन्मानही स्वीकारला. आणि हे सुखदुःखमिश्रित जीवन अनुभवीत असताना त्यांचे उमदे मन नाउमेद झाले नाही.

मृत्यूपूर्वी अवघे दहा दिवसच त्यांनी सेवानिवृत्तीचा संकल्प सोडला होता. पण विधात्याला ते मानवले नाही. विधाता त्यांना जणू असेच बजावीत होता की वार्धक्य प्राप्त झाले म्हणून काय झाले, तुझ्या प्रवृत्तीशी मुनिवृत्ती जमणारी नाही. आणि येथेही काकांनी त्याच्याशी खेळकर वृत्तीने दोन हात केले असावेत. त्यांच्यावर विधात्याने अखेर चिरनिवृत्ती लादली. असा हा अस्सल पुणेकर, खेळकर, खोडकर, उमद्या मनाचा झुंजार सद्‌गृहस्थ आपल्यातून नेला. आलेला जातच असतो. पण ज्याच्या जाण्याने काही एक पोकळी निर्माण होते, त्याचे येणेही सार्थ ठरते आणि जाणेही व्यर्थ होत नाही. काकांचे येणे-जाणे असे सार्थ ठरले. त्यांच्या येण्याने पुणे गाजले आणि जाण्याने पोरके झाले. या पुण्यात केवढी दिग्गजासारखी माणसे होऊन गेली याची साक्ष ठिकठिकाणी विखुरली आहे. मेहुणपुरा ही त्यात एक नवी भर. त्या मेहुणपुऱ्यावर जाणाऱ्यायेणाऱ्याने नजर टाकली तर नाट्याचार्यांच्या द्रौपदी नाटकातील ‘ इथेचि थारा पराक्रमाला ’ या पदाची आठवण झाल्याशिवाय राहणार नाही.

(२३-१-१९६६)




वि: ..........
अनुक्रम ..........
क्रमांक .......... नोंद दि: ..........

६

# विन्स्टन चर्चिल

## संपन्न व्यक्तिमत्त्वाचा झुंजार नेता

His future is the most interesting problem of personal sheculation in English politics. At thirty-four he stands before the country one of the two most arresting figures in politics, his life a crowded drama of action, his courage high, his vision unclouded, his boats burned, " I love Churchill and trust him," said one of his colleagues to me. " He has the passion of democracy more than any man I know. But don't forget that aristocrat is still there latent and submerged, but there nevertheless. The occasion may arise when the two Churchills will come into sharp conflict, and I should not like to prophesy the result... If we could conceive him in a great upheaval, he would be seen emerging in the role of what Bagehot calls 'a Benthamite despot,' dismissing all feudal ideas and legitimist pretensions, sweeping aside all aristocracies, proclaiming the democratic doctrine of the " greatest happiness of the greatest number " and seating himself astride the storm as the people's Caesar .... at once dictator and democrat.

....A. G. GARDINER

“ त्यांचे – विन्स्टन चर्चिल ह्यांचे – भवितव्य काय ह्याबद्दल वैयक्तिक अंदाज बांधणे, हा ब्रिटिश राजकारणातला एक मनोवेधक विषय आहे. सध्या वयाच्या ३४ व्या वर्षी ब्रिटनच्या राजकारणातील एक कुतूहलमय व्यक्ती म्हणून ते देशासमोर उपस्थित आहेत. त्यांचे आयुष्य म्हणजे कृतींनी गजबजलेले मनोहारी नाट्यच होय. त्यांचे धैर्य उच्च दर्जाचे असून दृष्टी साफ आहे. ती अभ्राच्छदित नाही. शिवाय व्यक्तिगत स्वार्थाच्या नौका जाळूनच, वैयक्तिक हितसंबंधांना तिलांजली देऊनच, ते राजकारणाच्या दर्यात उतरले आहेत.

‘माझे चर्चिल ह्यांच्यावर प्रेम आहे; विश्वास आहे.’ त्यांचा एक सहकारी मला म्हणाला, “त्यांच्याइतकी लोकशाहीविषयीची निष्ठा नि कळकळ मला अन्य कोणातही आढळली नाही....हां. पण विसरू नका की त्यांच्या स्वभावात ‘उमराव’ ( ॲरिस्टोक्रॅट ) देखील आहे. सुप्त आहे.’ लीन अन् विलीन आहे. पण अद्यापी जागा आहे. असा एखादा क्षण येईल की, त्या वेळी ह्या दोन चर्चिल-मध्ये तीव्र संघर्ष होईल. त्याचा अंतिम निकाल काय लागेल, ह्याचे भविष्य मी वर्तवू इच्छित नाही....पण राष्ट्रातील प्रचंड उलथापालथीच्या काळात, ते कोण बनतील ह्याचे कल्पनाचित्र आपण नजरेपुढे आणले तर! तर बेगहॉटच्या शब्दांत म्हणावे लागेल ‘ते बेन्थामवादी हुकूमशहा’ ( Benthamite despot ) म्हणून दृश्यमान होतील! सर्व सरंजामशाही कल्पना नि कायदेबाज भूमिका रद्द करणारे, सर्व उमरावशाह्या झाडून झटकून टाकणारे ‘जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त सुख’ ‘बहुजन सुखाय बहुजन हिताय’ ही लोकशाही तत्त्वे उच्चरवाने उद्घोषिणारे; आणि वादळी परिस्थितीच्या वारूवर जनतेचे ‘सीझर’ म्हणून ठाण मांडणारे...एकाच वेळी हुकूमशहा नि लोकशाहीवादी ह्या परस्परविरोधी भूमिका पेलणारे महान नेते चर्चिल!”

**....ए. जी. गार्डनर**

एका प्रख्यात पत्रकाराने सर विन्स्टन चर्चिल यांचे शब्दचित्र वरील शब्दांत रेखाटले आहे. त्या वेळी चर्चिल यांचे वय होते अवघे चौतीस. त्या वेळी चर्चिल जगाच्याच काय पण खुद्द इंग्लंडच्या राजकारणातही चर्चेचा विषय झालेला नव्हता. त्या वेळी चर्चिल यांच्या व्यक्तिमत्त्वाचा व राजकीय नेतृत्वाचा विकास कोणत्या दिशेने होऊ शकेल याचा कोणासही अंदाज घेता आला नसता. त्या वेळी गार्डिनरच्या लेखणीतून निर्माण झालेली ही व्यक्तिरेखा भविष्याचा इतका अचूक ठाव घेईल अशी खुद्द गार्डिनरला तरी कल्पना असेल काय? पण वर्तमानातून भविष्यकाळ जन्म पावतो आणि वर्तमानाचे निरीक्षण ज्याचे सूक्ष्म व वास्तव, त्याने आपल्या लेखणीच्या कुंचल्यातून निर्माण केलेल्या भविष्याच्या रंगरेखाही तशाच सूक्ष्म व वास्तव असल्या तर त्यात नवल नाही. चर्चिल काय

आहे याचे अचूक ज्ञान झाले की चर्चिल कोण होऊ शकेल याचा अंदाज सहसा चुकणे शक्य नाही.

'डिक्टेटर अँड डेमोक्रॅट,' 'डेमोक्रॅट अँड ॲरिस्टोक्रॅट,' 'सामान्य आणि सन्मान्य,' अशा परस्पर विरोधांनी चर्चिलचा जीवनपट तयार झालेला आहे आणि म्हणूनच त्याच्या व्यक्तित्वाचे, कर्तृत्वाचे व नेतृत्वाचे मूल्यमापन करण्याचे काम बरेचसे अवघड आहे. तो जसा उदार होता, तसाच तिखट होता. लोकशाहीचा भोक्ता होता आणि साम्राज्यशाहीचा पुरस्कर्ता होता. शांततेचा उद्गाता होता आणि युद्धाचा नेता होता. झुंजार होता अणि कलाकार होता. पट्टीचा वक्ता होता आणि पट्टीचा लेखकही होता. भावना व बुद्धी, साहस व सावधगिरी, मार्दव व कठोरता, आर्जव व फटकळपणा हे परस्परविरोध याच्या व्यक्तित्वात, वागण्यात अणि बोलण्यात एकत्र गुण्यागोविंदाने नांदत होते.

भारतीय मनाला चर्चिल पटला नाही तो त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या एकांगी दर्शनाने. 'साम्राज्याच्या विघटनाचे उद्घाटन करण्यासाठी मी पंतप्रधान झालो नाही' हे त्याचे कटू उद्गार अजून भारतीय मनांत रेंगाळत आहेत. 'त्याच्यातला हुजूर अजून जागा आहे' असे गार्डिनरने पन्नास वर्षांपूर्वी लिहिले आहे. मधूनच तो असा जागा होतो. त्याची कटुता कायम राहते. १९४२ साली क्रिप्स-मिशन पाठवूनही ती कटुता पूर्णांशाने नष्ट झालेली नाही. पण भारतीयांनी या एकाच निकषाने चर्चिलचे मूल्यमापन करणे चूक ठरेल. जगातील कोणत्याही थोर पुरुषाचे मूल्यमापन करण्याची ही आत्मकेंद्रित वृत्ती आपण टाकून द्यावी असे मला वाटते. कारण जग म्हणजे भरतखंडाचा विस्तार नव्हे. भारत हा जगाचा एक भाग आहे, हे साधे भौगोलिक सत्य आपण सतत लक्षात ठेवले पाहिजे. जग आपल्याविषयी काय म्हणते याच विचार जसा आवश्यक तसाच आपण जगाविषयी काय बोलतो याचाही विचार आवश्यक आहे. ज्या मापाने आपण चर्चिलला त्याज्य ठरविणार, त्याच मापाने इतरांनी नेहरूंना त्याज्य ठरविले तर चालेल ते आपल्याला?

आणि म्हणून कोणताही निकष लावून पाहता, आधुनिक जगातील चर्चिल ही एक असामान्य व्यक्ती ठरते हे आपणांस मान्यच करावे लागते. इतके बहुरंगी, बहुढंगी, जीवनावर अपार प्रेम करणारे, मृत्यूची क्षिती न बाळगणारे, साहसी, झुंजार, कलात्मक व्यक्तिमत्त्व सहसा पाहावयास सापडत नाही. चर्चिल कोण नव्हता? तो योद्धा होता; पत्रकार होता, मुत्सद्दी होता, राजकीय नेता होता, वक्ता होता, लेखक होता, चित्रकार होता आणि मानवी स्वातंत्र्याचा कट्टर पुरस्कर्ता होता. आपल्या पन्नास वर्षांच्या कारकीर्दीत त्याने एक परराष्ट्रीय खाते सोडून सर्व खाती

हाताळली. पार्लमेंटचे सभागृह आपल्या अमोघ वक्तृत्वाने दणाणून सोडले. गार्डिनर लिहितो की, एका प्रसंगी चर्चिल बोलावयास उभा राहिल्यावर विरोधी पक्षाचे २५० सभासद सभागृह एकसाथ सोडून गेले. शत्रुपक्षाची इतकी दाणादाण रणांगणावरील झुंजार योद्धा तरी उडवू शकेल काय? सारांश, चर्चिलचे व्यक्तिमत्त्व संपन्न व्यक्तिमत्त्व होते. आपल्यासमोर जसे राजकीय नेत्याचे जीवन एकारलेले दिसते, तसे ते एकारलेले नव्हते. विज्ञान, कला, युद्धनीती, राजनीती, इतिहास, वक्तृत्व, घोड्यांच्या शर्यती, सैन्य, विमानदल, नौदल इत्यादी जीवनाच्या बहुविध क्षेत्रांत त्याला रस होता. फार काय भोजनातही. 'जाणिजे यज्ञकर्म' या दृष्टीने नाही. कलावंताच्या रसिकतेने. एक दिवस तो डेन्मार्कमध्ये व्याख्यानाला गेला होता. तेथून विमानाने परत लंडनला आला. लगेच घोड्यांच्या शर्यती पाहावयास गेला. नंतर एका खास विमानाने हुजूर पक्षाच्या अधिवेशनाला गेला, तेथे आणखी एक व्याख्यान दिले आणि विश्रांतीसाठी हॉटेलमध्ये आल्यावर 'सूप' चे दोन भरगच्च पेले, एक डझनभर खेकडे, आइस्क्रीमच्या तीन प्लेटी, दोन शँपेनच्या बाटल्या व भरपूर प्रमाणात ब्रँडी असा खाद्यपेयाचा भरपूर आस्वाद घेतला.

भावी आयुष्यात महत्पदाला चढलेली माणसे लहानपणी ढूड असावयाची, असा एक संकेतच आहे का काय न कळे. पण ज्या शिक्षणक्रमाच्या चाकोरीतून सुरवंटाचे फुलपाखरात रूपांतर होते त्या चाकोरीतून माणसे सनदी नोकर बनतात, त्या चाकोरीत अशा व्यक्ती चपखल बसू शकत नाहीत, एवढे मात्र खरे. त्यांच्या सुप्त शक्ती चाकोरीत मावत नसतात हेच याचे कारण द्यावे लागते. हॅरो, ऑक्सफर्ड येथील शिक्षणाच्या चाकोरीतून व्यवस्थित रीतीने बाहेर पडलेली व्यक्ती जर मूर्ख ठरली नाही, तर अपघातातून आपण थोडक्यात बचावलो असे त्या व्यक्तीने खुशाल समजावे, असे हॅझलिटने एके ठिकाणी म्हटले आहे. ( Any one who has passed through the regular gradations of a classical education and is not made a fool by it, may consider himself as having had a very narrow escape. )

ते हॅरोच्या शाळेत चर्चिल महाराजांची फारशी प्रगती होऊ शकली नाही ही काही नवलाची गोष्ट नाही. प्रगती झाली ती इंग्रजी वाङ्मयात आणि ढूडपणात. त्या काळात हॅरोला देखील गुरुजी छडीचा प्रयोग करीत असत आणि चर्चिल व छडी यांचे सख्य फार असे. एक दिवस छडी खाताना चर्चिलने शिक्षकांना बजावले " सर, छडी मारताहात, पण लक्षात ठेवा की, मी तुमच्यापेक्षा मोठा होणार आहे. " शिक्षकानेही चर्चिलच्या भावी मोठेपणाबद्दल आणखी एका छडीची बक्षिसी दिली. अर्थात ग्रीक व लॅटिन्, गणित व भूगोल अशा टरावेकाला

न जुमानणाऱ्या या व्यक्ती ज्ञानाची भरपाई अन्य साधनांनी करीत असतात, हे सांगण्याची गरज नाही. चर्चिलने हॅरोला जे गमावले त्यापेक्षा अधिक सैन्यात गेल्यावर कमावले. तो साहसी होता, तसाच दीर्घोद्योगी होता. मेकॉलेचे ग्रंथ, गिब्नचे 'डिक्लाइन् अँड फॉल ऑफ रोमन एम्पायर' हे त्याचे आवडते ग्रंथ. त्याला ते जवळजवळ मुखोद्गत होते आणि त्यापेक्षाही अशिया-अफ्रिका खंडांत हिंडून त्याने त्या भागातील मानवी जीवनाचे व त्या त्या देशांच्या इतिहासांचे व राजकारणाचे जे सूक्ष्म निरीक्षण केले होते ते वेगळेच. मोठ्या व्यक्तींचा विद्यार्थीदशेत शालांत लवकर होत असला तरी, त्यांच्या विद्यार्थीदशेला प्रौढ दशेतच खरा प्रारंभ होत असतो.

चर्चिलच्या राजकीय कर्तृत्वाला प्रारंभ झाला तो हुजूर पक्षात, मध्यबिंदू होता उदारमतवादी पक्षात आणि शिखर गाठले ते परत हुजूर पक्षात. पण या राजकीय प्रवासाला चाळीस वर्षे लागली. हे पक्षांतर त्याने व्यक्तिगत महत्त्वाकांक्षेने केले नाही. खरे सांगायचे तर त्याचा पिंड कोणत्याही राजकीय पक्षात बसणारा नव्हताच. त्यातल्या त्यात हुजूर पक्षाशी तर त्याचा वैचारिक पिंड विसंवादीच होता. कारण जन्माने, परिस्थितीने जरी त्याची वाढ हुजूर पक्षात झाली होती, तरी त्याची अनन्यसाधारण भक्ती होती लोकशाहीवर, आणि हुजूर पक्षात नेमका कशाचा अभाव असेल तर या लोकशाहीचा. "Tory democracy is active in its Toryism and paralysed in its democracy" असे शॉने हुजूर पक्षाचे मोठे बोचक व खोचक वर्णन केले आहे. हुजूर पक्ष हा खरा उमरावांचा पक्ष. पेहेराव मात्र लोकशाहीचा. ग्लॅडस्टन, पिट यांसारख्या लोकमताला आवाहन करणाऱ्या जबरदस्त व्यक्तींचे नेतृत्व लाभले तेव्हाच या पक्षात, जिवंतपणा दिसू लागला. चर्चिलच्या झुंजार वृत्तीला, उदारमतवादी दृष्टिकोणाला, ही जात मानवणारी नव्हती. खुल्या व्यापाराच्या प्रश्नावर त्याने हुजूर पक्षाला रामराम ठोकला आणि परत तो हुजूर पक्षात आला त्या वेळी व्हिक्टोरियन युगातील हुजूर पक्ष केव्हाच संपुष्टात आला होता. सत्य असे आहे की, चर्चिलच्या कर्तृत्वाला राजकीय पक्षांचे पंख फार अपुरे पडत होते. राजकीय पक्ष हे त्याचे एक साधन होते. जेट विमानोड्डाणाला 'रनवे' लागतो तसे ! आणि म्हणून त्याच्या नेतृत्वाचे मोजमाप घेताना पक्षांच्या उपाधी आपोआपच गळून पडतात.

दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी त्याच्या खांद्यावर नेतृत्वाची धुरा आली तोच त्याच्या कर्तृत्वाचा व नेतृत्वाचा खरा बहर. त्याच्यातील लढवय्या झुंजार, दुर्दम्य आशावादी, चिकाटीचा, मानवी स्वातंत्र्यावर व लोकशाहीवर अपार निष्ठा ठेवणारा,

पराभवाच्या जबड्यातून विजयश्री खेचून आणणारा चर्चिल बाहेर पडला तो त्या वेळी. त्याच वेळी तो इंग्लंडचा नेता बनला, इतकेच नव्हे तर जगाचा नेता बनला.

आजवर त्याने इतिहास लिहिले, पण या वेळी त्याने इतिहास घडविला. त्याच्या पिंडातील हुजूर त्याच वेळी मावळला. पूर्वीचे ग्रह, आग्रह व पूर्वग्रह नष्ट झाले. एका बाजूला अमेरिका व दुसऱ्या बाजूला रशिया या दोन टोकांना सांधणारा तो सेतुबंध बनला. मजूर पक्ष व हुजूर पक्ष यांचा त्याने एकच रांधा बनवला. हिटलरच्या टाचेखाली सापडलेल्या युरोपच्या भूमीवर भूमिगत प्रतिकाराची मुहूर्तमेढ त्यानेच रोवली.

रशियावर हल्ला होताच पूर्वीचा वैरभाव विसरून स्टालिनपुढे त्याने दोस्तीचा हात पसरला. वॉशिंग्टन, तेहरान, कायरो, माल्टा येथे भव्य त्रिकूट कायम टिकविण्यासाठी त्याने जगभर यात्रा केली. हे सारे त्याने कशासाठी केले तर फॅसिझमच्या विनाशासाठी. कारण युरोपने गेल्या तीन-चार शतकांत सांस्कृतिक मूल्ये निर्माण केली, त्या सर्वांचा हिटलरच्या विजयाने विध्वंस होणार होता. या मूल्यावर त्याची अपार श्रद्धा होती.

मानवी इतिहासाला प्रगतीच्या दिशेने कलाटणी देण्याचे हे जे महत्तम कार्य चर्चिल करू शकला त्याची त्याने चाळीस वर्षे पूर्वतयारी केली होती. खुद्द चर्चिलनेच आपल्या जीवनावर तसे भाष्य केले आहे. अफगाण युद्ध, बोअर युद्ध या युद्धांत त्याने जातीने भाग घेतला होता. समरांगणाची त्याला प्रत्यक्ष माहिती होती. त्यानंतर एक परराष्ट्रीय खाते सोडले तर असे एकही खाते नाही की, ज्या खात्यात त्याने काम केलेच नाही, किंवा त्या खात्यावर त्याने आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला नाही. राजकारणाच्या या विविध क्षेत्रांत त्याने केवळ अनुभवच मिळविला असे नाही; त्या त्या क्षेत्रात त्याने कर्तृत्वही गाजविले. असे सांगतात की, चर्चिलच्या कर्तृत्वाशी तुलना करण्यासारखे कर्तृत्व इतिहासात एकाच व्यक्तीपाशी होते आणि ती व्यक्ती म्हणजे अठराव्या शतकातील इंग्लंडचा पंतप्रधान पिट हा होय. पण ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार हेच पिटच्या कर्तृत्वाचे फलित असल्याने चर्चिलच्या कर्तृत्वाशी त्याची सर्वांशाने तुलना होऊ शकत नाही. उक्ती आणि कृती यांमध्ये त्याच्या जवळपास उभी राहू शकेल अशी आणखी एक व्यक्ती म्हणजे क्लॅरेन्डन. पण कृतीमध्ये तोही थिटाच पडला. सारांश चर्चिलच्या कर्तृत्वाची व्याप्ती व क्षितिज फार मोठे होते आणि म्हणूनच त्याच्यावर १९४० मध्ये येऊन पडलेली महान जबाबदारी त्याला यशस्वीरीत्या पार पाडता आली.

या चाळीस वर्षांच्या पूर्वतयारीत त्याने हुजूर पक्षाला, मानवी स्वातंत्र्याला, लोकशाहीला, आधुनिक संस्कृतीला, धोका कोणत्या बाजूने येत आहे याविषयी परखड

शब्दांत इशारेही दिले होते. पहिल्या महायुद्धाच्या वेळी इशारा दिला होता आणि दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी देखील. चेंबरलेनने म्यूनिकचा करार केला त्या वेळी शांततेचा करार अशी हुजूर पक्षाने स्वतःचीच पाठ थोपटून घेतली. या करारावर चर्चिलने त्या वेळी केलेली टीका अशीच चिरस्मरणीय ठरली. "हा करार म्हणजे युद्ध न करता आपल्याला मिळालेला पराभव होय हे लोकांना समजले पाहिजे. लोकांना हेही समजले पाहिजे की आपल्या इतिहासातील एक दुःखद टप्पा आपण गाठला असून, युरोप खंडातील तोल नष्ट झाला आहे आणि 'तुमचे पारडे वर गेले आहे' अशी पाश्चात्य लोकशाहीला उद्देशून भीतिदायक शापवाणी उच्चारली गेली आहे आणि येथेच हे पर्व संपले असा कृपा करून समज करून घेऊ नका. ही आहे फक्त सुरवात. प्रतिवर्षाला जो कटू प्याला आपल्या ओठाशी लावला जाईल त्यातील हा पहिला घुटका. आपले नैतिक आरोग्य व भौतिक आरोग्य परत मिळवून आपले पुनरुत्थान होईपर्यंत हा विषाचा प्याला आपल्याला दूर भिरकावून देता येणार नाही." हे चर्चिलचे उद्गार मानवी स्वातंत्र्याला खग्रास ग्रहण लावणाऱ्या हिटलरशी दोस्तीचा करार करणाऱ्या लालभाईंनी ध्यानात घेण्यासारखे नाहीत काय ?

या चाळीस वर्षांत त्याने आपल्या कार्यासाठी दोन अमोघ शस्त्रे तयार केली. ती म्हणजे एक वक्तृत्व आणि दुसरे लेखन. चर्चिलचे वक्तृत्व हे एक अमोघ हत्यार होते आणि ते त्याने दीर्घोद्योगाने कमावलेले होते. संसदीय व सभावक्तृत्व या दोन्ही प्रकारच्या वक्तृत्वांत त्याचे कौशल्य अपूर्व होते. ब्रॉड्रिकच्या सैन्ययोजनेवर टीका करणारे वक्तृत्व करून त्याने सभागृहाला प्रथम अक्षरशः दिपवून सोडले. राष्ट्रीय संरक्षणाच्या प्रश्नाचे संपूर्ण आकलन, योजनेतील दोषांचे विदारक दर्शन इत्यादी वक्तृत्वगुणांनी त्या योजनेच्या त्याने अक्षरशः ठिकऱ्या ठिकऱ्या उडवल्या. पण हे वक्तव्य करण्यापूर्वी त्याने ते भाषण स्वतःच्या हाताने सहा वेळा लिहून काढले होते. चर्चिलच्या वक्तृत्वात कोणते गुण नव्हते, असाच इतिहासकाराला प्रश्न विचारावा लागेल. नाद, नजर, चर्येवरील हावभाव, हाताची हालचाल, आवेश, ओज, प्रसाद, विनोद, उपरोध आणि गांभीर्य अशा सर्व गुणांनी नटून थटून त्याची वक्तृत्वकला सभास्थानी पदविन्यास करीत असे. त्याच्या भाषाशैलीची तुलना इतिहासकार गिबन व रोमन वक्ता सिसेरो यांच्या शैलीशीच होऊ शकते असे जाणकार सांगतात. पण भाषाशैली म्हणजे वक्तृत्व नव्हे. प्रतिपाद्य विषयांचे संपूर्ण आकलन, तो विषय आकर्षक रीतीने मांडण्याची धाटणी, योग्य शब्द योग्य ठिकाणी वापरण्याची कल्पकता, प्रसन्न व्यक्तिमत्त्व, नादमय आवाज हेही गुण असल्याखेरीज वक्तृत्व प्रभावी ठरत नाही. आणि इतके सारे असूनही त्या वक्तव्यात भावनेचा ओलावा नसेल तर ते वक्तृत्व

श्रोत्यांची हृदये हेलावू शकत नाही. वक्ता व श्रोता या दोघांमध्ये अशी भावनिक समरसता निर्माण करणारे वक्तृत्व ते खरे वक्तृत्व. लॉर्ड रोझबेरी याने चॅथॅमच्या वक्तृत्वासंबंधी--" It is not merely the thing that is said, but the man who said that counts, the character which breathes through the sentence " असे उद्‌गार काढले आहेत. चर्चिलच्या वक्तृत्वाला हे उद्‌गार तंतोतंत लागू पडतात. महायुद्धाच्या कालखंडातील त्याची भाषणे अशीच भावनेने भारलेली, लयबद्ध व प्रासादिक झाली आणि सारी जनता प्रतिकाराला एकमुखाने सज्ज झाली याचे पुष्कळसे श्रेय त्याच्या अमोघ वक्तृत्वालाच दिले पाहिजे.

असा हा इंग्लंडचा अपूर्व युद्धकालीन नेता युद्ध संपताक्षणी लोकांच्या विश्वासास अपात्र ठरावा हा एक चमत्कारिक योगायोगच नव्हे काय ? पण इतिहास निष्ठूर आहे असे वाटले तरी त्यात एक संगती असते. युद्ध ही मानवी इतिहासातील सामान्य घटना नाही. जी सामाजिक स्थित्यंतरे घडून येण्यास शांततेच्या काळात पन्नास वर्षे लागतात ती युद्धकाळात अवघ्या पाच वर्षांत घडून येतात. इंग्लंडचेच उदाहरण घ्या. सामाजिक विषमता नष्ट करण्याच्या उद्देशाने मजूर पक्ष आज कित्येक वर्षे झगडत होता. पण जे पाचपन्नास वर्षांत मजूर पक्षाला घडविता आले नाही, ते १९४० साली अवघ्या एका वर्षांत घडून आले. चर्चिलच्या कामगिरीचे समालोचन करणाऱ्या एका लेखकाने या क्रांतीचे मार्मिक वर्णन केले आहे, तेच येथे देतो- " " Historians in the future may come to see that from the point of view of the social revolution of our time, 1940 was far more important than 1945. No conventional peace-time Labour Government, in the ordinary rhythm of Party alteration,would have dreamed of the degree of social change brought about in this country. It was the war that did it, there really never has been going back on 1940. "

तेव्हा इतिहासक्रमाने ब्रिटिश समाजात जे परिवर्तन घडून आले, त्याचा प्रवाह मागे रेटण्याचे सामर्थ्य कोणाही व्यक्तीपाशी नसते. मग ती व्यक्ती कितीही मोठी असो. तेथेच ' डेमोक्रॅट विरुद्ध ॲरिस्टोक्रॅट ' हा चर्चिलच्या व्यक्तिमत्त्वातील अंतर्गत संघर्ष प्रकट झाला आणि उमराव चर्चिलला इतिहासाच्या रंगभूमीवरून निवृत्त व्हावे लागले.

चर्चिलचा शहाणपणा हा की, त्याने प्रसंग ओळखून निवृत्ती पत्करली. मोठ्या

व्यक्तीदेखील इतिहासाशी दांडगाई करतात आणि मग धनुर्धारी पार्थाप्रमाणे अखेरीस फजीत पावतात. राजकारणात निवृत्तीला समयसूचकता लागते, तसेच धैर्यही लागते. पन्नास वर्षे ज्या क्षेत्रात घालविली त्या क्षेत्रात ममत्वाचे बळकट पाश निर्माण होत असतात. नातवाला खांद्यावर खेळविण्याऐवजी त्याला जमिनीवर रांगत ठेवावे असेच वाटू लागते. आणि मग या हट्टवादाने मिळविलेली पुण्याई बरबाद होऊन जाते. या प्रसंगी 'निवृत्तीस्तु महाफला' या सिद्धांतानुसार जे निवृत्त होतात ते महाभाग धन्य होत. चर्चिल अशा धन्यात्म्यांपैकी एक होय.

पण हेही त्याचबरोबर लक्षात ठेविले पाहिजे की, ज्यांचे जीवन बहुरंगी, बहुढंगी आहे आणि जे या जीवनाचा आस्वाद घेऊन तृप्त झाले आहेत त्यांनाच ही निवृत्ती मानवते. राजकारणात सत्ता सर्वस्व मानून सत्तेच्या छंदाखेरीज ज्यांना कोणताच छंद नाही, त्यांना निवृत्ती आपत्तीप्रमाणे भासावी यात नवल ते कसले ? चर्चिल असे कृतार्थ जीवन जगला, जीवनातील सर्व सुखे मोठया रसिकतेने उपभोगिली. शरीराचा व मनाचा, बुद्धीचा, शक्तीचा कण नी कण झिजवला आणि त्या जीवनतृप्तीचा आस्वाद घेत घेत त्याचा आत्मा अनंतात विलीन झाला. विसाव्या शतकात असे कृतार्थ जीवन जगणारे दोनच महापुरुष होऊन गेले. एक पं. नेहरू आणि दुसरे सर विन्स्टन चर्चिल. त्यांच्याविषयी 'हा म्हातारा लवकर का खपत नाही' अशी चरफड तरुण पिढीने कधीही व्यक्त केली नाही.

(३१-१-१९६५)

१

# गर्भपात — आपद्धर्म

बरेच दिवस एका नाजूक व अवघड विषयासंबंधीचे काही लिखाण माझ्याकडे येऊन पडले आहे. शास्त्री, पंडित, समाजशास्त्रज्ञ, डॉक्टर, प्राध्यापक आदि मान्यवर विद्वज्जनांनी त्या विषयावर, साधार सोपपत्तिक अशा पद्धतीने विचार मांडले आहेत. तो विषय आहे 'गर्भपाताला कायद्याने मान्यता द्यावी काय ?' असा.

गर्भपाताला कायद्याने मान्यता द्यावी काय ? असा विचार सुरू झाला यावरून गर्भपाताला समाजाने मान्यता दिली आहे आणि आता फक्त कायद्याची मान्यता मिळण्याचेच तेवढे बाकी राहिले आहे, असा ग्रह होण्याचा संभव आहे. वस्तुस्थिती तशी नाही. 'अडवे आले तर कापून काढावे' एवढ्यालाच फक्त समाजाने मान्यता दिली आहे. आणि कायद्यानेही मूल मातेच्या जिवावर उठले तर माता हवी, मूल नको, असा हिशोब दिसतो. 'शिर सलामत तर पगडी पचास' अशी अमानुषतेची झाक या गणितात आढळते. पण समाजाने गर्भपाताचे एवढेच गणित मान्य केलेले आहे. यावरून गर्भपात एवढ्या सामाजिक गणितापुरताच मर्यादित आहे, असा गैरसमज करून घेण्याचे कारण नाही. सामाजिक व नैतिक मान्यता आणि सामाजिक व्यवहार यांचे प्रमाण बहुधा व्यस्तच असते. या नियमास धरून सामाजिक व्यवहारात गर्भपाताचे प्रमाण बरेच मोठे असावे असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. भारतातच नव्हे तर सर्व राष्ट्रांत व्यवहार व नीती यांची ही फारकत

झालेली आढळून येते. अमेरिकेत दरवर्षी असे बेकायदा गर्भपात झाल्याची संख्या वीस लक्षांच्या आसपास आहे. भारतात सुदैवाची गोष्ट एवढीच की या बेकायदा गर्भपाताचे प्रमाण येथे उपलब्ध होत नाही. अनीतीची नोंद ठेवली नाही की, समाजात अनीती होत नाही असा आपला साधाभोळा हिशोब आहे. तो जसा साधा आहे, तसाच भोळा आहे. म्हणून आधुनिक विचार असा निर्माण झाला की, हा काळाबाजार नष्ट करण्यासाठी, कायद्याची मान्यता देऊन त्याला पांढऱ्या बाजाराचे स्वरूप द्यावे.

यावर नीतिविशारद टाफरून बोलतील : ' चोरी, चहाडी, शिंदळकी यांनाही कायद्याने बंदी घातली आहे आणि तरीदेखील ही कर्मे घडतातच. मग या क्षेत्रात काळाबाजार घडतो म्हणून त्यांनाही तुमच्या तर्कशास्त्रानुसार कायद्याने मान्यता द्यावी काय ? ' याला उत्तर असे की, या बेकायदा गर्भपाताच्या बुडाशी बेडरपणा वा बेरडपणा नाही. त्यात डर आहे आणि रडही आहे. एका महिला विदुषीने वर्णन केले आहे की, कोणी वचनभंगाच्या खोल दरीत फेकलेल्या असतात, तर काही अपेक्षा-स्वप्नभंग पावल्याने दुःखी झालेल्या असतात. अजाणतेपणाने फशी पडलेल्या काही परिस्थितीचा प्रकाशझोत पडल्यावर हतबुद्ध होतात, तर कित्येकजणी खोट्या स्तुतीला भाळून आपण त्या स्तुतीचा केवढा भयंकर मोबदला देण्यास तयार झालो, या जाणिवेने अस्वस्थ झालेल्या असतात. वंचिता, परित्यक्ता पश्चात्तप्ता, दग्धा अशा अनेक माता कायद्याच्या कक्षेबाहेर जाण्याचा प्रयत्न करीत असतात. आणि त्यात विशेष लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही की, चौर्यकर्मात चोरी करणाऱ्यालाच शिक्षा होते. येथे मात्र गुन्हेगार सहीसलामत सुटतो. ताताची तात मातेच्या गळ्याभोवती आवळली जाते. थोडक्यात असे सांगता येईल की, पुरुषाचा अधःपात होतो आणि स्त्रीला अगतिकत्वाने गर्भपात करावा लागतो.

हे झाले अगतिक मातेविषयी. पण वेडी माता बनली तर काय करावे ? एकामागून एक बाळंतपणे लादल्याकारणाने जिला रक्तक्षय झाला आहे, अशा मातेचा प्रश्न आपण कसा सोडवणार आहोत ? क्षय, महारोग, सांसर्गिक रोग यांची बाधा झालेल्या मातांचे मातृत्व स्पृहणीय ठरेल काय ? युद्धात बलात्काराला बळी पडलेल्या स्त्रीला सक्तीने मिळालेले मातृत्व नको असेल तर ? वानगीदाखल ही काही उदाहरणे दिली. त्या उदाहरणांनी एवढेच लक्षात घ्यावे की, काही प्रसंग, काही घटना अशा स्वरूपाच्या असू शकतात की, त्या वेळी मातृत्व आणि मांगल्य यांची फारकत होत असते. एक वेळ मातेचा प्रश्न दुर्लक्षिता येईल. पण जन्माला येणाऱ्या बालकाकडे समाजाला दुर्लक्ष करता येणार नाही. हॅवलॉक एलिसने बजावले आहे

की, ‘ Child is a social responsibility. ’ अशा स्त्री-पुरुषांची प्रजनन-क्षमा सक्तीने नष्ट करावी असा उपाय यावर कोणी सुचवतील. पण त्याच्या कक्षेत येणाऱ्या मातांचे काय करणार समाज ? त्या मातांची विकृतीने पछाडलेली प्रजा समाजाला हवी आहे. जन्म ही शिक्षा व मरण ही सुटका, असे या बालकांना प्रौढपणी वाटणार नाही काय ?

मला वाटते प्रमेयाची अर्धी बाजू मी मांडली. ‘ धर्म व आपद्‌धर्म या दोन्ही दृष्टींनी कायद्याने गर्भपाताला मान्यता द्यावी काय ’ असे हे सबंध प्रमेय आहे. पैकी आपद्‌धर्माचा विचार झाला. लोकसंख्येची भरमसाट वाढ लक्षात घेतल्यास, धर्म म्हणूनही गर्भपात कायदेशीर ठरवावा असा आग्रह धरणारा विचार आता बळ धरू लागला आहे. हा विचार आहे की अविचार आहे, याचा विचार नंतर. लोकसंख्येची वाढ हा विचार खरोखरीच विचाराचा विषय आहे. विचाराचा नव्हे, चिंतेचा विषय झाला आहे. देशाची फाळणी होण्यापूर्वी या देशाची लोकसंख्या तेहेतीस कोटींच्या आसपास होती. फाळणी झाल्यानंतर एकऱ्या भारतात ३३ कोटी देवांचे ४४ कोटी झाले, दर दहा वर्षांनी पाच कोटींनी वाढ व्हावी, ही सरासरी मागे पडून, गेल्या दहा वर्षांत आठ कोटींनी वाढ झालेली आहे आणि आगामी दहा वर्षांत ही वाढ १५ कोटींनी व्हावी, असा अंदाज आहे. आगामी पाच वर्षांत हा भारत ६० कोटींचा देश बनेल. उत्पादनवाढ नको त्या क्षेत्रात होत आहे असा याचा अर्थ. हे असेच चालू राहिले तर बॉम्बस्फोटाप्रमाणे लोकसंख्येचाही स्फोट होईल, असे तज्ज्ञ सांगतात. धरित्री सस्यशामला गणितश्रेणीने होत आहे आणि लोकसंख्या भूमितीश्रेणीने वाढत आहे. तेव्हा ‘ असेल माझा हरी, तर देईल खाटल्यावरी ’ या तत्त्वानुसार किंवा ‘ चोच आहे तेथे चारा आहे ’ या सिद्धांतानुसार निभाव लागणार नाही. चारा बघून चोचींचे प्रमाण ठरवावे लागेल.

हे जे ‘ पौरुषासि अटक नसे ’ असे घडू लागले आहे, त्याचे कारण जन्माचे प्रमाण कायम, मृत्यूचे प्रमाण कमी यांमुळे घडू लागले आहे. पूर्वी जन्म-मृत्यू समप्रमाणात होते. विज्ञानाने मृत्यूला हटविले. जन्म थांबविला नाही. त्यामुळे खाणारी तोंडे भरमसाट वाढली. खाद्य वाढले नाही. येथे माल्थस प्रवेश करतो. ‘ भूकंप, वादळे या नैसर्गिक आपत्ती अथवा युद्ध, रोगांच्या साथी या आपत्ती नसून इष्टापत्ती होत आणि त्यामुळे लोकसंख्या व अन्न यांचा समतोल राहण्यास मदत होते ’ असा त्याचा आवडता सिद्धांत होता. आपणांस तो मंजूर नाही. हा रानटी विचार झाला, असा आपण त्यावर केव्हाच शिक्का मारला आहे. पण त्यामुळे मूळ प्रश्न सुटण्यास मदत होत नाही. लोकसंख्येचे प्रश्नचिन्ह कायमच आहे. त्यातही ज्यांना संभाळण्याचे सामर्थ्य आहे त्यांना कमी मुले, आणि

दरिद्र्याला खंडीभर मुले असा विषम तोल निर्माण झालेला आहे. माल्थस नको तर मग यावर उपाय काय?

प्रथम उपाय म्हणून कुटुंबनियोजन पुढे आले. कल्पना चांगली. मातृत्वाचेही नियोजन व्हावे. योजना आखून कुटुंबाचा विस्तार व्हावा. पण अवघड आहे ही योजना. आईबाप व दोन मुले असा कुटुंबविस्तार आदर्श मानला तर स्त्रीला त्या दोन मुलांत एक मुलगा व एक मुलगी अशी 'पॅरिटी' हवी असते! पण पहिली मुलगी झाली तर पुढचा मुलगाच होईल याची हमी कोण देणार? 'पुमान् पुंसो धिके शुक्रे स्त्री भवत्याधिके स्त्रियः' हे मनूचे प्रजनन शास्त्र आता मागे पडले आहे. तेव्हा मुलगा झाल्यानंतर मुलगी होईपर्यंत अनासक्त कर्मयोगाचे आचरण करावयाचे ठरविले तर आदिमायेचा अवतार होईपर्यंत सात-आठ अपत्ये पदरी पडण्याचा संभव निर्माण होतो! उलटपक्षी, मुलगीनंतर मुलाची अपेक्षा बाळगावी तर हा श्रीकृष्णावतार आठवा ठरणार नाही याचीही हमी नसते! तेव्हा कुटुंब-नियोजन यशस्वी व्हावयाचे असले तरी मातेच्या व पित्याच्या आकांक्षा व अपेक्षा आडव्या येतात. 'प्रजनार्थं स्त्रियः सृष्टाः संतानार्थं च मानवाः' हा दृष्टिकोण अजून तग धरून आहे. वास्तविक वंशसातत्य नष्ट झाले तर भारतीय समाजाचे असे काय नुकसान होणार आहे? पण हा प्रश्न पटणारा नाही. आपटे, मावळे, मोरे, जाधव हे या घराण्याचे अभिमान वस्तुस्थितीने खोटे पाडले असले तरी, मनात त्याची मुळे खोलवर रुजलेली असतात. जन्मभर कारकुनी केली तरी वाटते की आपल्या नावाने तर्पण करणारा कोणी तरी हवा! काय करणार कुटुंब-नियोजन या भावनेपुढे? शिवाय नियोजनात ठराविक कालमर्यादेने उत्पादन अपेक्षित असते. दोन बाळंतपणात ठराविक अंतर असावे लागते. असे अंतर राखण्यासाठी नैष्ठिक ब्रह्मचर्याची पराकाष्ठा केली, तरी पुढे जुळे होणारच नाही हेही माता-पित्यांच्या हाती नसते. सारांश, कुटुंबनियोजन ही एक अवघड कला आहे. यातील बरेचसे घटक उत्पादकांच्या ताब्यातले नाहीत. त्यांचे नियंत्रण कसे व्हावे? हा कुटुंबनियोजनातील यक्षप्रश्न होय आणि 'धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां' हेच उत्तर देऊन या ठिकाणी स्वस्थ बसावे लागते.

लोकसंख्येचे प्रमाण कमी करणे हा जर आजचा युगधर्म असेल तर, गर्भपाताला आपद्धर्म म्हणून नव्हे तर धर्म म्हणून कायद्याने मान्यता दिली पाहिजे, असा हा नवा विचार आहे. जपान ही या विचाराची मक्का-मदीना. गर्भ-पातास अनिर्बंध परवाना देणारा देश म्हणजे जपान. जपानने १९४९ पासून गर्भपातास मंजुरी दिली आणि तेव्हापासून १९६१ पर्यंत गर्भपातांची संख्या अडीच लाखांपासून दहा लाखांपर्यंत चढत गेली. अनिर्बंध गर्भपाताचे स्त्रीच्या

प्रकृतिस्वास्थ्यावर काय परिणाम झाले, हाही या संदर्भात विचार करण्यासारखा विषय आहे. पण एवढे मात्र खरे की, जपानने आपल्या लोकसंख्येचे प्रमाण बरेच कमी करण्याच्या कामी यश मिळविले आहे. १९४७ साली जपानात जननसंख्येचे प्रमाण दर हजारी ४३·३ इतके होते, ते १९५७ साली दर हजारी १७·२ इतके खाली आले. परंतु जपानचा हा प्रयोग सर्व दृष्टींनी विचार करता अपवादभूत मानावा लागतो. युद्धोत्तर कालात खालावलेली आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन एक तातडीचा उपाय म्हणून जपानने अनिर्बंध गर्भपाताच्या उपायाचा अवलंब केला होता. अनिर्बंध गर्भपाताने स्त्रीचा मानसिक व शारीरिक ऱ्हास फार मोठ्या प्रमाणावर होतो, याची जपानमधील विचारवंतांना जाणीव झाली असून, कुटुंबनियोजनाच्या साधनांचा प्रचार व प्रसार अधिक प्रभावी कसा करता येईल, या दिशेने जपानचे सरकार पावले टाकीत आहे.

तेव्हा गर्भपात हा धर्म होऊच शकत नाही. झालाच तर तो आपद्धर्म होऊ शकेल. ' अडवे आले तर कापून काढावे ' यात आपद्धर्मच अभिप्रेत आहे. पण या आपद्धर्माची व्याप्ती थोडी वाढवावी लागेल. कारण पूर्वीचा समाज आता तसाच राहिलेला नाही. हा समाज पूर्वीच्या तुलनेने बराच मोकळा झालेला आहे. स्त्री-पुरुषसंबंधाविषयी त्याची दृष्टी फार बदलली आहे. ' प्रजा की मजा ' हे जे लैंगिक संबंधाचे दोन पर्याय होते, त्यांपैकी ' मजा ' या पर्यायावर आता भर देण्यात येत आहे. या संक्रमणकाळात जोपर्यंत पुरुषाला आपले पित्याचे नाते झटदिशी तोडून टाकून मोकळे होता येते तोपर्यंत स्त्रीला सुटकेचा मार्ग समाजाने मोकळा करून दिला पाहिजे. वाकडे पाऊल पडलेली स्त्री व अनौरस संतती हा लांच्छनास्पद शिक्का जोपर्यंत स्त्री व तिची संतती यांच्या कपाळावर मारावयास समाज कचरत नाही, तोपर्यंत गर्भपातासंबंधी सध्याच्या कायद्यात उदारमतवादाने प्रवेश करावा हेच उचित होय. कर्णालादेखील दुर्योधनाच्या पक्षाला जाऊन स्वतःचे स्थान निर्माण करावे लागले. आधुनिक कर्णांना म्हणजे अनौरस संततीला ( कर्ण याचा अर्थ ' अनढायाः पुत्रः कानीनः ' असा पाणिनीने केला आहे. ) या लोकशाहीत असा राजाश्रय थोडाच मिळणार ? कायद्यात बदल हाच आधुनिक काळातील राजाश्रय.

लोकसंख्येचे प्रमाण कमी करण्यासाठी गर्भपात हा प्रभावी उपाय होऊ शकत नाही. कारण गर्भपाताने स्त्रीची प्रजननशक्ती कमी होत नाही. गर्भपातानंतर अवघ्या सहा महिन्यांतच कित्येक स्त्रियांना गर्भधारणा झाल्याचा जपानचा अनुभव आहे. म्हणजे ब्रह्मचर्यही गेले आणि गाढवही गेले, अशा प्रकारचा हा उपाय ठरतो. लोकसंख्येचे प्रमाण कमी करण्यासाठी कोणतीही जवळची वाट

दरिद्र्याला खंडीभर मुले असा विषम तोल निर्माण झालेला आहे. माल्थस नको तर मग यावर उपाय काय ?

प्रथम उपाय म्हणून कुटुंबनियोजन पुढे आले. कल्पना चांगली. मातृत्वाचेही नियोजन व्हावे. योजना आखून कुटुंबाचा विस्तार व्हावा. पण अवघड आहे ही योजना. आईबाप व दोन मुले असा कुटुंबविस्तार आदर्श मानला तर स्त्रीला त्या दोन मुलांत एक मुलगा व एक मुलगी अशी ' पॅरिटी ' हवी असते ! पण पहिली मुलगी झाली तर पुढचा मुलगाच होईल याची हमी कोण देणार ? ' पुमान् पुंसो धिके शुक्रे स्त्री भवत्याधिके स्त्रियः ' हे मनूचे प्रजनन शास्त्र आता मागे पडले आहे. तेव्हा मुलगा झाल्यानंतर मुलगी होईपर्यंत अनासक्त कर्मयोगाचे आचरण करावयाचे ठरविले तर आदिमायेचा अवतार होईपर्यंत सात-आठ अपत्ये पदरी पडण्याचा संभव निर्माण होतो ! उलटपक्षी, मुलगीनंतर मुलाची अपेक्षा बाळगावी तर हा श्रीकृष्णावतार आठवा ठरणार नाही याचीही हमी नसते ! तेव्हा कुटुंब-नियोजन यशस्वी व्हावयाचे असले तरी मातेच्या व पित्याच्या आकांक्षा व अपेक्षा अडव्या येतात. ' प्रजनार्थं स्त्रियः सृष्टाः संतानार्थं च मानवाः ' हा दृष्टिकोण अजून तग धरून आहे. वास्तविक वंशसातत्य नष्ट झाले तर भारतीय समाजाचे असे काय नुकसान होणार आहे ? पण हा प्रश्न पटणारा नाही. आपटे, मावळ, मोरे, जाधव हे या घराण्याचे अभिमान वस्तुस्थितीने खोटे पाडले असले तरी, मनात त्याची मुळे खोलवर रुजलेली असतात. जन्मभर कारकुनी केली तरी वाटते की आपल्या नावाने तर्पण करणारा कोणी तरी हवा ! काय करणार कुटुंब-नियोजन या भावनेपुढे ? शिवाय नियोजनात ठराविक कालमर्यादेने उत्पादन अपेक्षित असते. दोन बाळंतपणात ठराविक अंतर असावे लागते. असे अंतर राखण्यासाठी नैष्ठिक ब्रह्मचर्याची पराकाष्ठा केली, तरी पुढे जुळे होणारच नाही हेही माता-पित्यांच्या हाती नसते. सारांश, कुटुंबनियोजन ही एक अवघड कला आहे. यातील बरेचसे घटक उत्पादकांच्या ताब्यातले नाहीत. त्यांचे नियंत्रण कसे व्हावे ? हा कुटुंबनियोजनातील यक्षप्रश्न होय आणि ' धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां ' हेच उत्तर देऊन या ठिकाणी स्वस्थ बसावे लागते.

लोकसंख्येचे प्रमाण कमी करणे हा जर आजचा युगधर्म असेल तर, गर्भपाताला आपद्धर्म म्हणून नव्हे तर धर्म म्हणून कायद्याने मान्यता दिली पाहिजे, असा हा नवा विचार आहे. जपान ही या विचाराची मक्का-मदीना. गर्भ-पातास अनिर्बंध परवाना देणारा देश म्हणजे जपान. जपानने १९४९ पासून गर्भपातास मंजुरी दिली आणि तेव्हापासून १९६१ पर्यंत गर्भपातांची संख्या अडीच लाखांपासून दहा लाखांपर्यंत चढत गेली. अनिर्बंध गर्भपाताचे स्त्रीच्या

नाही. समाज जसा सुसंस्कृत बनत जातो, तसे त्या समाजातील लोकसंख्येचे प्रमाण घटत जाते, असा सार्वत्रिक अनुभव आहे. या उपायाचे परिणाम दिसू लागण्यास फार काळ वाट पाहावी लागेल. तोपर्यंत कुटुंबनियोजनाच्या साधनांचा प्रचार करण्यावरच भर द्यावा लागणार. शस्त्रक्रियाही अवलंबावी. पण पुरुषांवर. विशेषतः पुंगवांप्रमाणेच नरपुंगवांचें खच्चीकरण हा कमी धोक्याचा व अधिक खात्रीलायक मार्ग आहे, असे दिसते. काही झाले तरी गर्भपात हा उपाय होऊ शकत नाही. त्यात एक प्रकारची अमानुषता आहे· स्त्रीच्या जीवनात मातृत्व ही एक महन्मंगल प्रक्रिया आहे. त्याला वांझ्याच्या कसाईखान्याचे स्वरूप येऊ नये. कल्पनेनेच अंगावर शहारे येतात. हॉस्पिटलच्या दारापाशी भावी माता 'क्यू' करून उभ्या आहेत आणि एकामागून एक त्यांच्यावर गर्भपाताचा प्रयोग होत आहे, हे जपानच्या हॉस्पिटलचे वर्णन शिसारी निर्माण करीत नाही काय ? पुरुषाच्या गुन्ह्याबद्दल स्त्रीला अशी शिक्षा करता येणार नाही, तशीच मातेच्या चुकीबद्दल अपत्याला प्रायश्चित्त देता येणार नाही, आणि म्हणून गर्भपात हा समाजधर्म बनू शकत नाही. अनिर्बंध गर्भपात हा समाजाचा वैचारिक अधःपात आहे, असे मानणारांपैकीं मी एक आहे.

(१४-३-१९६५)

२

# जीवन व ज्ञान यांतील तफावत

गेली दोन-तीन वर्षे विद्यार्थी, आणि विशेषतः विद्यापीठातील विद्यार्थी, दंगलीच्या राजकारणात जोराचा भाग घेऊ लागल्याचे दिसून येते. बनारस, लखनौ, गया, उत्कल, नागपूर, कर्नाटक या विद्यापीठांतील विद्यार्थ्यांनी केलेल्या दंगलींची इतिवृत्ते आपण वाचली म्हणजे विद्यार्थी-जगात कोणत्या दिशेने वारे वाहत आहेत याची अंधुकशी कल्पना येते. विद्यार्थ्यांची ही आंदोलने केवळ शैक्षणिक प्रश्नांपुरतीच मर्यादीत राहिलेली नाहीत असे उत्कल विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी ओरिसा विधानसभेवर केलेल्या अतिक्रमणावरून स्पष्टपणे सिद्ध होते. साहजिकच आपले नेते, शिक्षक व पालक या घटनांचा लांबट चेहरा करून गंभीर विचार करू लागले आहेत.

पण विद्यार्थी-विश्वातील ही दंगलीची लाट भारतापुरतीच मर्यादित राहिलेली नाही, असे जगातील अनेक देशांच्या इतिहासावरून दिसून येईल. इंग्लंडमध्ये निर्माण झालेले मॉड आणि रॉकर्स हे पंथ, सायगावमधील विद्यार्थ्यांनी जनरल कान्हविरुद्ध केलेली निदर्शने इत्यादि घटना या गोष्टीची साक्ष पटवतील. समाजातील तरुण पिढी, कोणत्याही कारणाने का असेना, पण अस्वस्थ बनत असल्याची ही चिन्हे आहेत. प्राप्त परिस्थितीवर ते संतुष्ट नाहीत असे दिसते... तथापि, आपण विश्वाची एवढी व्यापक चिंता कशाला करावी? भारतापुरतीच त्या चिंतेची मर्यादा ठेवलेली बरी. भारतातील विद्यार्थी-विश्वही काही लहान नाही. आणि

उपेक्षणीय तर नाहीच नाही. 'राष्ट्राचे भावी आधारस्तंभ' असा विद्यार्थ्यांचा गुणगौरव वडीलधारी मंडळीच करीत असतात. पण आपण स्तंभ आहोत हा गौरव विद्यार्थ्यांना मान्य नाही असे दिसते!

गंभीर व विचारमग्न चेहऱ्याने वडीलधारी मंडळी या घटनांचा विचार करू लागली आहेत, असे मी वर सांगितले. पण 'विद्यार्थ्यांत अलीकडे शिस्त राहिली नाही' असे खेदोद्गार काढण्यापलीकडे या विचारांची झेप गेलेली दिसत नाही. वडील-धाऱ्या मंडळींच्या मनांत नापसंती, उसासा, खेद आणि निषेध यापलीकडे मूलगामी विचार दिसत नाहीत. कुत्रे पिसाळते, माणसाला वेड लागते, घोडे चौखूर उधळते या जशा विकृती, तशीच विद्यार्थी दंगल करतात ही एक विकृती. आणि मग त्यावर उपायही ठरलेला असतो आणि तो म्हणजे घोड्याला ठाणबंद करून ठेवणे. ही सरकारने 'शिस्त योजना' म्हणून जी योजना काढली होती, त्या योजनेची प्रकृती ही अशा स्वरूपाची आहे. त्या योजनेचा अनुभव असा आला की शिस्तीवर भिस्त ठेवून ही विकृती काही बरी होण्यासारखी नाही.

आज माझ्यासमोर दोन विद्यार्थ्यांनी लिहिलेला एक लेख पडलेला आहे. लेखाचा मथळा आहे, 'आजचा भारतीय विद्यार्थी' असा. विल्सन कॉलेज मुंबई विद्यापीठाला जोडले या घटनेची शताब्दी १९६१ मध्ये साजरी झाली. त्यानिमित्त 'थॉट्स ऑन एज्युकेशन' हा जो ग्रंथ प्रसिद्ध झाला, त्या ग्रंथात हा लेख प्रसिद्ध झाला आहे. विद्यापीठात विद्यार्थी असे का वागतात याचा विचार करीत असताना हा ग्रंथ सहज चाळू लागलो आणि त्यात हा लेख मला प्रक्षोभक वाटला. एक तर हा लेख विद्यार्थ्यांनी लिहिलेला, त्यामुळे त्याला महत्त्व अधिक. 'सत्य सदा बोलावे सांगे गुरु आणि आपुला बाप' यातील गुरू आणि बाप विद्यार्थ्यांवर अधिकार गाजवीत असले, तरी विद्यार्थ्यांविषयी बोलण्याचा या दोघांना अधिकार (पात्रता) आहे, असे मला वाटत नाही. किंबहुना विद्यार्थ्यांविषयी कमालीचे अज्ञान जर कोणा प्राण्याला असेल तर ते या दोन प्राण्यांना आहे. बाप या नात्याने माझा या प्राणिवर्गात समावेश होतो, हे मान्य करून मी हे विधान करतो आणि तेही जबाबदारीची जाणीव ठेवून.

दुसरे, विद्यार्थ्यांनी हा विद्यार्थ्यांविषयीच लेख लिहिला आहे. गुरुजन वा पितृ-जन याविषयी हा लेख नाही. विद्यार्थ्यांनी पालक व शिक्षक यांचे शब्दचित्र रेखाटले तर ते देखील वाचनीय व मननीय ठरेल. शॉने बापाचे मोठे विदारक चित्र रेखाटले आहे. आपण साक्षात परमेश्वर आहोत असे मुलाच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न करणारा, तो सांगेल ते चांगले, तो न मानेल ते वाईट अशी शिकवण देणारा, आणि हे विधिनिषेध, शिक्षा, भीती, पापपुण्य असल्या विकृत साधनांनी

मुलाच्या मनावर सक्तीने लादणारा हा बाप, असे त्याचे वर्णन करून ‘ Oh ! these fathers ! ’ असे शॉने हताश होऊन उद्गार काढले आहेत. पण गुरू व बाप यांच्याविषयी विद्यार्थ्यांना काय वाटते हा आपला प्रस्तुतचा विषय नसल्याने तो कितीही मनोरंजक असला, तरी येथेच सोडून देणे क्रमप्राप्त आहे.

अशा प्रकारे विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांविषयी लिहिलेल्या या लेखात काही महत्त्वाचे मूलगामी प्रश्न उपस्थित केलेले आहेत. विद्यार्थ्यांवर गैरशिस्त वर्तनाबद्दल वडीलधारी मंडळी कडक टीका करीत असतात ही जाणीव ठेवून, त्यांनी काही प्रश्न उपस्थित केलेले आहेत, असे म्हणा किंवा टीका करणाऱ्या वडीलधाऱ्या मंडळींना उद्देशून हे प्रश्न विचारले आहेत असे म्हणा. पण अनुल्लेखाने मारण्यासारखे, अधिक्षेपाने केराच्या टोपलीत टाकण्यासारखे हे प्रश्न नाहीत. हे विद्यार्थी लेखक असा प्रश्न टाकतात की, बेकार सुशिक्षित हा गल्लोगल्ली आढळणारा प्राणी पाहिल्यावर विद्यार्थी निराशेने व वैफल्याने झपाटणार नाही काय? शिक्षणाकडे तो उथळ दृष्टीने पाहू लागला व केवळ नावापुढे एक पदवीचे शेपूट असावे म्हणून तो पदवी मिळविण्याचा प्रयत्न करू लागला, तर हा काय विद्यार्थ्यांचा दोष आहे असे म्हणता येईल? आणि या तांत्रिक ज्ञानाची कसरत करण्याचा उबग आल्यानंतर तो जर संप, मोर्चा, निदर्शने या राजकीय ‘ थ्रिलर ’च्या आहारी गेला तर हा दोष कुणाचा? विद्यार्थ्यांचा का शैक्षणिक वातावरणाचा?

यावर गुरुजनांचे उत्तर काय येईल हेदेखील ठरलेले आहे. ते उत्तर हेच की, ज्ञान पैसे मिळविण्यासाठी संपादन करावयाचे नसते. ‘ न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ’ या उपदेशामृताचा डोस इतक्या वेळा पाजला जातो की त्या अमृताचाही आता शिसारी येऊ लागली आहे आणि यावरही ‘ बुभुक्षितैर्व्याकरणं न भुज्यते ’ हा उतारा देता येईल. पण आपण जे निरर्थक ज्ञान विद्यार्थ्यांच्या मेंदूत कोंबत असतो त्याचा प्रांजल कबुलीजबाब हे तज्ज्ञ कधीच देणार नाहीत. तशी अपेक्षा करणे व्यर्थ होय. त्यांनी हे मान्य केले नाही तरी पदवी परीक्षेपर्यंत मिळविलेले ज्ञान पुढील जीवनात अगदी निरुपयोगी ठरते, हे सत्य त्यामुळे झाकले जाणार नाही. अशना व पिपासा या मानवी जीवनातील महान प्रेरणा आहेत. त्या भागविण्याचे सामर्थ्य पदवीत नसेल तर ती पदवी विद्यार्थ्याला नाममात्रच भासणार आहे हे अगदी उघड आहे.

विद्यापीठाला ज्ञान व व्यवसाय यांची सांगड घालता येत नसेल, व्यवसाय करणारांना ज्ञान मिळविण्याची संधी देणे, हा विद्यापीठापुढे दुसरा पर्याय आहे. पण दुर्दैव हे की विद्यापीठाला हा पर्याय पसंत नाही. ‘ Earn while you learn ’ हा पर्याय आपल्या विद्यापीठाने निकृष्ट दर्जाचा ठरविला असून,

नोकरी करून शिकणारांसाठी त्यांनी सहा वर्षे ठेवली आहेत. या विद्यार्थ्यांनी दीडपट कालापव्यय करावा असे गुरुजनांचे मत आहे. त्याचे कारण मला दिसते ते की विद्यापीठ जे ज्ञान देते त्याचा व्यवसायाशी सुतराम संबंध नसतो. व्यवसाय करणाऱ्या विद्यार्थ्याला त्याच्या व्यवसायाला उपयोगी पडेल अशी विद्या विद्यापीठापाशी नाही. आणि हा न्यूनगंड लपविण्यासाठी व्यवसाय करणाऱ्या विद्यार्थ्याला न्यूनप्रतीचा विद्यार्थी ठरविण्यात आले असावे. अर्थात व्यवसाय करून पदवी मिळवू इच्छिणारे विद्यार्थी पगारवाढीचे एक साधन म्हणून पदवीकडे पाहत असले तर ते उणेपण विद्यापीठाचे आहे. त्या विद्यार्थ्यांचे नाही. ज्ञान आणि जीवन यात एवढी भयंकर तफावत इतरत्र क्वचितच आढळेल.

शिक्षणाप्रीत्यर्थ पूर्ण वेळ देणारे विद्यार्थी ! विद्यापीठाचे आवडते विद्यार्थी ! नोकरी करून शिक्षण घेणाऱ्यांचा स्पर्श त्यांना बाधू नये अशी विद्यापीठ ज्यांची काळजी वाहते ते हे विद्यार्थी ! पण ' पूर्ण वेळ देणारे ' याचा प्राकृत अर्थ माहीत आहे ? पूर्ण वेळ घराबाहेर असणारे असा तो आहे. कारण घरात आईबापांना यांची अडचण होत असते. शिक्षणाप्रीत्यर्थ होणारा खर्च सोसण्याची ऐपत असल्याने, आपण शिकलेच पाहिजे अशी यांच्यावर सक्ती नसते. आणि जे विषय शिकवले जातात व जे शिकवणारे असतात त्यांच्यावर या विद्यार्थ्यांची भक्ती नसते. सुमारे तीस वर्षांपूर्वी बर्नार्ड शॉने काढलेले उद्‌गार आजही खरे आहेत. तेच येथे देतो :

" to my mind, a glance at the subjects taught in schools ought to convince any reasonable person that the object of the lessons is to keep the children out of mischief, and not to qualify them for their part in life as responsible citizens of a free state."

आणि विद्यार्थ्यांनी शिस्तीची चाकोरी ओलांडून जाऊ नये हा जो उद्देश, तो काही केल्या सफल होत नाही. विद्यार्थ्यांचे मन संपूर्ण रिकामे राहते आणि रिकामे मन सैतानाचे घर बनायला कितीसा उशीर लागणार.

या विद्यार्थी लेखकांनी आणखी एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. आज भारतात नवनिर्मितीचे युग सुरू झाले आहे. या महान कार्यात भाग घेण्यासाठी विद्यार्थ्याला आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करून घेतला पाहिजे. पण आजच्या शिक्षण पद्धतीत ही संधी त्याला मिळते काय ? खरोखरीच विचार करण्यासारखा असा हा प्रश्न आहे. शालांत परीक्षा विद्यार्थी उत्तीर्ण होतो. त्या वेळी शालांत होतो आणि एवढेच नव्हे तर ज्ञानांतही होतो. शालांत परीक्षेला असलेले विषय म्हणजे निरुपयोगी माहितीची मेंदूत खोगीरभरती. शिक्षकाची मनोवृत्ती

भाडोत्री. विद्यार्थ्यांची संख्या अमाप. त्याला त्यात ना स्वारस्य, ना भक्ती. उत्तीर्ण होण्याइतके गुण मिळाले की काम झाले. त्यामुळे शालांत परीक्षा उत्तीर्ण झाल्याबरोबर तो केवळ क्रमिक पुस्तकेच बाहेर काढतो असे नाही. सक्तीने मेंदूत कोंबलेली माहितीही भराभरा बाहेर फेकून देतो आणि महाविद्यालयात प्रवेश करतो तो अगदी कोऱ्या करकरीत मनाने. विद्यापीठाच्या आवारातील हे ज्ञान आपल्या जीवनात कसे व कोठे उपयोगी पडणार याची पदवी मिळेपर्यंत कल्पना नसते व पदवी मिळाल्यानंतर कल्पनाच उरत नाही.

बुद्धी व भावना यांचा विकास करणारे असे हे शिक्षण आहे काय? नसेल तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास कसा व्हावा? प्राध्यापक व प्रशिष्य यांचे संबंध किती तांत्रिक व उथळ असतात? त्याच्या विचाराला चालना मिळेल व भावना समृद्ध होतील असे या सरस्वतीच्या आवारात काय घडत असते? या पोकळीत राजकारण शिरले, राजकीय पुढारी आले तर तो दोष विद्यार्थ्यांचा असे कसे मानता येईल? कारण राजकारणात विद्यार्थ्यांच्या क्रियात्मकतेला, बंडखोरीला, सळसळत्या रक्ताला आवाहन असते. त्याचे एक विलक्षण आकर्षण निर्माण होते. एका बाजूला रोमन सम्राटाच्या पुतळ्याप्रमाणे धीरगंभीर व निराकार प्राध्यापक आणि दुसऱ्या बाजूला गर्जना व घोषणा करणारे पुढारी. या दोहोंत विद्यार्थ्याला कुणाचे आकर्षण वाटेल?

विद्यार्थी हा असा विद्येचा इच्छुक आहे, तसाच तो समाजाचा एक घटक आहे. त्याला विद्या हवी, खेळ हवा, वाद हवा आणि थोडा खोडकरपणाही हवा. तरच त्याच्या भावना समृद्ध होतील. बाह्य विश्वापासून त्याला सक्तीने अलग काढता येणार नाही. त्या विश्वाबद्दल त्याला वाटणारी जिज्ञासा तृप्त झाली पाहिजे. त्याच्या विद्यार्थी-जीवनात व बाह्य जगात काही संवाद निर्माण झाला पाहिजे. त्याची विचारशक्ती वाढली पाहिजे. त्याच्या भावना तृप्त झाल्या पाहिजेत. जीवनाच्या सर्व क्षेत्रांतील रस चाखण्याइतके त्याचे सामर्थ्य वाढले पाहिजे. आणि विशेष म्हणजे नवनिर्मितीची आज अनेक क्षेत्रे निर्माण झाली आहेत. त्यांपैकी कोणत्या तरी एका क्षेत्रात आपण कर्तृत्व गाजवू असा आत्मविश्वास त्याच्या मनात निर्माण झाला पाहिजे.

म्हणून विद्यार्थी-मनात जो अवखळ व हूड भाव असतो, त्यालाही काहीतरी वाट करून दिली पाहिजे, नाहीतर विद्यार्थी आपल्या पद्धतीने ती वाट करून घेतील. सुसंस्कृत मनाची ती एक गरज आहे. प्रसिद्ध तत्त्ववेत्ता बर्ट्रांड रसेल याने आपल्या 'पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा इतिहास' या ग्रंथात लिहिले आहे,

" Much of what is greatest in human achievement involves some element of intoxication, some sweeping away of prudence by passion."

विद्यार्थ्यांना ही बेहोषीही हवी असते. कारण प्रौढांइतके त्यांनाही जीवनाचे अधिकार आहेत. आजचे शिक्षण त्या दृष्टीने किती रूक्ष, नीरस आणि कंटाळवाणे आहे नाही ?

(४-१०-१९६४)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
...... बि: ......
अनुक्रम ...... नों: दि: ......
क्रमांक ......

३

# नादब्रह्माचा आविष्कार

आपल्या पूर्वसूरींनी नाद हा ब्रह्माचा एक आविष्कार मानला आहे आणि खरोखरीच या विश्वातील नाद व लय लोप पावली तर हे विश्व अत्यंत अनाकर्षक व रूक्ष बनेल याविषयी तिळमात्र शंका नाही. या चराचरात नाद भरून राहिला आहे. मनुष्याच्या जीवनात नादासारखे दुसरे आकर्षण नाही. हर्ष-विषाद, सुख-दुःख, राग-द्वेष, भय-कंपा, लोभ-मोह सारे काही नादावरच अवलंबून नाही काय? प्रेयसीच्या नूपुरांचा मंजुळ झणत्कार ऐकून कोणता प्रियकर देहभान विसरून जात नाही? प्रेममय भक्तिगीत आणि दर्दभरे गजल कानी पडताच योगी व विरही सारख्याच प्रमाणात व्यथित होत नाहीत काय? प्रियकर प्रेयसीला साद घालतो, रसिक कलावंताला दाद देतो, भक्त ईश्वराला हाक देतो हे सारे नादाचे प्रताप नाहीत असे म्हणण्याचे धाडस कोण करील?

पण कविकुलगुरू सांगतात की "विषयमप्यमृतं भवेत् क्वचित्। अमृत वा विषमीश्वरेच्छया॥" काही प्रसंगी विषाचेही अमृत बनते, आजच्या युगात, या आधुनिक युगात या आधुनिक विज्ञाननिष्ट युगात सागराचा ठाव घेणाऱ्या व चंद्राचा वेध लागलेल्या या युगात नाद विषासमान बनला आहे. दिल्ली येथील राष्ट्रीय पदार्थ-विज्ञान प्रयोगशाळेने संशोधनाअंती असा निष्कर्ष काढला आहे की, या युगात आवाजाने माणसाची भूक मरू लागली आहे आणि झोप उडू लागली आहे. तान्हुल्याला झोप आणणाऱ्या अंगाई गीताचे, झोपेतून दचकून उठविणाऱ्या 'अग

आई ग ' भयगीतात रूपांतर झाले आहे. " घास घे रे " असे म्हणून घास भरविणाऱ्या भोजन गीताच्या जागी पहिल्याच घासाला ठास लागेल अशी कर्कश गीते थैमान घालू लागली आहेत. आवाजाची केवढी ही अवनती !

परंतु हा वर की शाप या गहन वादात मी येथे शिरू इच्छीत नाही. विज्ञानाने निर्माण केलेले यंत्र नको म्हटले तरी आता जाणार नाही आणि कर्मेंद्रियांच्या व ज्ञानेंद्रियांच्या शक्ती यंत्राने वाढविल्या हेही आपणास मान्य करावे लागेल. शारीरिक शक्तीला यंत्राने अश्वशक्तीचे प्रचंड स्वरूप दिले आहे. हस्तशक्तीचा घणाघात आणि अश्वशक्तीचा घणाघात यांत जमीन-अस्मानाचा फरक आहे. पायांनी पळणे, आणि मोटारींनी धावणे, उंच उडी मारणे आणि विमानातून उड्डाण करणे याची कल्पनेनेही तुलना करता येत नाही. मनुष्यशक्तीची जागा अश्वशक्तीने घेतली त्याचा हा सारा प्रभाव. त्या प्रभावात उणीव एवढीच राहिली की, अश्वशक्तीबरोबरच अश्वनादही यंत्राने जीवनात आणला. पक्षांची किलबिल गेली, विमानांची घरघर आली. आगगाडीचा खडखडाट, शस्त्रांचा धडधडाट आणि टाळ्यांचा प्रचंड कडकडाट, किती कठोर आणि कर्कश झाली आहे ही आवाजाची दुनिया ! मोटारींचे हॉर्न्स, गिरण्यांचे भोंगे, समुदायाचा गोंगाट, कानठळ्या बसविणाऱ्या घोषणा या आवाजाने माणसाच्या कानाला आवाज नको असे होऊन गेले आहे. यंत्राने निर्माण केलेल्या अश्वशक्तीचा हा सारा परिणाम !

मनुष्य नादाचा भोक्ता आहे. पण त्या नादात सौंदर्य हवे. माधुर्य हवे. लयबद्धता हवी. किंबहुना लयबद्ध नाद हाच खरा नाद. मग तो खर्जातला नाद असो वा तारस्वरातील नाद असो. हसणे, रडणे, रागावणे, लोभावणे, विषाद वाटणे इत्यादि सर्व क्रियांमध्ये नाद असावाच लागतो. पण या स्वरांत सौंदर्याचा प्रत्यय आला तर ते ऐकावेसे वाटतात. कान तृप्त होतात एवढेच नव्हे तर मन तृप्त होते. कनक आणि कांता माणसाला एवढी प्रिय का ? त्यांच्या नादाने माणूस नादावतो म्हणून. जीवनात हरतऱ्हेचे नाद आहेत, स्वर आहेत, ताल आहेत, लय आहेत, प्रेमिकांचे प्रणयकूजन, भ्रमरांचे मधुर गुंजन, उत्तम वक्त्याचे नादमय भाषण या सर्वांत माधुर्य व सौंदर्य आहेच. पण प्रसंगाचे गांभीर्य सूचित करणारा गंभीर ध्वनी, खेळकर हास्यध्वनी, परित्यक्तेचा हुंदका, गतभर्तृकेचा टाहो, भक्ताची आर्त हाक या सर्वांतही सौंदर्याची प्रचीती आणणारा नाद आहे. ते नाद ऐकावेसे वाटतात, त्यांचे हृदयात पडसाद उमटतात. माणसाच्या चित्तवृत्ती बहरून येतात. समुदायाने एका सुरात आवाज उठविला तरी, ' विठ्ठल विठ्ठल गजरी । अवघी दुमदुमली पंढरी ' अशा रीतीने वातावरण नादमय बनते.

अशी होती एके काळी आवाजाची दुनिया. या दुनियेत माणसाचे आवाजावर प्रेम होते. त्या दुनियेत शरीराप्रमाणेच माणूस आवाज कमावीत होता. गायकच नव्हे तर वक्ताहीआवाज कमावीत असे. माणूस आवाजाचे लाड करीत असे. त्याला अंजारीत असे, गोंजारीत असे. त्या आवाजाचे चढउतार अजमावीत असे. कारण त्याला माहीत होते की, शब्दाला महत्त्व प्राप्त होते ते आवाजाने. नव्हे उपसर्गांने धातूचा अर्थ बदलतो तसेच आवाजाने शब्दाचे अर्थ उलटेपालटे होऊन जातात. विद्वानाचा मूर्ख व शहाण्याचा गाढव आणि चांगल्याचे वाईट करायला आवाजाला कितीसा वेळ ? बोल बोल म्हणता ही किमया होत असे. शब्द बिचारे निर्जीव. त्यात जीव निर्माण होतो तो आवाजाने. बाणांच्या फेकीप्रमाणे शब्द फेकले जातात आवाजाने. स्वरांच्या आरोह-अवरोहात असे विलक्षण सामर्थ्य भरले आहे. व्यंजना, लक्षणा, उपरोध, व्याजोक्ती, वक्रोक्ती सारे गुणधर्म आवाजाचे आहेत. रुपया वाजतो तो आवाजाने, तसे आवाजाने शब्द खणखण वाजतात, तीरासारखे अचूक लक्ष्यवेध करतात, लक्ष वेधून घेतात आणि अंतःकरण विद्ध करतात. शब्दांना नाद व लय नसेल तर ते शब्दच नव्हेत. ती होते केवळ वर्णमाला. त्यात नाद भरा, त्यांना लयीने बांधा की त्यांचा स्फोट होतो. आवाज हा शब्दांचा महाप्राण आहे.

•

जेव्हा बृहत् ध्वनी नव्हते, जेव्हा यंत्राने आवाजातील ध्वनी दूर पळविला नव्हता, तेव्हाचे वक्ते मी ऐकले आहेत. तेव्हाचे गायक मी ऐकले आहेत. त्यांचे आवाज कमावलेले होते. आज या बृहत् ध्वनीने आवाज गमावलेले आहेत. शिवरामपंत परांजपे, तात्यासाहेब केळकर, भालाकार भोपटकर, बॅ. जयकर, श्री. म. माटे, शंकर श्रीकृष्ण देव, पांगारकर हे त्या वेळचे पट्टीचे वक्ते. त्यांच्या वक्तव्यातील षड्जपंचम भाव अशी काही भावसमाधी निर्माण करीत असे की, त्याचे शब्दांनी वर्णन करणे अशक्य होय. त्या वक्त्यांच्या आवाजात नाद होता, धार होती. तंबोरा छेडला की स्वरांचे अणुरणन जसे दीर्घकाळ राहते, तसा तो आवाज बराच काळ कानात रेंगाळत असे. त्या कमावलेल्या आवाजाला एक प्रकारची स्वादिष्ट चव होती. जशी साजूक लोणकढ्या तुपाला असते तशी. लोणकढी थाप मारली तरी त्या थापेला खमंग वास येत असे. इंद्रियार्थ सन्निकर्षजन्य असा हा नाद काही अपूर्व होता. आजच्या लोहमय ध्वनिक्षेपक यंत्राने आवाजाचे सोने होण्याऐवजी लोखंड झाले आहे. त्यात अणुरणन नाही, झंकार नाहीत वा झणत्कार नाहीत. सारे स्वर कसे अगदी तुटक, कर्कश आणि बेचव.

मला वाटते आजचे युग समुदायपूजेचे आहे. यंत्राने समुदायपूजा निर्माण केली की समुदायपूजेसाठी यंत्र निर्माण झाले, हा नेहमीचा वादग्रस्त प्रश्न राहील. पूर्वी-

प्रमाणे वक्ता व श्रोता यांचा साक्षात संबंध राहिला नाही एवढे मात्र खरे. दोहोत मध्ये यंत्र उभे राहिले. समुदायासाठी त्या यंत्राने नैसर्गिक आवाज मोठा केला; त्यामुळे हजारोंना तो ऐकू येऊ लागला. पण त्याचबरोबर आवाज दिसेनासा झाला. हे एक महान सत्य आहे की आवाज ऐकायचा असतो, तसाच पाहायचा असतो. तो श्रवणीय असतो तसाच दर्शनीय असतो. प्रियतमेचा आवाज केवळ ऐकून प्रेमपूर्ती होत नाही, गायकाचे नुसते स्वर कानी पडून समाधान होत नाही. सागराच्या लाटांचा खळखळाट, मेघांचा गडगडाट यांचे टेपरेकॉर्ड आनंद देत नाही. बृहत् ध्वनीने दूरत्व निर्माण केले आणि म्हणून आवाजातला 'चार्म' निघून गेला. आवाजाचे हे यांत्रिक मोठेपण खरे नाही. त्यात नैसर्गिक गुणांचा विकास नाही. दोषांचा मात्र विस्तार आहे. गायकाचे निर्मळ स्वर यंत्राने भसाडे होतात आणि कणसूर व बदसूर मात्र अधिक तीव्र होतात. आणि मुख्य म्हणजे बृहत् ध्वनीने आवाजाची शान जाते. आवाजालाही निसर्गाने प्रमाणबद्धता दिली आहे. यंत्राने तेच प्रमाण अवाढव्य केले तर आवाज मोठा होतो. तसाच बेढब होतो. तन्वंगीला गामा पहिलवानाची भरदार शरीरयष्टी शोभेल?

समुदाययुगात आवाज असा सौंदर्यहीन बनला. त्यात 'ऱ्हिदम' नाही. आता व्यक्तीचा आवाज ऐकू येत नाही. ऐकू येतो तो जनतेचा आवाज. आणि तो जनतेचा आवाज उठविला जातो. राष्ट्रांनाही आवाज प्राप्त झाला आहे. अमेरिकेचा आवाज आहे, इंग्लंडचा आवाज आहे.आणि भारताचा आवाज आहे. दलित जनतेचा आवाज आहे. बहुजन समाजाचा आवाज आहे, किसान मजदूरांचा आवाज आहे. या सामुदायिक आवाजांत व्यक्तीचा आवाज पार बुडून गेला आहे. या सामुदायिक आवाजालाही प्रमाणबद्धता नाही. वेगवेगळे सूर एकदम उमटतात. हार्मोनियमच्या पट्ट्या एकदम दाबल्या की आवाज होतो तसे. त्यात नाद नाही, संवाद नाही. हा आवाज नाही. हे झाले किंचाळणे आणि तेही अतिशय कर्कश. याला तारसप्तकही म्हणता येणार नाही. तारसप्तकातही प्रमाणबद्ध उंची असते; आणि म्हणून तारस्वर ऐकावासा वाटतो. या अराजक ध्वनिलहरी आपल्या ज्ञानतंतूवर फार घातक प्रहार करतात. ते तंतू प्रमाणात ताणले जात नाहीत. वा छेडले जात नाहीत, ते तंतू तुटले जातात.

भावमधुर संगीत ऐकले, रसभावपूर्ण नाट्य पाहिले, लयबद्ध वक्तृत्व श्रवण केले तर माणसाला तहानभूक उरत नाही, किंवा झोप येत नाही. पण या कलाहीन यांत्रिक आवाजाने तहानभूक हरपत नाही. तहानभूक मरते. झोप उडून जात नाही, निद्रानाशाचा विकार जडतो. हा यांत्रिक आवाज म्हणजे महान विकृती आहे. भूक विसरणे ही भावसमाधी तर भूक सरणे ही व्याधी

होय. हंसपदिकेचे गीतगायन ऐकल्यानंतर दुष्यंताच्या तोंडून अभावितपणे उद्गार बाहेर पडले की ' अहो रागपरिवाहिनी गीति ' असे. नभोवाणीवर आजच्या हंसपदिकांचे गायन श्रवण केले तर तेच उद्गार प्रेक्षकांच्या तोंडून बाहेर पडतील. मात्र त्यातील राग हा शब्द मराठी भाषेतील राग या अर्थाने घ्यावा.

तेव्हा आधुनिक युगात आवाज मोठ्या प्रमाणावर कमी करण्याची गरज आहे. या प्रयोगशाळेच्या संशोधनाशी सहमत होण्यास हरकत नसावी. ' सारे कसे शांत शांत ' असे काही काळ तरी होण्याची गरज आहे. ' सायलेन्स झोन ' या केवळ पाट्याच झळकतात. या विभागात केवळ मोटारींच्या भोंग्यांचे आवाज थांबले पाहिजेत असे नाही, तर आवाज बंद झाले पाहिजेत. मी असा दिवस उजाडण्याची वाट पाहत आहे की, त्या दिवशी प्रभातसमयी हे कृत्रिम, कर्कश आवाज ऐकू येणार नाहीत. तांबडे फुटले आहे. अंथरुणावर मी शांत पहुडलो आहे. डोळयांवरची मुख्य झोप सरली आहे. पण झोपेचा हॅन्गोव्हर ' तेवढा उरला आहे. अशा प्रशांत थंड वातावरणात पक्षांची किलबिल सुरू होते, बाजूच्या घरातून जात्यावरील दळणाचे व त्या वेळी गायिल्या जाणाऱ्या ओव्यांचे मंदस्वर कानांवर पडत आहेत. घरची म्हातारी उठून वेड्यावाकड्या स्वरात भूपाळी आळवीत आहे आणि त्या स्वरांच्या तंद्रीत निद्रा व जागृती यांच्या सीमा रेषेवर माझे मन उभे आहे. सामान्य जीवनात सात्विक भावनांचा मंद प्रकाश देणारी अशी परत प्रभात कधी पाहावयास मिळेल काय ? कारण पहाटे साडेपाचचा ठोका पडला की चहाचे आधण ठेवल्याची सूचना स्टोव्हचा फर्रर्र असा आवाज आणि दूध केंद्रावर घाईने पळणाऱ्यांच्या हातांतील बाटल्यांचे आवाज कधीकाळी चुकतील का, या निराशेने मी हैराण झालो आहे.

( १४-२-१९६५ )

९

# शीतळ चंद्रतळ अंगार ओकणार ?

बरोबर चार वर्षांपूर्वी (१२ एप्रिल १९६१) गागारिन या रशियन वैमानिकाने अंतरिक्षात उड्डाण केले. आज लिओनॉव्ह या दुसऱ्या रशियन गृहस्थाने अंतरिक्षात विहार केला.

म्हणजे ज्या अंतरिक्ष यानातून तो अंतराळात फिरत होता, त्या अंतरिक्ष यानातून तो बाहेर आला, थोडा वेळ त्या अवकाशात संचार केला आणि परत आपल्या यानात जाऊन बसला. अंतरिक्ष पादाक्रांत करण्याच्या प्रयत्नांतील हे दोन महत्त्वाचे टप्पे आहेत. या दोन स्थित्यंतरांच्या दरम्यान, म्हणजे गेल्या चार वर्षांत, रशिया व अमेरिका या राष्ट्रांतून एकूण सतरा पुरुष व एक स्त्री असे अठरा लोक अंतरिक्ष प्रवास करून पृथ्वीवर सुखरूप परतले. अंतरिक्षात प्रवास करणारी एकुलती एक प्रमदा या धरित्रीवर सुखरूप परतली व प्रेमात पडली. अंतरिक्ष गमनात अपघात घडला असेल तर तो हा घडला ! अर्थात या अष्टादश वीरांनी अंतरिक्षावर मात करण्यापूर्वी किंवा दरम्यानच्या काळात अंतरिक्षानेही पुष्कळांवर मात केली असली पाहिजे. पण अजून तरी तो इतिहास अज्ञातच आहे.

पण या अंतरिक्ष गमनांची अथवा गमनागमनांची अखेर फलश्रुती काय पदरात पडली ? या अंतराळवीरांना आकाशात काय गवसले ? काय सापडले ? कशाचा शोध लागला ?

तर आकाश अनंत आहे आणि त्या अनंत आकाशात काही नाही हे सापडले. ज्या दोन अमेरिकन आकाशवीरांनी आकाशात संचार केला त्यांनी, आणि तत्पूर्वी ज्या सोळा व्यक्तींनी आकाश संचार केला त्यांनी, सांगितले ते एवढेच की, आकाशात सुंदर विविध रंग आहेत. हे रंग इतके सुंदर आहेत की, त्याचे शब्दांत वर्णन करता येणार नाही. ग्रहनक्षत्रमालांनी भरलेल्या या आकाशाच्या पोकळीत काय दडले आहे याचा वेध घेण्याचा प्रयत्न मानव आज वीस वर्षे करीत आहे आणि गेल्या आठ वर्षांत वातावरणाच्या पलीकडे जाऊन त्या पोकळीत काही दडले आहे काय, हे प्रत्यक्ष पाहण्याचा त्याने प्रयत्न केला आणि त्याला ' नेति नेति ' एवढेच त्या पोकळीत आढळून आले. या आकाशात वजन नाही, गुरुत्वाकर्षण नाही, यक्षगंधर्व नाहीत, देवांगना नृत्य करीत नाहीत, स्त्रीच्या सुंदर मुखाला उपमारूपाने बिलगून बसणाऱ्या चंद्रावर साधी हिरवळदेखील नाही, मंगळावर नद्यानाले नाहीत, शुक्रावर वातावरण नाही. या आकाशात फक्त अवकाश आहे, पोकळी आहे. भयाण पोकळी आहे. अनंत अवकाश आहे. रशिया व अमेरिका यांसारखी बलाढ्य व धनाढ्य राष्ट्रे पाण्यासारखा पैसा ओतून आपली शास्त्रीय शस्त्रे व अस्त्रे यांचा या अवकाशरूपी आकाशावर एवढा प्रखर हल्ला चढवीत आहेत तो कशासाठी ? त्यांचा हेतू तरी काय ? का म्हणून हवेत तलवारीचे वार करावेत, तसा हा निष्फळ उद्योग त्यांनी आरंभिला ?

शास्त्रीय उपकरणांनी, जिवाला धोका असताना माणसाला आकाशात पाठवून या आकाशाचे जे काही अंतरंग हाती आले, त्यात नवीन असे काहीच हाती पडले नाही.

या आकाशात किरणोत्सर्गी वलये ( Radiation belts ) आहेत आणि या वलयात मनुष्य सापडला तर तो भस्मसात होतो. चंद्राचा पृष्ठभाग अशा प्रकारचा आहे आणि वातावरणापलीकडे मनुष्य या अवकाशात सापडला तर ग्रहमालेतील ग्रहांसारखा तो फिरतच राहील इत्यादि जे काही ज्ञान या आकाशयानातून संचार करणाऱ्या मानवांनी संपादन केले ते शास्त्रज्ञांनी पूर्वीच अनुमानिले होते. शास्त्रज्ञांच्या अनुमानाला प्रत्यक्ष प्रमाणाचा पाठिंबा मिळविण्यापलीकडे या अंतराळ संशोधनातून काही अधिक निष्पन्न झाले नाही. मग या अंतरिक्ष गमनाचे प्रयोजन काय ? ' इकॉनॉमिस्ट ' या साप्ताहिकाने याचे एक उत्तर दिले आहे ते प्रथम येथे देतो....पृथ्वीवर माणसाला माणसे मारण्याशिवाय दुसरा छंद राहिलेला नाही. त्यासाठी तो नित्यनूतन शस्त्रे निर्माण करू लागला आहे. पण हा छंद असा आहे की त्यामुळे त्याचा अहंकार सुखावत असला तरी या छंदापायी पृथ्वी निर्मनुष्य झाल्यावर प्रौढी मिळवावी तरी कुणासमोर या विचाराने तो बेचैन झालेला

आहे. अशा अस्वस्थ, बेचैन, निराश मानवी मनात निर्माण होणाऱ्या राक्षसी महत्त्वाकांक्षेपासून मानवसमाजाचा बचाव करावयाचा असेल तरत्याची युद्धाची खुमखुमी जिरवण्यासाठी आकाश बरे आहे! या आकाशात उडवा अग्निबाण, सोडा क्षेपणास्त्रे आणि करा आकाशाचा विध्वंस; निःशस्त्रीकरण परिषद भरवा, अण्वस्त्रनिर्मितीवर बंदी घाला, चाचणी प्रयोग थांबवा असे आकाश माणसाला काही काही सांगणार नाही. आंतरराष्ट्रीय कायद्याचा भंग झाला किंवा सीमाप्रदेशावर आक्रमण झाले अशी कोणतीही तक्रार करणार नाही. अण्वस्त्र-निर्मितीवर बंदी घालण्यासाठी निदर्शने करणार नाही किंवा शिष्टमंडळ पाठविणार नाही. अनंत अवकाशात, त्या अगाध पोकळीत माणसाच्या त्या मर्कटचेष्टा पाहून आकाश हसेल आणि मनातल्या मनात म्हणेल, " काय माणूस वेडा आहे पाहा. " पण आकाश काही म्हणो, ही पृथ्वी सुरक्षित राहण्यासाठी राक्षसी महत्त्वाकांक्षेने प्रेरित झालेल्या माणसांनी आकाशावर स्वारी केली तर फार फार बरे होईल.

दुर्दैव असे आहे की या आकाशाचाही उपयोग माणूस पृथ्वी बेचिराख करण्यासाठी करू पाहत आहे. माजलेला बैल वाळूत शिंगे खुपसून आपला कंडू शमवितो तसा आपल्या कंडूशमनार्थ त्याला आकाशाचा उपयोग करावयाचा नाही. आपण निर्माण केलेल्या भयानक अस्त्रांचा त्याला आकाशातून पृथ्वीवर मारा करावयाचा आहे आणि अंतरिक्षावर गागारिनने जेव्हा पहिली स्वारी केली तेव्हाच हा उद्देश स्पष्ट झाला होता. या अंतराळ वीरांचे मॉस्कोत प्रचंड स्वागत झाले. त्या वेळी या अंतरिक्ष गमनात संरक्षणाची शक्यता दडलेली आहे असे क्रुश्चेव्हने मोठे सूचक उद्गार काढले होते. ( Space flight conceals broad facilities for defence ) म्हणजे अंतरिक्ष यान ही लष्करी तंत्र व लष्करी डावपेच यांत क्रांती होण्याची नांदी ठरणार असा याचा स्पष्ट अर्थ आहे. अंतरिक्ष यानाने होणाऱ्या या क्रांतीचे स्वरूप काय राहील? अंतरिक्ष यानाचे जे काही विविध उपयोग होऊ शकतील त्यावर या क्रांतीचे स्वरूप अवलंबून राहणार हे अगदी उघड आहे. एकमेकांच्या देशांतील लष्करी तळांवर, अण्वस्त्रनिर्मितीच्या केंद्रांवर आणि इतर मोक्याच्या जागांवर सुरक्षितपणे पाळत ठेवता येते हा या अंतरिक्ष यानाचा पहिला उपयोग. ज्या ठिकाणाहून चीनने पहिला स्फोट केला त्याची अमेरिकेला याच साधनाने उत्कृष्ट छायाचित्रे मिळू शकली. शत्रुपक्षाकडून क्षेपणास्त्रे फेकली जाण्याचा संभव आहे अशी सावधगिरीची सूचना अंतरिक्ष याने सुरक्षितपणे व अती लौकर देऊ शकतात. हा या अंतरिक्ष यानाचा दुसरा उपयोग आणि दोन्ही गट या अंतरिक्ष यानांचा त्या दिशेने उपयोग करण्याच्या खटपटीत आहेत.

पण लष्करी तंत्रात क्रांती करणारा अंतरिक्ष यानाचा सर्वांत महत्त्वाचा उपयोग कोणता असेल तर त्याचा ' स्पेस बॉंबर ' म्हणून केला जाणारा उपयोग.

बॉंबफेकी विमानाप्रमाणे ही क्षेपणाशास्त्रापैकी आकाशयाने. गागारिनच्या पहिल्या उड्डाणाच्या वेळीच रशियन युद्धतंत्रविशारदांनी आकाशयानाचे हे लष्करी महत्त्व जाणले होते आणि आता अमेरिकेनेही ते ओळखले आहे. अंतरिक्ष यानाच्या गतीचे भूमीवरून नियंत्रण करता आले आणि क्षेपणास्त्रे सामावू शकतील एवढे अंतरिक्ष यान मोठे असले की या अंतरिक्ष यानाचा अण्वस्त्रयुद्धात प्रभावी रीतीने उपयोग होऊ शकतो. कारण जमिनीवरील अग्निबाणांतून फेकल्या जाणाऱ्या क्षेपणास्त्रांची गती कितीतरी पटीने अधिक असते. दुसरे जमिनीवरून होणाऱ्या हल्ल्यात प्रतिपक्षाकडून प्रतिहल्ला होण्याचा संभव असतो. जमिनीवरील अग्नि-बाणांचे तळ उद्ध्वस्त करता येतात. पण पृथ्वीपासून कितीतरी मैल दूर अंतरावर फिरणाऱ्या या अंतरिक्ष यानांवर प्रतिहल्ला चढविणे जवळजवळ अशक्य आहे. आणखी असे की, ही अंतरिक्ष याने पृथ्वीभोवती तासातासांनी एकसारखी प्रदक्षिणा घालीत राहणार. तेव्हा क्षेपणास्त्रांचा मारा होण्याची भीती सतत कायम राहून शत्रुपक्षाचे नीतिधैर्य खच्ची करण्याचे कार्यही सशस्त्र अंतरिक्ष याने करीत राहतील. आणि दोन्ही बाजूंकडून ही अंतरिक्ष याने आकाशात सोडण्यात आली तर सबंध मानवसमाजावर ही विनाशाची तलवार सतत टांगती राही. यात काहीच शंका नाही. आर्थिकदृष्ट्याही ही अंतरिक्ष याने कमी खर्चाची ठरतील अंतरिक्ष यान तयार करण्याचा खर्च मोठा असतो. पण तयार होऊन एकदा का ते आकाशात सोडले की त्याला इंधन नको किंवा दुरुस्तीचा खर्च नको. अग्नि-बाणांचे तळ व विमानतळ यांची सुस्थिती राखण्यासाठी जसा वर्षावर्षाला खर्च करावा लागतो, तसा अंतरिक्ष यानाचा कोणताही खर्च लागणार नाही आणि अंतरिक्ष यानांच्या उत्पादनाचा खर्च मोठा असला तरी, हे चालू खर्च व वरखर्च वाचल्यामुळे आर्थिकदृष्ट्या सशस्त्र अंतरिक्ष यान अधिक परवडणारे आहे.

चार-पाच दिवसांपूर्वी कोसिजनने आपल्या एका वक्तव्यात रशियाने अंतरिक्ष शास्त्राचा उपयोग करून प्रभावी अस्त्रे निर्माण केली आहेत असे सांगितले.

रशियाची ही धमकी पोकळ नाही याची वरील विवेचनावरून खात्री पटावी म्हणजे एकंदरीत फलनिष्पत्ती काय झाली? ज्या आकाशात आकाशवीरांना अवर्णनीय सुंदर रंग दिसतात, त्या आकाशातून त्या सर्व रंगांचा बेरंग करणारी विनाशक आग ही अवकाशयाने पृथ्वीवर ओकू लागणार ही विज्ञानाची केवढी शोकांतिका आहे बरे! आकाशस्थ परमेश्वरा! बरे वाटते तुला हे? ज्या सैतानाने आदिमायेला ज्ञानवृक्षाचे फळ चाखायला लावून सर्व मानवजातीचा अधःपात घडवून

आणला तोच सैतान, तोच पतित देवदूत तुझ्या मांडीला मांडी लावून सर्व मानवजातीचा निःपात करणार आणि ' तुझ्यावर कशी मात केली ' या विजयी मुद्रेने विकट हास्य करणार! याच गगनपथावर रवी चोवीस तासांत प्रदक्षिणा करीत असताना पृथ्वीवरच्या मानवांना प्रकाश व उष्णता देऊन त्यांचे संरक्षण करीत असतो. त्याच गगनपथावर रवीच्या तुलनेने खद्योतासारखी दिसणारी ही अंतरिक्ष याने मानवाचा विध्वंस करण्यासाठी शस्त्रास्त्रांचा मारा करणार! जेथे देवदूत जाण्यास कचरतात तेथे मूर्ख धिटाईने पुढे सरसावतात!

या पृथ्वीच्या शंभर मैल उंचीच्या परिसरातच अजून मानव संचार करीत आहे. पण त्याची महत्त्वाकांक्षा चंद्रावर स्वारी करण्याची आहे.

कविजनांनी वर्णिलेला चंद्र यापुढे दिसणार नाही अशी कविजनांना खंत वाटेल. पण विज्ञान व काव्य यांचे अहिनकुलवत सख्य प्रसिद्धच आहे. दुरून सुंदर दिसणाऱ्या या चंद्राचा सुंदर मुखचंद्रमा जवळून पाहून, तो किती रुक्ष, बेढब, ओबडधोबड आहे हे विज्ञानाने सिद्ध केले आणि कविसृष्टीचा विध्वंस केला. ठीक आहे. करू द्या त्यांना काव्यसृष्टीचा विध्वंस. पण परवा एका फ्रेंच शास्त्रज्ञाने बातमी अशी सांगितली की, अमेरिका या चंद्राचा लष्करी तळ बनविणार आहे म्हणून! ज्याने शीतल चंद्रकिरणांचा वर्षाव करावा तो चंद्र या पृथ्वीवर अग्निकिरणांचा वर्षाव करू लागणार ही कल्पनाच अंगावर शहारे उभी करणारी आहे. वैज्ञानिक काव्यसृष्टीच्या विध्वंसावर संतुष्ट नाहीत. त्यांना सत्यसृष्टीचाही विध्वंस हवा आहे. चंद्राचा उपयोग रमणीच्या मुखाला उपमा देण्यासाठीच आहे ही अतिशयोक्ती आपण कविकल्पना म्हणून सोडून देऊ. पण पौर्णिमेच्या रात्री चंद्राचे चांदणे किती सुखकर, आल्हाददायक असते हे सत्य तर कोणाला नाकारता येणार नाही. अशाच एका पुनवेच्या रात्री कोणी पिकनिक-साठी बागेत आले आहेत, काही जोडपी प्रीतीचे हितगुज करण्यात दंग झाली आहेत, तर कित्येक त्या स्वच्छ रुपेरी चांदण्याची मजा लुटण्यासाठी उगाचच भट-कत आहेत. आणि अशा वेळी चांदण्याची बरसात संपूर्ण अग्निवर्षाव सुरू झाला तर या पृथ्वीवर केवढा हलकलोळ उडेल याची कल्पनाच करवत नाही. चंद्रतळ आणि लष्करी तळ! दोन कल्पनाच किती परस्पर विरोधी आहेत नाही? रमणी-च्या दंडात जर गोटी पाहिली तर कसेसेच वाटणार नाही? पण जगातल्या सौंदर्याचाच विध्वंस करायला निघालेल्या असुरांना ही सौंदर्यगीता सांगून काय उपयोग!

कित्येक वर्षांपूर्वी प्रसिद्ध तत्त्ववेत्ता बर्ट्रांड रसेल याने विज्ञानावर ग्रंथ प्रसिद्ध केला होता. ' वैज्ञानिक दृष्टिकोण ' हे त्या ग्रंथाचे नाव.

त्या ग्रंथात त्याने ' विज्ञान आणि मूल्ये ' या नावाचे एक प्रकरण लिहिले असून त्या प्रकरणात त्याने हाच इशारा दिला होता की, विज्ञान मानवाच्या हातात अपरंपार सत्ता देऊ लागले आहे. त्याला मानवी मूल्यांचा अंकुश नसेल तर या मानवाचे दानवात रूपांतर झाल्याशिवाय राहणार नाही. या पंचमहाभूतांवर माणसाचे स्वामित्व नव्हते, त्या वेळी तो विनम्र होता. या विश्वाचा तो उपासक होता. विज्ञानाने त्याला जगाचा ताबा दिला. पंचमहाभूतांवर त्याचे स्वामित्व प्रस्थापित झाले. ' स्वामी तिन्ही जगांचा ' ही उद्दाम भावना त्यांच्यात जागी झाली. आणि परिणाम एवढाच झाला की, या सृष्टीने त्याला जे काही सामर्थ्य दिले त्याचा तो भस्मासुराप्रमाणे आत्मनाशासाठी उपयोग करू लागला आहे. म्हणून प्रथमच मी सांगितले की, आकाश, मानवाकडे पाहून हसत आहे. ' काय मूर्ख आहे हा माणूस ? ' असे त्याला हसत आहे. या आकाशात मानवाने संचार केला, तेथून पृथ्वीवर अस्त्रे फेकली, काय होणार आहे आकाशाचे वाकडे ! काय आकाश कमी होणार आहे ? का भयभीत होणार आहे ? आकाश आहे तेथेच राहणार आहे. आहे तसेच राहणार आहे. त्या आकाशाचा शोध घेण्याच्या निरागस बुद्धीने मानवाने संचार केला तर केव्हाना केव्हा तरी, या अनंत अवकाशाचा त्याला थोडा तरी ठाव लागेल. नाहीतर माणसाचे करंटेपण मात्र उघडे होईल.

( ता. ४-४-१९६५ )

## वाङ्मयीन

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ४४०६२ ...... दि:
क्रमांक ९६२१ ...... नों: दि:

१

# शाकुंतलचा आठवा अंक

शाकुंतलचा आठवा अंक! गेल्या सप्ताहात आपले प्रसिद्ध साहित्यिक श्री. वि. स. खांडेकर यांनी नागपूरला व्याख्यान दिले यांच्या व्याख्यानाचा हा विषय–' शाकुंतलाचे सात अंक आदर्शवादी आहेत. ' या सात अंकांत कविकुलगुरूने वास्तवतेवर आदर्शवाद लादून ललित कलाकृतीचा तोल बिघडविला, असा त्यात कविकुलगुरूवर आधुनिक लेखकांचा आक्षेप आणि तो समतोल प्रस्थापित करण्यासाठी कालिदासाने आठवा अंक लिहावा अशी या आधुनिक लेखकांची मागणी. ही मागणी पुरी करण्यासाठी कविकुलगुरूला काय लिहावे व काय चित्र रेखाटावे लागेल? निसर्गक्रमाने शकुंतलेला अनेक मुले झालेली आहेत असे दाखवाने लागेल, असे श्री. भाऊसाहेब खांडेकर सांगतात; पण भाऊसाहेबांना नम्रपणे सुचवावेसे वाटते ते हे की शकुंतलेला मुलगा झाल्याचे कविकुलगुरूंनी सातव्या अंकात दाखविले आहे." हा, तो मुलगा त्या अंकात मोठा दाखविला आहे, ही गोष्ट खरी. तेव्हा पाचव्या अंकात मेनकेने शकुंतलेला, आपन्नसत्वा शकुंतलेला मारीच ऋषींच्या आश्रमात नेल्यानंतर, सहाव्या अंकाच्या प्रारंभाला शकुंतला सुखरूप प्रसूत झाली असावी असा तर्क वाजवी ठरेल; पण काही झाले तरी शकुंतला पुत्रवती होण्याची वास्तववादी क्रिया कविकुलगुरुने आपल्या नाटकात पडद्याआड दाखविलेली आहेच. आता ही क्रिया पडद्याआड का म्हणून? उघड का नाही? असा आजचे वास्तववादी लेखक

आक्षेप घेत असतील आणि या वास्तववादी चित्रणासाठी आठवा अंक लिहावा अशी त्यांची मागणी असेल तर गोष्ट निराळी !

प्रसूतिक्रिया ही शंभर टक्के वास्तववादी क्रिया आहे. वास्तवावर आदर्शवाद लादून होणारी ही क्रिया नाही. या विषयावर कविकुलगुरूंचाही मतभेद न व्हावा. मग या महाकवीने का बरे ही वास्तवता चित्रित केली नाही ? सहाव्या अंकात दुष्यंत शकुंतलेच्या आठवणीने विव्हल झाला. भ्रमिष्टासारखे वाटेल तसे बडबडू लागला. चित्रात त्याला खरी शकुंतला दिसू लागली. ही काय वास्तवता झाली ? माणसे पत्नि-प्रेमाने इतकी का दुःखी होतात ? आठवण राहिली नाही आणि पत्नीचा त्याग केला म्हणून माणसाला एवढा का पश्चात्ताप होत असतो ? हे कविकुलगुरू, या नवलेखकांनी निर्माण केलेल्या शकुंतला एकदा पाहा तर खरे ! नवऱ्याने कानांवर हात ठेवले तर त्या शकुंतलेसारख्या मुळूमुळू रडत बसत नाहीत ! न्यायालयात जातात. साक्षीदार उभे करतात आणि त्यांना चांगली अद्दल घडवितात. 'दोन घडीचा डाव मांडिला' असल्या प्रेमाचा पुरस्कार करणाऱ्या शकुंतला, दुष्यंताने स्वीकार केला नाही ही आपत्ती न मानता इष्टापत्ती समजून सरळ निघून जातात. माहेरी अथवा बाहेरी ! पण कुठे तरी निघून जातात आणि आधुनिक दुष्यंतही शकुंतलेच्या आठवणीने इतके घायाळ होत नाहीत. तसे त्यांना वाटते काहीतरी. हृदयात होते काहीतरी; पण तू जेवढे रंगविले आहेस तेवढं होत नाही.

पत्नी गेली तर तेवढाच खर्च वाचला. तिला पोसण्याचा आणि बाळंतपणाचा. या जाणिवेने समाधानही वाटते. हे कालिदासा ! विरह-व्यथेच्या या सूक्ष्म छटा दाखवून सहावा अंक का बरे तू बिघडवून टाकलास ? कलाकृतीला त्यायोगे तोल जातो एवढे देखील तुला समजू नये ? त्यापेक्षा शकुंतलेचे बाळंतपण हा सहाव्या अंकातील चित्रणाचा विषय निवडला असतास तर किती वास्तववादी चित्र झाले असते ते ! त्यासाठी आठवा अंक लिहिण्याची शिक्षा वास्तववादी लेखकाने तुला फर्माविली आहे.

कदाचित हे कविकुलगुरो, प्रसूती हा काय नाटकाचा विषय आहे, असे तुला वाटले असेल; पण तुझा वास्तववादाशी संबंध नाही असाच याचा अर्थ होत नाही काय ? अरे, 'प्रेमा तुझा रंग कसा' असा प्रेमाचा रंग शोधता शोधता अखेर मांडीवर एक बछडे घेऊन त्या प्रणय रंगाची पूर्ती व्हावी यालाच वास्तवता म्हणतात. या वास्तवतेला प्रणयरंगाची तार्किक परिणती म्हणजे प्रसूती पडद्याआड व्हावी हे साफ नामंजूर. प्रणयकूजनासाठी नाटकाचे अंकच्या अंक खर्ची पडावेत हे या वास्तवतेला साफ नामंजूर आहेत. प्रणयाची वास्तवता ती

केवढी ! ‘ तो आला. त्याने पाहिले आणि तो प्रेमात पडला ’ बस्स. एवढीच ही वास्तवता ! या टीचभर वास्तवतेसाठी सारे सात अंक वाया घालवयाचे, हे या वास्तवतेला साफ नामंजूर आहे ! आणि या प्रणयात चंद्र कशाला ? या चंद्राचे माहात्म्य आता संपुष्टात आले असून माणूस चंद्रावरच स्वारी करण्यास सज्ज झाला आहे. प्रिय सखीच्या मुखाला चंद्राची उपमा देण्याइतका चंद्र आता सुंदर राहिला नाही ! किंवा आपल्या शीतल चांदण्याने कामज्वर वाढविण्याइतके सामर्थ्यही या चंद्रापाशी उरलेले नाही. तेव्हा चंद्र, चांदणे, चंदनाची उटी, पुष्पवाटी हा अवास्तव पसारा वाढवून प्रणयाचे पापुद्रे सोलण्याचे व्यर्थ उद्योग तू का केलेस बरे ? त्यापेक्षा फार तर एका अंकात शकुंतलेचे प्रेम उरकून घेऊन, तिचा संसार कसा वाढत चालला, तिचे बाळंतपण किती थाटामाटात झाले, मुलाच्या नामकरणप्रसंगी एखादा नवकवी, नवनाट्यवादी हजर होता की नाही, असे काही दाखविले असते तर ‘ शाकुंतल ’ किती वास्तववादी झाले असते. यासाठी कालिदासा ! आठवा अंक लिहिण्याची शिक्षा तुला फर्माविण्यात आली आहे ! !

वास्तववादी नाट्यात कृतीवर भर असतो हे तुला माहीत नसावे असे दिसते. नाहीतर प्रेमासाठी इतकी चरपटपंजरी दुष्यन्ताने केली नसती. अरे प्रेम कुणी बोलत नाही; प्रेम करतात. प्रेम हा बोलण्याचा विषय नाही, करण्याचा विषय आहे. ‘ प्रेम कोणी की करीना ’ अशी आज वास्तवतेत सर्वत्र हाकाटी सुरू आहे. प्रेम जडते; प्रेमात माणूस पडतो हे सारे वास्तवाला धरून असले, तरी त्या प्रेमापायी कोणी आजारी पडल्याचा दाखला चुकूनसुद्धा मिळणार नाही. शकुंतला प्रेमज्वराने लतामंडपात अत्यवस्थ झाल्याचे दाखवून तू वास्तवतेवर आदर्शवाद लादलास याला काय म्हणावे ? अरे, प्रेम हा काय मलेरियाचा जंतू आहे का फ्ल्यूचा हल्ला आहे की याची बाधा होताच माणसे जायबंदी होऊन अंथरुणाला खिळून राहावीत ! आणि राजा असून दुष्यंत झुरणीला लागावा याला तरी वास्तवता म्हणता येईल काय ? दुष्यंत-शकुंतला यांचा प्रेमाचा एवढा फापटपसारा वाढविण्याऐवजी, शकुंतलेच्या संसाराचा पसारा वाढवून दाखविला असतास तर हेच अभिज्ञान शाकुंतल किती वास्तववादी झाले असते. म्हणून वास्तववादी लेखकांनी तुला आठवा अंक लिहिण्याची शिक्षा फर्माविली आहे !

हे कविकुलगुरू,. शकुंतलेच्या प्रसूतीचे चित्र रेखाटताना काय अडचणी तुझ्या समोर आहेत याची आम्ही कल्पना करू शकतो. मारीच ऋषींच्या आश्रमात शकुंतला प्रसूत झाली. ती गरोदर असताना मेनकेने तिला एकदम उंच आकाशात नेले. त्या धक्क्याने ती नऊ महिने पूर्ण होण्यापूर्वी प्रसूत झाली की, नऊ महिन्यांनंतर झाली, हा वैद्यक शास्त्राचा विषय आहे. आजकाल एस्. टी. ची गाडी,

आगगाडी यांत स्त्रिया प्रसूत झाल्याची वास्तवता लक्षात घेता, शकुंतला ज्या अर्थी आश्रमात प्रसूत झाली त्या अर्थी तिला अंतराळगमनाचा धक्का जाणवला नसला पाहिजे. त्या काळी लोकसंख्येची वाढ इतकी झपाट्याने होत नव्हती आणि धान्य-टंचाईही भासत नव्हती. तेव्हा शकुंतलेची प्रकृती ठणठणीत असावी असा तर्क केल्यास तो वास्तवतेला सोडून होणार नाही; पण ऋषींचा आश्रम म्हणजे मॅटर्निटी होम नव्हे! ना, तेथे डॉक्टर, ना तेथे नर्स! तारीख घेऊन मॅटर्निटी होम-मध्ये प्रवेश करण्याची सोय नाही. एवढ्या उंच जागी या सर्व सोयींनी सुसज्ज असे प्रसूतिगृह दाखवावे कसे आणि तसे ते दाखविल्यास तें वास्तववादी ठरेल काय ? पण कविकुलगुरो, तू अलीकडच्या नवकवींच्या करामती पाहिल्या नाहीस असे वाटते ! अरे, या कवींनी हिमालयाच्या माथ्यावर चिंधीचा शोध लावला आहे. तेव्हा मारीच ऋषींच्या आश्रमात एक अद्ययावत मॅटर्निटी होम आहे, शुभ्र वस्त्रांकिता नर्स इकडून तिकडे हेलपाटे घालीत आहे, मेनका बाहेर काळजी करीत बसली आहे, इतक्यात पोराचा ट्यॉंवट्यॉंव ऐकून ती समाधानाचा सुस्कारा सोडीत आहे, डॉक्टर बाहेर येऊन मेनकेला 'कॉंग्रॅच्युलेशन्स' देत आहे, अशा काही 'स्टेज डायरेक्शन्स' दिल्या असत्यास तर त्या वास्तववादाला धरून झाल्या असत्या ! हे काहीही न लिहिता दुष्यंत शकुंतलेची आठवण काढकाढून ढसढसा रडत होता, याचे तू चित्रण केलेस ? काय म्हणावे तुला ? म्हणून वास्तववादी लेखकांनी तुला आठवा अंक लिहिण्याची शिक्षा फर्माविली आहे.

वास्तविक शकुंतलेची सासरी पाठवणी करताना, तुझा मुलगा राज्यावर बसला की तू पतीसहित या शांत आश्रमात म्हातारपणी प्रवेश करशील असे कण्वांनी तिला आश्वासन दिले होते. तू मात्र शकुंतलेशी दुष्यंताचे पुनर्मीलन झाल्यानंतर नाटक तसेच अर्ध्यावर सोडून दिलेस. अरे, खरे वास्तववादी नाटक तर पुढेच आहे! प्रेम आणि लग्न ही त्या वास्तववादाची प्रस्तावना. प्रस्तावनेतच नाटक संपले! काय म्हणावे या नाटकाला! वास्तववादासाठी आठवाच काय; पण आणखी सात अंक लिहिण्याची शिक्षा तुला द्यायला हवी. हे कालिदासा! तू म्हणशील की शकुंतलेला केवळ एकच मुलगा झाला. तेव्हा आणखी सात अंक हवेत कशाला ? धृतराष्ट्र आंधळा होता तरी त्याला शंभर मुले झाली. पाच पांडवांना द्रौपदीखेरीज त्यांच्या त्यांच्या स्वतःच्या बायका होत्या आणि त्यांपासून त्यांना संतती झाल्याचे महाभारतात नमूद आहे. बाप्पा रावळच्या पराक्रमाने राजस्थान निर्माण झाला हे तर ऐतिहासिक सत्यच आहे आणि एवढा इतिहासाचा दाखला तरी हवा कशाला ? अरे! सध्या एवढी कुटुंब नियोजनाची मोहीम चालू असताना लोक-संख्येची वाढ झपाट्याने होत आहे, असे आम्ही पाहतो. आणि शकुंतलेला फक्त एकच मुलगा ? छे ! छे ! आदर्शवादाचा वास्तवावर तू अगदी अत्याचार केला

आहेस ! या आधुनिक भारतात फक्त पंडित नेहरूच काय ते एक अपत्यवान होऊन गेले; पण या अपवादाने नियम उलटा सिद्ध होतो. तेव्हा हा जो तू आदर्शवाद स्वीकारलास तो पुसून टाकण्यासाठी तरी तुला आठवा अंक लिहावा लागेल !

निसर्गक्रमाने शकुंतलेला मुले झाली हाच खरा वास्तववाद. आणि मारीच ऋषींच्या आश्रमातून दुष्यंत सहकुटुंब सहपरिवार राजधानीत परत आल्यानंतर या वास्तववादाला प्रारंभ होतो. त्यापूर्वी जे घडले तो काही नाटकाचा विषय नाही आणि असला तरी तू ज्या पद्धतीने तो विषय मांडलास ती पद्धती वास्तवाला धरून नाही. एखाद्या राजाचे एखाद्या रानावनात राहणाऱ्या मुलीवर मन गेले तर त्यासाठी त्या राजाला एवढी खटपट करावी लागते ? एखाद्या ऋषीची त्याला एवढी भीती वाटते ? सत्ताधारी लोक असली लफडी कशी सफाईने पार पाडतात, याची कालिदासा तुला कल्पना नाही आणि परत करूनसवरून नामानिराळे राहण्याची कलाही त्यांना अवगत असते. त्यासाठी दुर्वासाचा शाप कशाला हवा ? हो, काही चिठ्ठीचपाटी वा कोर्टात पुरावा शाबीत होईल अशी खूण नसली म्हणजे झाले ! येथे तर दुष्यंताच्या नावाची अंगठी होती. तीही हरवली ! तेव्हा दुष्यंताचा प्रोफ्यूमो बनण्याची बिलकूल धास्ती नव्हती. या कामात दुर्वास पडण्याची काही गरज नाही ! राजे लोक भानगडी करतात आणि दुर्वास असो वा नसो, मनात आणले तर त्या अंगाबाहेर टाकून देतात. वास्तववाद हा असा आहे अलीकडची कोणतीही वास्तववादी नाटके पाहा. अगोदर त्यांत राजे असत नाहीत. कारण राजा ही आता वास्तवता राहिली नाही ! आता राज्य लोकसेवकांचे आहे. लोकांना अजून राजेशाहीची सवय आहे म्हणून कोणी त्यांना मंत्री म्हणतात. बाकी वास्तवात ते जनसेवक ! त्यामुळे त्यांच्या जीवनात ज्या काही भानगडी असतील त्या मिटविण्यासाठी त्यांना दुर्वासाची गरज लागत नाही. वास्तव जीवनात भानगडी केल्याची विस्मृती कोणाला होईल ? पण देशकाल पाहून तसे विस्मरण झाल्याचे दाखवावे लागते आणि अंगावरचे शिंगावर घेण्यासाठी या विस्मरणाचा बहाणा अगदी बेमालूम वठविला जातो. वास्तववादी जीवनात नाट्य आहे ते हे आहे आणि किती नाट्यमय असे नाट्य आहे हे. कविकुलगुरो, दुर्वासाच्या शापाची भानगड करून तू या वास्तववादी नाट्याचा अगदी चोळामोळा करून टाकलास ! म्हणून आठवा अंक तुला लिहिलाच पाहिजे.

आठव्या अंकापासून फिरून सात अंक कालिदासाने लिहावेत हे देखील वास्तवाला धरून नाही. वास्तववादी नाट्याची मर्यादा तीन अंकांबाहेर जाता कामा नये. शाकुंतलातले मूळचे सात अंक हेच मुळी अवास्तव आहेत. शाकुंतल, वास्तववादी शाकुंतल, तीन अंकीच असले पाहिजे. ते बारा वाजता संपले पाहिजेत.

लोकल पकडता यावी म्हणून ते बारा वाजता संपवावे असे नाही. नाटकातील वास्तवता आणि जीवनातील वास्तवता यांना रात्र अशी अर्धी अर्धी वाटून दिली जावी. ती देखील वास्तवताच नव्हे काय ? सबंध रात्र नाटकातील वास्तवतेपायी घालविल्यानंतर, दिवसा का जीवनातील वास्तवता अनुभवावी ? म्हणून तीन अंक. दोन अंक झाले की, निसर्ग-क्रमाने त्यांतून तिसरा अंक निघावा आणि खेळ खलास व्हावा. तेव्हा प्रतिभेचा विलास म्हणून ख्यातनाम झालेल्या कालिदासा ! सारे शकुंतला-दुष्यंत चरित्र तुला तीन अंकांत दाखविणे भाग आहे. तुला काही अडचण भासत असेल तर त्यासाठी वास्तववादी लेखक तुला ' टिप्स ' देतील. तयारच आहेत ते. दुष्यंत शकुंतलेला पाहतो. त्याला ती आवडते, त्याची मालिनी तीरावर गाठ पडते, वडील परगावी गेलेले असतात, तेव्हा तीही अडचण राहिलेली नसते. दोघांचा ' गांधर्व-विवाह ' म्हणजे मॉडर्न पद्धतीने विवाह होतो. ह्यासाठी तीन अंक कशाला? अर्ध्या अंकाचाही हा विषय नाही. राजधानीला परतल्यानंतर शकुंतला त्याच्याकडे राहायला येते. त्या वेळी ही भानगड राजधानीतल्या जनतेला कळू नये ! हा विषय कसा महत्त्वाचा आहे ? पण शाप ! नको तो शाप ! ! आपण भानगड केलेली नाही एवढे लोकांचे समाधान झाले की मागील दरवाजाने शकुंतलेला आत घेण्याची व्यवस्था करावी म्हणजे शंभर टक्के वास्तवता. असो; पण या टिप्स देण्याचा अधिकार वास्तववादी लेखकांचा आहे. मुख्य तात्पर्य, शाकुंतल तीन अंकी असावे हे आहे. अरे ! वाईट वाटून घेण्याचे कारण नाही. इंग्लंडचा एवढा मोठा महाकवी शेक्सपिअर, त्याचे हॅम्लेट देखील या वास्तववादी लोकांनी तीन अंकी नाटक केले. मग बोलूनचालून तू तर आमचाच. तुझ्या शाकुंतलाचा निकाल लावावयाला कितीसा उशीर !

आणखी एक शेवटची टिप. दिग्दर्शन, नेपथ्य, सजावट, प्रकाश-योजना, पार्श्वसंगीत यांची अडचण भासली तर ती सोय या शहरात आहे. या शहरात रात्रीच्या बोलीने नटनटी, नेपथ्यकार, दिग्दर्शक सारे काही मिळते. किती भरपूर प्रमाणात वास्तववाद येथे पसरला आहे !

( १-११-१९६४ )

२

# दुर्बोधतेची दुर्बोध मीमांसा

हैद्राबादच्या साहित्यसंमेलनात ‘ कवि व कविता ’, ‘ अपेक्षा व अडचणी ’ या विषयावर परिसंवाद ठेवलेला होता. या परिसंवादात भाग घेणारे सारे नव-कवी व नवकाव्याचे समर्थक होते. पहिल्या वक्त्याने ‘ काव्यात्मक दुर्बोधता ’ या विषयावर गहन निरूपण केले आणि मग गाडीचे जे शंटिंग झाले, ते थेटपर्यंत. मूळ विषय बाजूला राहिला आणि दुर्बोधतेचे पुराण सुरू झाले. कवी काव्य प्रसवतात तेव्हा ते निरंकुश असतात असे नाही. ते काव्यावर भाषण करतात तेव्हाही निरंकुश असतात, असे फिरून एकवार सिद्ध झाले !

काव्यात्मक दुर्बोधतेवर इतका दुर्बोधक परिसंवाद मी तरी अजूनपर्यंत ऐकला नव्हता. नवकवींचे काव्य दुर्बोध असते अशी आपल्या काव्यावर टीका होते हे गृहीत धरून, स्वसमर्थनपर ही प्रवचने होत होती. या समर्थनात या नवकवींनी केलेली चपळाई लक्षात घेण्यासारखी आहे. नवकाव्य दुर्बोध असते एवढीच काही नवकाव्यावर टीका होत नाही. ते निरर्थक असते अशीही त्या काव्यावर टीका होते. तेव्हा या नवकवींनी क्लृप्ती काय लढविली ते पाहा. दुर्बोधतेचा आक्षेप मान्य केला आणि हा आक्षेप मान्य करण्याने निरर्थकतेचा आक्षेप उडवून लावण्याचा प्रयत्न केला; पण ही चलाखी चालणार नाही! नवकविता दुर्बोध आहे, तशीच ती निरर्थक आहे. या दोन्ही आक्षेपांना त्यांच्याकडून उत्तरे अपेक्षित आहेत. प्रा. जोगांना बोलाविले ते जोगांची भूमिका सौम्य आहे म्हणून.

प्रा. जोगांनी उत्तर देताना फिरून एकवार, ‘ मुख्यार्थाची कैफियत ’ मांडली. पण आक्षेप आहे तो हा की, नवकाव्यात केवळ मुख्यार्थच नसतो असे नसून त्या काव्यात कसलाच अर्थ नसतो !

हे चापल्य क्षणभर दृष्टीआड करून काव्यात्मक दुर्बोधतेच्या मीमांसेचाच विचार केला तरी दुर्बोधतेचे समर्थन करण्यासाठीदेखील एवढी दुर्बोधतता निर्माण करण्याची काय गरज होती, असा प्रश्न मनात येतो. काव्य करताना नवकवी दुर्बोध होतात हे एक वेळ समजण्यासारखे आहे; पण आपल्या काव्यातील दुर्बोधतेवर प्रकाश टाकतानाही त्याला बाळबोध नसले तरी सुबोध विवेचन करता येऊ नये, याचे मोठे नवल वाटते. दुर्बोधतेची मीमांसाही दुर्बोध असावी ? म्हणजे पुढील संमेलनात आमची मीमांसा देखील दुर्बोध का असते, यावर परिसंवाद घडवून आणण्याची ही तयारी दिसते ! यातील इंगीत मला दिसते ते असे की, या लोकांचा सारा काव्यविचार परभृत आहे. कै. शेजवलकरांनी एका प्रस्तावनेत असे तिखट लिहिले होते की, विलायतेतील ग्रंथ घेऊन येणारी बोट जर का अकस्मात बुडाली तर आपल्या येथील कित्येक विद्वानांची विद्वत्ता संपुष्टात येण्यास विलंब लागणार नाही. या दुर्बोधतेची मीमांसा करताना वाक्यरचना देखील इतकी क्लिष्ट व अ-मराठी होती की, बोलणारे मराठी अक्षरांचा उपयोग करीत असले तरी त्यांच्या आंतरमनात इंग्रजी वाक्येच घोळत होती असा एकसारखा भास होत होता. सारे परभृत ! सारे उधार आणि उसनवार !

पाश्चात्य ज्ञान व पाश्चात्य साहित्य टाकून द्यावे, या मताचा मी नाही. उलट त्यातील ज्ञानाचे व वाङ्मयाचे स्वागत केले पाहिजे. असा नवकवी व त्याचे समर्थक यांच्यापेक्षाही मी जोरदार आग्रह धरणारा आहे. पण अन्नाप्रमाणे ज्ञानही पचावे लागते ! कै. आगरकरांनी म्हटल्याप्रमाणे आपल्या मूळ भारतीय प्रकृतीशी या ज्ञानाचा जेवढा भाग सात्म्य पावण्यासारखा असेल तेवढा भाग त्या प्रकृतीशी एकरूप करून एक रांधा बनविला तरच ते ज्ञान प्रासादिक भाषेत मांडण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. नवकथा, नवनाट्य किंवा नवकाव्य हा सारा बौद्धिक अपचनाचा विकार जडल्याची लक्षणे होत. संमेलनात दुर्बोधतेचे ते अगडबंब व दुर्बोध समर्थन ऐकल्यानंतर तर माझी खात्रीच पटली की, या लोकांना अपचनाची बाधा झाली आहे !

काय सांगायचे होते या लोकांना ? आपल्या काव्यातील दुर्बोधतेचे कसले समर्थन करणार होते हे लोक ? दुर्बोधतेविषयी काय संदेश दिला त्यांनी ? एवढा फापटपसारा मांडून या लोकांनी जे सांगितले त्याचे बालबोध मराठीत सार एवढेच सांगता येईल की, आमचे काव्य दुर्बोध आहे, असे काव्यवाचकाला वाटले तर

तो दोष वाचकाचा आहे, आमचा नाही. थोडक्यात टीकाकार मूर्ख आहेत, आम्ही शहाणे आहोत, हे सांगण्यासाठी कठीण शब्दांचा उपयोग केला. क्लिष्ट वाक्यरचना वापरली आणि आपल्या काव्यातील दुर्बोधता सुलभ करण्याचे काम टीकाकारांचे आहे, असा टीकाकारांना हितोपदेश केला; पण हे सगळे सांगून झाल्यानंतर जे दशांगुळे उरले ते म्हणजे दुर्बोधतेचा आक्षेप मूर्खपणाचा आहे हे. काव्यातील दुर्बोधता हा दोष नाही तर तो या नवकाव्याचा गुण आहे असाही दावा करण्यात आला. यांना जे काव्य होते ते काव्य आणि काव्यरसांचा आस्वाद घेणारा रसिक यात फार मोठी दरी असते असाही एक शोध लावण्यांत आला.

असे सांगण्यात आले की, नवकवी आपले काव्य एक प्रकारच्या उन्मनी अवस्थेत प्रसवतो. तो जेव्हा काव्य निर्माण करतो तेव्हा त्याचा त्यालाच अर्थ कळत नाही. सबब आपल्या काव्याचा अर्थ सांगण्याची जबाबदारी त्याच्यावर नसतेच मुळी. ती जबाबदारी काव्यसमीक्षकांची. हे समीक्षक टीकाकार प्रो. क्षीर-सागर वा प्रो. जोग यांच्या जातीचे मात्र असता कामा नयेत. या नवकवींचे काव्य म्हणजे काहीतरी अद्‌भूत वा अचाट आहे अशी त्याची धारणा आहे. आणि जे नवकवींप्रमाणे आक्षेपकांना मूर्ख ठरविण्याच्या कलेत वाकबगार आहेत, असे आधुनिक मल्लीनाथ त्यांना हवेत ! असे समीक्षक नवकाव्यातील दुर्बोधता सामान्य रसिकांना अतिशय दुर्बोध भाषेत समजावून सांगतील आणि त्या दुर्बोधतेच्या माऱ्यापुढे हतबल होऊन रसिक ‘ समजले समजले, पण आता अंत पाहू नका ’ अशी कबुली देतील. थोडक्यात नवकवी आणि त्यांचे विशिष्ट जातीचे समीक्षक हा एक परस्पर प्रशंसा करणारांचा तांडा आहे. काव्याच्या ओळी बाहेर आल्या रे आल्या की, आदा करणारी ही टोळी आहे.

आचार्य भागवतांचा दाखला देण्यात आला. त्यांनी असे कोठेतरी म्हटले होते की, या नवकवींतून पुढेमागे एकादा महाकवी होणारच नाही असे नाही ! या दाखल्याचे येथे प्रयोजन काय ? या नवकवींतून भविष्यकाळात एखादा महाकवी निर्माण होईल या कल्पनेने सध्याच्या नवकाव्यावर, ते समजले नाही तरी टीका न करता टीकाकारांनी स्वागत करावे, असा यामागे हेतू दडलेला आहे काय? तसा हेतू असेल तर तर, तो साध्य होण्याचा संभव कमी दिसतो. होईलही एखादा महाकवी या नवकवींतून होईल. तेव्हा त्याला रसिक मान्यता देतील; पण यापैकी नक्की कोण महाकवि होणार हे जोपर्यंत निश्चयाने माहित नाही, तोपर्यंत भविष्यकाळाच्या मोघम वायद्यावर नवकाव्याची हुंडी आता वटवता येणार नाही. असा व्यवहार होत नाही. काव्यप्रांतातही होत नाही. महाकवीला, महापुरुषाला, अवताराला लोक मान्यता देतात. ते ‘बाप दाखव नाही-

तर श्राद्ध कर ' असा रोख-ठोक पद्धतीने. शियाय लोक मान्यता देणार ते महाकवीला देणार. त्याच्या अवतीभोवती असलेल्या गणगोताला नाही. वाल्या कोळ्याचा वाल्मीकी झाला म्हणून काही समस्त कोळी समाजाला लोक वाल्मीकमुनी समजून अभिवादन करणार नाहीत.

महाकवीचा विषय निघाला तेव्हा त्याविषयी आणखी विचार करावयास हरकत नाही. ज्यांच्या वाणीमागे अर्थ धावतो तो महाकवी अशी महाकवीची एक सुटसुटीत व्याख्या भवभूतीने केली आहे. या नवकवीची खूण नेमकी त्याच्या उलट दिसते. नवकवीच्या आशयामागे वाणीच धावत नाही. त्या कवीच्या मनात आशय फार. शब्द मात्र त्याचा मागोवा घेत नाहीत. कसा होणार महाकवी या मुशीतून ? सुजनांचा असा एक नियम आहे की फलनिष्पत्ती होण्यासाठी Potentiality स्वरूपयोग्यता असावी लागते. मुसळाला कोंब फुटत नाहीत किंवा वांझेला मुलगा होत नाही. तेव्हा प्रथम असे सिद्ध झाले पाहिजे की, महाकवित्व निर्माण करण्याची शक्ती सुप्त का असेना – नवकाव्यात आहे. जे सिद्ध व्हावयास हवे ते सिद्ध झाले असे गृहीत धरता येणार नाही.

ही उन्मनी अवस्थेची काय भानगड आहे ? काव्य प्रसवताना नवकवी एक प्रकारच्या उन्मनी अवस्थेत असतात. म्हणजे कोणत्या अवस्थेत असतात ? मला वाटते, नवकाव्याचे समर्थक शब्दाचा नेमका अर्थ लक्षात न घेता शब्दयोजना करीत असले पाहिजेत. नाहीतर त्यांच्या लक्षात आले असते की, उन्मनी अवस्थेत काव्य–प्रसव संभवत नाही. उन्मनी अवस्था ही अशी अवस्था आहे की, त्या अवस्थेत कसलेच मनोव्यापार होऊ शकत नाहीत ! निर्विकल्प समाधी म्हणजे उत्कट एकतानता. ' यथाप्रियया सह संपरिष्वक्तः न किंचन वेद, व बाह्यंनाभ्यंतरम् ' अशी या अवस्थेला उपनिषत्कारांनी प्रियालिंगनाची उपमा दिली आहे. या निर्विकल्प समाधीतून मनुष्य सविकल्प अवस्थेत उतरतो, तेव्हाच त्याला शब्द सुचतात. नवकाव्यच काय पण कोणतेही काव्य उन्मनी अवस्थेत स्फुरत नाही. मनोभावना, संवेदना जाणिवा व नेणिवा ह्या शब्दांत ग्रथित करण्यासाठी कवी बराच शुद्धीत असला पाहिजे. त्याने जे उत्कटत्वाने अनुभविले ते अनुभवीत असताना त्याला अभिव्यक्ती करता येत नाही. तो अनुभव अंतर्मनात साठविल्यानंतर त्याचा जेव्हा कवीला पुनः प्रत्यय येऊ लागतो तेव्हाच अभिव्यक्ती संभवते. ही मीमांसा लक्षात घेता ज्या वेळी काव्य स्फुरते तेव्हा आमचे आम्हाला ते समजत नाही हे समर्थन लंगडे पडते.

अनुभवाची उत्कटता, उन्मनी अवस्था, काव्य स्फुरणे, ही काय एकट्या नवकवीचीच ठेकेदारी आहे काय ? उत्कट काव्यनिर्मितीच्या या पूर्वावस्थेतून

सर्वच कवींना जावे लागते. पण यांपैकी एकाही कवीला नवकवीप्रमाणे दुर्बोधतेची बाधा झाल्याचे दिसत नाही. मग नवकाव्यच तेवढे दुर्बोध का ठरावे ? तर हा सारा पाश्चात्य वाङ्मयाच्या अंधानुकरणाचा परिणाम आहे. तेथे एखादी नवी टूम निघाली की, ताबडतोब तिचे अनुकरण करून, आपण किती अत्याधुनिक आहोत हे दाखविण्याची आंग्लविद्याविभूषितांत फॅशनच रूढ झालेली आहे. त्यामागे काही उत्कट अनुभव, आशयघनता, असली काही भानगड नाही !

आमचे काव्य उपभोगल्याखेरीज नवकाव्याचा रसास्वाद घेता येणार नाही. काव्य बुद्धिग्राह्य नाही. असेही या नवकवींच्या समर्थकांनी सांगितले. आता याही सांगण्यात या लोकांचे किती औद्धत्य आहे ते पाहा. आपल्या दुर्बोधतेची कारणमीमांसा करताना, ते अशा थाटात एकेक कारणे पुढे करीत आहेत की, जणू कोलंबसाने अमेरिकेचा शोध लावला त्याप्रमाणे त्यांनी एक नवीन शोधच लावला आहे. नवकवी हा जो ऐटबाज पवित्रा घेतात, त्यामुळे ते हास्यास्पद ठरत आहेत. आता काव्य भोगण्याचा विषय घ्या. या नवकवींच्या पूर्वी सहा शतके आधी ज्ञानदेवांनी ‘ तियांपरी श्रोता । अनुभवी हे कथा । अशी हळुपणा चिंता । आणुनिया ’ असा काव्य भोगण्याचा सिद्धांत सांगून ठेवला आहे. भवभूतीने आपल्या काव्याचे रसग्रहण करताना कोणी ‘ समानधर्मा ’ अपेक्षिला तो समानधर्मी हा काव्य भोगणाराच अपेक्षिला आहे. पण यांपैकी एकाही कवीजवळ नवकवीचा उद्धटपणा नव्हता. रसिकाला आमचे काव्य समजले नाही तर रसिकाला मूर्ख ठरवून स्वतःचे शहाणपण सिद्ध करण्याची करामत यापैकी एकाहीजवळ नव्हती. नवकवीजवळ ही करामत भरपूर आहे. फक्त त्यांच्यापाशी काव्य नाही.

असा हा दुर्बोधता-संवाद झाला. त्या दुर्बोधतेची यावरून कारणे समजली असतील तर शपथ. त्या संवादात तशा अनेक गोष्टी सांगण्यात आल्या; पण ज्यांनी या गोष्टी सांगितल्या त्या त्यांच्या त्यांना तरी समजल्या असतील की नाही, कोणास ठाऊक. वस्तुस्थिती अशी दिसते की, तृतीय श्रेणीच्या काव्याला प्रथम श्रेणी मिळवून देण्याचा हा एक पद्धतशीर प्रयत्न आहे आणि काही गल्लीबोळांपुरतीच या प्रयत्नाची कक्षा जोपर्यंत मर्यादित होती, तोपर्यंत त्याची दखल घेण्याचे प्रयोजन नव्हते, पण हिकमतीने किंवा मागील दरवाजाने काव्य-दरबारांत प्रतिष्ठित मानकऱ्यांना मागे रेटून पुढे येण्याचा या टोळीने प्रयत्न केला म्हणून हे एवढे लिहिणे भाग पडले. नाहीतर या नवकवींचे ते बेचव, बेसूर, तारस्वरातील काव्यवाचन मधून मधून चालते आणि श्रोत्यांचा छळवाद केल्याबद्दल त्यांना बऱ्यापैकी बिदागी मिळते, याची कोण दखल घेतो ?

( २-१-१९६६ )



ग्रा. क्र. २४८३०

अनुक्रम ४४०६३ वि: निबंध
क्रमांक १६२९ नों: दि: २५/११/८०

# साधना

मराठी साप्ताहिक

संस्थापक : **साने गुरुजी**

- शाळा-महाशाळांतील विद्यार्थी, सार्वजनिक वाचनालये आणि सुसंस्कृत अभ्यासू नागरिक यांच्यासाठीं उपयुक्त असें साप्ताहिक.
- साने गुरुजी पहिल्या निवेदनात म्हणतात : “ महाराष्ट्रात उदार विचार सर्वत्र नेण्यासाठी साधना आहे. समाजवादी तिची दृष्टि आहे. जेथे जेथे चांगला विचार दिसतो तेथून साधना घेते. नवयुगाला अनुरूप अशी विचारसंपदा देणारी साधना आहे. ”
- प्रचलित जागतिक घडामोडींची सर्वांगीण माहिती.
- विधायक कार्याचा परिचय.
- थोर व्यक्तींचे परिचय.
- समाजाच्या अज्ञात आधारांची ओळख.
- आंतरभारती.
- साहित्यपरिचय.
- समाजोन्नतीच्या विविध धडपडी.
- प्रचलित आंदोलने.
- मुलांच्या मेळाव्यात इ. इ.

वार्षिक वर्गणी १५ रुपये

सहामाही वर्गणी ८ रुपये

४३०-३१ शनिवार पेठ, पुणे २.

दा. क्र. १५६९

REFBK-0015930

# साधना २री आवृत्ती

ट्वेंटिएथ सेंचरि

स्टुडन्टस् **डिक्शनरी**

संपादक :

प्रि. रा. प. सबनीस, एम्. ए. (कॅन्टब)

प्रि. डॉ. ना. य. डोळे, एम्. ए. पीएच्. डी.

पृष्ठे ९६० किंमत ७ रुपये

उपलब्ध असलेल्या इंग्रजी - इंग्रजी - मराठी शब्दकोशांतील उणीवा दूर करून अधिक विस्तृत प्रमाणावर शब्द आणि अर्थ देणारा, इंग्रजी शिक्षणाचा प्रारंभ करणाऱ्या विद्यार्थ्यांपासून पदवी परीक्षांपर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या सर्व गरजा भागविणारा बृहद्कोश.

साधना प्रकाशन, पुणे २

# नवी पुस्तके

## जीवनभाष्ये

जे. कृष्णमूर्ती

अनु. सौ. विमलाबाई देशपांडे

*प्रवाही, प्रसन्न व तेजस्वी जीवन कसे जगावे यावरील सखोल चर्चा*

## तरीही हात शिवशिवतच राहिले

लीलाधर हेगडे

*नेफा आघाडीवरील जिद्दीने एकाकी लढत राहिलेल्या शूर जवानाची रोमहर्षक कहाणी*

## सैकत

अनिरुद्ध पुनर्वसु

*मृगजळाबाहेरील वास्तवाचे दर्शन घडविणारे पुस्तक*

## भ्रमरासी चारा सुगंधाचा

शांताराम रामचंद्र शिंदे

*रसिकाला गुंगवून टाकणारी, समर्थ शैलीची कादंबरी*

## हाजीपीर

ग. प्र प्रधान

*युनेस्को पारितोषिक विजेते*

## वाजे पाऊल आपुले

विश्राम बेडेकर

*सामाजिक गद्य नाटक*

ही आणि शिवाय आणखी खूप. सूची मागवा.

# सा ध ना  प्र का श न,  पुणे